IRBK-0100102

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे

विषय निबंध

दा क्र १०२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें

संग्रहालय शाखा.

| अनुक्रम नं. | विभाग | क्रमांक |
| --- | --- | --- |

पुस्तकाचें नांव

लेखक

सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका. पुस्तकाची खराबी करूं नका.

IRBK-0100102

IRBK-0100102

निबंध
१२८
१

JUN 1979 दा.क्र.-१०२.

# स्त्रियांचा स्वर्ग.

गाव्हाळे ... 
ता. २.८.२८

लेखक

## सौ. गिरिजाबाई केळकर.

( 'गृहिणीभूषण' व 'पुरुषांचें बंड' या पुस्तकांची कर्त्री. )

७०२ .
निबंध .

प्रकाशक—परचुरे पुराणिक आणि मंडळी माधवबाग मुंबई ४.

आवृत्ति दुसरी.

( सर्व हक्क राखून ठेविले आहेत. )

किंमत १॥ रुपाया.

IRBK-0100102

हें पुस्तक

पुणें येथें ' आर्यभूषण ' छापखान्यांत रा. अनंत विनायक **पटवर्धन** यांनीं छापिलें व जळगांव येथें सौ. गिरिजाबाई केळकर यांनीं प्रसिद्ध केलें.

# अर्पणपत्रिका.

जिच्या प्रेमळ व सच्छील वर्तनाचें चित्र
ज्या बुकांत आहे त्या बुकाचें रूपांतर
मराठींत करण्याची स्फूर्ति मला
जिच्या प्रेमळ व सात्विक सह-
वासामुळें झाली त्या माझ्या
परमपूज्य व प्रिय मातोश्री
यांस हें पुस्तक मीं
नम्रतापूर्वक अर्पण
केलें आहे.

ग्रंथकर्त्री.

# उपोद्घात.

इ. स. १९०७ सालीं आम्हीं मालेगांव मुक्कामीं असतांना आमचे स्नेही श्री डॉ. वरजीवनदास दामोदरदास मर्चंट अ. सर्जन ह्यांनीं मला गुजराथी समजतें असें कळल्यावरून " स्त्रिओनुं स्वर्ग " हें वाचनीय पुस्तक भेटीदाखल दिलें. पुढें तें पुस्तक वाचतां वाचतां माझ्या मनांत असें विचार आले कीं, या पुस्तकाचें मराठी भाषांतर झाल्यास आपल्या महाराष्ट्र बंधुभगिनींना त्याचा फार उपयोग होईल. असें वाटतोच मीं तें पुस्तक पुन्हां एकदां त्या दृष्टीनें पाहिलें व माझा तो विचार मीं तिकडे कळविला तेव्हां स्वतःही माझ्या म्हणण्याला उत्तेजन देऊन मला तें काम करण्यास सांगितलें. तेव्हां पुढें मीं त्या पुस्तकाच्या कर्त्याची म्हणजे श्री. रा. रा. वैद्य अमृतलाल सुंदरजी पाढियार यांची परवानगी मागण्याचा प्रयत्न केला, पण त्यांचें वसतिस्थान चोरवाड असल्यामुळें माझीं मुंबईचे पत्त्यावर लिहिलेलीं दोन्हीं पत्रें परत आलीं. त्यामुळें, जरी माझा विचार ती गोष्ट ताबडतोब अमलांत आणण्याचा होता तरी तसें करतां आलें नाहीं. पुढें एकदां एका गुजराथी मासिकांत वर्गणीदारांच्या नांवाची यादी मी सहज चाळीत असतां मला त्यांत वरील ग्रंथकारांचा पत्ता आढळला व लागलीच माझी जुनी इच्छा ताबडतोब जागृत झाली. त्याप्रमाणें मीं त्यांना पत्र घालून परवानगी मागितली व त्यांनीं मोठ्या आनंदानें मला आपल्या पुस्तकाचें भाषांतर करण्याची परवानगी दिली. आतां हें पुस्तक पूर्ण होऊन बाहेर पडत आहे.

हें पुस्तक मूळ गुजराथी आहे, परंतु त्याचें मराठींत रूपांतर करतांना मीं त्याचें अक्षरशः भाषांतर केलें नाहीं. ह्या पुस्तकांतला कांहीं भाग आपल्या लोकांना फार पाल्हाळीक व कंटाळवाणा वाटण्याजोगा होता, सबब मीं तो थोडक्यांत आटोपला आहे. शिवाय ग्रंथकारानें जीं बंगाली पात्रें कल्पून त्यांची थोड्या जास्त पुढें गेलेल्या राहाणीची

छाया क्वचित् ठिकाणीं दाखविली आहे तेथें मला त्याला बरेंच सौम्य रूप द्यावें लागलें आहे. अशा रीतीनें मीं जरी रूपांतर केलें आहे तरी मूळ ग्रंथांतली तत्वें व रस यांची हानि कोठेंही न होऊं देण्याची मीं शक्य तितकी खबरदारी घेतली आहे.

ह्या पुस्तकाच्या विषयाची एकंदर कल्पना त्याच्या नांवावरून होतच आहे. ह्या पुस्तकांतील बरेच विचार आपल्या हल्लींच्या समाजस्थितींत मनन करण्यायोग्य आहेत. निदान ते एक वेळ वाचण्यायोग्य तरी आहेत असें मला वाटतें. हल्लीं आम्हीं स्त्रियांनीं कसें वागावें व आम्हांला कसें वागवावें, ह्यासंबंधीं वाटाघाट सुरू आहे. अशा वेळीं जुन्या व नव्या दोन्ही पक्षांला वाचण्यायोग्य व विचार करण्यायोग्य, असें ह्यांत कांहीं तरी सांपडेल असें मला वाटतें. हल्लींच्या आम्हां स्त्रियांना परतंत्रतेच्या सांखळींत राहूनही ह्या असार संसाराला सारपूर्ण कसें करतां येईल व आपली योग्यता पुरती ओळखल्यास क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टींपासून सुद्धां केवढा परमार्थ मिळवितां येईल, व आपल्या सुशील व प्रेमळ आचरणानें विशेष शिक्षणाशिवाय सुद्धां या मृत्युलोकाला स्वर्ग कसें बनवितां येईल, हें मूळ ग्रंथकारानें अगदीं साध्या व सोप्या शब्दांत दाखविलें आहे, तें माझ्या बंधुभगिनींना कितपत रुचतें तें पहाणें आहे..

या पुस्तकाची प्रस्तावना श्रीयुत रा. रा. वासुदेवराव गोविंद आपटे ह्यांच्यासारख्या योग्य व अधिकारी माणसाच्या हातून लिहिली गेली आहे. त्यांत त्यांनीं ह्या पुस्तकाचा समाजाला कसा उपयोग होईल हें चांगल्या प्रकारें दाखविलें आहे व अशा रीतीनें त्यांनीं माझ्या विनंतीला मान देऊन जे उपकार केले त्याबद्दल मी त्यांची फार आभारी आहें.

शेवटीं ह्या पुस्तकाचें छपाईचें वगैरे काम व्यवस्थेशीर झालें ह्याबद्दल 'ज्ञानप्रकाश' कर्त्यांचे आभार मानून हा उपोद्घात पुरा करतें.

ता. २४।११।१२. सौ. गिरिजाबाई केळकर.

# प्रस्तावना.

प्रत्येक व्यक्तीचे ठायीं तिची मूल प्रकृति, आनुवंशिक संस्कार, शिक्षण व संवयी यांनीं एकप्रकारचें विशेषत्व आलेलें असतें आणि वैद्यानें औषधोपचाराची योजना करतांना व शिक्षकानें शिक्षणपद्धति ठरवितांना त्या विशेषत्वाला धक्का न लावितां इष्ट हेतु जेणेंकरून साध्य होतील असे उपचार देशकालमानाप्रमाणें योजिले पाहिजेत, तरच ते श्रेयस्कर होतात. त्यांत थोडेंसें कोडें चुकलें कीं सगळें यंत्र बिघडतें. समाजसंस्कारकांनींही या नियमाकडे लक्ष देऊन आपल्या प्रयत्नाचें धोरण ठेविलें तर त्यांनीं सुरू केलेलें सुधारणेचें कार्य यशस्वी व सुपरिणामी होतें. पण आमच्या इकडे ज्या महात्म्यांनीं सदिच्छेनें प्रेरित होऊन पाश्चात्य शिक्षण सुरू केलें व पाश्चात्य पद्धतीवर समाजसुधारणा करण्याचा ओनामा केला, त्यांनीं आमच्या समाजाच्या मूळ प्रकृतीकडे फारसें लक्ष न देतां डोळे मिटून पाश्चात्यांचें अनुकरण करण्याचा धडा घालून दिला. याचा परिणाम आमच्या समाजाच्या प्रकृतिगत विशेषत्वाला हानि घडण्यापर्यंत अनिष्ट झाला आहे. याच्या उलट दहा पांच हजार वर्षांपूर्वींच्या चालीरीती, तत्कालीन आचारविचार व समाजरचना यांचें पुनरुज्जीवन करूं पाहणारेही तसेच चुकत आहेत व नकळत समाजाची हानि करीत आहेत. एक समाजाच्या प्रकृतीकडे न पाहतां व त्याच्या विशेषत्वाला न जपतां सरसहा पाश्चात्य सुधारणेची नक्कल करूं पाहातात, तर दुसरे देशकालवर्तमान न पाहतां परिस्थितींत घडलेली क्रांति लक्षांत न घेतां, कलियुगांतल्या कालाशीं कृतयुगांतील नियम जोडूं पाहतात ! मिळून प्रकृतिमान आणि देशकालमान या दोघांचाही विचार करून सामाजिक व्याधीवर औषधी योजना करणाऱ्या धन्वन्तऱ्यांची सध्यांच्या काळीं मोठी उणीव आहे. ही उणीव गेल्या पन्नास वर्षांत आहे तशीच आहे. ती अद्याप भरून निघाली नाहीं.

श्री० सौ० गिरजाबाई केळकर यांनीं आपल्या 'गृहिणी-भूषण' या पुस्तकांत सामाजिक सुधारणेचें एक अंग जें स्त्रीशिक्षण त्यासंबंधांत आमच्या समाजाच्या प्रकृतीचा व परिस्थितीचा विचार न करतां स्त्रीशिक्षणाची पाश्चात्य पद्धति आमच्या इकडे डोळे झांकून प्रचारांत आणण्यांत झालेल्या चुकीचें आविष्करण केल्यामुळें कित्येक मंडळींचा त्यांच्यावर घुस्सा झाला आहे, आणि त्यांचें म्हणणें नीट समजून न घेतां एका उतावळ्या लेखकानें 'विविधज्ञान-विस्तारा'सारख्या सन्मान्य मासिक पुस्तकांत त्यांच्यावर निष्कारण उतावळेपणानें टीकाही केली आहे. मला वाटतें कीं, श्री. सौ. गिरिजाबाई यांनीं लिहिलेलें 'स्त्रियांचा स्वर्ग' हें पुस्तक शांत चित्तानें वाचून व त्यांत चित्रित केलेला हिंदु स्त्रीत्वाचा आदर्श पूर्णपणें लक्षांत घेऊन मग त्यांच्या स्त्रीशिक्षणविषयक विचारांची छाननी केली तर त्यांच्या विचारांत सत्य व मनन करण्यास योग्य असा पुष्कळ भाग आहे असें कोणासही आढळून येईल. मतलबी पुरुष शास्त्रकारांनीं स्त्रियांविषयीं अन्याय केला, त्यांचे हक्क पायांखालीं तुडविले, त्यांना पुरुषांची गुलामगिरी करण्यास लाविलें, इ० वाक्यांची पुनरावृत्ति होतां होतां आपल्या समाजांत वादविवादाची उष्णता एकेकाळीं इतकी वाढली होती कीं, मनूसारख्या स्मृतिकारांना शिव्या मोजण्यापर्यंत पाळी आली होती ! सुदैवानें तो काळ हळू हळू जात चालला आहे व आमचा जुना हिंदु स्त्रीत्वाचा आदर्श कशा प्रकारचा आहे हें पाहण्याची मनःपूर्वक इच्छा कित्येकांस होऊं लागली आहे. आमच्या शास्त्रवचनांचा रहस्योद्ग्राही पद्धतीनें अर्थ लावण्याकडे विचारी लोकांची प्रवृत्ति होत आहे, पाश्चात्य पद्धतीविषयींचा गैरसमज व दुराग्रहही कमी कमी होत चालला आहे व पूर्व आणि पश्चिम या दोहोंतल्या गुणांचा मिलाफ करून व आमच्या समाजाची प्रकृति व देशकालमान यांचा पूर्ण विचार करून सुधारणेची दिशा ठरविली पाहिजे, असें पुष्कळांना वाटूं लागलें आहे. अशा वेळीं हिंदु स्त्रीत्वाचा आदर्श पुढें मांड-

णारे व खरी सेवा, खरें प्रेम, 'लग्न' शब्दाचा खरा अर्थ, स्त्रियांच्या हक्कांचा प्रश्न, स्त्रीशिक्षणाची इष्ट दिशा इ० विषयांची प्राच्य पद्धतीनें उत्तम प्रकारें फोड करणारें पुस्तक लिहून, श्री. सौ. गिरिजाबाई यांनीं महाराष्ट्र वाङ्मयाची, महाराष्ट्र समाजाची व त्याबरोबरच समाजसुधारणेच्याही कार्याची बरीच मोठी सेवा केली आहे असें म्हटलें पाहिजे. त्यांनीं ज्या मूळ गुजराथी पुस्तकाचें भाषांतर केलें आहे, त्यांत प्रतिपादिलेले सगळेच विचार तर्कशास्त्राच्या व विचाराच्या कसोटीला कदाचित् उतणार नाहींत. अलंकाराच्या भाराखालीं खऱ्या अर्थाचा गुदमाराही क्वचित् ठिकाणीं झाला असेल, किंवा प्राच्य आदर्शाविषयींचें वकीलपत्र मूळ लेखकानें घेतलें आहे, असाही भास कांहीं प्रसंगीं होईल; पण सदर पुस्तकाच्या वाचनानें हिंदु स्त्रीत्वाच्या आदर्शाची बरीचशी स्पष्ट कल्पना होऊन त्याविषयीं शांत मनानें व निर्विकल्प बुद्धीनें विचार करण्याची स्फूर्ति वाचकांच्या मनाला होईल. हें भाषांतर करण्यांत ग्रंथकर्त्रीचेंही याहून कांहीं अधिक उद्दिष्ट असेल असें मला वाटत नाहीं.

शेवटीं श्री० सौ० गिरिजाबाईंनीं आपल्या पुस्तकासाठीं ही प्रस्तावना लिहिण्याचें काम मला सांगून माझा जो गौरव केला त्याबद्दल त्यांचे आभार मानून आणि टीकाकारांच्या कटूक्तीनें मनाचा धीर न खचूं देतां त्यांनीं आपला लेखनव्यवसाय अव्याहत ठेवावा व आपले विचार लोकांस रुचतील कीं अप्रिय होतील याचा विचार न करतां ते निर्भीडपणें लोकांपुढें मांडण्याचा प्रयत्न असाच चालू ठेवावा, अशी त्यांना विनंति करून मी वाचकांची रजा घेतों.

आनंद-कार्यालय, पुणें.
ता. २३-११-१२.

वासुदेव गोविंद आपटे.

# दुसरे आवृत्तीची प्रस्तावना.

हें पुस्तक १९१२ सालीं प्रसिद्ध झालें व पहिली आवृत्ति ४ वर्षांत खपली परंतु लढाईमुळें झालेल्या कागदाचे महागाईमुळें नवीन आवृत्ती छापणें मागें पडलें असून ही कागदाची महागाई कमी झाली नाहीं, परंतु पुस्तकास मागणी फार असल्यानें तें छापले आहे व त्याची किंमत निरुपायानें वाढविली आहे, याबद्दल दिलगिरी वाटते. ही आवृत्ती आर्यभूषण छापखान्याचे म्यानेजर यांनीं लवकर व काळजीपूर्वक छापलेबद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे.

जळगांव, मनोहर भुवन,
ता. ७।३।१९२१.

सौ० गिरिजाबाई केळकर.

# स्त्रियांचा स्वर्ग.

## थोडीशी जुनी आठवण.

माई, आठवण आहे का ? जेव्हां तुमची तारुण्यावस्था होती, तेव्हां आपण एक वेळ नावेंत बसून गंगेमध्यें फिरत फिरत शरदृतूंतील चंद्राला पाहात होतों, तो देखावा लक्षांत आहे का? वसंतप्यारी, मी आणि राधा वगैरे वरच्या अंगाला होतों, आणि तुम्ही खालीं माझ्या भावाबरोबर—आपल्या पतीबरोबर—पत्त्यांनीं खेळत होतां, त्यावेळेस समोरच्या खिडकींतून पौर्णिमेच्या ताटाएवढ्या चंद्राचं तेज तुमच्या नाजुकशा तोंडावर पडत होतं, आणि त्याच सुमारास, तुम्हीं डाव जिंकला होता म्हणून तुमच्या हुषारीवर संतुष्ट होऊन माझ्या भावानं तुमच्या हंसत्या मुखाला चंद्राची उपमा देऊन, तुम्हाला 'चंद्रमुखी' म्हटलं होतं, त्यामुळं तुम्हांला अतिशय आनंद झाला होता, आणि तुम्ही आमच्याजवळ वर आलां होतां तें आठवतं का ? तुम्ही येण्यापूर्वीं मदनमंजरी तुमच्या जवळून उठून आमच्याजवळ येऊन सांगून गेली कीं, भाऊकडून वहिनींना आज चंद्राची उपमा मिळाली आहे. हें ऐकून वसंतप्यारी म्हणाली, ' आपण येथें एकट्या बसलों आहोंत आणि ती खालीं नवऱ्याशीं चैन करते आहे, तेव्हां आपण तिची कांहीं गंमत केली पाहिजे. ' राधा म्हणाली, हो हो' खरी गोष्ट आहे. जरूर कांहीं तरी केलेंच पाहिजे. कमला म्हणाली, तरलिकेची थोडी चेष्टा करणं कांहीं मोठीशी गोष्ट नाहीं. ' मीं म्हटलें, ' जाऊं द्या. तिच्या डोक्यांत कांहीं वेड शिरलं तर पुन. लवकर निघा-

यचं नाहीं.' वसंतप्यारी म्हणाली, 'नाहीं. तसें होणार नाहीं. आपला वेळ कसा जाईल? जरा कांहीं गंमत तर झाली पाहिजे. तिला वाईट वाटेल असं आपण कशाला बोलावं? अशीच कांहीं तरी गंमत करूं.' राधा म्हणाली, आतां ती हंसत हंसत येथें येईल. तेव्हां मी विचारीन कीं, कायम तुझ्या नवऱ्यानं तुला काय शिवी दिली? तें ऐकून ती विचारांत पडेल. मग आपण हंसूं, म्हणजे ती चिडेल. मग गंमत होईल.' राधेची ती गोष्ट ऐकून, मला राधाकृष्णाच्या एका प्रसंगाची आठवण झाली, त्यामुळें मीं म्हटलें, 'हो हो, ही युक्ति ठीक आहे. त्यानंतरचं काम मला करतां येतं आहे.' अशा गोष्टी बोलत होतों, तों तुम्ही आमच्या-करितां विडे घेऊन हंसत हंसत वर आलात—त्याबरोबर वसंतप्यारी म्हणाली, वहिनी, उदास कां दिसतां?' तेव्हां राधा म्हणाली, 'तुमच्या भावानं कांहीं शिवीबिवी दिली असेल!' तशी आपल्या सफेत मांजरीशीं खेळत बसलेली मदनमंजरी म्हणाली, 'आज तर मा[illegible]नं वहिनीला 'चंद्र' केलं.' मीं म्हटलं कीं, 'हं! वहिनीला 'चंद्र' बन-वलं आहे' तेव्हां खरोखरच शिवी! राधेचं अनुमान बरोबर आहे.' हें ऐकून तुम्ही म्हणालांत, 'ह्यांत शिवी कसली? ही तर खुबी आहे. स्त्रियांच्या मुखाला कवि तर वारंवार चंद्राची उपमा देतात.' वसंतप्यारी म्हणाली 'वहिनी आहेत चंद्रासारख्याच रसिक.' राधा म्हणाली, 'वसंतप्यारी तुम्हीहि वहिनीची चेष्टाच करतां कां? चंद्राच्या उपमेचा अर्थ काय, तें वडील बहिणीला विचारून तर पहा.' मीं म्हटलं एक वेळां खेळाडु कृष्णानें राधेला 'चंद्रमुखी' ची उपमा दिली होती, त्यामुळं राधा रुसली होती, आणि शेवटीं कृष्णाला राधेची क्षमा मागावी लागली.' वसंतप्यारी म्हणाली, 'अगबाई! कृष्णाला क्षमा मागावी लागली! एवढं मोठं त्या राधेच्या उपमेंत काय आहे, तें सांगा तर खरं!'

---

चंद्रमुखी' म्हटल्यामुळं राधा रुसली.

मीं म्हटलं, ‘ रसिकांचा आनंद ’ नांवाच्या मासिकपुस्तकांत ही गाष्ट आली होती, आणि तिकडून तिचा अर्थ मला समजावून सांगणं झालं. त्यांत असं होतं कीं, एक वेळां शरदृतूंतील पौर्णिमेला, यमुनेच्या तीरीं श्रीकृष्ण रास खेळत होते, तेव्हां अतिशय प्रेमांत येऊन राधेला म्हणाले कीं, तुझं तोंड ह्या पौर्णिमेच्या चंद्रासारखं आहें तें ऐकून राधा विचारांत पडली कीं, हे म्हणतात काय ? मी चंद्रासारखी आहें ? माझ्या प्रेमाचं मूल्य चंद्राबरोबर ? माझा आणि चंद्राचा संबंध काय ? मला चिडवायु-साठीं अशी हलकी उपमा द्यावी ?—असें समजून राधा म्हणाली कीं, ‘ काय ? मी चंद्र ? चंद्र जड आहे. तुम्ही मला जड समजतां काय ? चंद्र कलंकित आहे. माझ्यांत काय कलंक आहे तो सांगा, चंद्र क्षय-वृद्धीचा रोगी आहे. माझं प्रेम असं कमीजास्त होणारं आहे काय? चंद्र परप्रकाशित आहे. मी काय परप्रकाशित आहें ? तुम्ही तर म्हणतां कीं, तुझ्यामुळं मी शोभतों म्हणून आणि मला परप्रकाशिताची उपमा कां देतां ? माझ्या प्रेमाची तुम्ही अशी किंमत कर-णारे आहां आणि तुम्ही मला अशी उपमा द्याल हें मला ठाऊकही नव्हतं. माझ्याजवळून पळून जायची युक्ति तर चांगली आहे. बरं आहे, जा जा, तुमच्या इच्छेस वाटेल तिकडे जा. ’ असं म्हणून राधा रुसली.

वसंतप्यारीनं विचारलंन्, ‘ मग काय झालं ? ’ ‘ मग श्रीकृष्णानं राधेची पुष्कळ पुष्कळ समजूत केलीन, पण तिचा राग गेला नाहीं. शेवटीं श्रीकृष्णानं राधेच्या पायां पडून, किरीट उतरून ठेवला आणि क्षमा मागितली; तेव्हां कुठं जेमतेम राधेची समजूत झाली. ’

वसंतप्यारी म्हणाली, ‘ आहा ! श्रीकृष्ण स्वतः राधेच्या पायां पडले, तेव्हां भाऊंनीं वहिनींची माफी मागितल्यास नवल कोणतं ? ’

राधा म्हणाली, ‘वहिनींच्यांत पराक्रम असेल तर भाऊरावसुद्धां क्षमा मागतील, नाहीं तर कसली क्षमा ? अशी क्षमा कांहीं रस्त्यावर नाहीं पडली. अशी राधेसारखी खंबीर बायको एखादीच. ह्या भोळ्या वहि-

नींच्या हातून काय होतं आहे ? आत्तां इकडे तिकडे करून देतील समजूत घालून.'

मथुरा म्हणाली, ' अशी कांहीं तरलिका समजायूसारखी नाहीं. जर अशी समजूत झाली तर आपण तिला कच्ची समजूं. कारण कीं, चंद्राची उपमा फार वाईट.'

वसंतप्यारी म्हणाली, ' वहिनी संभाळा.'

राधा म्हणाली, 'अरेरेरेरे ! ही उपमा तर फारच वाईट. चंद्राच्या ह्या इतक्या गोष्टी कांहीं मला ठाऊक नव्हत्या. जर मला कुणीं असली उपमा दिली तर चाळणींत पाणी घालून बुडून मरावं लागेल.'

अशा गोष्टी चालताहेत तों मदनमंजरी धांवत धांवत येऊन सांगूं लागली कीं, भाऊ आपल्या मित्रांना सांगताहेत कीं, ' आज तर मीं दोन चंद्र पाहिले.'

रावसाहेब म्हणाले, एक चंद्र पहाण्यानं श्रीकृष्णासारख्या महात्म्यावर चोरीचा आळ आला ! तेव्हां दोन चंद्र पहाण्याचं फळ कोण जाणे काय मिळेल तें ?

चंद्रसेन म्हणाले, ' थंड वेळ आहे, बात मारण्यांत कांहीं बाकी ठेवूं नका. भल्या माणसा, कधीं दोन चंद्र पाहिले होतेस ?'

रामराव म्हणाले, ' गृहस्थहो, दुनियेंत एक चंद्र आहे, पण आपल्या मित्रानं दोन चंद्र पाहिले आहेत, तेव्हां आपल्या पृथ्वीला दोन चंद्र मिळवून दिल्याबद्दल मी सर्वांतर्फे साहेबांचे आभार मानतों.'

चंद्रसेन म्हणाले, ' राजेश्री, दुसरा चंद्र कुठें आहे तो तर सांगा. मग तुमचं भाषण चालूं द्या.'

शिवरामपंत म्हणाले, ' माझी तरलिका—माझी लाडकी—हा माझा दुसरा चंद्र आहे. ह्या चंद्राबरोबर तिच्या मुखचंद्राला जोडून पहाण्याची आज फार चांगली वेळ मिळाली होती.'

चंद्रसेन म्हणाले, " ओहोहोहो ! फार मोठा चंद्र ! शोध तर फार मोठा केलात ! मला वाटलें कसला शोध असेल नी कसला नाहीं. पण ही तर बाईलवेडेपणाची गोष्ट सांगितलीत. आपल्या बायकोची स्तुति करतांना, तुम्हांला लाज कशी नाहीं वाटली ? "

शिवरामपंत म्हणाले, ' चंद्रसेन, तुम्ही गणिताचे प्रोफेसर आहां, तेव्हां तुमचा हिशेब, फार लांब लांब असणार, पण जोंपर्यंत तुम्ही ब्रह्मचारी आहां तोंपर्यंत ह्या बाबतींत मत देण्याचा तुम्हांला अधिकार नाहीं. कारण तुमचं मत अनुभवाशिवायचं असणार त्यामुळें तें वजनदार असूं शकणार नाहीं. तुम्हांला योग्य स्त्री मिळाली म्हणजे तिच्या स्तुतीचा स्वाद चाखल्यानंतर ह्या बाबतींत मत देत जा.'

रामराव म्हणाले, 'तेव्हां तुम्हीं तिला चंद्राची उपमा दिली असेल ?'

शिवरामपंत म्हणाले, ' होय तर. त्यांत काय संशय ! '

रावसाहेब म्हणाले,' ती तर हीन उपमा आहे. कारण चंद्र लहान असून शिवाय उपग्रह आहे. जीं माणसं असं समजतात कीं, स्त्रिया आपल्याहून हलक्या आहेत, कमी हक्कदार आहेत, कमी प्रेमळ आहेत, ते अशी उपमा देतात. पण आपण स्त्रिया पुरुषांच्या समान हक्कदार आहेत असं म्हणतों, आणि त्यांत तर तुम्ही प्रेमाच्या वरच्या कोटींत आहां. तेव्हां तुमच्यानं अशी हलकी उपमा कशी देववते ? '

मदनमंजरीची ही गोष्ट ऐकून कमला म्हणाली, ' अगबाई ! पाहिलंत ? तिथेंसुद्धां बायकोचीच फजिती. '

वसंतप्यारी म्हणाली, ' वहिनी, हें तर फार झालं, तिथेंही तुमची थट्टा झाली. '

माझ्याकडे पाहून मला खूण करून वसंतप्यारी म्हणाली, ' ताई, आज भाऊरावांना काय झालं आहे ? वहिनीची ही फजिती काय आरंभली आहे ? '

मीं म्हटलं ' तशी उपमा देण्याचें काय कारण असेल ह्या बाबतींतील त्यांचा खुलासा ऐकला पाहिजे. '

' आमचं इतकं बोलणं तुम्हांला चिडवायला पाहिजे होतं त्यापेक्षां जास्त होतं. त्या वेळेस तुम्हाला सगळं खरं वाटलं. मला हलकी उपमा दिली आहे आणि माझी मस्करी आरंभली आहे, असं वाटून तुम्ही वाईट तोंड करून उठलांत आणि खालीं आपल्या प्रियकराशीं भांडायला मेलांत. '

तुम्ही खालीं जातांक्षणींच तुमच्या प्रियकरानीं साभिमान मुद्रेनं तुमच्याकडे पाहून, रसिकतेनं म्हटलं कीं, ' यावंत चंद्रमुखी. ' तम्हीं म्हटलंत, ' जळलं तें. मला अशा शिव्या कां देतां ? मी तुमच्यासारखी शिकलेली नाहीं म्हणून मला हवं तें म्हणावं कां ? तुम्ही तुमच्या मित्रमंडळींत सुद्धां मला असल्या उपमा देतां, तें मला आवडणार नाहीं. तुमच्याबरोबर फिरायच्यास येण्याचं फळ हेंच कीं नाहीं ? असली मजा मला नको, मला मातुश्रीजवळ पाठवा, मला आतां इथं राह्यचं नाहीं, ' असं म्हणून तुम्हीं आपल्या कपड्याच्या पेटीकडे गेलांत. तुमचे प्रियकर तें ऐकून चकित होऊन विचारांत पडले. त्यांच्या चेहे-ऱ्यावर एका पळांत दिलगिरी पसरली आणि तुमच्याजवळ येऊन तुम्ही तोंडापर्यंत घेतलेला पदर मागें मागें ओढीत ते म्हणाले, ' अग वेडे, तुला काय झालं आहे ? कांहीं स्वप्नभ्रम पडलं का ? का आज तुला चंद्रमुखी म्हटलं त्याचा मान चढला ? '

हें ऐकून तुम्हीं म्हटलंत,' 'अजून 'चंद्रमुखी' च ? ही शिवी तुमच्या तोंडांतून नाहीं जाणार का ? मीं चंद्रासारखं काय केलं आहे ? '

शिवरामपंत म्हणाले, ' ह्याला तूं शिवी कां म्हणतेस ? हें तुझ्या डो-क्यांत कोणीं भरवलं ? हें काम वसंतप्यारीनं असेल. '

ह्याच्या पूर्वीं असे एक दोन प्रसंग झाले होते त्यामुळं त्यांना वाटलं कीं, बिंदेच्यासंबंधानं अशा असलेल्या विनोदांत असे प्रसंग झाल्यास

कांहीं नवल नाहीं. त्यामुळं ते हंसत हंसत आमच्याकडे आले आणि म्हणाले, ' आज वसंतप्यारीनें काय किल्ली फिरविली आहे ? '

वसंतप्यारी म्हणाली, ' कसली किल्ली ! किल्लीसंबंधीं मला कांहीं माहीत नाहीं. '

कमला म्हणाली, ' कांहीं रुसवा झाला आहे वाटतं ? '

शिवरामपंत म्हणाले, ' तुमची तशी व्यवस्थाच असेल तर का झाल्याशिवाय रहातो ? '

कमला म्हणाली, ' व्यवस्था ? व्यवस्था कसली ? रुसणार तुमची ' चंद्रमुखी ' आणि बदनामी आमची. '

शिवरामपंत म्हणाले, ' हो. तुमचीच तजवीज. कारण तुमच्या प्रिय-करानं मला आधींच सुचविलं होतं कीं, दोन चंद्र पहाण्याचं फळ काय येईल कुणाला ठाऊक ? तेव्हां आतां कृपा करून खुलासा करा म्हणजे उपाय होईल. '

वसंतप्यारी म्हणाली, ' श्रीकृष्णानं राधेला ' चंद्रमुखी ' म्हटलं, म्हणून राधा रुसली. ती गोष्ट ताई आम्हांला सांगत होत्या, ह्या पलीकडे आम्हांला कांहीं ठाऊक नाहीं. '

शिवरामपंत म्हणाले, ' 'चंद्रमुखी' म्हटल्यानं राधा रुसली ! मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. मला वाटतं चंद्राची उपमा फार उत्तम आहे. कारण चंद्रांत शांति आहे, चंद्रांत अमृत आहे, चंद्रांत सौंदर्य आहे, चंद्र दंपतीचा आनंद आहे. चंद्रांत शीतळतां आहे. चंद्रांत भरती-ओहोटी करण्याची शक्ति आहे. चंद्र देवाच्या कोटींत मोजला जातो आणि ह्या रसिक चंद्राला देवांचा देव जो महादेव त्यानें आपल्या मस्तकावर धारण केला आहे. इतकेंच नाहीं, पण महान् कवींनीं आपल्या काव्यांत नायिकेचें वर्णन करतांना, तिला चंद्राची उपमा दिलेली आहे. असंच नव्हे तर, तशी उपमा देण्यांत त्यांना आनंद वाटलेला आहे. तेव्हां मला

असं वाटतं कीं, ह्याच्याहून श्रेष्ठ अशी उपमा मजजवळ नाहीं. तीच श्रेष्ठांत श्रेष्ठ उपमा आहे. असं असून राधा कां रुसली, तें ऐकण्यासारखं आहे.'

मीं म्हटलं, चद्राची उपमा वाईट आहे, ह्याकरितां कांहीं राधा रुसली असं नाहीं, पण तें फक्त एक निमित्त होतें. खरी गोष्ट तर अशी आहे कीं, कृष्णांनीं दुसरीकडे कुठें जायचं कबूल केलं होतं, हें ललितेच्या मार्फत राधेला समजलं होतं. त्यामुळं कृष्णाला तिकडे न जाऊं देण्याकरितां 'चंद्रमुखी' ची उपमा न आवडल्याचं निमित्त करून रुसण्यांत, वादविवादांत सारी रात्र घालवून, कृष्णाला जाऊं दिलं नाहीं हा राधेचा चतुरपणा आहे. ह्यांत कांहीं चंद्राची उपमा वाईट हा मुद्दा नाहीं.'

शिवरामपंत म्हणाले, 'अहो, ही तर खुबीची गोष्ट. चंद्राची उपमा आवडत नाहीं म्हणून राधेनं आपलं काम करून घेतलंन्, आणखी उलट कृष्ण फसले गेले.'

कमला म्हणाली, 'जर असं नसेल तर बायकांची चतुरता ती काय?'

शिवरामपंत म्हणाले, 'ही पहाना चतुरता! तोंड वाईट करून कोपऱ्यांत बसून विनाकारण त्रास करून घेणं चाललं आहे. हीसुद्धां एक प्रकारची चतुरताच आहे.'

मीं म्हटलं, 'वहिनी, राधेनं आपली बाजू जिंकली, पण तुम्ही मात्र हरलांत.'

तुम्हीं म्हटलंत, 'हा सर्व दोष तुमचा आहे. राधेनं कृष्णाला आवडण्यासाठीं ही युक्ति केली असं कुठें सांगितलंत?'

वसंतप्यारी म्हणाली, 'ती गोष्ट पुरती कुठं झाली? चंद्राच्या उपमेचे दोष सांगितले इतक्यांत तुम्हीं रुसलांत'

नागर ४०२

राधा म्हणाली, ' पुरती गोष्ट ऐकण्यापूर्वी रुसल्या, तेव्हां राधेप्रमाणं त्यांनींही आपल्या नवऱ्यासंबंधीं कांहीं ऐकलं असेल. '

कमला म्हणाली, ' तरलिका ही राधेसारखीच आहे. ती कांहीं तुह्माला जाऊं देणार नाहीं. तेव्हां आतां सांगा, तुम्हांला कुठें जायचं होतं म्हणजे आम्हीं तुम्हा मंडळीसंबंधानं सावध राहूं. '

शिवरामपंत म्हणाले, ' मला तर माझ्या चंद्राजवळ जायचं आहे. ' असं म्हणून ते खुर्चीवरून उठले. उठतां उठतां म्हणाले, ' शेवटीं राधेची समजूत कशी झाली, तें सांगायचं राहिलं. '

राधा म्हणाली, ' मुगुट काढून माफी मागितल्यानं. '

शिवरामपंतांनीं ( आपल्या डोक्यावर हात फिरवून ) म्हटलं, ' माफी मागावयास तर मी तयार आहें, पण आम्ही कांहीं मुगुट घालीत नाहीं, तेव्हां मी काय करूं ? '

वसंतप्यारी म्हणाली, ' तुम्हीं बूट काढून वहिनीजवळ ठेवा. ' तेव्हां मीं म्हटलं, हें ' काय ? ' तेव्हां मदनमंजरी मध्येंच म्हणाली, ' जसे देव तशी पूजा. '

त्यानंतर तुम्हीं तुमची चूक कबूल केलीत, इतकंच नाहीं तर अधिक विद्येची जरूरी आहे असं समजून माझ्याजवळ रोज शिकावयास येण्याचं ठरविलंत; आणि आपण सर्व नंतर हंसत हंसत पत्ते खेळावयास बसलों, तें आठवतं का ?

भक्तिमाई, कुठें त्या पोरपणाची स्थिति आणि कुठें आजची स्वर्गाची स्थिति ! आहा ! महान् प्रभूच्या पवित्र नांवांत कसं अलौकिक बळ आहे तें तर पहा. त्या नांवाच्या बळानं, त्या नांवाला अंतःकरणांत धारण करून, तुम्ही इज्जतीवर चढलां आहांत, आणि आपल्या इतर भगिनी ह्या संसाराच्या खटपटींत पडून राहिल्या आहेत. तुमच्याजवळ अशा मागल्या पुढल्या गोष्टी काढणं हा सुद्धां एक अपराध आहे. कुठें तुमचा स्वर्ग आणि

कुठें ह्या आमच्या जुन्या भाकडकथा ! मलाही आसल्या गोष्टी बोलावयास किंवा ल्याहावयास आवडत नाहींत. पण आपली पूर्वींची संसारिक स्थिति व हल्लींची दैवी स्थिति लोकांना समजावी, व त्यांनीं प्रभूच्या पवित्र नांवाचं स्मरण करावं, एवढ्याकरितां मी ही हकीकत मुद्दाम लिहीत आहें.

---

वा. न. २०५ २

# हिऱ्याचें इअररिंग.

चंद्रकुमारीच्या लग्नाची गोष्ट कांहीं विसरण्यासारखी नाहीं. त्या वेळेस जी धामधूम करून सोडली त्यानं सर्व कलकत्ता शहर गजबजून गेलं होतं. आपली सुद्धां त्या लग्नांत खूब चैन झाली. पुष्कळ मजा मारावयास सांपडली, तें आठवतं का ? आपण तो बनारशीचा नाच पहाण्याकरितां राहिलों होतों, तिथें तुमचं हिऱ्याचं इअररिंग हरवलं. पण ती गोष्ट कांहीं लहानसहान नाहीं. तिथें देखील अशा कांहीं कांहीं वस्तु हरवणं स्वाभाविकच होतं; पण तुम्ही एका मैत्रिणीच्या शिकवणीमुळं त्याचं केवढं केलंत ? तिनं तुमच्या मनांत भरवून दिलं कीं, तें तुमच्या प्रियकरांनीं त्या गाणारणीला दिलं, त्यामुळं तर तुम्ही फारच बिथरलात. ती गोष्ट तुमच्या सासूबाईच्या कानापर्यंत जाऊन, दोघींच्या रागामुळं तुमचे पति परगांवीं आपल्या स्नेह्याकडे चालते झाले ती सर्व आठवण असेलच; पण तुमच्या प्रियकराचाही त्यांत दोष नव्हता. कारण योगायोगच असा होता कीं, तुम्हाला त्यांचा राग यावा. बनारशीच्या नाचावर ते जसे दिवाणेच झाले आहेत असा त्यांचा त्या वेळचा देखावा होता. हिंडतां फिरतां ते तिच्या तोंडचं पद बडबडत; गोष्टींवरून गोष्ट निघाली कीं, ते तिची स्तुति करीत; नाचाच्या वेळीं ते उघड उघड तिला शाबासकी देत; इतकंच नव्हे, तर त्यांनीं तिला आपल्या घरीं नाचासाठीं आमंत्रणही दिलं होतं—इतकंच नव्हे तर त्या लग्नाच्या गडबडींत ते आपलीही पाहिजे तशी विचारपूस करूं शकले नाहींत. त्यामुळं तुम्ही त्यांच्यावर चिडलांच होतां, त्यामुळं तुमचा संशय दृढ होण्यास एक कारणच झालं होतं. पण त्यांत त्यांचा कांहीं मोठासा दोष नव्हता. कारण ते अगदीं मोकळ्या मनाचे होते. पण तारुण्याचा भर, नाच-गाण्याची आवड, आणि बनारशीची खुबी, ह्यामुळं ते जरूरीपेक्षां जास्त खुष झालेले दिसत. पण

तें सर्व प्रसंगाच्या आधीन होतें, त्यांत निवळ त्यांचा दोष नव्हता. पण आपल्यांत स्त्रियांमध्यें मात्सर्याची जी एक सार्वत्रिक संवय आहे, तिला तुम्ही थांबवूं शकलां नाहींत, त्यामुळं गोष्ट वाढली. त्यांनीं तुमची पुष्कळ समजूत केली कीं, अडीचशें रुपयांच्या इअररिंगांत काय आहे ? मी तुला दुसरी हजाराची जोडी आणून देतों. पण तुमची समजूत झाली नाहीं. तुम्ही म्हणालांत कीं, ' मला तेंच इअररिंग हवं ' त्यामुळं ते त्रासले. ते म्हणाले, ' हरवणार तूं आणि रागावतेस माझ्यावर ? एका इअररिंगकरितां मला त्रास देण्यास तुला कांहीं वाटत नाहीं का ? तुझ्यासाठीं जें मी इतकं करीत असतों त्याचा हा मोबदला का ? परमेश्वरा, आमच्या बायका ' प्रेम ' कधीं समजतील ? त्या केव्हां मन मोठं करूं शकतील ? ' असं म्हणून ते तोंड वाईट करून उसासा टाकून चालते झाले. तेव्हां तुमच्यांत जरा लोभी वृत्ति होती. हिऱ्याचं इअररिंग तुम्हाला फार मोठी गोष्ट आहे असं वाटत होतं. जरी तुमच्याजवळ हजारों रुपयांचं जवाहीर होतं तरी एक सुंकलं हरवलेलं तुम्हाला सहन होत नसे. पतीच्या प्रेमळ दृष्टीच्या आनंदापेक्षांही तुह्मांला दागिन्याची विशेष किंमत वाटत असे. त्यामुळंच भांडण वाढलं, पण त्यांत तुमची चूक नव्हती. कारण वयाप्रमाणं, विद्येप्रमाणं, स्वभावाप्रमाणं, आजूबाजूच्या परिस्थितीप्रमाण, माणसं चालत असतात. त्यामुळं त्या वेळेस तुमच्या मनांत तसे विचार असत, ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. त्यानंतर तुमचं तें इअररिंग आंघोळीच्या खोलींत सासूबाईंना सांपडलं. त्यामुळं तुम्हांला लाज वाटली व मग तुम्हीं माझ्या सांगण्याप्रमाणं आपल्या पतीला माफीपत्र पाठविलंत आणि सर्वच सुरळीत झालं.

त्या वेळेस २५० रु० च्या इअररिंगाकरितां तुम्हीं घाबरलां होतां आणि आतां लाखों रुपयांच्या मिळकतीवर, आणि चालू जहागिरीवर, आपल्या गरीब देशाकरितां, आपल्या पवित्र धर्माकरितां, तुम्हीं तुळशीपत्र ठेवलं आहां. असं बळीराजासारखं तुमचं मन उदार कसं झालं, ही

गोष्ट मी लोकांना समजायला हवी म्हणून विचारतें आहें, आणि त्याकरितां आपल्या स्थितीला न रुचणाऱ्या गोष्टी मला लिहाव्या लागत आहेत. मला हेंच दाखवावयाचं आहे कीं, बंधुभगिनींनो, आम्हींही तुमच्यासारखींच माणसं आहों, तुमच्यासारखे आम्हींही संसाराचे धक्के खाल्ले आहेत, तुमच्यासारखं आह्मींसुद्धां सुखदुःख पाहिलं आहे, तुमच्यासारखी आम्हींही जगाशीं शत्रुता–मित्रता ठेविली आहे, तुमच्यासारखे आम्हींसुद्धां चांगले वाईट विचार केले आहेत, आणि तुमच्यासारखे आम्हांलाही जीविताला जरूर ते सर्व व्यापार करावे लागले आहेत. आह्मीं कांहीं तुमच्याहून निराळया नाहीं, किंवा स्वर्गांतून उतरून आलों नाहींत. आम्हीं तुमच्यासारख्याच आहों, पण फरक मात्र इतकाच कीं, आम्ही प्रभुप्रेमाला पुढें करून सर्व गोष्टी करतों आणि तुम्ही स्वार्थाला पुढें करून सर्व गोष्टी करतां. म्हणून भक्तिमाईची हकीकत वाचल्याखेरीज ह्या गोष्टी पुरत्या कळणार नाहींत. त्या हकीकतीचें पुस्तक 'संसारांत स्वर्ग' हें होय. तुमचीं कामं तुमच्याकरितांच होतात, आणि आमचीं सार्वजनिक होतात, कारण आम्ही तीं 'ईश्वराकरितां' ह्या भावनेनं करतों. आम्ही मोठ्या आणि तुम्ही लहान असा कांहीं भेद नाहीं. आम्ही आणि तुम्ही सारखींच आहों. म्हणजे तुम्हींसुद्धां मनांत आणाल तर आमच्याहूनही मोठीं कामं करूं शकाल, पण आपल्यामध्यें जो फरक आहे तो हाच कीं, परमेश्वरी इच्छेला आधीन होऊन अंतःकरणाच्या प्रेरणेप्रमाणं चांगलीं कामें करायचीं असा निश्चय आम्हीं केला आहे, आणि प्रभूवर असणाऱ्या आमच्या प्रेमामुळं आमच्या त्या निश्चयाला ईश्वरी कृपेचं बळ मिळालं आहे, म्हणून आमचीं कामं तुमच्या दृष्टीनं विशेष दिसतात, पण आम्हांला तर असं वाटतं कीं, ह्या दुनियेंत जितकं करावयाचं आहे, आणि माणसं जितकं करूं शकतात, त्यांतील आम्हीं एक भागसुद्धां केला नाहीं. तुह्मी अझून ईश्वरी इच्छेच्या आधीन झालां नाहीं त्यामुळं अंतःकरणाच्या प्रेरणेप्रमाणं चालूं शकत नाहीं व या कार-

णान तुम्ही काम करण्याचा नक्की निश्चय करीत नाहीं; आणि जे लहान लहान निश्चय करतां त्यांतसुद्धां प्रेमाखेरीज, भक्तीखेरीज, खरं बळ येऊं शकत नाहीं. त्यामुळं ते विचाराबाहेर आचारांत येऊं शकत नाहींत. ज्यांना तुम्हीं मोठीं माणसं समजतां किंवा ईश्वराचे भक्त समजतां त्यांच्यांत आणि तुमच्यांत हेंच अंतर आहे. [त्यांचा आणि तुमचा आत्मा कांहीं लहान मोठा नाहीं. तसंच त्यांच्या आणि तुमच्या बुद्धींतही कांहीं पुष्कळ फरक नाहीं, पण अंतर जें आहे तें हेंच कीं, त्यांच्यांत ईश्वराच्या पवित्र स्मरणामुळं पवित्रता जास्त असते. त्यामुळं त्यांची बुद्धि सूक्ष्म तत्त्वं ग्रहण करूं शकतें आणि तुमची बुद्धि मलीनतेमुळं जरा जड झालेली असते, त्यामुळं पुष्कळ ईश्वरी संकेत तुम्ही समजूं शकत नाहीं.]

वाच हो, जर नाकमाइन मस्ताखोर मदनमंजरीच्या 'जसे देव तशी पजा' ह्या वाक्याला अंतःकरणांत ठवलं असतंन् तर ह्या बुडत चललेल्या भारताला लहानसा कां होईना जो आधार मिळतो आहे तो मिळाला असता का ? जर ती पूर्वींप्रमाणं तरलिकाच राहिली असती तर आपल्या बंधुवर्गांत ती नवीन जीवन घालूं शकती का ? ती जर आपल्या इतर भगिनींप्रमाणं 'माझ्या हातून काय होणार आहे ? ' असं म्हणती व आपला विधवेचा जन्म कोपऱ्यांत बसून राहण्यापुरताच आहे असं समजती, तर ती आपल्या आर्यधर्माला मदत केल्याबद्दलचा आनंद मिळवूं शकती का ? तारुण्यांतील उत्साह अगर प्रेम म्हणा, त्याच्या मोहांत जर ती पुरती सांपडली असती तर आज आपल्या आत्म्याची इतकी उन्नति करूं शकली असती का ? आणि असा हा संसारांत स्वर्ग भोगूं शकती का ?

बंधूंनो, आणि भगिनींनो, भक्तिमाईच्या उदाहरणांनीं लक्षांत ठेवा कीं, ह्या जगांत मोठें होण्याकरितां अगर संसारांत स्वर्ग मिळविण्याकरितां कांहीं मोठ्या माणसांची जरूरी नाहीं. त्यांत रूप किंवा पैशाची जरूरी नाहीं; किंवा अलौकिक [illegible]

जरूरी नाहीं; पण ईश्वरी इच्छेच्या आधीन होण्याची जरूरी आहे. ईश्वरी प्रेमाची जरूरी आहे. अंतःकरणापासून काम केलं पाहिजे. जर तसं कराल तर उद्यां तुम्हीसुद्धां मोठे होऊन जाल आणि संसारांत स्वर्ग भोगूं शकाल. म्हणून ज्यांतून सर्व सद्गुण मिळवितां येतात, त्या ईश्वरी प्रेमाला तुम्ही तुमच्या जीविताचं तत्व समजा म्हणजे तप, योग, याग हीं केल्याशिवाय सहजगत्या तुमच्या घरांत स्वर्ग उभा राहील; ह्याहून अधिक तें तुम्हांला काय पाहिजे ? ही गोष्ट तुम्हांला बरोबर समजण्याकरितां आणखीही थोडीं उदाहरणं द्यावीं लागतील.

चोलतां बोलतां वाईट वाटायचं, क्षुल्लक कारणावरून रुसायचं, हा जसा कांहीं स्त्रियांचा देहधर्मच आहे. जसे कांहीं हे हक्क आपल्याला वारशानं मिळालेच आहेत, अशा रीतीनें आपल्या भगिनी वागतात. आपणही कांहीं ह्या दोषांतून सुटलों नव्हतों. तुमचे दिरांनीं पद्माकराच्या लग्नाच्या वेळीं नवरीला घालण्याकरितां एक उंची मोत्यांचा कंठा घेतला होता. तेव्हां तुम्ही म्हणालांत, 'मलासुद्धां कांहीं तरी एकादा जिन्नस घेऊन द्या.' तुमच्या सासूबाई म्हणाल्या कीं, 'तुझ्यांजवळ दोन कंठे आहेत आणि मोत्यें फार महाग आहेत, तेव्हां विनाकारण--उगीच खर्च नको. दुसऱ्या कांहीं तरी चांगल्या प्रसंगीं घेऊं.' तुम्ही म्हणालांत कीं, 'माळ घ्यायची नसली, तर बांगड्यांचा एक जोड घ्या; व त्याही नाहीं तर हिऱ्याची आंगठी घेऊन द्या. कांहीं तरी ह्या प्रसंगाला मला हवं. भाऊजींचं लग्न म्हणून मला कांहींच का नको ? धाकट्या सुनेला आतां दहा हजारांचे दागिने कराल तर मला एकदोनशेंचा, कांहींच का नको ? तुमच्या यजमानानीं सांगितलें कीं, ' नाहीं. असं हट्टानं घेण्याची आमच्या घरांत चाल नाहीं. आमच्या मनांत आलं म्हणजे न मागतां हजारों रुपयांचा दागिना आणून देऊं, पण हट्टानं एक गुंजभर सोनं मिळणार नाहीं.' तुमचा हट्ट पाहून आई म्हणाली, 'भाऊ, त्यांत काय मोठी गोष्ट आहे ? तिला

आनंद वाटूं दे. ती म्हणते तशा प्रकारची एक आंगठी घेऊन दे.' पण भाऊ म्हणाला 'नाहीं. तिनं मागितली म्हणून आतां नाहीं मिळणार. माझ्या मनांत तिच्याकारितां हिऱ्याचीं कुडीं घेण्याचं होतं. व त्याकरितांच रामलाल जव्हेऱ्याला मीं काल सांगितलं होतं. तो आज सकाळीं मला दाखवून गेला. ८०० ची जोडी आहे. मला पसंत पडली म्हणून दुपारीं तुम्हांला दाखवावयास येण्यास त्याला सांगितलें आहे. मीं त्याला आतां कळवीन कीं, तूर्त त्यांची जरूरी नाहीं.' मातोश्री म्हणाल्या. 'भाऊ असं कां करतोस! तुला पसंत आहे तर ठेवून घे.' भाऊ म्हणाला, 'नाहीं. आई, नाहीं. आतां ती गोष्ट गेली. आतां कधीं योग येईल तेव्हां येईल.' तुम्ही ह्या गोष्टी ऐकून अगदीं अधीर झालांत. तुम्हांला वाटलं अरेरे!! हा तर फांसा उलटा पडला.' ८०० शेंचीं कुडीं हातांतून गेलीं, तुमच्या डोळ्यांस अश्रु आले, व मनांत कांहीं कांहीं, विचार येऊं लागले. तुम्हांला मागण्याची कांहीं जरूरी नव्हती; पण स्त्रियांच्या अधिऱ्या स्वभावाप्रमाणें दागिन्यांची हौस व थोडीशी लोभी वृत्ति, ह्याप्रमाणें आणि नयाप्रमाणें स्वाभाविकपणेंच तुम्ही बोलून चुकलांत. ही तुमची चूक तुम्हांला समजली होती तरी पण तुम्ही मोकळ्या मनानं त्याच वेळेस आपल्या प्रियकराची क्षमा मागूं शकलां नाहींत. कारण तुम्हीं आपल्या पतीला जगाच्या रहाटीप्रमाणें स्वामी समजत होतां, पण अंतःकरणापासून स्वामित्व दिलं नव्हतं; कारण तुमची प्रीति अजून कच्ची होती. तुम्हीं आपल्या अंतःकरणाची किल्ली त्यांना दिली नव्हतीत. त्यामुळं तुमच्या पतीचं स्वामित्व रजोगुणी प्रवृत्तीचं—दुनियेच्या रीतीप्रमाणें—होतं. शास्त्रांत सांगितलं आहे तसं, ईश्वराला आवडतं तसं नव्हतं. जर तशा प्रकारचा संबंध असता तर तुम्हांला मागावं लागलं नसतं व त्यांनाही म्हणावं लागलं नसतं. पण अशा प्रकारचा पतिपत्नीसंबंध जीं ईश्वराचीं कृपापात्र असतात, त्यांचाच असतो.

शेवटीं तुमचे प्रियकर कांहींसे विचारयुक्त होऊन बाहेर गेले, आणि तुम्ही डोळे पुशीत पुंशीत आपल्या खोलींत गेलांत. इतक्यांत मी माझ्या अभ्यासाच्या खोलींतून तुमच्याजवळ आलें. तुम्हांला डोळे पुसतांना पाहून मीं विचारलं, 'कां वहिनी, काय झालं ?' तेव्हां रडत रडत तुम्हीं सर्व हकीकत मला सांगितलीत. तेव्हां मीं म्हटलं, 'अग वेडे, त्यांत काय मोठीशी गोष्ट आहे ! रडावं कशासाठीं ? असं पक्कं व्हावं कीं, आपलीं कुर्डी घेऊन, नवऱ्याला आपला कान पकडायला लावावं. तेव्हां आपण खऱ्या.' तुम्हीं म्हटलंत 'तें कसं होईल ?' मी म्हणालें, 'तें जर आपल्याला स्त्रीपणानं वागतां येईल तर होईल.' तुम्हीं म्हटलंत, 'आम्ही बायका नाहीं तर कोण आहोंत ?' मीं म्हटलं, 'आपल्याला स्त्रीपणानं वागतां येत नाहीं. जर बायकांना स्त्रीत्व भोगतां येऊं लागलें तर दुनियेंत क्लेश राहावयाचे नाहींत. वहिनी, आपण फक्त स्त्रीजात असल्यामुळं लोकाचाराप्रमाणें बायका म्हणवतों, पण करितों तर पुरुषपणा. स्त्रीत्वाचीं लक्षणं कांहीं अशीं नसतात.' तुम्ही म्हणालांत, 'मग काय ? बायका म्हणजे गुलाम.' मीं म्हटलं, 'नाहीं. वहिनी, नाहीं. बायका म्हणजे स्वर्ग. वहिनी तुम्हाला ठाऊक आहे का ? ह्या दुनियेंतला पतिपत्नीसंबंध स्वर्गांतील देव व ईश्वराच्या संबंधाप्रमाणें आहे. स्वर्गांत-मोक्षांत-प्रभूच्याजवळ देवांचा व ईश्वराचा कसा आनंददायक संबंध आहे तो आपण बरोबर रीतीनें समजूं शकलों, आणि त्याप्रमाणें वागून आपणही पुढें जातां जातां देव बनलों, तर ईश्वराच्या जवळ जाऊं शकूं आणि त्याच्या स्वरूपांत मिळूं शकूं. याकरितां—तें शिकण्याकरितां—ईश्वरानें कृपा करून, ईश्वर आणि देव ह्यासंबंधाची बरोबरी ह्या दुनियेंत आपल्याला नवराबायकोच्या रूपानं दिली आहे.'

देव आणि ईश्वर ह्यांचा संबंध कसा आहे, तें तुम्हांस ठाऊक आहे. देव नेहमीं दर पळाला प्रभूच्या आधीन असावं असं इच्छितात. दीनता हेंच त्यांचं जीवन, आणि आधीनता हेंच त्यांचं कर्तव्य आहे. प्रभूच्या-

जवळ प्रेमपूर्वक हात जोडून ते त्याच्या हुकुमाची वाट पहात बसलेले असतात. त्यांच्यांत मीपणा किंवा अहंपणा मुळींच नसतो. केव्हां ईश्वर आम्हांला हुकूम करील आणि केव्हां आम्ही तो बरोबर रीतीनें बजावूं शकूं हीच भावना हमेशा त्यांच्या अंतःकरणांत खेळत असते. त्यांना कोणत्याही प्रकारच्या सुखाची उणीव नसते, पण त्यांचा आनंद प्रभूच्या स्वरूपाचं ध्यान करण्यांत व त्याचं दर्शन करण्यांतच असतो. ईश्वराची इच्छा तीच त्यांची इच्छा, ईश्वराचा हुकम तेंच त्यांचं कर्तव्य, ईश्वराचं दर्शन हेंच त्यांचं सुख, आणि त्याच्याशीं तन्मय होऊन जाणं, हीच त्यांची सार्थकता. ईश्वराची आज्ञा पाळण्याखेरीज दुसरं कांहीं समजावं असं त्यांना वाटत नाहीं. इतकंच नाहीं, तर स्वतःचं स्वतःपणसुद्धां ते विसरून गेलेले असतात. अशा दीनतेनं व अशा आधीनतेनेंच ते देवपणाला पावलेले असतात आणि त्याकरितांच आपल्या धर्मशास्त्रांतून ईश्वरानं देवांना मोठे व पूज्य मानिलेलं आहे.

देव जेव्हां असा सेवकभाव ठेवतात, तेव्हां प्रभु त्यांच्याकरितां काय करितो तें तुम्हांला माहीत आहे काय ? ईश्वर त्यांच्या सुखाकरितां हमेशा तत्पर असतो. देवांच्याकरितां त्यानं स्वर्ग केलेला आहे. देवांच्यासाठीं त्यानं मनोवांछित वस्तु देणाऱ्या कामधेनु आणि कल्पवृक्ष केलेले आहेत. देवांच्या सुखाकरितां तो अवतार घेतो. देव जेव्हां निजतात तेव्हां त्यांच्याजवळ तो आपखुषीनं पहारा करितो. देव जेव्हां त्याच्या गुणांचं गान करितात, तेव्हां तो त्यांच्यापुढें नाचतो. देव जेव्हां बसतात तेव्हां त्यांची व्यवस्था करण्याकरितां तो उभा असतो. देव जेव्हां चालण्याची इच्छा करितात, तेव्हां तो त्यांस उचलून घेतो, आणि देव जेव्हां खाण्याची इच्छा करितात, तेव्हां त्यांना उत्तमांतील उत्तम वस्तूंचा पुरवठा तो करितो. थोडक्यांत सांगावयाचं म्हणजे इतकंच कीं, देवांना सुखी पाहून आनंद मानावयाचा व त्यांच्या सुखाची अहोरात्र काळजी वहावयाची—हाच त्यांचा आनंद. असा सेव्यसेवकभावाचा देव

आणि ईश्वर यांच्यामध्यें संबंध आहे, आणि तोच संबंध जगांत स्त्रीपुरुषांमध्यें व्हावयास पाहिजे. म्हणजे जसे देव ईश्वराकरितां, तसें स्त्रियांनीं पतीकरितां केलं पाहिजे, आणि जसं ईश्वर देवांच्याकरितां करितो तसं पतीनं पत्नीच्याकरितां केलं पाहिजे, अशी आर्यशास्त्राची आज्ञा आहे आणि ईश्वराची इच्छा आहे.

---

## देवांमधील लहान-मोठेपण.

आपल्यांत जसें लहान-मोठ्या वयावर किंवा कमी अधिक सत्तेवर लहान-मोठें समजतात, तसें देवांत नाहीं. त्यांच्यांत तर ज्यांच्यांत लीनता व आधीनता असेल, किंवा अधिक श्रद्धा व अधिक प्रभुप्रेम असेल तेच मोठे. कारण देवांचा देवपणा, लीनता व प्रभुचरणीं प्रेम ह्यांतच आहे. तसेंच येथेंही असें समजावयाचें आहे कीं, ज्या स्त्रींत पतिप्रेम अधिक असतें, व आधीनता अधिक असते, तीच खरी स्त्री आहे, तीच मोठी आहे, तीच येथें आणि स्वर्गांत वंदनीय आहे. कारण तशा स्त्रिया ईश्वराच्या कृपेस पात्र असतात. आणि लक्षांत ठेवा कीं, ईश्वराची कृपा भाग्यशालीनांनाच मिळते.

---

## स्वर्गांतुन देव कसे पतन पावतात ?

कोणत्याही देवांत जेव्हां लीनता कमी होते, तेव्हां त्याच्यांत अभिमान येतो; आणि अभिमानानें त्याचें ईश्वरावरील प्रेम कमी होतें. म्हणजे स्वाभाविक रीतीनेंच त्याची आधीनता सैल पडते. कारण स्वर्गांत सुख आहे, म्हणजे जी वस्तु आनंद देऊं शकत नाहीं, व जो

प्राणी आनंद घेऊं शकत नाहीं, तो स्वर्गांत राहूं शकत नाहीं. आपल्या हातानेंच, आपल्या कर्मानेंच ते पडून जातात. देव समजतात कीं, ईश्वरी प्रेमांतून आणि जिवाच्या आधीनतेंतून स्वर्ग झालेला आहे. इतकेंच नव्हे तर त्यांचा असा अनुभव आहे कीं, ज्यांत जास्त प्रेम व जास्त आधीनता, तितका तो जास्त मोठा आणि जास्त सुखी. कारण सर्व देव प्रेमपूर्वक आधीनतेलाच इच्छितात—त्यालाच ते सुख समजतात. तेव्हां ज्यांच्यांत खरोखर आधीनता नाहीं, तो स्वर्गांत राहूं शकत नाहीं. कारण स्वर्गाची भूमि ही आपल्या पृथ्वीसारखी जड वस्तूंची बनलेली नाहीं म्हणजे आपण जसें ह्या जगांत भूमीच्या आधारानें राहतों, तसे देव स्वर्गांत स्वर्गभूमीच्या आधारानें राहत नाहींत. ते प्रभुप्रेम आणि आधीनता म्हणजे सेवाधर्माच्या सांखळीनें जोडलेले आहेत. म्हणजे ज्याची ती सांखळी तुटते, म्हणजे ज्याच्यांत लीनता कमी ऊन मीपणा येतो, तो आपल्याआपणच पडून जातो. तसेंच ज्या स्त्रीमधील आधीनता कमी होते, तिचें स्त्रीत्व कमी होतें, अर्थात् ती कर्तव्यभ्रष्ट होते आणि तिचें सुख कमी होतें. कारण स्त्रियांचें स्त्रीत्व पतिप्रेमांत आहे; आणि प्रेमांत आधीनता आहे, व आधीनतेंच सुख आहे. म्हणून लक्षांत ठेवा कीं, प्रेम कमी झाल्याशिवाय आधीनता कमी होत नाहीं. म्हणून जिच्यांत आधीनता कमी असेल, म्हणजे प्रेम कमी असेल, ती स्त्री काय कामाची ? ती बायको खरी बायको नव्हे. ज्याप्रमाणें ईश्वरी प्रेम व आधीनता हींच देवत्वाचीं लक्षणें आहेत, त्याप्रमाणें बायकांत पतिप्रेम व आधीनता असणें हींच खऱ्या स्त्रीत्वाचीं लक्षणें होत. हीं जिच्यांत नाहींत, ती खरी ' बायको ' नाहीं. बायको बायकोपणांतून निघाली, तर त्यापासून काय हानि आहे, हें समजण्याकरितां देवांचीं कामें आपल्याला समजलीं पाहिजेत. कारण, स्त्रिया ह्या देवांच्या स्वरूप आहेत—म्हणजे स्वर्गांत देवांचीं जीं कामें आहेत, तींच कामें ह्या पृथ्वीवर स्त्रियांचीं आहेत. म्हणून स्त्रियांचीं कर्तव्यें समजण्याकरितां आपल्याला देवांचीं कामें समजून घेतलीं पाहिजेत.

---

# देवांची कामगिरी.

सुखाच्या मूर्ति असे जे देव त्यांची कामगिरी काय आहे, हें तुम्हांला ठाऊक आहे काय ? शास्त्रें म्हणतात कीं, दयाळू परमेश्वरानें त्यांना ह्या पृथ्वीवर दया करावयाचीं कामें दिलेलीं आहेत. जसें कोणाला पाऊस पाडण्याचें, कोणाला प्रजा उत्पन्न करण्याचें. कोणाला रोग्यांना औषधें देण्याचें, कोणाला मनुष्याच्या कर्मांचीं फळें देण्याचें, कोणाला वायुला आपल्या कबजांत ठेवण्याचें, कोणाला धान्य, फळें, फुलें व औषधी उत्पन्न करण्याचें, कोणाला अग्नीवर स्वामित्व ठेवण्याचें, कोणाला जगतांत प्रकाश पाडण्याचें, कोणाला मरणाच्या मागच्या क्रियांचीं फळें पोंचतीं करण्याचें, कोणाला जगतास ज्ञान देण्याचें, कोणाला ऐश्वर्य वाढवावयाचें, कोणाला सृष्टीचा संहार करण्याचें, कोणाला ईश्वरी सेवा व भक्ति शिकविण्याचें, कोणाला जगतांत मंगल करण्याचें, अशी त्या सर्व सत्ताधीश प्रभूनें सर्वांना निरनिराळीं कामें दिलीं आहेत. हीं कामें आपल्याला कळत नाहींत, अशा रीतीनें पण व्यवस्थित तऱ्हेनें होत असतात. पण देव सूक्ष्म सृष्टींत काम करतात आणि आपलें हें जग तर स्थूलरूप आहे. तेव्हां ह्या जगतांत उघड रीतीनें कामें करतां येतील, अशा प्रकारच्या शक्तीची जरूरी ईश्वराला वाटली. तेव्हां देवांच्या सारख्या रूपांच्या आणि तशा प्रकारचीं कामें करणाऱ्या शक्ति देवानें उत्पन्न केल्या. त्या शक्ति, म्हणजेच स्त्रिया होत. देव देवांच्या प्रमाणांत आणि स्वर्गाच्या प्रमाणांत दयेचीं कामें करितात; आणि स्त्रिया स्वतःच्या प्रमाणांत आणि आपल्या शक्तीच्या प्रमाणांत दयेचीं कामें करितात. कारण, स्त्रिया देवांच्या समरूप आहेत. म्हणजे देवांच्या सारखें पण त्याहून जरा उतरत्या प्रकारचें रूप—देवांचें दुसरें रूप—तें स्त्रीचें रूप होय. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, देवांचें दुसरें रूप—देवांचा दुसरा अवतार—ह्या स्त्रिया होत. कारण दयेचीं कामें कर-

ण्याकरितां म्हणजे दुनियेची सेवा करण्याकरितांच देवांच्या अवताररूप स्त्रिया उत्पन्न झाल्या आहेत. वहिनी, ही गोष्ट माझ्या घरची नाहीं. पण प्राचीन ऋषींच्या सिद्धांताची आणि आर्यशास्त्राच्या महतीची आहे. आपल्या शास्त्रांत ठिकठिकाणीं 'देवी' ह्या शब्दांनीं वर्णन केलेलें आहे; इतकेंच नाहीं, पण असेंही म्हटलें आहे कीं, महान् ऋषींनीं व्रजाच्या गोपीरूपानें अवतार घेतला होता, त्या सर्व गोष्टींचा अर्थ काय ? हाच कीं, स्त्रिया देवांच्या समरूप आहेत; आणि त्या ह्या जगतांत दयेचीं कामें करण्याकरितां आणि प्रभुप्रेम वाढविण्याकरितांच उत्पन्न झालेल्या आहेत. स्त्रियांचें असें उत्तमोत्तम स्वरूप समजून तुम्हाला फार आनंद झाला; आणि तुम्ही म्हणालां कीं, बाई ! हें रहस्य तुम्ही कोठें शिकलांत ? आपले शास्त्रीबोवा रामशास्त्री आपल्या येथें रोज पोथी वाचतात, पण असें कांहीं सांगत नाहींत. जर दरएक स्त्री आपलें अशा प्रकारचें स्वरूप समजेल तर कालांतरानें ह्या दुनियेचें स्वरूप बदलल्याशिवाय राहणार नाहीं.

---

## आपले शास्त्री लोक.

मीं म्हटलें, आमचे शास्त्रीलोक ! ईश्वर त्यांच्यावर दया करो ! ते बिचारे गंध भस्म आणि मुद्रा लावण्यांतच धर्म समजत आहेत. शेंडी नीट कशी राहील ? गंध सुरेख कसें दिसेल ? धोतर कशा रीतीनें नेसलें असतां रेशमी कांठ बाहेर रहातील ? अशा काळजींत त्यांचा पुष्कळ वेळ जातो. बाकी कांहीं वेळ बायकोशीं भांडणतंटा, व गांवगप्पा मारण्यांत जातो. ह्याखेरीज जो उरतो, तो व्याकरणाच्या एकदोन सूत्रांना धरून शब्दांची मारामारी करण्यांत आणि आपल्या इतर व्यवसायबंधूंना पाण्यांत पाहण्यांत जातो. आपल्या शास्त्रीलोकांची हल्लींची स्थिति अशी आहे. ह्याकरितां त्यांच्याकडून धर्माचें खरें रहस्य कळणें संभवनीय नाहीं.

पद्माकरपंत म्हणतात कीं, आपल्या शास्त्रीलोकांसंबंधीं असे विचार मनांत बाळगण्यांत मला फार खेद वाटतो; पण जें नजरेनें पाहातों आणि अनुभवतों, तें नाइलाजानें म्हणावें लागतें. त्यांतही जर कोणाला वाईट वाटलें तर मी त्याबद्दल क्षमा मागेन.

तिकडचे मित्र पद्माकरपंत, एम. ए., म्हणतात कीं, शास्त्रीलोकांसंबंधीं माझा अनुभव फार कडू आहे. दिलगिरीनें मला म्हणावें लागतें कीं, त्यांतील पुष्कळ लोक विद्येचा बोजा उचलणारे मात्र आहेत. तुम्ही पाहा कीं, पाश्चात्य विद्वानांनीं अलिकडल्या दहा वीस वर्षांत आपल्या धर्मासंबंधीं किती माहिती मिळविली आहे ! पण आपल्या देशांतील शास्त्र्यांनीं म्हणण्यासारखें असें विशेष कांहीं केलें आहे का ? त्यांच्यापैकीं पुष्कळजण हलक्या मनाचे, एकतर्फी मताचे, आपलें तें खरें म्हणून धरून बसणारे, हट्टी, दांभिक, आणि फुकटखाऊ कां असतात, तें मला कळत नाहीं. ते असेंही म्हणतात कीं, जर शास्त्रीलोक मनावर घेतील, तर ते आपल्या पवित्र आर्यधर्माची पुष्कळ उन्नति करूं शकतील. कारण त्यांच्यांत विद्या असते व पुष्कळ श्रीमंत लोक आणि पुष्कळ स्त्रीसमुदाय त्यांच्या ओळखीचा असतो. त्यांचें सांगणें लोकांच्या मनावर लवकर ठसतें. तेव्हां ते जर आपल्या धर्मग्रंथांतील स्त्रियोपयोगी भाग शोधून काढून ते निराळे लिहून लोकांना उपलब्ध करून देतील, त्याचें रहस्य त्यांना सांगतील, बायकांत धर्मशिक्षणाचा प्रसार होईल असे लहान लहान लेख तयार करून श्रीमंत लोकांच्या आश्रयानें फुकट अगर स्वस्त किंमतींत विकवतील, तर त्याचा परिणाम चांगला झाल्यावांचून राहणार नाहीं. पण तसें भारताचें आणि आर्यधर्माचें नशीब कोठें आहे ? शास्त्री जर जागृत झाले तर थोड्याच वर्षांत आपल्या दृष्टीस निराळाच रंग पडेल. ईश्वर त्यांना तशी सद्बुद्धि देवो.

## स्त्रियांचा अवतार कशाकरितां आहे ?

वहिनी, स्त्रियांचा अवतार कशाकरितां आहे, हें तुम्हांला आतां समजलें का ? लक्षांत ठेवा कीं, स्त्रियांचा जन्म, आपले लोक म्हणतात त्याप्रमाणें, पुरुषाचा पायपोस होऊन राहण्याकरितां नाहीं. स्त्रियांचा जन्म कांहीं पुरुषांच्या घटकाभर करमणुकीखातर नाहीं, स्त्रियांचा जन्म कांहीं केरपोतेऱ्याकरितां नाहीं, स्त्रियांचा जन्म मुलांचीं बाळंतीं धुण्याकरितां नाहीं, स्त्रियांचा जन्म घरांत कोंडून राहण्याकरितां नाहीं, स्त्रियांचा जन्म कांहीं खोट्या लाजेनें उपाशीं राहण्याकरितां नाहीं, स्त्रियांचा जन्म उंसांतून एरंडाचें गुऱ्हाळ शोधण्याकरितां नाहीं, स्त्रियांचा जन्म गांवकुटाळक्या किंवा शेजारणीची निंदा करण्याकरितां नाहीं, पण कोमल आणि पवित्र स्त्रियांचा जन्म दयेच्या देवता होण्याकरितां आहे. रसिक स्त्रियांचा जन्म ह्या जगतांत नवीन जीवन आणण्याकरितां आहे. सुंदर स्त्रियांचा जन्म ह्या जगतांत अलौकिक सुंदरता पसरविण्याकरितां आहे. मंद मंद हास्य करणाऱ्या स्त्रियांचा जन्म पुरुषांत पुरुषार्थ वाढविण्याकरितां आहे. ज्यांची दृष्टि हरिणीसारखी मनोरंजक व माशासारखी चपळ असून दयेनें भरलेली आहे अशा स्त्रियांचा जन्म जगतांत परमार्थ शिकविण्याकरितां आहे. स्वभावतःच खोल धर्मभावनेच्या स्त्रियांचा जन्म प्रभूचा महिमा आणि भक्ति या पृथ्वीवर पसरविण्याकरितां आहे. ईश्वरनिर्मित गोड आणि नाजुक अशा स्त्रियांचा जन्म ह्या जगतांत शांति पसरविण्याकरितां आहे. लीन स्वभावाच्या स्त्रियांचा जन्म मंगलकार्यें करण्याकरितां आहे. ज्यांच्या प्रकृतींतच स्वाभाविक आधीनता आहे, अशा स्त्रियांचा जन्म स्वर्गांतील देवांच्या प्रतिनिधींच्या जन्मासारखा आहे, ह्यांत कांहीं संशय नाहीं.

# स्त्रियांचा महिमा.

मीं जेव्हां 'लेडीज सोशल क्लबाच्या अधिष्ठात्री कमलाबाई' जवळ ही गोष्ट सांगितली, तेव्हां त्या म्हणाल्या, 'तुम्ही तर स्त्रियांना अगदीं सातव्या मजल्यावर नेऊन बसवितां.' नंतर मीं ही गोष्ट आमचे शास्त्री हरिपंत यांना सांगितली. तेव्हां ते म्हणाले कीं, 'आपल्या शास्त्रांत स्त्रियांचा दर्जा वरिष्ठ प्रतीचा आहे, ही गोष्ट खरी आहे, पण तुम्ही म्हणतां तितकें मला वाटत नाहीं.' दोन्ही ठिकाणीं माझ्या विचारांना पुष्टि न मिळाल्यामुळें, माझ्या मनांत मी विचार करूं लागलें, म्हणून मीं तिकडे विचारिलें कीं, 'आपला ह्यासंबंधांत काय अभिप्राय आहे?' तेव्हां ते म्हणाले, "माझ्या स्वर्गा अजून तुला ती गोष्ट नीटशी सांगतां येत नाहीं; तं जितकें म्हटलेंस तितकें तर काय? पण त्याहूनही हजारपटीनें स्त्रियांचें माहात्म्य अधिक आहे. तूं म्हणतेस कीं, ह्या जगतांत देवांच्या प्रतिनिधि म्हणून स्त्रियांची नेमणूक आहे. पण मी तर असें म्हणतों कीं, ज्या स्त्रीमध्यें खरोखर स्त्रीपणा आहे, ती स्वतःच देवता आहे, इतकेंच नव्हे तर स्वर्गींच्या देवांचीही ती स्त्री देव आहे, ह्यांत कांहीं संशय नाहीं."

मीं म्हटलें, 'क्षमा करा. पण मला ही अतिशयोक्ति वाटते.' तेव्हां तिकडून जरा हंसून माझ्याकडे पाहून म्हटलें कीं, 'अतिशयोक्ति नाहीं. माझे स्वर्गदेवते, त्यांत जरासुद्धां अतिशयोक्ति नाहीं. आतां मी तुजकडून कबूल करवितों कीं, मीं म्हटलें त्यांत मुळींच अतिशयोक्ति नाहीं, एवढेंच नाहीं तर त्याहूनही स्त्रियांचें माहात्म्य जास्त आहे. तुला ठाऊक नाहीं कां कीं, पतिव्रता स्त्रियांच्या दृष्टीनें अपराधी झाल्यामुळें मोठे महात्मेसुद्धां थरथर कांपत होते. इतकेंच नाहीं, पण अशा स्त्रियांच्या कोपानें स्वर्गसुद्धां हालत होता, अशा गोष्टी पुराणांत नाहीं कां ऐकल्यास? सतीच्या आशीर्वादानें कितीकांचें कल्याण झालें आहे, हें आर्यांचा

इतिहास वाचणारांना नवीन सांगावयास कां पाहिजे ? ज्याच्या घरीं सगळे देव दास्यत्व करीत होते आणि ज्याचा मुलगा मेघनाद ह्यानें इंद्राला सुद्धां जिंकून आणला होता, तो रावण कच्चा कां होता ? ज्यानें अयोध्यापति रामाला क्षणोक्षणीं रडविलें तोच सीतेपुढें वर मान करून पाहूंही शकत नव्हता, ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी नाहीं काय ? केवढा हा सीतेचा प्रभाव ! सीतेनें जितका रावणाचा अपमान केला, तितका एकाद्या पुरुषानें केला असता, तर तो त्याला कच्चा खाऊन टाकता, पण तो सीतेसमोर बोटसुद्धां उचलूं शकला नाहीं. त्याचें कारण काय ? त्याचें कारण हेंच कीं, स्त्रियांचें स्त्रीत्व म्हणजे पतिप्रेम आणि आधीनता हे गुण--ज्याला शास्त्रांत पातिव्रत्य किंवा सतीपणा म्हणतात--ते सीतेंत होते. मी म्हणतों यांत अतिशयोक्ति कोठें आहे ? तूं म्हणतेस, 'स्त्रिया देवाचं दुसरं रूप आहे, म्हणजे त्या देवांच्या खालच्या पायरीच्या आहेत.' पण मी म्हणतों कीं, स्त्रिया देवानाही कांरविणाऱ्या आहेत. निर्वाण पावलेल्या स्त्रियांचीं विमानें देवांच्याही वरून परभारें मोक्षांत गेल्याचीं आणि देवतांनीं आनंदित होऊन त्यांच्यावर पुष्पवृष्टि केल्याचीं उदाहरणें तूं पुराणांत नाहीं का पाहिलीस ? ह्या सगळ्या नुसत्या कोमल व सुंदर कल्पनाच आहेत का ? नाहीं. प्रिये ! हे सगळे सत्य सिद्धांत आहेत; आणि महान् प्रभूची जगावर किती दया आहे, हें समजण्याकरितांच हें सारें आहे. तूं पहा बरं पतिप्रेम आणि आधीनता ही किती सोपी, किती स्वाभाविक गोष्ट आहे ! आणि तसें असून फळ कांय ? म्हटलें तर फळ हेंच कीं, देवांच्याही वरून, स्वर्गाच्याही वरून, प्रभुचरणाजवळ म्हणजे मोक्षाला जातां येतें हें, आणि देवता विमानांतून पुष्पवृष्टि करीत असतां त्यापासून होणारा आनंद अनुभवितां येतो हें. तेव्हां देव आपल्या पुरुषार्थाच्या कमीपणाबद्दल पश्चात्ताप करीत बसतात कीं, 'अरेरे ! आम्ही कसे कमनशीबी ! ईश्वराच्या जवळ म्हणजे मोक्षाला गेलों नाहीं; आणि देवपणांतच हें नाशवंत स्वर्गसुख घेत बसलों.' अशा रीतीनें

सतीपेक्षां देव आपल्याला कमी दर्जाचे समजतात; आणि त्यांच्यावर फुलांची वृष्टि करितात. हें काय स्त्रियांचें माहात्म्य कमी आहे! आणि हें सर्व कशापासून? तर फक्त लीनता आणि आधीनता म्हणजे पतिप्रेम आणि घरचें रोजचें साधारण कामकाज यांपासून प्राप्त होतें. ”

तिकडून सांगितलेल्या ह्या गोष्टी ऐकून मी अगदीं दिङ्मूढ झालें. मी म्हणालें: “ अहाहा! काय? स्त्रियांच्याकरितां स्वर्ग इतक्या जवळ आहे? मीं ह्याच्यापूर्वी पुष्कळ सतीवर्णनें वाचिलीं आहेत, पण अशा रीतीनें त्यांतलें मर्म मला कधीं समजलें नव्हतें. मला सांगा पति-प्रेमांत आणि आधीनतेंत इतकें बळ कसें आलें? ” आम्ही दोघेजण नदीकांठच्या वाळूंत बसून गमतीनें अशा गोष्टी बोलत होतों, इतक्यांत स्वामीमहाराज तेथें आले. त्यांना दुरून पाहून मला सांगितलें, “ आतां चांगली मजा होईल. तुला माझें सांगणें अतिशयोक्तीचें वाटतें. कारण तुला असें वाटतें कीं, तुझ्यावर माझें प्रेम फार असल्यामुळें साहजिकरीत्या मी खोटें बोलतों, पण तसें नाहीं. मी तर माझ्या अनुभवाप्रमाणें सांगतों. माझ्यापेक्षां तुझी महाराजांच्या शब्दांनीं जास्त खात्री होईल. त्यांना कांहीं कोणाचा पक्षपात नाहीं; त्यांना आपण दोघे सारखेंच आहोंत. इतकेंच नाहीं, पण ते संन्याशी आहेत. त्यामुळें ‘द्वारमेकं नरकस्य नारी ’ असें ह्मणणाऱ्यांपैकींच ते आहेत; तेव्हां त्यांचें म्हणणें तर तुला पटलेंच पाहिजे. ”

---

## स्वामी.

आम्ही अशा रीतीनें बोलतों आहों, इतक्यांत स्वामी तेथें आले; आणि म्हणाले, “ कां, काय चाललें आहे? ” आम्ही दोघेजण उठून उभे राहिलें आणि हंसून त्यांना नमस्कार केला. स्वतः स्वामींना म्हटलें,

" महाराज आपण फार गमतीच्या वेळीं आलां आहां ! आपल्या ह्या शिष्यिणीनें मला एक फार गंभीर प्रश्न केला आहे. त्याच्या उत्तराकरितां डोक्याला सारखा तापवीत होतों. इतक्यांत ईश्वराची कृपाच्च कीं आपण आलां. आतां मी काळजींतून मुक्त झालों. कारण माझ्यापेक्षां आपण त्याचें उत्तर चांगल्या रीतीनें द्याल. "

महाराज म्हणाले, ' बेटा काय प्रश्न आहे ? '

मी म्हणालें, " महाराज, आपण असें समजतां कीं, स्त्रिया नरकाचें साधन ( द्वार ) आहेत. मी म्हणतें कीं, स्त्रिया देवांचें दुसरें रूप आहेत. आणखी स्वतःचें असें मत आहे कीं, बायकांना जर आपलें स्त्रीत्व सांभाळतां येईल, तर देव त्यांचे दास बनायास तयार आहेत. आतां ह्या प्रश्नाचा निकाल आपण कसा कराल ? "

महाराज म्हणाले, " बेटा, ह्यांत काय मोठा प्रश्न आहे ! माझ्या हल्लींच्या संन्यासधर्माप्रमाणें स्त्रिया नरकाचें द्वार आहेत असें मी समजतों, हें सत्य आहे. पण त्यामुळें तुमच्या प्रश्नाचें उत्तर देण्यास काय हरकत आहे ? मीं संन्यासधर्म स्वीकारिला असल्यामुळें मी तसें मानणें वाजवी आहे; पण सगळ्या दुनियेनें असें मानावें असा दुराग्रह माझ्यामध्यें कशास हवा ? आपण जें मानितों अथवा ज्याप्रमाणें वागतों तेंच सर्व खरें, बाकी सर्व खोटें व वाईट, असा आग्रह आपल्या शास्त्रीपंडितांजवळच राहूं द्या. मी तर असें समजतों कीं,

## निरनिराळ्या लोकांचे धर्म निरनिराळे असतात.

जसें खेडुताचा, शिपायाचा, संन्याशाचा, राजाचा, विद्यार्थ्यांचा, बायकोचा, वगैरे दरेकाचा धर्म निरनिराळा असतो. या सर्वांचा धर्म एक करण्याची चूक आपण कशाकरितां करावी ? आपला भिक्षुकवर्ग करितो तेवढें बस्स आहे. आपल्याला तर असा सिद्धांत काढावयाचा आहे कीं, ज्यांत

कोणत्याही अधिकाऱ्याला कांहींच अडचण येऊं नये. आपल्या गोष्टी कांहीं मताकरितां, अगर पंथाकरितां नाहींत. आपण तर आपल्या देशाकरितां आपल्या बंधुवर्गाकरितां, आपल्या स्वतःच्या आत्म्याकरितां, आणि परमेश्वराला ओळखण्याच्या इच्छेकरितां, तत्त्व शोधणारे जिज्ञासु आहोंत. म्हणून माझें अगर तुमचें मत वाटेल तसें असलें तरी काय हरकत आहे? आपल्या मताकरितां शास्त्रांचे सिद्धांत किंवा नियम थोडेच फिरावयाचे आहेत ? इतकें खरें कीं, माणसें पाहिजे त्यापेक्षां आपल्याच मताला जास्त वजन देऊन त्याची ओढाताण करितात, आणि आपलें मत हें जगाचें मत आहे, असें ठरविण्याकरितां शक्तीबाहेर श्रम करितात; पण ईश्वरी कृपेमुळें ह्या दुराग्रहापासूनही हल्लींचा वाढता सुधारकवर्ग थोडा थोडा बचावत चालला आहे. मला किंवा तुम्हांला असा कोणत्याही तऱ्हेचा पक्षपात नाहीं; मग वाटेल त्या प्रश्नाची चर्चा करावयास कशाची हरकत आहे ?

यावर माझ्याकडे पाहून स्वतः म्हटलें, " महाराजांचें सांगणें बरोबर आहे. आपल्या स्वतःच्या मतांना खऱ्या सिद्धांतामध्यें कशाकरितां आणावयाचें ? अद्यापपर्यंत मी थोडासा जातिभेद पाळतों, तरी पण मला असें वाटतें कीं, जातिभेद थोडा कमी होऊन, बेटीव्यवहाराची आणि रोटीव्यवहाराची सूट मिळाल्यास बरी. मीं स्वतः जरी मूर्तीची पूजा करीत नाहीं, तरी पण मला असें वाटतें कीं, मूर्तिपूजा ही प्रथम पायरी आहे. आपण आपल्या कुटुंबांतून जरी पुनर्विवाह करीत नाहीं, तरी पण आपल्याला असें वाटतें कीं, पुनर्विवाह हल्लींच्या स्थितींत जरूरीचा आहे. जरी मी स्वतः जैन नाहीं, तरी पण जैनांच्या हिंसा न करण्याच्या तत्वाची मी स्तुतिच करितों; जरी मी मुसलमान नाहीं तरी मुसलमानांची दिवसांतून पांच वेळेस प्रार्थना करावयाची रीत मला पसंत आहे; आणि जरी मी ख्रिस्ती नाहीं तरी पण येशूच्या अतिशय क्षमा करण्याच्या गुणाचा मी चाहता आहें. तसें जरी स्वामी संन्याशी आहेत, तरी त्यांना स्त्रियांच्या बाजूनें बोलतां येतें. "

## माझा प्रश्न.

मीं म्हटलें, " पुष्कळ दिवसांपासून माझ्या मनांत एक असा प्रश्न घोळतो आहे कीं, स्वर्गींच्या देवांच्या प्रतिनिधीप्रमाणें ह्या जगांत स्त्रिया आहेत. रामायण वाचींत असतां हा विचार प्रथम मला सुचला. तेव्हां शेंघांतिघांजवळ ही गोष्ट मीं काढून पाहिली, पण कोणींही माझ्या विचाराला दुजोरा दिला नाहीं. नंतर मीं ती गोष्ट जवळ काढिली, तेव्हां त्यांनीं तर बायकांना थेट स्वर्गाच्या वरच्या पायरीवर बसवायला आरंभ केला. त्यांचें म्हणणें स्त्रियांमध्यें जर खरें स्त्रीत्व असेल, तर त्या देवांच्याही वरचढ होऊन थेट ईश्वराच्या चरणाजवळ म्हणजे मोक्षाला जातील, आणखी देव त्यांची स्तुति करीत, त्यांच्यावर फुलें टाकीत, तेथेंच राहतील. तेव्हां माझा प्रश्न असा आहे कीं, आधीनता आणि पतिप्रेम ह्यांत इतकें बळ आहे काय कीं देवही त्यांच्यापेक्षां खालच्या पायरीचे—दर्जाचे ठरतात ! "

महाराज म्हणाले, 'वा ! प्रश्न फारच सुरेख आहे. पण त्याचा खुलासा पंधरा वीस मिनिटांत होण्यासारखा नाहीं. ' तेव्हां स्वतः आपलें घड्याळ काढून पाहिलें, आणि सांगितलें, आतां साडेपांच वाजले आहेत; आणि आपण साडेसातापर्यंत येथें थांबूं शकूं. ' तेव्हां महाराज म्हणाले, ' तर मग वेळ तर ठीक मिळाला. बेटा ! तुझ्या प्रश्नाचा खुलासा करण्याकरितां प्रथम मला कांहीं आजूबाजूच्या गोष्टी सांगाव्या लागतील, कारण त्याशिवाय तुझ्या प्रश्नाचें उत्तर तुझ्या लक्षांत नीटपणें येणार नाहीं कारण तो प्रश्न कांहीं नवीन, सहज समजण्यास कठीण, आणि फार महत्त्वाचा आहे. तुझ्या नवऱ्याला तूं असा गंभीर प्रश्न विचारलास, ह्याकरितां मी तुला शाबासकी देतों. आपलें कर्तव्य समजावें अशा इच्छेचा आणि बुद्धिबळाचा तुझा प्रश्न आहे. बेटा ! प्रथम तुला हें समजलें पाहिजे कीं,

## स्त्रियांच्या खेरीज पुरुषांची स्थिति

कशी असते ? अनुभवी विद्वानांचें असें म्हणणें आहे कीं, स्त्रियांशिवाय पुरुषांची स्थिति बिन चाटलेल्या पशूच्या बच्चयासारखी असते. तुमच्या येथें तो व्रजवासी टोपीवाला अर्धवेडा तरुण येतो ना ! त्याची स्थिति तुम्ही नाहीं कां पाहात ! ”

मीं म्हटलें, “ कोण ? बन्सी ! त्या मूर्खाची आठवण या वेळीं कोठून झाली ! नेहमीं बायकांच्या गोष्टी, आणि लग्नानंतरचे विचार ! मला वाटतें कीं, बायको बायको करीत तो एखादे वेळीं पक्का वेडा होईल. ”

स्वामी म्हणाले, “ तसें झाल्यास कांहीं नवल नाहीं. ईश्वरी योजनेप्रमाणें पुरुषाला एक विसाव्याची जागा लागत असते, आणि ती जागा म्हणजे लग्नस्नेह आहे—ती जागा स्त्री आहे. म्हणून जोंपर्यंत ती मिळत नाहीं, तोंपर्यंत मन कोठेंही स्थिर होत नाहीं. जरी उत्तमोत्तम दोस्त असले, चांगले चांगले ग्रंथ मिळाले, पुष्कळ धन मिळालें, बेसुमार वैभव मिळालें, मायेचीं माणसें असलीं, इतकेंच नव्हे तर जरी मोठें राज्य मिळालें, तरी बायकोशिवाय त्याला त्या सर्वांची गोडी लागत नाहीं. जेव्हां तो बायकोचें हंसतमुख पाहतो आणि दोन घटका तिच्याजवळ बसून तिच्या गोष्टी ऐकतो, तेव्हांच त्याला अंतःकरणापासून खरा आनंद होतो. राहण्याला घर नसलें, नेसण्यास वस्त्र नसलें, किंवा खाण्यास अन्नही नसलें, तरी कंदमुळें खाऊन योग्य स्त्रीशीं पुरुष सुखानें राहूं शकतो; आणि बायकोच्या संगतींत थोडा वेळ तरी तो आपलीं दुःखें विसरतो. इतकेंच नव्हे तर जर पुरुषाला स्वर्गीचें राज्य मिळालें, आणि बायको मिळाली नाहीं तर, त्या राज्यापासूनही त्याला आनंद व्हावयाचा नाहीं. अशीं शेंकडों उदाहरणें दाखवितां येतील कीं, बायकोकरितां राजांनीं राज्यें सोडिलीं व साधूंनीं साधुता सोडिली. बेटा ! हें सगळें कशाकरितां ? ह्या सर्वांचें कारण हेंच कीं, प्रकृतीनेंच पुरुषांच्या आनं-

दाचें स्थान स्त्रिया हें आहे. ईश्वरानें पुरुषांची रचना अशी केली आहे कीं, स्त्रियांच्या प्रेमाखेरीज त्यांच्या हातून आनंदाचा उपभोग घेतला जाऊंच नये. म्हणूनच आपल्या शास्त्रांतून स्त्रीला अर्धांगाची उपमा दिलेली आहे. स्त्री हें पुरुषाचें अर्धांग आहे; तेव्हां बायकोशिवाय असलेला पुरुष म्हणजे अर्धा पुरुष होय. तेव्हां असे अर्धे पुरुष अर्धवट वेडे असतील ह्यांत नवल काय ? जगांत जास्त गुन्हे कोण करितो, हें तुला ठाऊक आहे काय ? लक्षांत ठेव कीं, ज्यांचीं लग्नें झालेलीं नाहींत, तेच लोक जास्त गुन्हे करितात. वेश्यांच्या येथून भटकणारांमध्यें जास्त संख्या कोणाची असते ? डोक्यावर वांकडी टोपी ठेवून तोंडास येईल तें बडबडणारे कोण असतात ? ज्यांना पैशाची किंमत नाहीं असे उधळे कोण असतात ? रिकामा वेळ घालविणारे आणि गांवकुटाळ्या करणारे कोण असतात ? बेटा ! ह्या सगळ्यांमध्यें अविवाहितांचाच भरणा फार असतो. यूरोप, अमेरिकेकडील ' मॅड हौसां'चे अहवाल तूं कधीं वाचले हेस का ? ' मॅड हौसां'तूनही शेंकडा ७५ असले फटिंगच असतात. बायकोशिवाय पुरुष अर्धा आहे. बायकोच्या बंधनानें पुरुषाला संसाराच्या बंधनांत बांधतां येतें. बायकोमुळेंच पुरुष नवें जीवन मिळवूं शकतात. बायकोच्या मदतीनेंच पुरुष पुरुषार्थ करूं शकतात; कारण बायको ही पुरुषाची अर्धी शक्ति आहे. तेव्हां त्या अर्धशक्तीची मदत न मिळाली तर पुरुष अर्धाच रहातो, म्हणजे त्याचीं कामेंही हाफ मॅडासारखींच असतात. असें होऊं नये म्हणूनच आपल्या शास्त्रांत सांगितलें आहे कीं, स्त्रीपुरुषांनीं लग्नें केलींच पाहिजेत. ऋषींनीं लग्नाला धर्माचें एक पवित्र कर्तव्य म्हटलें आहे; आणि परमेश्वरानें मनुष्यांना लग्न करण्याकरितां शास्त्रामार्फत हुकूम केलेला आहे; त्याचें कारण तुला समजलें कीं नाहीं ?"

## लग्न म्हणजे काय ?

मीं म्हटलें, " होय महाराज. हें मी बरोबर समजलें. पूर्वी जेव्हां मी इंग्रजी शिकत होतें तेव्हां थोडींशीं ' फ्रेंच नॉव्हेल्स ' वाचलीं आहेत. त्यांत मला असे विचार आढळले होते. लग्न म्हणजे काय ? हीं लग्नें कशाकरितां पाहिजेत ? माणसांनीं विनाकारण आपल्या मूर्खपणानेंच हा लग्नाचा फांस आपल्या गळ्याभोंवतीं घालून घेतला आहे. फार तर लग्न म्हणजे एक प्रकारचा करार–'कॉंट्रॅक्ट'–किंवा परस्परांमध्यें अनुकूलता असल्यास एक प्रकारची देवघेव–जी इतर देवघेवीप्रमाणें वाटेल तेव्हां सोडतां येईल–त्याला धर्म कशाला ? असले विचार त्यांत होते. त्या वेळेस लग्नाचें शुद्ध स्वरूप मला समजलेलें नसल्यामुळें ते विचार मला घोंटाळ्यांत घालीत होते. आपल्या शास्त्रांत लग्नाला फार महत्त्व दिलें आहे, आणि पतिप्रेमांतच स्त्रियांचें सर्वस्व मानलें आहे. पण ते लोक तर असें म्हणतात कीं, लग्न म्हणजे कांहीं नाहीं, तो एक प्रकारचा मूर्खपणा. फार तर तो एक प्रकारचा ' करार ' आहे झालें. "

महाराज म्हणाले, " बेटा, त्या लोकांना आपल्यासारखीं उत्तम शास्त्रें मिळालीं नाहींत, त्यामुळें लोक कल्पनेशींच खेळतात. त्याचा हा परिणाम आहे. पण अध्यात्मज्ञान असलेल्या त्रिकालदर्शी ऋषींनीं मनुष्याच्या प्रकृतीचें बारकाईनें निरीक्षण करून, स्वाभाविक नियम लक्षांत घेऊन, जगताचें बंधारण आणि ईश्वरी इच्छेप्रमाणें आर्यधर्माचे नियम बांधलेले आहेत. म्हणजे जों जों त्यांत आपण खोल जातों तों तों त्यांतील रहस्य आपल्या जास्त लक्षांत येतें आणि आपलें चित्त ईश्वराकडे जातें. हीच आपल्या सनातन आर्यधर्माची खुबी आहे; आणि अशा खोल ज्ञानाकरितांच सगळ्या दुनियेच्या तत्त्वज्ञानांत आर्यधर्माची प्रशंसा होत आहे. दुसऱ्या धर्मवाल्यांनीं आणि पंथवाल्यांनीं आपला देशकाल पाहून, लोकांचे आचारविचार पाहून, आणि दुसऱ्या मतांच्या खुब्या व उणीवा पाहून

आपल्या मताप्रमाणें धर्माचे नियम ठरविलेले आहेत. त्यामुळें तें ठरविणारांना असें वाटतें कीं, आम्ही लोकांना हें सारें फार सोपें करून देत आहों. पण त्यांच्या कृतीचा परिणाम उलटा झाला. त्यांच्या म्हणण्याला मान देणारे उलटे खड्ड्यांत पडले. ते नियम त्या वेळेस दिसण्यांत जरी चांगले होते, तरी ते खरोखर तसे नव्हते. ते ईश्वरी इच्छा समजून केलेले नव्हते. तसेच ते मनुष्य-जातीच्या उत्पत्तीचें ज्ञान मिळवून केलेले नव्हते. ते ठराविक काळाकरितां होते. जोंपर्यंत पाश्चात्य प्रजा अध्यात्मज्ञानापासून दूर होती तोंपर्यंत त्यांना बायबलचें ज्ञान रुचलें. पण आतां ख्रिश्चन तत्त्वज्ञान्याचीही इतक्या ज्ञानानें तृप्ति होत नाहीं. आतां ज्यांना जें कांहींसें जास्त हवें आहे तें त्यांना त्यांतून पूर्णपणें मिळूं शकत नाहीं. मुसाचे जुने करार बदलून महात्म्या येशूनें नवा करार दिला. पण कधीं बदलतां न येणारे त्रिकालाबाधित करार त्यांना मिळाले नाहींत. अलीकडे युरोप, अमेरिका येथील प्रजा आर्यधर्माकडे पाहूं लागली आहे. कारण आर्यधर्म खरा सनातन ईश्वरी धर्म आहे.

" बेटा, ईश्वरी प्रेमापासूनच लग्नस्नेहाची उत्पत्ति झाली आहे. आणि लग्नस्नेहानेंच ईश्वरी प्रेम वाढतें म्हणून मनुष्याच्या उत्पत्तीबरोबर लग्न-स्नेहाची उत्पत्ति झाली आहे. म्हणजे लग्न स्वाभाविक आहे. ती टाळतां येण्यासारखी बाब नाहीं. कारण लग्नस्नेहाचा आधार आपल्या कल्पना, देशकाल यांवर नाहीं. पण त्याचा संबंध मनुष्यजातीच्या प्रकृतीच्या मुळांत आहे. असें असल्यामुळें प्राचीन ऋषींनीं लग्नाला धर्मांतलें एक पवित्र कर्तव्य मानलेलें आहे; आणि कोण्याही स्त्रीनें किंवा पुरुषानें तीव्र वैराग्य आल्याशिवाय अविवाहित राहूंच नये अशी आज्ञा केलेली आहे. कारण वैराग्याखेरीज ब्रह्मचारी राहण्याचा प्रयत्न केल्यानें मनुष्याची जितकी खराबी होते, तितकी लग्नानें होत नाहीं—मग तीं लग्नें आसुरी प्रकारचीं जरी असलीं तरी तीं अविवाहितपणापेक्षां सहस्रपट उत्तम. ऋषि

लोक असें मानीत कीं, लग्नामुळें दोन निरनिराळया शक्ति एक होतात; आणि एकमेकांच्या मदतीनें त्या दुप्पट काम करूं शकतात. त्यामुळें दोन्ही शक्ति कदाचित् निर्बळ असल्या, तरी पण एकीपेक्षां त्या कांहीं तरी अधिक आहेत. इतकेंच नव्हे, तर दोन निरनिराळ्या शक्ति जरी कितीही प्रबळ असल्या तरी त्या स्थिरतेनें कांहींच करूं शकत नाहींत. जशा विजेमध्यें ' निगेटिव्ह ' व ' पॉझिटिव्ह ' अशा निरानिराळ्या दोन शक्ति आहेत, पण त्या शक्तींच्या दोन्ही तारा एकत्र केल्याखेरीज कांहींच काम होत नाहीं, तसेंच स्त्री आणि पुरुष ह्या दोन निरनिराळ्या शक्ति आहेत. त्या दोन्हीं शक्तींना लग्नांनीं जोडावयाचें असतें. अशा रीतीनें जोडल्याखेरीज त्या स्वतःची किंवा जगाची कांहींही उन्नति करूं शकणार नाहींत.

---

## लग्नासंबंधीं ऋषींचे विचार.

" ऋषि असें समजत होते कीं, स्त्रियांमध्यें आधीनता म्हणजे सेवा करण्याची शक्ति आहे, आणि पुरुषांमध्यें धनीपणा गाजवावयाची आणि सेवेचा मोबदला देण्याची शक्ति आहे. इतकेंच नाहीं पण स्त्रियांच्या स्वभावांत प्रभूनें खास असें तत्त्व ठेविलें आहे कीं, स्त्रियांना बाकीचीं कितीही सुखें असलीं, तरी सेवा केल्याखेरीज तीं त्या भोगूं शकत नाहींत आणि पुरुषांमध्यें असें आहे कीं, त्यांना बाहेरचीं कितीही सुखें असलीं तरी घरांत बायकोवर धनीपणा गाजविल्याशिवाय आणि तिच्या सेवेचा योग्य मोबदला तिला दिल्याशिवाय त्यांना आनंद होत नाहीं. कारण स्त्री आणि पुरुष हे देव आणि ईश्वर ह्याचें समरूप आहेत. म्हणजे स्त्री-पुरुषांच्या उत्पत्तीच्या वेळीं त्यांच्या प्रकृतीमध्यें दोन निरनिराळीं तत्त्वें

ठेविलीं आहेत. त्या निरनिराळ्या दोन तत्त्वांना जोडणें याचें नांव 'लग्न'. म्हणुन हें लग्न म्हणजे मनुष्यांच्या स्वभावांत आपल्या आपण निघालेलें ईश्वरी तत्त्व आहे. ही कांहीं ओढून ताणून उभी केलेली बनावट कृती नाहीं. म्हणून चांगलीं लग्नें होतील आणि त्या लग्नाचें मांहात्म्य वाढेल असें करणें हें आपलें खास कर्तव्य आहे.

---

## सेवा केल्यानेंच स्त्रियांना खरें सुख होतें.

"बेटा! आतां तूं पहा कीं, स्त्रियांमध्यें आधीनतेची म्हणजे सेवा करण्याची स्वाभाविक शक्ति आहे कीं नाहीं? तूं एक स्त्री आहेस, आणि प्रेमळ स्त्री आहेस. तेव्हां स्त्रियांच्या अंतःकरणाचें मान आमच्यापेक्षां तूं चांगलें समजत असशील. जरी तुझ्या डोळ्यांत मिस ब्रिटानियानें स्त्री-पुरुषांच्या समान हक्काचें वेड भरवलें असलें तरी पण तूं मला सांग, तुझा आनंद कशांत आहे? तुझ्या प्रियकराच्या ताब्यांत रहाण्यांत, कां त्याच्यावर हुकूम चालवण्यांत? बेटा, लाजूं नको, मला मोकळेपणानें जबाब दे. तुला काय आवडतें? तुझ्या प्रियकरासाठीं चांगले चांगले पदार्थ करण्याची तुला इच्छा होत नाहीं का? तुझ्या घरीं स्वयंपाकी आहे, तरी पण आपल्या प्रियकरासाठीं एखादे वेळीं चांगला स्वयंपाक करून घालण्याचें तुझ्या मनांत येत नाहीं का? जेव्हां तुझा नवरा तुझ्याजवळ पाणी मागतो, तेव्हां तें आधींपासून तयार ठेवण्यांत तुला आनंद होतो कीं नाहीं? तुझी अगदीं आवडत्यांत आवडती मैत्रीण आलेली असली आणि तिच्याशीं तूं अगदीं हितगुजाच्या गोष्टी करीत असलीस, तरी जर तुझा नवरा तेथें आला तर तुला आनंद होतो कां राग येतो? मला ठाऊक आहे कीं, परिस्थितीप्रमाणें आणि आजूबा-

ज्यूच्या संबंधाप्रमाणें तुला सभेला जावयाची इच्छा होते. पण मी तुला असें विचारतों कीं, तूं एखाद्या सभेंत अध्यक्षपदीं आहेस आणि तुझ्या भाषणांनीं प्रेक्षकवर्ग संतुष्ट होऊन टाळ्यांच्या गजरांनीं तुझें अभिनंदन करतो आहे, त्या वेळेस तुला जितका आनंद होतो त्यापेक्षां एखाद्या वेळेस प्रसंगानुसार कांहीं बोलणें होऊन "जा जा वेडी कुठली!" असें म्हणून तुझा नवरा हंसत हंसत जेव्हां तुझे गालाला दोन बोटें लावितो, तेव्हां तुला जास्त आनंद नाहीं का होत? समज कीं, तुझ्या प्रियकराचें कपाळ दुखतें आहे, तर तें नोकराकडून चेपवल्यानें तुला बरें वाटतें कां तूं चेपल्यानें वाटतें? तुझ्या आजारी मुलाला दायांकडून औषध पाजविण्यापेक्षां तुला स्वतःच तें पाजण्याची कां इच्छा होते? तुझ्या येथें तुझ्या नवऱ्याचे जे स्नेही येतात त्या सर्वांची व्यवस्था ठेवण्याची इच्छा तुला होते ना? त्याचें कारण काय? स्त्रियांच्या प्रकृतींतच प्रभूनें आधीनता ठेविलेली आहे, आणि स्त्रियांच्या अंतःकरणांत सेवाधर्म राहिलेला आहे. स्वाभाविकरीत्याच स्त्रिया सेवा करण्याकरितां उत्पन्न झालेल्या आहेत. त्यामुळें सेवेंतच—पतिप्रेमांतच—ईश्वरानें त्यांचा आनंद ठेविलेला आहे.

---

## सेवाधर्माची उत्तमता.

मीं हंसत हंसत स्वतःकडे पाहून स्वामींना म्हटलें, "महाराज! आपण तर गोड गोड बोलून सेवेचें लांकूड आमच्या गळ्यांत अडकविलेंत."

महाराज म्हणाले, "बेटा गळ्यांत नाहीं. गळ्यांत असतें तर कधीं तरी निघालें असतें. पण हें तर अंतःकरणांत; अंतःकरणांतच नाहीं तर थेट प्रकृतीच्या मुळांत, सृष्टीच्या उत्पत्तींत असून ईश्वरी इच्छेशीं त्याचा संबंध आहे.

जर असें नसतें तर प्रजापति जनकाच्या घरीं किंवा महाराणी कौसल्येजवळ काय कमी होतें? मग सीता वनांत कां गेली? तेथें सर्व कांहीं होतें, पण पतिसेवा नव्हती; आणि स्त्रियांचा आनंद–पतिसेवेंत–पतिप्रेमांतच राहिलेला आहे. म्हणून ह्या सेवेचा आनंद भोगण्याकरितां सीता वनांत गेली. बेटा! आजपासून पक्कें लक्षांत ठेव कीं, स्त्रियांच्या प्रकृतींत जें आनंदाचें स्थान आहे तें सेवाधर्मच आहे. जर स्त्रियांच्या प्रकृतींतून सेवेला आणि आधीनतेला काढिलें, तर त्यांच्या आनंदालाच काढून टाकिल्याप्रमाणें आहे. कारण प्रभूनें स्त्रियांची रचनाच अशी केली आहे कीं, सेवा केल्याखेरीज त्या खरा आनंद मिळवूं शकतच नाहींत; मग ती सेवा कशाही प्रकारची असो. पतीची म्हणा, कुटुंबाची म्हणा, धर्माची म्हणा, आपल्या दुःखी बंधु-भगिनींची म्हणा, अगर पाहिजे तर स्वदेशाची म्हणा,–जोंपर्यंत त्या सेवाधर्म पाळीत नाहींत तोंपर्यंत त्या खरा आनंद भोगूं शकत नाहींत आणि त्यांच्या आत्म्याची उन्नतिही त्याखेरीज होत नाहीं. सेवाधर्म इतका उत्तम आहे कीं, थोड्यांतून पुष्कळ मिळवितां येतें, असा तो आहे. तो स्त्रियांच्या प्रकृतींत राहिलेला आहे. तो लग्नस्नेहांतून वाढतो. म्हणून जगांतील कोणत्याही धर्मापेक्षां आर्यधर्मानें लग्नाचें महत्त्व जास्त ठेविलेलें आहे. सेवाधर्माची खरी मजा प्रेमबद्ध स्त्रीपुरुषांमध्येंच पाहावयास मिळते. पाहिजे तितक्या मोठ्या दर्जाची स्त्री असूं दे, महाराणी असूं दे, ती प्रेमांत पडूं दे, म्हणजे पहा ती आपल्या प्रियकराजवळ आपला दर्जा कसा विसरते ती! एखादा शहाजादीचा जरी गुलाम असला तरी पहा ती त्याकरितां काय कष्ट काढिते! अशा रीतीची अंतःपुरांतील किंवा जनानखान्यांतील चित्रें तुम्हीं पाहिलीं आहेत का? त्यावरून तुम्हांला सहज समजेल कीं, पुरुषांची सेवा करण्याकरितांच स्त्रिया उत्पन्न झाल्या आणि त्यांच्या सेवेचा मोबदला देण्याकरितांच पुरुष उत्पन्न झाले आहेत. पुरुष कशा रीतीनें धनीपणा गाजवितात आणि स्त्रियांच्या सेवेचा मोबदला कशा रीतीनें देतात, हें

दाखविण्याकरितां मला कितीएक उदाहरणें द्यावीं लागतील. पण बेटा! तीं उदाहरणें घेण्याकरितां मी लांब कशाला जाऊं—भाऊसाहेबानांच पकडतों, कारण तेही एक नमुनेदार पुरुष आहेत."

---

## पुरुषांची सगळ्यांत आवडती इच्छा.

" भाऊसाहेब, मला सांगा. तुमची सगळ्यांत आवडती इच्छा काय आहे? तुमचें चित्त सगळें कशांत असतें? आणि तुम्हांला शांति कशानें मिळते?"

स्वतः सांगितलें, "महाराज! माझी सगळ्यांत आवडीची इच्छा म्हटली म्हणजे माझ्या लाडकीला सुख व्हावें ही. तिला कशापासून सुख मिळेल, हाच विचार नेहमीं माझ्या अंतःकरणांत चालतो. जगांत मला जर कोठें शांति मिळत असेल तर ती माझ्या ह्या लाडकीच्या नाजूक चेहऱ्यांत मिळते. महाराज! नवराबायकोच्या प्रेमाच्या गोष्टी आपल्याजवळ बोलण्याला मी जरा कचरतों; पण आज प्रश्नच निघाला आहे, तर मला आपल्या-प्रमाणें मोकळ्या मनानें सांगूं द्या कीं, माझा स्वर्ग म्हणजे माझी प्रिया आहे. महाराज! ह्या संसारांतील जे कठीण मार्ग आम्ही आक्रमण करितों ते कोणासाठीं? अशा रत्नाकरितां ह्या असार संसाराच्या भयंकर त्रासांत आम्हांला किती त्रास होतो, हें आपल्यासारख्या त्यागी जनाला कोठून ठाऊक असणार! पण तो आम्ही सोसतों, तो कशासाठीं? ह्या जगांत आम्ही जीं जीं साहसें करितों, तीं कोणाकरितां? पुष्कळ वेळां ज्याचें तोंड सुद्धां पाहूं नये असें वाटतें अशाची चाकरी करितों, ती कशासाठीं? आह्मी स्वतः उन्हांतून आणि थंडींतून हिंडतों तें कशाकरितां! हें सारें स्त्रियांकरितां. त्यांची आधीनता आमच्याकडून इतकें सर्व करवतें.

तर स्त्रियांच्यामध्यें आधीनता नसेल, सेवाधर्म नसेल; तर आम्ही ह्यांतलें काहींएक करणार नाहीं. आह्मी एकटे असलों म्हणजे आमचें पांच रुपयांत पोट भरतें, पण बायको असली कीं पंचवीस रुपये सुद्धां पुरत नाहींत. ह्यामुळें आम्हांला किती त्रास होतो, पण आम्ही तो किती शांतीनें, किती आनंदानें पत्करितों, हें तुम्हांला ठाऊक असेलच. हें सर्व कशाकरितां? फक्त स्त्रियांच्या सेवेकरितां! आमच्यांत धनीपणा आहे म्हणून, आणि स्त्रियांच्या सेवेचा मोबदला देण्याकरितां, आम्ही इतका त्रास भोगतों. कारण स्त्री आणि पुरुष हे ईश्वराचे समरूप आहेत. तेव्हां देवांच्याकरितां प्रभु जसा अवतार घेतो, तसा आमचा अवतार स्त्रियांच्याकरितां आहे. तेव्हां समजून किंवा न समजून, खुषीनें किंवा नाखुषीनें, पण स्त्रियांच्या उपकाराची फेड आह्मांला करावी लागते, आणि जेव्हां आम्ही त्याचा मोबदला देतों तेव्हांच आम्हांला शांति मिळते, संतोष होतो. स्त्रियांच्या अंगची लीनता आणि आधीनता ह्या दोन गुणांकरितां हें आम्ही सर्व करितों. कारण आधीनता हेंच स्त्रियांचें स्त्रीत्व आहे. जिच्या अंगांत आधीनता व पतिसेवा नाहीं, ती स्त्री स्त्रीरूपानें असूनही स्त्रीत्वापासून आम्ही तिला भ्रष्ट झालेली लेखतों. कारण पुरुषार्थीमुळेंच जसा पुरुष आहे आणि ज्याच्या अंगीं पुरुषार्थ नाहीं तो पुरुष असूनही 'पुरुष' ह्या नांवाला जसा लायक नाहीं– तसेंच आधीनता हेंच स्त्रियांचें स्त्रीत्व आहे. तेव्हा जिच्यामध्यें आधीनता व पतिसेवा नाहीं, ती स्त्री 'स्त्री' ह्या नांवाला व स्त्रियांच्या कामाला योग्यच नाहीं.

नाइयाकडे पाहून स्वतः म्हटलें, "आम्हां पुरुषांचें स्वाभाविक प्रेम कोणावर असतें तें तुला ठाऊक आहे?"

## स्त्रीवर नाहीं तर स्त्रीत्वावर आमचें खरें प्रेम असतें.

"कारण आम्ही पुरुष असल्यामुळें आमच्या अंगांत स्वाभाविकरीत्याच पुरुषार्थ आहे. त्यामुळें तुमच्या सेवेचा मोबदला देण्यांत आम्हांला आनंद वाटतो. तसेंच तुम्हीं तुमचीं कर्तव्यें नीट रीतीनें केलीं नाहींत कीं, तुमच्यावर रागावणें हाही आमचा अंगस्वभावच आहे. कारण मीं मघांशींच म्हटलें आहे कीं, आम्ही स्त्रियांवर प्रेम करीत नाहीं, तर स्त्रीत्वावर करितों; आणि असें होण्याचें कारण पुरुषांमध्यें पुरुषार्थ भरलेला आहे, आणि स्त्रियांमध्यें स्वाभाविक रीत्याच आधीनता राहिलेली आहे. म्हणजे आमच्या पुरुषार्थाच्या स्वाभाविक बळामुळें आम्ही सहजगत्याच स्त्रियांना आमच्यापेक्षां कमी समजतों. आणि असें असूनही स्त्रियांना आम्ही आमच्यापेक्षां जो फार मान देतों, आणि देवी म्हणून पूजा करितों, त्याचें कारण हेंच कीं, त्यांच्यामध्यें स्वाभाविकरीत्याच आधीनता आहे. त्या आधीनतेला, त्या लीनतेला, आपल्या आश्रयाला घेण्याचा पुरुषार्थपणाचा स्वभावच आहे, आणि ह्या स्वभावामुळें आम्ही स्त्रियांच्या सेवेचे दास बनतों. म्हणजे जर स्त्रियांजवळ आधीनता नसेल, सेवाधर्म नसेल, तर आम्ही त्यांना कवडीमोल समजूं."

महाराज म्हणाले, "बेटा, पाहिलेंस ? तुझ्या नवऱ्यानें एकदां स्त्रियांना वर चढविलें आणि पुन्हां लागलींच खालीं पाडिलें. आपल्या शास्त्रांत पुष्कळ ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, 'नारी नरकाचें द्वार आहे,' आणि पुष्कळ ठिकाणीं असेंही म्हटलें आहे कीं, 'जेथें स्त्रियांची पूजा होते, तेथेंच देवता वास करितात.' आतां अशा ह्या परस्परविरोधी वचनांचा अर्थ तूं समजलीस का ?"

मीं म्हटलें, "हो महाराज. तें बरोबर समजलें. ज्या स्त्रीमध्यें स्त्रीत्व आहे, म्हणजे आधीनता आहे, पतिप्रेम आहे, सतित्व आहे, सेवाधर्म आहे, ती स्त्री पूजा करण्यास योग्य आहे; आणि जिच्यांत ते गुण

नाहींत, ती नरकाच्या द्वाराप्रमाणें आहे. अशा स्त्रियांना जग तुच्छ समजतें."

महाराज म्हणाले, "बेटा, आतां तूं पहा कीं, स्त्रीत्वाशिवाय स्त्रीला शास्त्रांत 'नरकाचें द्वार' म्हटलें आहे. म्हणून आतांचे लोक तिला हलकी समजतात. त्यांत नवल काय ? कित्येक उच्छृंखळ सुधारक म्हणतात कीं शास्त्र लिहिणारे पुरुष होते, म्हणून त्यांनीं स्त्रियांना असें हलकें लेखलें आणि स्त्रियांचे हक्क तुडविले आहेत. पण बेटा, असें कांहीं नाहीं. स्त्रियांशीं त्यांचें कांहीं वैर नव्हतें, पण स्त्रियांची प्रकृति आणि पुरुषांचा स्वभाव पाहून,आणि ईश्वरी रचना समजून त्यांनीं शास्त्रें लिहिलीं आहेत. त्यांना माहीत होतें कीं, पुरुषांत उद्दामपणा आहे. उद्दामपणा आधीनतेच्या जवळ नसेल,उद्दामपणा समोर होऊन कांहीं कधीं वश होत नाहीं. इतकेंच नव्हे, तर स्त्रियांचा स्वाभाविक आनंद आधीनताच आहे. स्त्री स्वभावतःच लीन असते, आणि लीनतेचा गुण असा आहे कीं, नमूनच रहावयाचें, ताबेदारींतच रहावयाचें. स्त्रीपुरुषांत असे स्वाभाविक गुण असल्यामुळें ईश्वरानें स्त्रियांवर पतिप्रेम आणि सेवाधर्म सोंपविलें असून पुरुषांवर स्त्रियांच्या सेवेचा मोबदला देण्याचें म्हणजे पुरुषार्थाचें काम सोंपाविलें आहे. त्यामुळें दोघांना आनंद मिळतो आणि दोघांच्याही आत्म्याची उन्नति होते."

मीं म्हटलें, "आपण कशाकरितां सेवाधर्मावर इतका जोर देतां ? स्त्रियांनीं पुरुषांप्रमाणें पुरुषार्थ कां करूं नये ?"

स्वतः अगदीं आश्चर्यचकित होऊन म्हटलें, "अग वेडे ! अजून हा प्रश्न ! कशाकरितां सेवाधर्म ? ईश्वराची स्त्रीजातीवर खास कृपा आहे म्हणून ईश्वर तुम्हांला थोड्याबद्दल फार देण्याला इच्छितो. म्हणून तुम्हांवर सेवाधर्म सोंपविलेला आहे. अजून कांहीं शंका आहे ?"

महाराज म्हणाले, "ईश्वर थोड्यांतून फार कसें देतो, तें तिला दाखवा, म्हणजे तिची शंका राहणार नाहीं."

तेव्हां माझ्याकडे पाहून म्हटलें, " माझ्या स्वर्गा ! तुला ठाऊक आहे का ? कीं तुमचें हंसतमुख पहाण्याकरितां आम्ही विपत्तीच्या मुखांत शिरतों, तुमची मधुरवाणी ऐकण्याकरितां आम्ही हजारों कोसांवरून धांवत येतों, तुमच्या एका चुंबनाकरितां आम्ही स्वर्गाला लाथ मारायला तयार होतों, तुमच्या अश्रूच्या थेंबाकरितां आम्ही रक्ताच्या धारा वाहवितों, तुमच्या नाजुकतेसाठीं आम्ही रणसंग्रामांत मरतों, तुमच्या गोड हावभावासाठीं आम्ही स्वार्थावर लाथ मारितों, तुम्हीं निर्दोष बच्चांना खेळवावें ह्यासाठीं आह्मी तलवारीशीं आणि तोफेच्या गोळयांशींही खेळतों, तुम्हांला सुखानें घरांत राहतां यावें म्हणून आम्ही परदेशीं जातों, तुम्हांला—या लोकींच्या देवींना—वस्त्रालंकारांनीं भूषवून तुमची पूजा करण्याकरितां म्हणून आम्ही हजारों कष्ट काढितों. तुमच्या गोड चरित्रांची किंमत समजण्यासाठीं आम्ही ज्ञान मिळवितों, तुम्हांला सुंदर करण्याकरितां आम्ही कुरूप होतों. लाडके लक्षांत ठेव कीं, स्त्रियांच्या सुखाकरितां पुरुषांचा अवतार आहे. सर्व कशाकरितां ? फक्त तुमच्या सेवेकरितां, तुमच्या प्रेमाकरितां. तुमच्याकरितां आम्ही इतकें करितों, त्याच्याबद्दल तुम्हांला काय करावयाचें ? तर फक्त सेवा ! "

---

## सेवा म्हणजे काय ?

"आम्ही तुमच्याजवळ कशा प्रकारची सेवा मागतों? आम्ही तुमच्याजवळ लष्करी शिपायासारखा पहारा मागत नाहीं. आम्ही तुमच्याकडून घाण्याच्या बैलाप्रमाणें काम घेऊं शकत नाहीं. आम्ही तुम्हांला पैसा मिळवून आणण्यास सांगत नाहीं. आमची सेवा करण्याकरितां स्मशानासारख्या भयानक स्थळीं अगर लढाईवर शत्रूच्यासमोर बोलावीत नाहीं, किंवा आफ्रिकेच्या गुलामाप्रमाणेंही वागवूं इच्छित नाहीं; पण आम्ही फक्त तुमच्या

अंतःकरणाचें प्रेम मागतों, तुमचें हमेशा हंसतमुख पहावयास इच्छितों आणि तुमच्यासारख्या देवींच्या तोंडचे आशीर्वाद इच्छितों. कारण तुम्ही प्रसन्न असलां म्हणजेच आमच्या घरांत देवता खेळतात, असें आमच्या प्राचीन ऋषींनीं आपल्या पवित्र शास्त्रद्वारें आम्हांला शिकविलें आहे. म्हणून माझ्या स्वर्गा ! आम्ही तुमच्यापासून सेवाधर्म म्हणजे पतिप्रेम आणि आधीनताच मागतों, आणि त्याचें स्थूलरूप तुमचें हंसतमुख हेंच आहे. म्हणजे तुम्ही नेहमीं हंसतमुख असावें हीच तुमची सेवा ! ह्याशिवाय दुसरें कांहीं आम्ही मागत नाहीं."

महाराज माझ्याकडे पाहून म्हणाले, " मुली ! तुझ्या नवऱ्यानें तर खुबी केली. पण सेवाधर्माचा अर्थ तूं आतां समजलीस, कीं नाहीं ? "

मीं म्हटलें, " होय, महाराज. सेवेचा अर्थ आतां मी बरोबर समजलें. पश्चिमेचे लोक शास्त्राचा हेतु आणि सेवेचा खरा अर्थ समजत नाहींत. त्यामुळेंच ते असें म्हणतात कीं, हिंदु शास्त्रकारांनीं स्त्रियांचे हक्क तुडविले आहेत. पण येथें तर त्याहून उलट आहे. हा किती मजेचा अर्थ आहे ! माझ्या दुसऱ्या भगिनींप्रमाणें मलाही वाटत होतें कीं, सेवेचा अर्थ काय असेल, कोण जाणे ! पण आतां सेवेमधून व दास्यत्वांतून आमची पूजा निघाली. आमचे हंसतमुख हीच आमची सेवा ! धन्य आहे आपली ! हें सूत्र आपण कोठून शोधून काढिलें ? पण खरोखर असेंच आहे. कारण प्रेमापासून पवित्रता येते आणि इतरांपेक्षां अशांच्या मुखावर आनंद लवकर प्रगट होतो. म्हणून हमेशा हंसतमुख रहावयाचें हचि आमची सेवा आहे. अहाहा ! काय आमच्यावर ईश्वरी कृपा आहे ! स्त्रीजातीवर ईश्वराची इतका कृपा असेल, ह्याची मला कल्पना नव्हती. हमेशा आनंदांत रहावयाचें हीच जर आमची सेवा असेल, तर मग आणखी काय पाहिजे ? पण खेदाची गोष्ट अशीं कीं, भगिनी तितकेंही करूं शकत नाहींत. किती दिलगिरीची गोष्ट कीं, त्या हा आनंद भोगूं

शकत नाहींत ! सेवेंत तर सर्व आहे. जीवितकर्तव्य, मनुष्यजन्माची सार्थकता, देवांचा स्वर्ग, ईश्वरी कृपा आणि मोक्षधर्माचें सुख—हें सर्व सेवतें आहे; आणि अशी महान् सेवा आमच्या हंसतमुखानें होते. ह्यापेक्षां मोठें आश्चर्य दुसरें काय ? महाराज, मला सांगा कीं, ईश्वरानें स्त्रियांवरच इतकी कृपा कां केली कीं त्यांच्या हंसतमुखानेंच त्यांची सेवा होऊन मुक्ति यावी !"

---

## स्त्रिया आनंदाचा अवतार आहेत.

महाराज म्हणाले, "बेटा, तुला ठाऊक आहे कीं, प्रभु आनंदस्वरूप आहे. त्यामुळें प्रभूचे भक्त, देवही आनंदस्वरूप आहेत आणि स्त्रिया देवाच्या समरूप आहेत, म्हणजे स्त्रिया ह्या आनंदाच्याच मूर्ति आहेत. त्यांना ईश्वरानें एवढ्याचकरितां जन्म दिला आहे कीं, त्यांनीं आपल येथील आयुष्य देवांच्या प्रतिनिधींसारखें आनंदांत घालवावें, आणि जगांत आनंद वाढवावा. आनंदांत सौंदर्य आहे, आनंदांत प्रेम आहे, आणि आनंदांतच आधीनता आहे. ह्या तीन अलौकिक वस्तु आरंभाला स्त्रियांच्या प्रकृतींत भरून मग ईश्वरानें त्यांच्या मूर्ति उत्पन्न केल्या, आणि त्यामुळें आनंद, प्रेम आणि आधीनता हे तिन्ही स्वाभाविक रीतीनेंच त्यांच्यांत राहिले आहेत. म्हणून त्या आनंदाच्या मुशी आहेत. लक्षांत ठेवा कीं, मला स्त्रियांची स्तुति करावयाचें खरोखर कांहीं एक कारण नाहीं, पण ईश्वरी इच्छा काय आहे ? शास्त्रांची आज्ञा काय आहे ? मनुष्यस्वभावाचें वळण कसें असतें ? स्त्रियांचें आणि पुरुषांचें कर्तव्य काय ? हें तुला नीट समजण्याकरितां ह्या खोल तत्त्वांचें मर्म सोप्या भाषेंत उघड उघड करून मी सांगत आहें. स्त्रिया ह्या आनंदाच्या मूर्ति आहेत आणि ह्या दुनियेंत आनंद पसरविण्याकरितां त्यांचा जन्म आहे. ही गोष्ट तुला पटते कां नाहीं !"

मीं म्हटलें, " होय, कांहीं ठराविक मर्यादेपर्यंत हें म्हणणें मला कबूल आहे खरें, पण ह्या गोष्टीचा ह्याच्यापेक्षां थोडा जास्त खुलासा कराल तर बरें होईल."

महाराज म्हणाले, "हद्दीची गोष्ट येथें नाहीं. येथें हद्दपारीची गोष्ट आहे. येथें तर सिद्धांताच्या गोष्टी आहेत, कारण अनुमानावर आपल्या गोष्टींचा आधार अवलंबून नाहीं. पण जगताची रचना स्त्रीपुरुषांचें बंधन म्हणजे ईश्वरी इच्छा ह्यावर अवलंबून आहे. बेटा ! प्रेम, सौंदर्य आणि आधीनता स्वाभाविक रीत्याच त्यांच्यांत राहिलीं आहेत, आणि म्हणूनच स्त्रिया आनंदाच्या मूर्ति आहेत; असेंच नव्हे, तर पुष्कळ गोष्टींत पुरुषांपेक्षां स्त्रिया जास्त आनंद भोगूं शकतात. क्षुल्लक दिसणाऱ्या वस्तूपासून अगर गोष्टींपासून स्त्रियांना कसा आनंद होतो, हें ज्यांनीं पाहिलें असेल, त्यांना ह्या गोष्टीचें इतकें नवल वाटणार नाहीं.

---

## स्त्रियांना क्षुल्लक गोष्टीपासूनही मोठा आनंद होतो.

" पुरुषांना मोठा अधिकार मिळाल्यापासून सुद्धां जितका आनंद होत नाहीं, तितका आनंद स्त्रियांना पुरुषांनीं त्यांच्याकडे हंसून पाहिलें कीं होतो. मोठमोठ्या पंडितांच्या चातुर्ययुक्त अशा संभाषणापासून पुरुषांना जितका आनंद होत नाहीं, तितका आनंद स्त्रियांना लहान मुलांच्या बोलण्यानें होतो. शत्रूला जिंकून मोठा जय मिळविण्यानें पुरुषांना जितका आनंद होतो, त्याच्यापेक्षां किती तरी पट अधिक आनंद बायकांना नवऱ्याच्या विनोदपूर्ण चार शब्दांनीं होतो. खोल खोल आणि मोठमोठ्या तत्त्वज्ञानाच्या गोष्टींनीं पुरुषांना जितका आनंद होत नाहीं, तितका आनंद सखीजनाशीं होणाऱ्या गोडें गोड थट्टामस्करीपासून स्त्रियांना होतो. सृष्टिसौंदर्याच्या अलौकिक देखाव्यापासून पुरुषांना जितका आनंद होत नाहीं तितका

स्त्रियांना आपल्या मुलांचीं चित्रें आणि चरित्रें पाहून होतो. एखादा मोठा शोध लागल्यापासून सुद्धां पुरुषांना जितका आनंद होत नाहीं, तितका आनंद नवऱ्याचें पत्र वाचून किंवा मुलांना गाणीं म्हणून स्त्रियांना होतो एक मोठें हॉस्पिटल बांधल्यानेंसुद्धां पुरुषांना जितका आनंद होणार नाहीं, तितका आनंद भल्या सासूचे पाय चेंपल्यानें किंवा शेजारणीचें कपाळ चेंपण्यानें स्त्रियांना होतो. बेटा! तुला ठाऊक नाहीं का? कीं, पुरुषांना चांगल्या व्याख्यानापासून किंवा उत्तम लेख लिहिल्यापासून जितका आनंद होतो, त्यापेक्षां आपल्या नवऱ्याशीं ज्यांत अर्थ नाहीं अशा गोड गोड गोष्टी सांगितल्यानें स्त्रियांना विशेष आनंद होतो. तर हें सर्व कशामुळें? ह्याचें कारण हेंच कीं, स्त्रिया आनंदाच्या मूर्ति आहेत; म्हणजे थोड्यांतूनही त्यांना पुष्कळ आनंद मिळावा अशी ईश्वरानें त्यांचे प्रकृतीची योजना केली आहे. कारण स्त्रियांच्यामार्फत ह्या दुनियेंत आनंद वांटावा अशी ईश्वराची इच्छा आहे,म्हणून स्त्रियांचीं अंतःकरणें आनंदानें भरलेलीं आणि लवकर आनंद मिळविणारीं आहेत. तो त्यांच्याजवळ पुष्कळ दिवस टिकतो आणि पुरुषांचें त्यांच्या उलट आहे. म्हणजे पुरुष स्त्रीशिवाय बाकीच्या वस्तूंपासून आनंद मिळवूं शकत नाहीं; आणि मिळाला तर तो फार वेळ टिकत नाहीं. ह्याचें कारण हेंच कीं, पुरुषामध्यें स्वाभाविक रीत्याच पुरुषार्थ भरलेला आहे.

---

## पुरुषार्थाचें एक खास लक्षण.

असें आहे कीं, कशांतूनही थोड्या वेळांत तृप्ति मिळावयाची नाहीं. जें झालें आहे आणि जें व्हावयाचें आहे त्यापेक्षांही जास्त इच्छा ठेवावयाची. असें असल्यामुळें पुरुष लवकर आनंद मिळवूं शकत नाहींत; कारण तो आनंद जर त्यांच्यांत कायम राहील, तर दुसरा जास्त आनंद मिळविण्याकरितां पुरुषार्थ करण्याची त्यांची इच्छा दडपून जाईल. म्हणून

दयाळू प्रभूनें जगताच्या हिताकरितां पुरुषांच्या स्वभावांत असें तत्त्व ठेविलें आहे कीं त्यांना स्त्रियांच्यासारखा लवकर आनंद मिळवितां येऊं नये, आणि स्त्रिया जितका वेळ तो आपल्या अंतःकरणांत टिकवूं शकतील तसा त्यांच्या हातून टिकूं नये. क्षुल्लक गोष्टीपासून स्त्रिया जास्त आनंद मिळवूं शकतात, ह्याचें कारण हेंच कीं, त्यांच्या प्रकृतींत ईश्वरानें दीनता, आधीनता ठेविली आहे.; आणि आधीनतेचें लक्षण हेंच आहे कीं, ईश्वरी इच्छेनें जें मिळेल त्यांत आनंद मानावयाचा. आधीनता थोड्याला पुष्कळ करूं शकते; आणि प्रेम मिळमिळीतालाही गोड करितें; म्हणजे त्यांना थोड्यापासूनही आनंद होतो. त्यांना साधारण गोष्टींत विशेष वाटतें, म्हणजे त्यांच्यांत आधीनता आहे. त्या लहान–मोठें, हलकें–भारी, असें पहात नाहींत, पण त्यांचें प्रेमळ हृदय देणाऱ्याच्या अंतःकरणाकडे पहातें. म्हणजे त्यांना लहान लहान वस्तूंपासूनही त्या वस्तूंच्या प्रमाणानें जास्त आनंद लवकर मिळवितां येतो. इतकेंच नाहीं, तर त्यांच्यांत आधीनता असल्यामुळें स्वाभाविक रीत्याच किती एक अंशीं त्यांना परतंत्र रहावें लागतें. अशा स्थितींत जर त्यांच्या अंतःकरणांत आनंद टिकणार नाहीं तर त्यांचें आयुष्य कंटाळवाणें होईल. म्हणून परमेश्वरानें कृपा करून स्त्रियांचीं अंतःकरणें अशीं बनविलीं आहेत कीं, त्यांत पुष्कळ आनंद टिकूं शकतो. बेटा ! जशी वीज भरण्याकरितां 'बॅटरी' लागते, तसें दुनियेंत स्वर्गाचा आनंद भरण्याकरितां स्त्रिया उत्पन्न केल्या आहेत. 'बॅटरीं'त जशी निरानिराळ्या तेजाबांच्या मिश्रणानें वीज उत्पन्न होते, तसें स्त्रियांमध्यें सौंदर्य आणि आधीनतेच्या संयोगानें आकर्षणशक्ति उत्पन्न केली आहे; आणि स्त्रियांच्या ह्या स्वाभाविक आकर्षणामुळें त्यांच्या आणि पुरुषांच्या आयुष्यांत गोडी वाढून जगांत आनंद वाढतो. बेटा ! लक्षांत ठेव कीं, स्त्रियांच्या मार्फत जगांत जितका आनंद वाढतो, तितका कोणत्याही उपायांनीं वाढत नाहीं. कारण कीं, ह्या दुनियेंत स्त्रियाच आनंदाचें स्थान आहेत. आणि स्वर्गाचा आनंद पसरण्याकरितां देवांच्या प्रतिनिधींप्रमाणें ईश्वरानें त्यांची योजना केली आहे. बेटा ! स्त्रिया लवकर आनंद मिळवूं

शकतात आणि पुष्कळ वेळ टिकवूं शकतात, ही गोष्ट तूं आपल्या अनभवावरून सांगूं शकतेस कीं नाहीं ?"

मीं म्हटलें, "होय, महाराज. ती गोष्ट मी बरोबर समजलें आणि तें मला खरें वाटतें."

महाराज म्हणाले, "लवकर आनंद मिळवावयाचा आणि पुष्कळ वेळ टिकवावयाचा ह्याचा अर्थ काय ? बेटा ह्याचा अर्थ असा कीं, स्त्रिया आनंदाच्या प्रत्यक्ष मूर्ति आहेत, आणि तूं पहा कीं, जर काष्ठपाषाणाच्या जड मूर्ति आपल्या भावनेप्रमाणें आपल्याला आनंद देऊं शकतात, तर मग ह्या आनंदाच्या देवी आपल्याला कसा आनंद देणार नाहींत ? आतां त्या जगांत आनंद कसा वाढवूं शकतील, ह्या गोष्टी तुझा नवरा तुला समजावून देईल. त्या गोष्टी माझ्यापेक्षां रावसाहेबांना चांगल्या रीतीनें सांगतां येतील." असें म्हणून त्यांनीं स्वतःकडे पाहिलें.

---

## स्त्रियांना मान मिळतो तो स्वाभाविक आहे.

स्वतः माझ्याकडे पाहून म्हटलें, "स्त्रिया आनंदाच्या मूर्ति आहेत, ही गोष्ट महाराजांनीं इतकी स्पष्ट करून सांगितली आहे कीं, त्यांत शंका ठेवण्यासारखें आतां कांहीं राहिलें नाहीं. तरापण ह्या बाबतीकडे मीं पुष्कळ लक्ष दिलेलें आहे. तेव्हां ह्यासंबंधीं मी कांहीं कमीजास्त सांगूं शकेन खरा; आणि जें कांहीं सांगेन तें माझ्या स्वर्गा ! मी तुझ्या हंसतमुखावरून शिकलों आहें हें मला आधीं कबूल केलें पाहिजे."

मीं म्हटलें, "जेथें तेथें माझें नांव घालण्यांत आपल्या जास्त काय वाटतें ? जर हें सर्व मला समजतें तर मग मीं हें आपल्याला कशाकरितां

विचारिलें असतें ? मला जी गोष्ट माहीत नाहीं, ती आपण माझ्या जवळून कसे शिकलांत ? ”

माझ्या हातांतला हातरुमाल घेऊन त्याच्याशीं खेळत खेळत म्हटलें, “ माझे लाडके, मी तुला कांहीं मुद्दाम मोठी करीत नाहीं. परमेश्वरानेंच तुम्हांला मोठ्या केल्या आहेत; म्हणजे ईश्वरी इच्छेनेंच आमच्या अंतः-करणांत तुमचें मोठेंपण भरून राहिलें आहे. आम्ही पुरुष आमचे स्वार्थांत इतके धुंद असतों व आमच्या पुरुषार्थाच्या जोरांत इतके उन्मत्त झालेले असतों कीं, जर आमचें चालेल तर तुमच्या मोठेपणाच्या गोष्टी तर राहिल्याच पण तुमच्याकडे वर डोळा करून आम्ही बघणार सुद्धां नाहीं आणि तुमच्या नाजुकतेला आमच्या बळानें दडपून टाकूं. पण सर्वसमर्थ जो प्रभू त्याची दया आहे, तुमच्यांत आधीनता आहे आणि आमच्यांत आधीनतेवर प्रेम ठेविलें आहे, म्हणून आम्ही समजून किंवा न समजून स्वाभाविक रीत्याच तुम्हांला मान देतों. तेव्हां आजपासून लक्षांत ठेवा कीं, स्त्रीजातीला पुरुष जो मान देतात तो मान कांहीं स्वार्थाचा नाहीं. तो मुद्दाम दिलेला असतो. तो मान कांहीं खुशामतीकरितां किंवा चांगलें दिसावें म्हणून किंवा हल्लींच्या काळांत जी मानपत्राची हूळ उठली आहे त्यांतला वरकरणी नाहीं, पण स्त्रियांच्या आधीनतेमुळें पुरुषाच्या पुरुषार्थांतून उत्पन्न झालेला हा स्वाभाविक मान आहे म्हणून मी जो तुला मोठी समजतों, तो तुला संतोष वाटण्याकरितां म्हणून नव्हे, पण आपलें प्रेम, कीं जें प्रेम ईश्वराच्या प्रेमापासून उत्पन्न झालेलें आहे आणि शेवटीं ईश्वरी प्रेमाला ओळखणार आहे, त्या प्रेमाच्या मार्गांत प्रभु स्वतः तुम्हांला मान देण्यास आम्हांला भाग पाडितो. म्हणून आजपासून लक्षांत ठेव कीं, स्त्रीजातीला पुरुष जो मान देतात, तो मान कांहीं बनावट नाहीं, तर स्वाभाविक आहे.

---

## स्त्रियांच्या चरणीं नमल्यानें होणारे फायदे.

" आतां तूं पहा कीं, जेव्हां स्त्रियांकरितां पुरुषांना इतका मान आहे, तेव्हां त्यापासून पुरुष काय काय शिकूं शकतात ? आपण जेव्हां लहान मुलाला हंसतांना आणि खेळतांना पहातों, तेव्हां आपल्याला किती आनंद होतो हें तुला माहीत आहेच. आपला तो आनंद मुलाला समजत नाहीं, म्हणून आपला आनंद कमी होतो का ? सुंदर फुलें आपल्याला काय आणून देतात ? पण त्यांना पाहून आपल्याला आनंद होतो. तसेंच माझ्या स्वर्गा ! तुमचें प्रेम, तुमची आधीनता, तुमचें सौंदर्य आणि तुमची सेवा पुरुषार्थाला आपण होऊन आपल्या चरणीं लाविनात; आणि असें चरणीं पडण्यांत आमचा आनंद आहे. त्या आनंदांत खोल उतरल्याशिवाय आपल्याला दिसणार नाहींत, अशीं रहस्यें असतात; तीं आपल्या आपण प्रकट होतात, आणि तीं तुमच्या आणि आमच्या अंतःकरणांत आपल्या आपण उत्पन्न होतात. म्हणून तुम्हांला जरी समजत नाहीं तरी तुमच्या स्वाभाविक मोठेपणानेंच आमच्या अंतःकरणांत जो आदर आहे, त्यामुळें आम्ही तुमच्यापासून नित्य नवें नवें शिकतों. तें असें असतें कीं, तें कोणत्याही पुस्तकांत लिहिलेलें सांपडावयाचें नाहीं, आणि तें इतकें असतें कीं, तें सर्व एकत्र पाहिल्यास आश्चर्य वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. कोणताही गुरु शिकवूं शकणार नाहीं, इतकें तुमची आधीनता आम्हांला शिकविते. मला सांग कीं माझ्याकरितां तुझें अंतःकरण धडपडतें, तें तुला कोणीं शिकविलें, म्हणून ? माझ्याकडे पहातांक्षणीं तुझ्या डोळ्यांत एक प्रकारचें पाणी दिसतें, तें तूं कोठून खरेदी केलेंस ? मी जेव्हां परगांवीं जावयास निघतों, तेव्हां डोळ्यांतून येणारे अश्रु काढावयास तुला एखाद्या मास्तरानें शिकविलें होतें काय ? आपण दोघे जेव्हां सोंगट्या किंवा बिझिक खेळतों, आणि प्रसंगोपात हारजीत झाली म्हणजे तूं विनोदानें जे शब्द बोलतेस

ते कोणत्या पुस्तकांतून घोकून ठेविलेले असतात ? तसेंच एखाद्या पुस्तकांतून जेव्हां एखादा भाग तुला समजत नाहीं, तेव्हां तो दुसऱ्याकडून विचारून घेण्याऐवजीं माझ्याकडून समजावून घेण्यांत तुला विशेष आनंद कां वाटतो ? तसेंच, माझ्या स्वर्गा ! मला सांग, हे तुझ्या चेहेऱ्यावर होणारे फेरफार, डोळ्यांतील गोडी, अंतःकरणाच्या निरनिराळ्या ऊर्मी, ह्या सर्व तूं कोणाजवळ शिकावयास गेली होतीस ? हें शिकविणारा मास्तर दाखीव; किंवा हें दुसरीकडे विकत मिळत असल्यास तें दुकान मला दाखीव म्हणजे मीही थोडें खरेदी करीन. "

---

## प्रेमाची वीज.

मीं म्हटलें, " तें सर्व शिकविणारे मास्तर हे येथें आहेत. " असें म्हणून मीं हंसत हंसत स्वतःकडे बघितलें. त्या वेळीं आमच्या दोघांच्या मनांत जो आनंद झाला, जे विचार आले, ते सांगतां येणें अशक्य आहे. तो आनंद कांहीं अपूर्व होता. थोडा वेळ अशा रीतीनें माझ्याकडे पाहिल्यानंतर स्वतः म्हटलें, " छे ! छे ! तें कांहीं चालणार नाहीं. अशी उडवाउडवी करून भागावयाचें नाहीं आणि मजवर केलेला असा खोटा आरोपही चालावयाचा नाहीं. मी कधीं कोणाचा मास्तर झालों नाहीं. "

आतां काय जबाब द्यावा, ह्या विचारांत मी होतें; तोंच म्हटलें, " अग वेडे ! हें सर्व जसें तूं माझ्यापासून बिनशिकवितां शिकलीस, तसेंच आम्हीही तुमच्याजवळ तुम्हांला न कळत आमच्या पुरुषार्थानें अनेक गोष्टी शिकलों. तुमचा स्पर्श म्हणजे प्रेमाची वीज आहे. त्या विजेचा स्पर्श झाल्याबरोबर त्या गोष्टी आपोआप येतात. "

---

# स्त्रियांपासून मिळणारें ज्ञान.

" लक्षांत ठेव कीं, आम्ही पुरुष तुमच्याजवळून जितकें ज्ञान मिळवितों, तितकें दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं मिळवूं शकत नाहीं. शाळांतील व कॉलेजांतील पुस्तकांत पाहिजे तितकें ज्ञान असू दे, पण स्त्रियांच्या चेहऱ्यांत जें ज्ञान भरलेलें आहे त्याच्यापुढें तें कांहींच नाहीं. शाळेंत आम्हांला कोरडें ज्ञान मिळतें, पण तें ज्ञान रसभरित तुह्मीच करितां. कॉलेजांतील ज्ञान जोंपर्यंत तुमच्या प्रेमाच्या चाळणींत चाळलें जात नाहीं, गृहस्थाश्रमाच्या सुपांतून पाखडलें जात नाहीं आणि कुटुंबाच्या स्नेहरूपी उखळांत कांडलें जात नाहीं तोंपर्यंत तें ज्ञान कोरडेंच असतें, तोंपर्यंत तें हलक्या प्रकारचें असतें, तोंपर्यंत तें पढविलेल्या पोपटाच्या ज्ञानाप्रमाणेंच असतें. जेव्हां तें ज्ञान तुमच्या हाताखालीं निभेल, तुमच्या कसोटीला उतरेल, तेव्हांच खरें–तेव्हांच तें ईश्वरी कोर्टांत रुजू व्हावयाचें. कारण स्त्रियांच्या सहवासांत आल्याशिवायचें ज्ञान –लग्न-स्नेहाशिवायचें ज्ञान कठोर असत, अनुभवाशिवायचें असतें, आणि ईश्वरी प्रेमावेगळें असतें, पण लग्नस्नेहाचें ज्ञान कोमल, रसमय, आणि जास्त संपूर्ण–कर्तव्यरूप–ठरतें. असें होण्याचें कारण असें आहे कीं, स्त्रियांची आधीनता, प्रेम आणि सौंदर्य ह्यांच्यायोगानें तें ज्ञान कांहीं नवेंच रूप धरितें. जसें, परिसाच्या संयोगानें लोखंडही सोनें होतें, तसेंच स्त्रियांच्या आधीनतेच्या योगानें आमचें कठोर ज्ञान रसमय होतें; आणि आमचा पुरुषार्थही परमार्थाकडे वळतो. इतकेंच नव्हे तर, लग्नस्नेहानें तें ज्ञान शेंकडोंपट वाढतें, आणि त्यामुळें आजूबाजूचें ज्ञानही प्रकाशित होतें. हें ज्ञान स्त्रियांच्या आधीनतेशिवाय दुसऱ्या कोणत्याही रस्त्यानें मिळणें शक्य नाहीं.

" लाडके ! मी कॉलेजांत रसायनशास्त्र शिकलों, पण मुलांकरितां भूक तहान सोसावयाचें कोठें शिकलों ? मी शाळेंत भूगोल

शिकलों, पण घरचें प्रेम—बायकांचें प्रेम, कीं जें अलौकिक आहे आणि ज्यापासून इतर सर्व प्रेम उत्पन्न होतें तें—कोठें शिकलों ? कॉलेजांत शरीररचना आणि मुडदे-फाड शिकलों, पण दुसऱ्याच्या अंतःकरणांत अमृत ओतावयाचें कोठें शिकलों ? कॉलेजांत जरी गणितशास्त्रांत पास झालों, तरी लग्नस्नेहापासून काय सुख होतें ह्याचें गणित मला कोठें येत होतें ? कॉलेजांत मला भूमिति आली, पण तिच्या आडव्या उभ्या रेघा माझ्या पाटीवरच राहिल्या आणि त्याच्या बदली मोक्षाच्या रेघा तूं दाखविल्यास. शाळेंत मी नकाशांत रंग भरावयाला शिकलों, पण लहान मुलांच्या अंतःकरणांत भविष्याचे रंग भरावयास कोठें शिकलों ? शाळेंत मी गाणें शिकलों, पण तुझ्या अंतःकरणाच्या ऐक्याशिवाय, तुझ्या तोंडाच्या पुस्तकाशिवाय, रसभरित प्रासादिक काव्यें मी यदृच्छेनें काढूं शकत नव्हतों. पंतोजीच्या शाळेंत 'एक दोन ' घोकायला शिकलों, पण तुझ्या संगतीन ईश्वराचें नांव घ्यावयास आणि त्याची कृपा ओळखावयास लागलों. सारांश, कॉलेजाचें आणि शाळेचें शिक्षण सूक्ष्म बीजरूपाचें असतें. तें तुमच्या संगतीनें म्हणजे लग्नस्नेहानें वृक्षरूप व फळरूप होतें, ह्मणूनच प्राचीन ऋषींनीं लग्नाला धर्माचें एक अंग मानलें आहे, म्हणूनच शास्त्रकार स्त्रीविरहित पुरुषाला अर्धा समजतात. स्त्रियांच्या संगतीनंच पुरुष पूर्ण होतो, आणि पुरुषांमुळेंच दुनियेची आबादानी आहे, म्हणूनच जगांत स्त्रियांच्या महिम्याचें वर्णन होतें. ”

---

## लग्न म्हणजे यज्ञ आहे.

माझ्याकडे पाहून महाराज म्हणाले, “ तुझ्या नवऱ्यानें तर खुबी केली. पण खरोखर असेंच आहे. विद्यार्थिदशेंत लाविलेलें बीं गृहस्थाश्रमांतच फळरूपानें अथवा वृक्षरूपानें उदयाला येतें. ह्मणूनच

शास्त्रकारांनीं चारी आश्रमांत गृहस्थाश्रमाला मुख्य मानिलें आहे, आणि त्याकारितांच ऋषींनीं लग्नाला यज्ञ मानिला आहे. ”

मीं म्हटलें, “ काय ? ही तर नवी गोष्ट. लग्न म्हणजे यज्ञ. महाराज, पुन्हां ही खुबी कोठून काढिली ? तर मग आम्हीही तरून जाणार, कारण लग्न म्हणजे यज्ञ. तर यज्ञाचें फळ कांहीं असें तसें नाहीं. पण हें मोठें नवल आहे. स्वर्ग इतका जवळ तुम्ही कसे आणूं शकतां ? ”

महाराज ह्मणाले, “ बेटा ! ही तर जुन्यांतली जुनी गोष्ट आहे. ही नवी नाहीं. प्राचीन ऋषि लग्नाला यज्ञच मानीत असत आणि अशा यज्ञांनीं–ह्मणजे खऱ्या लग्नांनीं–माणसें तरून जात, ह्यांत कांहीं संशय नाहीं. बेटा ! यज्ञ हा शब्द ऐकून तूं एवढी थक्क कां होतेस ? यज्ञ कांहीं एकाच प्रकारचा नाहीं. निरनिराळे शेंकडों यज्ञ आहेत. पण अंतीं त्या सर्वांचें फळ एकच आहे; आणि तें हेंच कीं, ईश्वराच्या जवळ जाणें, ईश्वराला ओळखणें. जे व्यवहाराला आणि धर्माला निरनिराळे मानितात, त्यांना लग्न हा यज्ञ आहे, असें म्हटल्याचें आश्चर्य वाटलें तर असो. पण आपण आर्य, कीं ज्यांचें जीवनच धर्ममय आहे, त्यांनीं या बाबतींत कशी शंका घ्यावयाची ? ”

मीं ह्मटलें “ आपली गोष्ट खरी आहे. आपला व्यवहार धर्माला अनुसरून आहे आणि आपला धर्म व्यवहाराला मदतगार होईल असा आहे; पण म्हणून कांहीं यज्ञाची बरोबरी लग्न करूं शकणार नाहीं. ”

महाराज म्हणाले, “ बेटा, मला यज्ञाचा अर्थ सांग. ”

मीं म्हटलें, “ यज्ञ ह्मणजे प्रभूकारितां केलेलीं खास कामें. अशा कामांत धनाचा व्यय करावयाचा असतो, मनावर ताबा ठेवावयाचा असतो, आणि स्वार्थाचा बली द्यावयाचा असतो, हरिभक्त आणि विद्वान् यांची सेवा करावयाची असते, कांहीं पुष्कळ खर्च करावयाचा असतो, व कांहीं बळीदान लागतें, निरनिराळे मंत्र आणि स्तोत्रे यांनीं

ईश्वराची प्रार्थना करून त्याचे गुण गावयाचे असतात. हें सर्व केल्यानें मनाला एक प्रकारची शांति मिळते, आत्मिक शांति मिळते, भक्ति दृढ होते, आणि उत्तम आशेमध्यें आनंददायक रीतीनें मरण येतें. हें सगळें आणि त्याहूनही जास्त यज्ञानें होतें. अशा पवित्र यज्ञाची बरोबरी लग्नानें कशी होणार ? ”

महाराज म्हणाले, “ आतां लग्नाचा अर्थ सांग पाहूं. ”

---

## लग्नाचा अर्थ.

मीं म्हटलें, “लग्नाचा अर्थ ? तो मला नाहीं सांगतां येणार. ती रामकुब्जा म्हणत असे कीं, लग्न म्हणजे त्रास, लग्न म्हणजे गुलामगिरी, लग्न म्हणजे घटकेचें हंसणें आणि बाकी रडणें. लग्न म्हणजे हंसून मागितलेली उपाधि, लग्न म्हणजे स्वर्गाची वाट सोडणें, लग्न म्हणजे मनाचें आवड–निवड–स्वतंत्रता–सोडून केरपोतेऱ्याशीं गांठ पाडून घेणें, लग्न हा एक प्रकारचा त्रास आहे.”

महाराज म्हणाले, “जेथें असा अर्थ असेल, तेथें त्याची यज्ञाशीं बरोबरी करून उपयोगी नाहीं. पण तूं कसा अर्थ करतेस ? तें ऐकण्याची माझी इच्छा आहे.”

महाराजांचा हा प्रश्न ऐकून स्वतः अगदीं ताठ होऊन डोकें हालवीत व डोळे चोळीत माझ्याकडे पाहावयास आरंभ केला.

मीं म्हटलें, “महाराज, अशा विषयांत मत देण्याला मी योग्य नाहीं. मी तर विद्यार्थीण आहें. मी कांहीं मास्तर नाहीं. तरी पण मला वाटतें कीं, लग्न ह्मणजे ईश्वरी कृपेचें फळ आहे. लग्न म्हणजे अलौकिक आनंद आहे. पण त्या आनंदाचें वर्णन मला करतां येत नाहीं, मला त्याच्या-

करितां शब्द सांपडत नाहींत, तेव्हां आपणच कांहीं सोप्या भाषेंत सांगितल्यास बरें ! ”

महाराज म्हणाले, “ बेटा, लग्नासंबंधीं जसें तूं म्हटलेंस, तसेंच आहे. ती ईश्वराची कृपाच आहे. त्यांत अलौकिकता आहे; आणि त्याचें महत्त्व दाखविणारे शब्द आपल्याच नव्हे तर दुसऱ्या कोणत्याही भाषेंत सांपडावयाचे नाहींत. तुझें सांगणें अक्षरशः खरें आहे, त्याहून जास्त कांहींच नाहीं. तरी पण जास्त उघड करून सांगावयाचें म्हटल्यास असें म्हणतां येईल कीं, लग्न म्हणजे दुनियेची आबादानी आहे, लग्नस्नेह हा सर्व स्नेहाचें मूळ आहे. लग्नाच्य. शाळेंतच स्वार्थ सोडावयाचें शिकावयाला मिळतें, लग्नानेंच पुरुषार्थ वाढतो, लग्नानेंच पुरुष आपल्या मनाला आळा घालावयास शिकतो. लग्नानेंच आत्म्याचें जास्त कल्याण करावयास मिळतें लग्नानेंच ईश्वराचे हुकूम पाळतां येतात, लग्नानें ईश्वरी कृपा मिळवितां येते. कारण लग्न ही ईश्वरी योजना आहे. मनुष्याला ईश्वरानें जीं बंधनें केलीं आहेत; त्यांत लग्न हें एक बंधन आहे, इतकेंच नव्हे तर, लग्नामुळें बाकी सर्व आश्रम पाळतां येतात. म्हणजे लग्न नसल्यास धर्म टिकणार नाहीं आणि आपणही राहूं शकणार नाहीं. म्हणून लग्नस्नेह—हा बाकी सर्व स्नेहांचा राजा आहे. मुली लक्षांत ठेव कीं, यज्ञ हा थोड्या दिवसांचा असतो; पण लग्नाचीं कर्तव्यें मनुष्याच्या आयुष्यापर्यंत, इतकेंच नव्हे तर परलोकापर्यंत असतात. यज्ञ एखादाच कोणी करील; पण लग्न सर्वांना करितां येण्यासारखें आहे, म्हणून यज्ञापेक्षां लग्न उत्तम आहे. दुसरें असें समजावयास हवें कीं, ज्या हेतूनें यज्ञ करावयाचा असतो, त्याच हेतूनें लग्न करावयाचे असतें. आज आपण तो हेतु समजत नाहीं, ती गोष्ट वेगळी. पण शास्त्र तर असेंच शिकवितें कीं, धर्म पाळण्याकरितां—मोक्ष मिळण्याकरितां—लग्नें करावयाचीं आहेत.

## लग्नस्नेह.

' बेटा ! तूं पहा कीं, हल्लीं पूर्वींप्रमाणें यज्ञ होत नाहींत. तरी पण आपलें गाडें कसें तरी चाललेंच आहे; पण जर जगांत लग्नें नसतीं तर काय स्थिति झाली असती, ह्याची कल्पना तुला करितां येते का ? ज्या लोकांत मुळीं लग्नच होत नाहीं, असा देश किंवा अशी प्रजा निदान आपल्या तरी माहितींत नाहीं, पण ज्या देशांत लग्नासंबंधीं अरुचि होत चालली आहे, त्या देशांची कशी खराबी होत चालली आहे तें पहा. लग्नाकडे कानाडोळा होण्याचें कारण हेंच कीं, हल्लींच्या स्त्रियांना पतीची सेवा करणें आवडत नाहीं. त्याची ताबेदारी त्यांना नको. त्यांना पुरुषाप्रमाणें समान हक्क पाहिजेत. पण त्याचा परिणाम असा होत आहे कीं, खऱ्या लग्न-स्नेहाचा नाश होत आहे. लग्नाचा नाश होणें म्हणजे ईश्वरी शाप होय. कारण लग्न हा एक यज्ञ आहे. आणि लग्नाचा ह्मणजे यज्ञाचा अर्थ ईश्वरी सेवा,—त्या रस्त्यानें ईश्वरासन्निध जातां येतें; म्हणजे जो आपल्या क्षुल्लक स्वार्थाकरितां लग्नावर अप्रीति करितो तो ईश्वरी रस्त्या-पासून भ्रष्ट होतो आणि त्याच्यावर ईश्वराचे शाप पडतात. ह्यांत नवल कोणतें ! ज्याच्यावर ईश्वरी क्षोभ होतो, जो ईश्वरी मार्गापासून भ्रष्ट होतो व स्वाभाविक नियम तोडतो त्याची खराबी होईल. ह्यांत नवल कसलें ! रावसाहेब, फ्रान्स वगैरे देशांतील—जेथें लग्नासंबंधानें अप्रीति वाढत जात आहे तेथील—लोकांची स्थिति सांगा. ”

तेव्हां स्वतः माझ्याकडे प्रेमपूर्वक दृष्टीनें पाहून ह्मटलें, “ तुला ठाऊक आहे का कीं, आपण आपल्या गरिबींत अद्यापपर्यंत कसे टिकून राहिलों आहों तें ? इतक्या आज्ञानांतही कसे सुखी आहों ? इतक्या गरिबींतही वांचण्याची इच्छा कां होते ? असें कठीण दिवस कीं जो तो पोटापाठीं लागलेला. कोणी कोणाचा नाहीं. अशा स्थितींतही सर्वांपेक्षां चांगल्या रीतीनें आपला कुटुंबस्नेह

टिकून राहिला आहे तो कशामुळें? लग्नस्नेहामुळें. आपलें सर्व कांहीं गेलें. पण लग्नस्नेह अद्याप गेला नाहीं, ह्मणूनच आपण हल्लींच्या स्थितींत शांतीनें राहिलों आहों. आपला लग्नस्नेह अद्यापपर्यंतही टिकून राहिला आहे याचें कारण काय ? याचें कारण आपल्या प्राचीन ऋषींचें शहाणपण होय. ह्याचें कारण स्त्रियांची आधीनता होय. आपल्या बुडत्या हिंदु संसारांतून खाऱ्या समुद्रांत असणाऱ्या गोड पाण्याच्या झऱ्याप्रमाणें हा लग्नस्नेह आहे. रोग, दुष्काळ, बसत जाणारा व्यापार, सत्रा तऱ्हेचे संशय, नसतीं रूढिबंधनें, शारीरिक अशक्तता, वगैरे गोष्टींनीं दुःखस्वरूप झालेल्या संसाररूप समुद्रांत गोड पाण्याच्या झऱ्याप्रमाणें अद्यापपर्यंत टिकलेला लग्नस्नेह व स्त्रियांची आधीनता हीं आहेत. पण त्यांच्यावरही हल्लीं पाश्चात्य विचारांचें पाणी पडलेलें दिसत आहे. सुधारणेच्या नांवानें स्वतंत्रतेच्या नांवानें आणि समान हक्काच्या नसत्या हुलीनें, आमच्या स्त्रियांमधील आधीनता कमी होत चालली आहे. पण ह्याचा परिणाम असा होईल कीं, लग्नस्नेहाचें बंधन शिथिल होईल आणि कालांतरानें लग्नासंबंधानें अप्रीति वाढेल आणि असें होणें ह्मणजे ईश्वरी शाप आहे. असें आतांच महाराजांनीं आपल्याला सांगितलें आहे. कारण आपण पहातों कीं, युरोपांत अतिशय समृद्धि आहे. पुष्कळ विद्या आहे. निरोगी शरीर, मुबलक धंदे, लोकांच्या इच्छेप्रमाणें कायदे, आवडीसारखीं समाजबंधनें, थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे आपल्यापेक्षां सर्व परीनें त्यांचीं सुखसाधनें जास्त आहेत, असें असून त्यांच्या संसारांत दुःख व अनीति जास्त कां ? त्यांच्या संसारांत आपल्याला तर नव्हेच पण त्यांचे त्यांनाही सुख दिसत नाहीं, तें कां ? त्याचें कारण हेंच कीं, त्यांच्या स्त्रियांत आधीनता कमी. त्यांच्यापेक्षां कमी दर्जाच्या स्त्रीशीं लग्न करूनही आम्ही संतोषांत असतो आणि ते आपल्या मनाप्रमाणें पत्नी करूनही आपल्याइतके सुखी असूं शकत नाहींत. आपल्या देशांत मूर्खही लग्नाखेरीज रहात नाहींत. आणि त्यांच्या पंडितांनाही लग्न करणें जड वाटतें. इकडे वेळेस अन्नाला महाग असा मनुष्यही

लग्न केल्यास सुखदुःखाला जोडीदार होईल म्हणून तेवढ्यांत लग्न करून आनंदांत असतो. आणि तिकडचे—लक्षाधीश-कोट्यधीश—देखील—लग्नापासून लांब रहातात. ह्याचें कारण समान हक्काचें वेड आधीनतेची कमतरता आणि लग्नस्नेहाची शिथिलथा हेंच होय.

---

## लग्नाविषयीं होणाऱ्या अप्रीतीचा परिणाम.

" लग्नस्नेह कमी झाला. त्याच्यासंबंधानें अप्रीति झाली. म्हणजे त्या देशाची व तेथील प्रजेची कशी खराबी होते, ह्याची कल्पना आपल्याला होणें शक्य नाहीं. ही ईश्वरी कृपा आहे कीं, तशा प्रकारचा अनुभव आपल्याला नाहीं, पण ज्या देशांत—ज्या प्रजेंत—त्याचा अनुभव आहे, तेथील विद्वानांना, राज्यकर्त्यांना आणि धर्मगुरूंना फार चिंता वाटत आहे. आणि त्यावर उपाय शोधण्याकरितां ते नाना तऱ्हेची खटपट करीत आहेत पण जेथें स्त्रियांमधील आधीनता—लग्नस्नेहच—कमी झाला आहे. तेथें अशा वरोपचारांनीं काय होणार ? सत्ताधिकारी अविवाहित लोकांवर कर बसाविण्याच्या खटपटींत आहेत, ज्याला ज्यास्त मुलें त्याला बक्षीस देत आहेत, अशा रीतीनें पुष्कळ उपाय करीत आहेत. पण लोकांची लग्नावरील अप्रीति कमी होत नाहीं. धर्मगुरु देवळांतून लग्नाचा उपदेश करितात, धर्मशास्त्रांतील वचनें वाचून दाखवितात, पण तें सर्व उपड्या घड्यावर पाणी घातल्याप्रमाणें होऊं लागलें आहे. कारण लग्नस्नेहाचें मूळ आधीनता तिला सोडून इतरत्र फिरणें फुकट आहे. कोणी विद्वान् लोक ह्या विषयावर मनोहर व रसपूर्ण कादंबरी रचून प्रसिद्ध करितात. पण हें सर्व झाडाला वरून पाणी शिंपडण्याप्रमाणें होत आहे. जर झाडाला मुळांत कीड लागली आहे, तर ह्या वरकरणी उपचारानें काय होणार ? स्त्रीपुरुषांच्या समान हक्कांच्या खुळाचे हे परिणाम आहेत. तुला वाटत

असेल कीं, लग्नस्नेह शिथिल झाला म्हणून त्याची इतकी आरडाओरड कशाला व्हावयास पाहिजे ? ज्याला वाटेल तो लग्न करील; नाहीं वाटणार तो करणार नाहीं. त्यांत आपलें काय गांठोडें खर्च होतें ? आणि अशा रीतीनें बोलणें पुष्कळांना सोपें वाटतें आणि पुष्कळजण चटदिशीं असें उत्तर देतातही. पण असें बोलणें म्हणजे आपलें अज्ञान प्रकट करणें होय. जर आपण लग्नाची गंभीरता समजलों, जर लग्नाची जबाबदारी आपल्या लक्षांत आली, लग्न म्हणजे यज्ञ हें आपल्या लक्षांत आलें, आणि ईश्वरासान्निध जाण्याचा लग्न हा एक दरवाजा आहे हें समजलें, तर ज्याला वाटेल तो लग्न करील आणि नाहीं वाटणार तो नाहीं करणार, असें आपण म्हणणार नाहीं. कारण लग्नाची अशी महती समजली, लग्न हा एक ईश्वरी नियम आहे, मनुष्यप्रकृतीचा स्वभाव आहे, ईश्वरी इच्छा आहे, वगैरे गोष्टी समजल्या कीं, आपल्याला असेंच वाटेल कीं कोणत्याही स्त्रीनें किंवा पुरुषानें

## लग्न न करणें म्हणजे पाप आहे.

कारण, ज्या समाजांत लग्नासंबंधानें अप्रीति होते, त्या समाजांत अनीति वाढते. गर्भपात होतात, गुप्त प्रकार वाढतात, कपट वाढतें, आणि हें बंद करण्याकरितां नवे नवे कायदे करावे लागतात, प्रजा निःसत्व होते. हें सर्व व ह्याहूनही जास्त वाईट परिणाम लग्नासंबंधानें अप्रीति झाल्यानें होतात. कारण तुम्ही विचार करा कीं, जी स्त्री आपल्या नवऱ्याची मर्जी सांभाळूं शकत नाहीं, ती जगाची सेवा कशी करील ? जे पुरुष स्त्रियांना भिऊन लग्न करीत नाहींत, ते पुरुषार्थाचीं कामें कशीं करतील ? व ईश्वरासान्निध कसे जातील ? ज्या स्त्रियांना आपल्या मुलांबाळांची कटकट सोसत नाहीं, त्या जगाची कशी सोसतील ? जे पुरुष

आपल्या क्षुल्लक स्वार्थाकरितां व थोड्याशा स्वतंत्रतेकरितां ईश्वराची पवित्र आज्ञा उल्लंघितील ते पुरुष शांति कशी मिळविणार ? ज्यांना लग्न नको, आधीनता नको, त्यांना कोणत्या प्रकारचीं सुखें असतात हें तुम्हांला ठाऊक आहे ? त्यांच्याकरितां नाना प्रकारचीं व्यसनें घरादाराखेरीज भटकणें, एका यजमानाची ताबेदारी नको म्हणून रोज नवे नवे मालक करणें, गुप्त गोष्टी, गुप्त पोलिसाची टेहाळणी, नेहमींची मनाची अस्वस्थता, वेड्याचीं इस्पितळें वगैरे असतात, आणि हें सर्व लग्नप्रेमाच्या अभावामुळें आणि त्याहून जास्त नुकसान समान हक्कानें स्त्रियांमधून अधीनता गेल्यामुळें. आपल्या प्राचीन ऋषींनीं लग्नाला यज्ञ मानिला आहे. आणि गृहस्थाश्रमाच्या आधारानें बाकी सर्व आश्रम सांभाळले जातात, असें म्हटलें आहे. तें खरें ना ? " असें म्हणून थोडां वेळ माझ्या हाताकडेच पाहात राहावयाचें. तेव्हां महाराज म्हणाले, " का रावसाहेब, इतक्यांत मन कोठें गेलें ? कोणत्या विचारांत आहांत ? "

तेव्हां चहूंदिशीं लक्ष ठिकाणीं येऊन विचारिलें, " महाराज, माफी मागतों. लक्ष जरा दुसरीकडे गेलें खरें. ह्या माझ्या स्वर्गाच्या हातांतील आंगठी पाहून माझ्या मनांत असा विचार आला कीं, ह्या आंगठीचा हिरा मळला आहे; तेव्हां उद्यां राधाकृष्णदास जव्हेऱ्याच्या येथून दुसरा चांगला हिरा आणिला पाहिजे; कारण जिची बुद्धि अशी विशाळ व अशी तेजस्वी तिला अशी आंगठी शोभणार नाहीं, तिच्या सुखाकरितां मला कांहीं तरी जास्त पुरुषार्थ केला पाहिजे. "

तें ऐकून महाराज मला म्हणाले, " बेटा ! तुझ्या प्रश्नाचें उत्तर तला बरोबर समजलें का ? "

मीं म्हटलें, " होय महाराज, आपल्या कृपेनें बरोबर समजलें. लग्नाखेरीज जगांत कशी खराबी होतें, लग्नस्नेहानें प्रजा कशी सुखी होते, लग्नस्नेहानें संसारांत स्वर्ग कसा भोगतां येतो, पुरुषामध्यें पुरुषार्थ कसा

वाढतो, लग्नानें दुनिया आनंदमय कशी होते, आणि लग्न म्हणजे यज्ञ कसा, ह्या सर्व गोष्टी मी बरोबर समजलें. म्हणजे पतिप्रेमानें, आधीनतेनें, देवांच्याही वर जाण्याचें बळ स्त्रियांच्या अंगीं कसें येतें, तें मला स्पष्ट समजलें. ”

---

## लग्नस्नेहांतील मर्म.

महाराज म्हणाले, “ बेटा, यज्ञानें ईश्वरी कृपा लवकर मिळवितां येते, कारण यज्ञाचा अर्थ इतर धर्मापेक्षां मोठा आहे. म्हणजे इतर धर्मकृत्या-पासून जें होत नाहीं तें यज्ञानें होतें. लग्न यज्ञाबरोबर आहे. लग्न म्हण-जेच यज्ञ हें नीट समजल्यानें आपल्याला फार आनंद होतो; इतकेंच नव्हे तर आपल्याला असें समजतें कीं, लग्नावरच दुनियेचा आधार आहे. लग्नस्नेहामुळेंच विहिरी खोदल्या जातात, नाले बांधिले जातात, बागांतून सुंदर फुलें फुलतात, जत्रा-मेळे भरतात व सर्वत्र आनंदीआनंद दिसतो. लग्नस्नेहानेंच पशुपक्ष्यांचें संरक्षण होतें, शेतें आबाद रहातात, वस्ती वाढते, हुन्नरकला आणि व्यापार वाढतो, इतकेंच नव्हे तर लग्नस्नेहानेंच नवीं नवीं रत्नें पैदा होतात, आणि परमात्मा प्रसन्न होतो. ह्मणूनच लग्न हा यज्ञ आहे, पण यज्ञाच्या सामग्रीकडे बघावयाचें नसतें, त्याच्या फळाकडे बघावयाचें असतें; तसेंच लग्नाच्या कामगिरीकडे पहावयाचें नसतें, पण तें बजाविल्यानंतर अनंत ब्रह्मांडाचा नाथ जो परमेश त्याला संतोष होऊन तो मोक्षाचें इनाम होईल, त्याच्याकडे बघावयाचें असतें; कारण त्यांच्या प्रसन्नतेंतच आपलें कल्याण आहे; आणि त्याची प्रसन्नता त्याचे हुकूम पाळण्यांत आहे. म्हणून त्याच्या आज्ञेला मान देऊन आपण लग्नरूपी यज्ञ केला पाहिजे.

---

# यज्ञाशीं लग्नाची बरोबरी.

यज्ञामध्यें वेदी म्हणजे खड्डा, नाना तऱ्हेच्या लांकडांचे तुकडे, निरनिराळ्या जातींचीं धान्यें, निरनिराळ्या जातींच्या थोड्या औषधी, प्रसंगोपात म्हणावे लागणारे मंत्र, आणि रोजच्या वापरण्यांत येणारीं कांहीं भांडीं, तूप आणि अग्नि, याशिवाय दुसरें काय असतें? त्यांत कांहीं विशेष अगर अलौकिक असें कांहीं नसतें; तरी पण त्या वस्तूंच्या विधियुक्त झालेल्या संयोगानें ईश्वर प्रसन्न होतो, आणि मोठं फळ मिळतें. कारण तें सर्व कर्तव्य करण्याकरितां, आणि ईश्वराकरितां आपण करितों म्हणून त्याचें मोठें फळ मिळतें.तसेंच लग्नाच्या यज्ञाच्या बाबतींत समजावयाचें आहे; म्हणजे लग्नाच्या कामगिरीकडे पहावयाचें नाहीं. पुरुष विचारतील कीं, आम्ही फुकटफाकट रोजच्या रोज ही कटकट कशाकरितां करावी? त्या लग्नांत विशेष तें काय आहे? साऱ्या आयुष्यभर कुटुंबाची आणि कुटुंबाकरितां दुसऱ्याचीही गुलामगिरी करावी लागते, नेहमीं बायकोला संतुष्ट ठेवावयाची तजवीज करावयाची आणि क्षुल्लक वस्तूकरितां आयुष्य घालवावयाचें, यांत काय आहे! आणि स्त्रिया असें म्हणतील कीं, पुरुषांच्या ताब्यांत राहावयाचें, मुलांचीं हगोलीं धुवावयाचीं, केरपोतेरें करावयाचें, तींच तींच भांडीं घासावयाचीं,व रोज लहान मुलें घेऊन तींच तींच गाणीं म्हणत त्यांना वाढवावयाचें, ह्यांत नवल तें काय? आणि ह्यानें कल्याण तें कसें होईल? पण बेटा, अशा रीतीनें आपण आपल्या रोजच्या लहान लहान कामाकडे पहावयाचें नसतें—त्या लहान कामांपासून ईश्वरी कृपेनें जें मोठें फळ मिळतें त्याच्याकडे पहावयाचें असतें. तांब्याची तार, जस्ताचा तुकडा, कांचेची बरणी, नवसागराची पूड, गंधकाचा तेजाब, कोळशाचे तुकडे आणि थोडेंसें पाणी ह्याची स्वतंत्रपणें काय

किंमत ? त्या साधारण वस्तूच आहेत; पण ह्या सर्वांच्या योग्य परिमाणांत विधियुक्त झालेल्या संयोगानें वीज उत्पन्न होते, आणि त्या विजेनेंच टेलिफोन टेलिग्राफ, वगैरे चालतात; आणि त्यामुळें जगांत जे मोठमोठे फायदे होतात, त्याकडे आपण पाहिलें पाहिजे. तसेंच लग्नाचा त्रास, एकमेकांची मर्जी सांभाळावयाची कटकट आणि हगोलीं धुणें, ह्याकडे आपण पाहावयाचें नाहीं; तर लग्नानें जगांत नीति वाढते, लग्नानें अबादानी वाढते, लग्नानें माणसाचें मन ताब्यांत राहतें; पुरुषांत पुरुषार्थ वाढतो, स्त्रियांच्या स्नेहाचा स्वाभाविक आनंद भोगावयास मिळतो, मनुष्यजातीची आणि आपल्या आत्म्याची उन्नति होते-लग्नानेंच धर्माचीं बंधनें पाळिलीं जातात, ईश्वरी कृपा मिळवितां येते, आणि पवित्र लग्नानच-यज्ञानच-ईश्वरासन्निध जाऊन मोक्षाचें अखंड सुख आणि आनंद भोगावयास मिळतो; तिकडे आपण बघावयाचें आहे. कां बेटा लग्न म्हणजे यज्ञ, अशी आतां तुझी खात्री झाली कीं नाहीं ? ”

मीं म्हटलें, “ ह्याहून आणखी जास्ती खात्री दुसरी कशी असते ? जर अजूनही माझी खात्री होणार नाहीं, तर माझ्यासारखें मूर्ख दुसरें कोणीच नाहीं. ”

दुसऱ्याला समजाविण्याच्या वरील सोप्या रीतीनें आनंदित होऊन स्वतः थट्टेनें म्हटलें, “ महाराज ! तुमचा शिष्यीण माझ्यासारख्यालाही शिष्य बनवील अशी आहे; पण आपण सांगितलेल्या गोष्टी तर एखाद्या मठ्ठ डोक्याच्या माणसाच्याही लक्षांत येतील अशा आहेत. अशी कठिण बाबत इतक्या सोप्या रीतीनें समजवणें हें कांहीं सोपें काम नाहीं. तें मोठ्या खुबीचें काम आहे. ”

आम्ही अशा रीतीनें बोलतों आहों, तों तिकडचे एक स्नेही प्रोफेसर एम. ए. हे फिरत फिरत तेथें आले. त्यांच्या येण्यानें आम्हांला आनंद झाला; आणि आम्हीं त्यांचा योग्य सन्मान केला. मग मीं म्हटलें,

" महाराज, आपण स्त्रियांच्याकरितां सेवाधर्म सांगितलात, पण आमचे हे प्रोफेसरसाहेब म्हणतात कीं, स्त्रीपुरुषांचे हक्क समान आहेत. "

महाराज म्हणाले, " काय ? स्त्रीपुरुषांचे समान हक्क ? तोबा ! तोबा ! जर स्त्रीपुरुषांचे समान हक्क असले, तर आपल्या स्त्रियांची काय दुर्दशा होईल ! जर स्त्रीपुरुषांचे समान हक्क असले तर आपल्या देशाचे बारा वाजलेच समजा ! जर स्त्रीपुरुषांचे समान हक्क तर आपल्या पवित्र धर्माची उत्तमता ती काय ? जर तसेंच असलें, तर आपल्या आर्यधर्मावर एक मोठी गदाच आली म्हणायची ! "

हें ऐकून प्रोफेसरसाहेब चिडले. ते मनांत म्हणाले, ' हे असले गोसावडेच देशाचा सत्यानाश करितात. जर माझें चालतें, तर ह्यांना बरोबर दाखविलें असतें. पण लाचार ! ' ते असें बोलणार तोंच स्वतः झटलें, " थांबा, अधीर होऊं नका. ऑनरेबल सत्येंद्रप्रसाद महाराजांनीं एका स्वामीला भेटण्याकरितां तुम्हांला सांगितलें होतें, तें आठवतें कां ? तेच हे महाराज ! "

तें ऐकून प्रोफेसरसाहेब म्हणाले, " काय ! अद्वैतानंदमहाराज ! धन्य भाग्य माझें. " असें म्हणून त्यांनीं हात जोडिले व म्हणाले, " महाराज, क्षमा करा. माझी चूक झाली ! "

महाराज म्हणाले, " कांहीं हरकत नाहीं. प्रोफेसरसाहेब ! ह्यांत तुमची चूक नाहीं. इंग्रजी शिक्षणांत हा एक प्रकारचा दोष आहे कीं, इंग्रजी शिकलेल्या मनुष्याचें डोकें लवकर तापतें, आणि जी गोष्ट स्वतःला समजत नाहीं, किंवा समजण्यासारखी नसते, तिला चट्दिशीं ' नॉनूसेन्स ' म्हणून ठेवून देतात. बरें प्रोफेसरसाहेब, मला सांगा, ' स्त्रीपुरुषांचे समान हक्क ' म्हणजे काय ? मला समान हक्काचा अर्थ सांगा. तो मला समजत नाहीं. "

प्रोफेसर म्हणाले, " त्याचा अर्थ असा कीं, पुरुषांची जितकी सत्ता तितकीच स्त्रियांची असावी. पुरुषांना जितके हक्क तितकेच स्त्रियांना

असावेत. पुरुष जीं कामें करतात, तीं स्त्रियांनाही करूं दिलीं पाहिजेत, आणि थोडक्यांत असें कीं, पुरुषांनीं स्त्रियांवर मालकीचा हक्क न चालवितां त्यांना आपले मित्र बनवावें ? ”

महाराज म्हणाले, “ असें करण्याचीं कारणें ?”

प्रोफेसर म्हणाले, “ कारणें ? वाः ! ह्याचीं कारणें तर फार जोरदार आहेत. मुख्य गोष्ट अशी कीं, आपण नीतीकरितां तसें केलें पाहिजे. कारण असें कीं, जशीं आपल्याला डोळे, कान, वगैरे इंद्रियें आहेत, मन आणि बुद्धि आहे, तशींच तीं त्यांनाही आहेत. मग त्यांना हक्क कमी कां, तें मला समजत नाहीं. मी असें विचारितों कीं, स्त्रियांना असें पायाखालीं तुडविण्याचा आपल्याला काय अधिकार आहे ? स्त्रियांनीं गुलामगिरी कशाकरितां करावी ? आपण ब्यारिस्टर होऊन कोर्टांतून बसावें, कायदे करावे, न्यायाधीश होऊन दुसऱ्याला इनसाफ द्यावा, आणि बायकांनीं घरांत कोंडून राहून केर काढावा, नाहींतर कोपऱ्यांत बसून रडावें, ह्याचें काय कारण ? महाराज, हें मनुष्यपण का ? दुसरें कांहीं नसलें तरी न्यायाकरितां तरी आपण स्त्रियांना सारखे हक्क दिले पाहिजेत.”

महाराज म्हणाले, “सारखीं कामें स्त्रियांना करूं द्यायचीं, ह्याचेंच नांव तुम्ही समान हक्क म्हणतां ना ? कां दुसरें कांहीं ? बरें आहे. तुमच्या विचाराप्रमाणें त्या तशीं कामें करूं देत; पण मला सांगा, स्त्रिया पुरुषांसारखीं कामें करूं शकतील अशी शक्ति स्वाभाविक रीत्या त्यांच्यांत आहे का ? अशीं कामें केल्यानें स्त्रियांचें कल्याण होईल का ? असें करून आपला संसार सुखाचा होईल का ? ”

प्रोफेसर म्हणाले, “ बेलाशक कां नाहीं होणार ? युरोप आणि अमेरिकेकडे पहा. तें स्त्री शिक्षणाचें फळ आहे. स्त्रिया पुरुषांसारखीं कामें कां करूं शकणार नाहींत ? सुधारलेल्या देशांतून स्त्रिया सर्व तऱ्हेचीं कामें करीत आहेत. स्त्रिया क्लार्क आहेत, त्या हॉटेल चालवूं शकतात

स्त्रिया भाड्याच्या गाड्या फिरवितात, स्त्रिया डिटेक्टिव्ह आहेत, स्त्रिया वकिलीच्या व डॉक्टरीच्या परीक्षांतून पास झाल्या आहेत. पुष्कळ ठिकाणीं त्या म्यानेजर आहेत, कित्येक ठिकाणीं म्युनिसिपालिटीच्या निवडणुकींत त्या मतें देतात, इतकेंच नव्हे तर लष्करी कामाची मागणी देखील त्या करीत आहेत. पुरुषांच्या हरएक कामाची नक्कल त्या लवकर करूं शकतात. स्त्रियांत पुरुषांपेक्षां काय कमी आहे, तें मला समजत नाहीं. आतां मला सांगा, कोणत्या कामांत स्त्रिया पुरुषांची बरोबरी करूं शकणार नाहींत ? त्यांचे समान हक्क नसावेत ?

महाराज म्हणाले, "स्त्रिया पुरुषांची नक्कल करूं शकतील पण त्यांना पुरुषांची बरोबरी करतां येणार नाहीं, आणि समजा कीं, त्या बरोबरी करूं शकल्या तरी त्यापासून त्यांना आणि पुरुषांना कांहीं फायदाही नाहीं. कारण स्त्रिया आणि पुरुष ह्या दोघांची प्रकृति ईश्वरानें निरनिराळी केली आहे. दोघांचे स्वभाव निराळे आहेत, दोघांच्या शरीरांची रचना निराळ्या तऱ्हेची आहे,आणि दोघांचीं कर्तव्येंही निराळीं आहेत. म्हणजे• प्रकृतिस्वभावाप्रमाणें—ईश्वरी नियमाप्रमाणें—त्यांच्यांत नवराबायकोचें नातें राहिलें पाहिजे, असें आहे विरुद्ध प्रकारच्या शिक्षणानें कदाचित् आपण थोडा फार घोंटाळा करूं शकूं, पण त्यामुळें खरें सुख कांहीं आपण मिळवूं शकणार नाहीं. कारण ईश्वरी नियमाच्या उलटें चालून जगांत कोण सुखी झाला आहे ! स्त्रीपुरुषांचे समान हक्क मानल्यानें ईश्वरी नियमाच्या उलटें कसें होतें तें पहा. "

## स्त्रीपुरुषांचे समान हक्क.

आधीं तुम्ही स्त्रीपुरुषांचे स्वभाव पहा. स्त्रिया काय इच्छितात ? त्या काय पसंत करितात, आणि कोणावर भक्ति करतात ? आपल्याला बाहे-

रचीं उदाहरणें कशाला हवीं ! रागावूं नका, आपण तुमच्याच घराकडे वळूं. मला वाटतें कीं, तुमची बायको तुमच्याच विचाराची असेल, तुम्हीं तिला सर्व प्रकारचे हक्क दिले असतील; तरी पण एखादे वेळीं बोलतां बोलतां तुमच्यामध्यें दर्जाचा प्रश्न निघून दोघेजण कसे संतापतां हें तुम्हाला माहीत नाहीं ? तुमचे दोघांचे समान हक्क आहेत, तर मग सहज बोलण्यांत असें कां होतें ? स्त्रियांना नाजुकता पाहिजे. स्त्रियांची कुटुंबस्नेहानें तृप्ति होते, आणि पुरुषांची इतक्यानें तृप्ति होत नाहीं. स्त्रिया साहसाच्या गोष्टी ऐकून भितात तेव्हां पुरुषांना त्यांत मजा वाटते. आपल्या सौंदर्याकरितां स्त्रियांचा जीव वर खालीं होत असतो, तरी पुरुषांना त्यांची किंमत नसते. स्त्रियांचें अंतःकरण कोमल असतें व पुरुषांचें कठिण असतें. स्त्रियांमध्यें दुःख सोसण्याची शक्ति जास्त असते, पुरुषांत कमी असते. स्त्रियांचें मत लवकर बनतें, पुरुषांना वेळ लागतो. स्त्रियांचे अंतःकरणांतील मृदुभाव लवकर खुलतात व पुरुषांत बुद्धीचीं स्थानें लवकर खुलतात. स्त्रियांच्या मनांत कोणतीही गोष्ट लवकर शिरते, तशीच ती त्यांच्या मनांतून लवकर निघते. पण पुरुषांच्या मनांत शिरावयाला वेळ लागतो व लवकर निघूं शकत नाहीं. स्त्रियांमध्यें रसिकता जास्त असते, तर पुरुष कामचलाऊ असतात. स्त्रियांमध्यें धर्माचा ओढा जास्त असतो, आणि पुरुषांत तो ठराविक मर्यादेंत असतो. स्त्रियांमध्यें स्वभावतःच विश्वास आणि संशय जास्त असतो, आणि पुरुषांत हे भाव साधारण असतात. स्त्रियांत प्रेम प्रबळ असतें, आणि पुरुषांत जरूरीपुरतें असतें. स्त्रियांमध्यें हिम्मत क्वचित् असते, तर पुरुषांत ती प्रबळ असते. स्त्रियांना चिरगटपांघरूण वापरण्यांत चैन करावयाची हौस विशेष असते, पण पुरुषांत ती साधारणच असते. स्त्रियांचीं स्वादाचीं व वासाचीं इंद्रियें तीक्ष्ण असतात, पुरुषांचीं तितकीं नसतात. स्त्रियांत दुःख आणि सुख ह्या मनोवृत्ति बलवान् असतात. स्त्रियांत चंचलता जास्त असते आणि पुरुषांत ती कमी असते. स्त्रियांमध्यें घरावर प्रेम जास्त असतें, आपणा पुरुषांत

कांहींसें सार्वजनिक प्रेम असतें. स्त्रियांच्या आवाजांत स्वाभाविक मधुरता असते, आणि पुरुषांचे आवाजांत कांहींशी कठोरता असते. पुरुषांत जेव्हां धीर असतो तेव्हां स्त्रियांमध्यें अधीरता असते; आणि पुरुषांत जेव्हां गंभीरता व मर्यादा असते, तेव्हां स्त्रियांमध्यें चंचलता असते. पुरुषांना जेव्हां कामकाजासंबंधीं बोलणीं आवडतात, तेव्हां स्त्रियांना विनोद आणि थट्टामस्करी आवडते. पुरुष जेव्हां एखादी गोष्ट विसरून जावयाला बघतात, तेव्हां स्त्रियांना त्याची फोड केल्याशिवाय चैन पडत नाहीं. स्त्रियांचें शरीर लवकर पोक्त होतें, तसें पुरुषांचें होत नाहीं. अशा रीतीनें स्त्री आणि पुरुष यांच्यामध्यें जमीनअस्मानाचें अंतर असतें, तें तुम्हीं कोण कशा रीतीनें दूर करूं शकणार ? जोंपर्यंत हा भेद तुह्मी दूर करूं शकत नाहीं, तोंपर्यंत स्त्रीपुरुषांचे समान हक्क कसे होऊं शकतील ?

---

## स्त्रीपुरुषांच्या शरीराची बरोबरी.

“ प्रोफेसरसाहेब, अजून तर आपल्याला ह्या बाबतींत फार खोल गेलें पाहिजे. तुम्ही पहा कीं, मनुष्याच्या शरीराचे मुख्य तीन भाग आहेत. पोट, छाती आणि डोकें. ह्या तीन भागांची स्त्रीपुरुषांच्या शरीराची रचना तुह्मीं पाहिली आहे का ? स्त्रियांच्या पोटांत जठराग्नीचा जोर जास्त असतो, त्यांची रुचि तीक्ष्ण असते, ह्याशिवाय विशेष गोष्ट त्यांचे पोटांत गर्भाशय असतो, हें तुम्हाला ठाऊक आहे ना ? जर स्त्रीपुरुषांचे हक्क समान तर आधीं गर्भाशयाला रजा दिली पाहिजे; तर तो कसा दूर करावयाचा त्याचा तुह्मी विचार करा, आणि मग बाकीच्या गोष्टी बोला. आतां दुसरें स्थान छाती आहे, तर तिच्या रचनेचा

विचार करा. पुरुषांची छाती कठोर असते आणि स्त्रियांची मृदु असते हें त्यांना भूषण आहे. त्याचें 'आपरेशन' करण्याकरितां तुह्मीं एखादें हत्यार शोधून काढलें आहे का ? फक्त तोंडानेंच समान हक्काच्या गोष्टी बोलतां ? असे भेद कायम ठेवून, स्त्रिया समान हक्क कसे मिळवूं शकतील ? आणि जरी पुरुषांच्या कठोर हृदयांतून बाहेर निघालेले हक्क स्त्रियांनीं घेतले तरी त्या ते आपल्या मृदु अंतःकरणांत कोठें ठेवतील? स्त्रियांच्या अंतःकरणांत जें स्वाभाविक आकर्षण आहे आणि पुरुषांच्या हृदयांत त्यांच्या स्वाधीन होण्याचा जो मनोधर्म आहे त्याला दूर करण्याकरितां कांहीं यत्न केले आहेत ? प्रथम हें सगळें करा. मग समान हक्काची तजवीज. आतां शेवटीं राहिलें डोकें. पुरुषांना डोकें आहे, स्त्रियांनाही आहे, हें खरें; पण पुरुषांच्या मेंदूचें वजन सरासरी एकूणपन्नास औंस आहे, आणि स्त्रियांच्या मेंदूचें वजन चव्वेचाळीस औंस आहे त्याची वाट काय ? तुमच्यासारखे आणि तुमच्याइतके हक्क देण्याकरितां तुमच्यांतले पांच औंस कसे कमी करतां ? किंवा स्त्रियांचें तुमच्याइतकें करण्यासाठीं त्यांच्या डोक्यांत कोणत्या तऱ्हेची माती घालतां तें मला सांगाल तर खरें. तुमच्या मंडळीला सांगा कीं, मेहेरबान, आधीं हें करा आणि मग दुसरा शोध लावा."

---

## योग्यतेशिवाय हक्क देववत नाहींत,

" माझ्या विद्वान् मित्रांनो ! तुम्ही विचार करा कीं, ज्याला आपल्या बरोबरीचे हक्क द्यावयाचे त्याची योग्यता आपल्यासारखी असली पाहिजेना ! आपण इंग्रज सरकारची रयत आहों, तरी इंग्रज सरकारच्या विलायतेच्या प्रजेइतके हक्क आपल्याला आहेत का ? नाहीत ! कारण ते म्हणतात, 'तुमच्यांत तशी योग्यता नाहीं. ती आली म्हणजे आमच्या-

सारखेच हक्क तुम्हांला देऊं.' ती योग्यता येण्याकरितां आपलें शिक्षण वाढवीत आहेत. तसेंच पुरुष आणि स्त्रिया ह्यांच्यामध्यें जो भेद आहे, तो मोडण्याची खटपट आधीं तुमच्यासारख्या प्रोफेसरांनीं केली पाहिजे. आणि मग समान हक्काची हूल काढली तर चालेल. कां रावसाहेब! तुम्हांला कसें वाटतें? जर माझी कोठें चूक असेल, तर मला दाखवा? कारण आपण कांहीं माझें तें खरें आणि दुसऱ्याचें खोटें, असें ठरविण्याकरितां हा वाद करीत नाहीं, तर सत्य शोधण्यासाठीं करीत आहों. आणि याचा परिणाम चांगलाच झाला पाहिजे."

प्रोफेसर म्हणाले, "युरोप, अमेरिका वगैरे पुष्कळ ठिकाणीं स्त्रीपुरुषांचे हक्क समान आहेत आणि पुष्कळ स्त्रिया पुरुषांप्रमाणें कामें करीत आहेत, त्यांत त्या लोकांना कांहीं अडचण पडत नाहीं ती?"

---

## प्रकृति फिरवितां येत नाहीं.

महाराज म्हणाले, "स्त्रियांना पुरुषांसारखीं कामें करतां येणार नाहींत, असें मी म्हणतच नाहीं. बेलाशक स्त्रिया जरूरीच्या वेळीं पुरुषांप्रमाणें कामें करूं शकतील, पण त्यामुळें काय? अशीं कामें केल्यानें ईश्वरी नियम फिरतील? आपला वाद तर ईश्वरी नियमाबद्दल आहे, आणि आपली लढाई तर मनुष्यजातीच्या स्वभावाच्या खोलांतील खोल रहस्यावर रचलेली आहे. आपली लढाई कांहीं बाहेरच्या कामावर नाहीं. बकऱ्याची गाडी असते, आमच्या महाराजांच्या येथें कुतऱ्यांची आहे. मीं ऐकलें आहे कीं, सैबिरीयाच्या बर्फांत एका तऱ्हेच्या हरणाकडून गाडी ओढवितात, आणि एका सर्कशींत सिंहाकडून गाडी ओढवीत असत अशा रीतीनें प्रसंगवशात्, बकरीं, कुत्रीं,

हरणें गाडी ओढतात म्हणून त्यांच्यानें घोड्याची किंवा बैलाची बरोबरी होईल का? तसेंच साहेब, वेळेनुसार स्त्रिया पुरुषांचीं कामें करतील म्हणून त्यांच्यानें पुरुषांची बरोबरी होईल का? कारण माणसें आपल्या प्रकृतीला फिरवूं शकत नाहींत. महात्मा श्रीकृष्णानें अर्जुनासारख्या दृढ मनाच्या मनुष्याला म्हटलें कीं

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि ।
प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति ॥

गीता, अ० ३० श्लोक ३३.

अर्थः—'प्राणिमात्र आपल्या प्रकृतीप्रमाणें चालतो आणि ज्ञानीसुद्धां प्रकृतीच्या नियमांतून सुटूं शकत नाहींत, त्यांत निग्रही काय करील?'

प्राचीन काळीं लोक प्रकृतीला किती मान देत असत तें आपण ह्यापासून शिकावयाचें आहे. खास ज्ञानीसुद्धां प्रकृतीच्या आधीन आहेत, इतकेंच सांगून कृष्ण थांबत नाहींत, तर पुढें म्हणतात कीं,

यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे ।
मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ॥

गीता. अ० १८. श्लोक ५९.

अर्थः—'अहंकारांत फसून जाऊन तूं असें समजतोस कीं, मी युद्ध करणार नाहीं पण तुझें म्हणणें खोटें आहे, कारण तुझी प्रकृति तुझ्याकडून खास युद्ध करविणार.'

अशा रीतीनें आर्यशास्त्र आपल्याला सांगत आहे कीं, तुम्ही वाटेल तितकी ओढताण करा, पण शेवटीं तुम्हांला प्रकृतीच्या आधीन व्हावेंच लागेल, त्याशिवाय सुटका नाहीं. कारण प्रकृति ही ईश्वरी इच्छा आहे, आणि प्रकृति हेंच जगताचें बंधन आहे. ईश्वरी इच्छा आणि जगताचें बंधन फिरविण्याचें सामर्थ्य नाहीं, म्हणून आपल्यावर दया करण्याकरितां श्रीकृष्ण याहूनही उघड रीतीनें सांगतात कीं—

स्वभावजेन कौंतेय निबद्धः स्वेन कर्मणा ।
कर्तुं नेच्छसि यन्मोहात्करिष्यस्यवशोऽपि तत् ॥

गीता. अ० १८. श्लोक ६०.

अर्थः—'•हे अर्जुना, तुझ्या हातून स्वाभाविकपणें जीं कामें होतात, तीं करण्याकरितां तूं बांधला गेला आहेस, पण परस्वाधीन होऊन तुला तीं कामें करावींच लागतील. कारण तुझा स्वभाव जुलमानें तें तुझ्याकडून करवील.'

"प्रोफेसरसाहेब ! हे कांहीं आमच्या घरचे ठराव नाहींत. हीं त्रिकाळदर्शी मुनींच्या अनुभवाचीं रहस्यें आहेत. ह्यांतलें किती ऐकावयाचें आणि किती नाहीं, हें तुमच्या स्वभावावर अवलंबून आहे. म्हणून माझें सांगणें असें आहे कीं, आपल्या स्त्रियांची प्रकृति फिरवितां येणार नाहीं, आणि जोंपर्यंत, आपली किंवा स्त्रियांची प्रकृति फिरवितां येणार नाहीं, तोंपर्यंत त्यांचे आणि आपले हक्क सारखे होणार नाहींत. एवढें मात्र होईल कीं, मि. ग्लॅडस्टन म्हणतात तसे समान हक्काच्या नांवानें, तुम्ही त्यांना बिघडवून मिशांशिवायचे पुरुष करूं शकाल. पण त्यामुळें खरा लाभ मिळवितां येणार नाहीं. एखाद्या विशेष कारणानें स्त्रिया पुरुषांच्या कामाची उत्तम नक्कल करूं शकतील; पण जातिस्वभाव बदलणें शक्य नाहीं, त्यामुळें उत्तमांत उत्तम नक्कल करूनही अपूर्णता राहातेच कारण पुरुषांची जीं जीं कामें स्त्रिया करतात तीं कांहीं अंतःकरणाच्या प्रेरणेनें नव्हे तर विशेष कारणानें करितात. तीं जर तशीं कारणें येणार नाहींत तर आपखुषीनें स्त्रिया तशीं कामें कधींही करणार नाहींत, आणि जरी त्यांनीं तीं केलीं तरी त्यांत सैदव तशाच खुबी येणार नाहीं, कारण तें सर्व वरचें असतें, निरुपायाचें असतें, चित्त तर कोठल्याकोठें असतें.

# स्त्रियांची आवड

"समजा कीं, आपण एक सुंदर प्रदर्शन रचलें आहे. तेथें एकीकडे एक सुंदर आरसा आणि पिस्तुल ठेविलें आहे. तर स्त्रिया काय पसंत करतील ? एका खोलींत एकीकडे सुंदरसें फळ ठेविलें आहे आणि दुसरीकडे एक वेडेंवांकडें यंत्र ठेविलें आहे, तर स्त्रिया यांतलें काय पसंत करतील ? एकीकडे कामाचे कागद आहेत आणि त्याच्याजवळ एक सुंदरसें हंसतमुख मूल खेळत बसविलें तर स्त्रिया त्यांतलें काय पसंत करतील ? एकीकडे विजेचें यंत्र व जवळ थट्टामस्करी करणारी बोलकी मैत्रीण असल्यास तिच्याशीं बोलल्याखेरीज यंत्राकडे जातील कां ? कां प्रोफेसरसाहेब, तुम्हीं या सर्व गोष्टींचा कधीं विचार केला आहे का ? का उगीच समान हक्काच्या नांवानें ओरडतां ? अशा तऱ्हेची बरोबरी तुम्हीं कधीं आपल्या मनाशीं करून पाहिली होती का ? आपले अडाणी मुलासारखे काळोखांत धोंडे मारीत फिरतां आहां झालें. या सर्व गोष्टींचा विचार करून मग दुसऱ्यांना उपदेश करा."

स्वतः प्रोफेसरांना म्हटलें, "महाराजांनीं तर कमाल केली ! आज तर तुम्ही हरलेत. मला नाहीं वाटत कीं, ह्या गोष्टींचा तुम्ही संतोषकारक रीतीनें जबाब देऊं शकाल. कारण आपण जीं मतें देतों तीं वरवरचीं असतात; पण महाराज तर मनुष्यस्वभाव, सृष्टीचे नियम, आपल्या पवित्र शास्त्रांच्या द्वारें ईश्वरी हेतपासून निघणारें त्यांतील रहस्य वगैरे अशा रीतीनें सांगतात कीं त्यापुढें आपली तक्रार मुळींच टिकूं शकणार नाहीं."

प्रोफेसर म्हणाले, "होय. महाराज फार खोल गोष्टी सोप्या भाषेंत आणि मनावर ठसतील अशा रीतीनें सांगूं शकतात. त्यामुळें माझी खात्री झाली कीं, स्त्रीपुरुष ह्यांचे स्वभाव मूळचेच निरनिराळे बनविलेले आहेत; पण त्यामुळें सारख्या हक्कांत काय अडचण येते तें मला समजत नाहीं."

## समान हक्कानें होणारी खराबी.

महाराज म्हणाले, " अद्यापि तोच प्रश्न ? आश्चर्य आहे ! त्यांत काय हरकत आहे ? हरकतीची तर गोष्टच बोलूं नका ! त्याचें चित्र तुम्हाला पहावयाचें आहे ? तर ऐका. ईश्वरी कृपेनें अजून आपल्या देशांत तशी स्थिति आली नाहीं त्यामुळें समान हक्कानें कसें नुकसान होतें तें तुम्हांला ठाऊक नाहीं. ज्या देशांत ते आहेत तेथील इतिहास तुम्ही वाचा, तेथील लोकस्थितीचें बारकाईनें निरीक्षण करा, तेथील अधर्म पहा. ते सर्व पाहिल्यानंतर तुम्हांला वाटेल कीं, अरे ! इतका मूर्खपणा ! इतकी खराबी ! ईश्वरा ! संरक्षण कर. जेथें स्त्रियांना समान हक्काचें शिक्षण मिळेल तेथें सांसारिक कामाकाजानें स्त्रियांना कधींही सुख होणार नाहीं; त्यामुळें घरांतील बारीकसारीक कामांत स्त्रियांचें चित्त लागावयाचें नाहीं. त्यांचा भर सर्व पुरुषांप्रमाणें लोकांच्या दृष्टोत्पत्तीस येण्यासारख्या मोठमोठ्या कामाकडे आणि चैनीकडे. तेव्हां त्याचा परिणाम काय ? नवऱ्यावर खर्चाचा बोजा त्याच्यानें तो खर्च झेंपला नाहीं. म्हणजे लग्नसंबंधानें अप्रीति आणि असें झालें म्हणजे जगाचा नाश. लग्नाच्या अभावानें जगांत किती गुन्हे होतात हें तुम्हांला ठाऊक आहे ? नुसती लग्नाची आपत्तिच नव्हे तर जेथें लग्नें झालेलीं असतात तेथें निर्दोष बालकांचाही अभाव, ह्यापेक्षां जास्त मोठें नुकसान तें कोणतें ? आपल्या इकडे तर फक्त दुराचाराकडे पाऊल पडलेल्या स्त्रियाच फक्त मुलें न होण्याचें औषध शोधतात; पण तिकडे तर तरुण धडधाकट सौभाग्यवती स्त्रीसुद्धां असें औषध वापरते. यापेक्षां आणखी जास्त पाप कोणतें ? ही कांहीं फक्त माझी कल्पना नाहीं. जेथें समान हक्क आहेत तेथील विद्वानांचे हे विचार आहेत. ही ओरड आहे. स्त्रीपुरुषांच्या समान हक्कामुळें लग्नस्नेह तुटतो, स्त्रिया आपलीं गृहकृत्यासंबंधींचीं कर्तव्यें विसरतात; आणि लग्नाचें बंधन सैल होतें. त्यामुळें लग्नाकडे पुरुषांचा ओढा होण्या-

साठीं स्त्रियांना शेंकडों युक्त्या कराव्या लागतात; आणि तरुणपण संपून म्हातारपण आलें तरी नवरा मिळूं शकत नाहीं, ही काय थोडी खराबी? आपल्यांत चकणी, वेडी, लंगडी, कशीही असो, पण एकही स्त्री संबंध आयुष्यभर नवरा न मिळाल्यामुळें कुमारिका राहिल्याचें कोठें ऐकण्यांत आहे का? नाहीं, कारण आमच्या स्त्रियांमध्यें आधीनता आहे, सेवाधर्म आहे. त्यामुळें वेडयावांकड्यांतून सुद्धां त्यांच्या योग्यतेचे पुरुष त्यांच्या-पासून सुख मिळवूं शकतात. पण ज्यांच्यांत समान हक्क आहेत, ज्या रंभेसारख्या सुंदर आहेत, अशा मूर्ति कुमारिका—रखडतात आणि विद्वान् असून सुद्धां त्यांच्या लग्नाचें रूपांतर काडी मोडून देण्यांत होतें. हें सर्व कशामुळें? प्रिय प्रोफेसरसाहेब! हें समान हक्कामुळें—स्त्रियांमधील सेवा-धर्म कमी झाल्यामुळें.

आमच्या देशांत अलीकडे थोड्या वर्षांपासून बिनवारशी निराधार मुलांकरितां आश्रम लागूं लागले आहेत. पण जेथें स्त्रीपुरुषांचे समान हक्क आहेत, तेथें आईबाप असून मुलें रखडतात, आणि त्यांच्याकरितां ठिकठिकाणीं 'ऑर्फनेजें' असतात. आपलेकडे पंधरा वर्षांच्या आंतील पंधरा लाख विधवा असून फक्त विधवांच्या मुलांकरितां पंढरपुरासच आश्रम आहे, पण जेथें समान हक्क आहेत, तेथें ठिकठिकाणीं कुमारि-कांच्या मुलांकरितां आश्रम आहेत, आणि जेथें स्त्रीपुरुषांचे समान हक्क आहेत, तेथें दरेक शहरांत वेड्याचे दवाखाने आहेत. तेथें डोकेफिरूंची संख्या वगैरेसंबंधीं जेव्हां आपण रिपोर्ट वाचतों, तेव्हां आपल्याला दिल-गिरी वाटल्याशिवाय आणि दया आल्याशिवाय राहात नाहीं. जेथें स्त्री-पुरुषांचे समान हक्क आहेत, तेथें काडी मोडून देण्याकरितां कोर्टें ठेवावीं लागतात, आणि तेथें दरवर्षीं अशा तऱ्हेचे इतके खटले उपस्थित होतात कीं, ते पाहून आपली अक्कल काम करीत नाहीं. नुसती काडी मोडून दिली जाते इतकेंच नव्हे तर ती इतक्या सुलभ कारणावरून दिली जाते कीं, तें ऐकलें म्हणजे आपल्याला हंसूं येतें; आणि समानत्वाचा

कल्पनेचा धिक्कार वाटल्यावांचून रहात नाहीं.ज्या देशांत मोकळेपणाच्या नांवाखालीं स्त्रीपुरुषांचे समान हक्क आहेत, तेथें अविवाहितपणा वाढतो. कारण स्त्रीपुरुष दोघेजण असें समजतात कीं, लग्न करणें म्हणजे परतंत्रता आहे. म्हणून स्वतंत्रतेच्या नांवाखालीं आपल्या चैनीखातर ते अविवाहित रहातात. मला सांगा, हें चांगलें का ? जगांत लग्नासंबंधानें अप्रीति वाढणें आणि प्रजेंत अविवाहितपणा वाढणें याचे परिणाम काय ? ह्यामुळें किती खराबी होते, हें तुम्हांला ठाऊक आहे का ? अविवाहितपणें आयुष्य चालविण्यानें अनीति वाढते, इतकेंच नव्हे तर, निरनिराळ्या जातींत निरनिराळ्या देशांत प्रजा कमी होत जाते. प्रोफेसरसाहेब, तुम्ही वाटल्यास स्त्रियांना समान हक्क द्या, पण त्यामुळें फ्रान्सप्रमाणें लोकसंख्या कमी होईल त्याची काय वाट ? प्रथम त्याबद्दल कांहीं उपाय शोधा; मग आर्यत्वाची शोभा जो लग्नस्नेह, दुनियेची आबादानी जो लग्नस्नेह, प्रजेचें सुख आणि सृष्टिचक्र चालविणार जो यज्ञचक्र होय असा लग्नस्नेह, त्याच्या सेवारूपी मुळांत समान हक्करूपी कुऱ्हाड मारा.

जेथें स्त्रीपुरुषांचे समान हक्क असतात, तेथें स्त्रियांची किती वाईट दशा होते, तें तुम्हीं पाहिलें आहे का ? कुरूप चेहऱ्याच्या, तरतरीत स्वभावाच्या, मिजासखोर आणि नखरेबाज अशा समान हक्कांच्या स्त्रियांचें, सुकून लांकडासारखें झालेलें अंग वगैरे तुम्हीं पाहिलें नाहीं का ? भाऊसाहेब ! लक्षांत ठेवा, तो समान हक्काचा परिणाम आहे. जर स्त्रियांत स्त्रीत्व असतें, आधीनता असती, तर लग्नासंबंधानें अप्रीति झाली नसती, नोकरीकरितां ठिकठिकाणीं रखडावें लागलें नसतें, आणि त्यांना आपल्या मनाच्या खुपसुरतीची-सौंदर्याची-आहुति द्यावी लागली नसती. लग्नस्नेहानें युक्त आधीनतेंत राहणाऱ्या व सेवाधर्म बजाविणाऱ्या आर्यस्त्रिया आपल्या घरांत काय करितात, त्यांचीं चित्रें तुम्हीं पाहिलीं आहेत का ? तुम्ही अलीकडील हवेंत वाढत जाणारे तरुण आहां. आणि आपल्या प्रोफेसरपणाच्या अभिमानांतच राहिलेले आहां. तुम्हांला अजून अशीं चित्रें

पाहाण्याची इच्छा झाली नसेल, ह्यांत नवल नाहीं. पण तुमचे स्नेही रावसाहेब अशा विषयांत बरेच लांब गेलेले आहेत, तेव्हां ते दाखवितील तीं चित्रें. बघा तर खरीं." असें म्हणून स्वामींनीं स्वतःकडे पाहिलें.

स्वतः म्हटलें, " मित्रा, स्वामींचीं रहस्यें घेण्यासारखीं आहेत. त्यांचे विचार तुम्हांस पसंत पडत नाहींत, ह्याचें कारण तुम्ही विलायतेस जाऊन तेथील मोकळया वातावरणांत राहून आलेले आहां, आणि तुमच्या पत्नींनीं मिशनस्कूलमध्यें शिक्षण मिळविलेलें आहे त्यामुळें तुम्हांला ही मजा लवकर समजणार ना ीं. मी इंग्रजी विचारांत वाढलेला आहें, आणि तुमच्याप्रमाणेंच माझे विचार होते. पण माझ्या ह्या लाडकीनें माझे ते विचार फिरवून टाकिले आहेत." हें ऐकतांच मीं लाजेनें खालीं मान घातली.

पुढें स्वतः म्हटलें कीं, "जर मला ही आकर्षणशक्ति मिळाली नसती तर महाराजांचा उपदेश असूनही मी तुमच्यासारखा वरकरणी विचाराचाच राहिलों असतों. पण तुमच्या ह्या वहिनीनें माझें सर्व मन फिरवून टाकिलें आहे."

मीं जरा हंसून त्यांच्या मित्रास हळूच म्हटलें, " पाहिली ही थट्टा आपण कधीं असा नसता आरोप ठेऊन आपल्या बायकोची मस्करी केली असता काय ? "

प्रोफेसर म्हणाले, "माझ्यानें अशा रीतीनें माझ्या बायकोची मस्करी झाली नसती, मी एक बोललों तर मला तीन उत्तरें ऐकावीं लागतील हीच समान हक्काची खुबी आहे कीं कोणी मर्यादेबाहेर थट्टा करूं शकत नाहीं."

स्वतः म्हटलें, "तुम्ही समान हक्कवाले मर्यादा पाळतां आणि आम्ही उलट समजुतीचे लोक ती पाळूं शकत नाहीं काय ? "

प्रोफेसर म्हणाले, "तुम्ही मर्यादेंत कशाकरितां रहाल ? तुम्ही तर असेंच समजतां कीं, स्त्रिया आमची सेवा करण्याकरितांच उत्पन्न झाल्या आहेत. स्त्रियांना वाटतें कीं, आपल्यास आधीनता असलीच पाहिजे, मग तुह्मी त्यांना दडपण्यांत कशाकरितां कमी कराल ? आम्हांला समान हक्काचा कायदा स्त्रियांवर सक्ति करतांना ज्याप्रमाणें आडवतो, त्याप्रमाणें तुम्हांला अडविणार कोण आहे ?"

स्वतः म्हटलें, "काय ? आम्हांला बुद्धि नाहीं ? आम्हांला हृदय नाहीं ? जसा तुम्हाला समान हक्काचा कायदा ताब्यांत ठेवतो, तसें आम्हांला स्त्रियांच्या सेवेचा बदला देण्याचें कर्तव्य मर्यादेंत ठेवतें. तुमचा समान हक्काचा कायदा अपूर्ण आहे, कारण तो बाहेरच्या शिष्टाचारावर अवलंबून आहे. पण सेवेचा बदला देण्याची आमची रीत पुष्कळ पूर्ण आहे, कारण त्याचा संबंध आमच्या आत्म्याशीं आहे आणि तुम्ही पहा कीं,

## पुरुषांचा पुरुषार्थ स्त्रियांच्या सेवेच्या मोबदल्याकरितां आहे.

जर जगांत स्त्रियांची सेवा नसेल तर पुरुष पुरुषार्थ करणार नाहींत. तुम्ही कदाचित् असें म्हणाल कीं समान हक्कांत स्त्रिया हक्कानें आपले हक्क मागून घेतात, पण सेवाधर्मांत तसें कांहीं नाहीं, त्यांत तर त्या पुरुषांच्या दयेवरच सर्वस्वी अवलंबून असतात. वरकरणी पहाणाराला असें वाटेल खरें, पण जर मनुष्यस्वभाव आणि ईश्वरी नियम ह्यांकडे पाहिलें तर आपल्याला असें दिसून येतें कीं, ह्यांतच स्त्रियांचें हित आहे कारण ह्यांतूनच त्या समान हक्कापेक्षां जास्त मिळवूं शकतात. कारण स्त्रियांत स्त्रीत्व आहे, स्वाभाविक रीत्या आकर्षणशक्ति आहे. आणि जिच्यांत हें नाहीं, त्या स्त्रीमध्यें आणि स्त्रीरूपी बाहुलीमध्यें काय अंतर आहे ? समान हक्कानें स्त्रिया स्त्रीत्वहीन

होतात, त्यामुळें त्यांच्यांत असणारी दैवी आकर्षणशक्ति नाहींशी होते, आणि त्यामुळें त्या पुरुषांकडून कांहीं मिळवूं शकत नाहींत, आणि फक्त हक्कानें मिळेल तेवढ्यावर त्यांना आपला निर्वाह करून घ्यावा लागतो. पण सेवाधर्मांत तर तें आकर्षण प्रधान अंग असतें कारण तें सेवेंतूनच उत्पन्न झालेलें असतें, आणि त्या आकर्षणशक्तीमुळेंच पुरुषांत पुरुषार्थ वाढतो--इतकेंच नव्हे तर त्या वाढलेल्या पुरुषार्थाचा फायदा स्वाभाविकरीत्याच स्त्रियांना मिळतो. जर कदाचित् तो देण्यांत पुरुष मागें पुढें करितील, तर स्त्रियांच्या सेवेंतून उत्पन्न झालेलें आणि पुरुषांच्या पुरुषार्थांत घुसलेलें आकर्षण पुरुषांच्या हृदयांत प्रेरणा करून त्यांच्या सेवेचा बदला पूर्णपणें दिल्याशिवाय रहाणार नाहीं. स्त्रियांच्या सेवेच्या आकर्षणामुळें पुरुषार्थ वाढून त्याच्या जोरावर मी हॉस्पिटलमध्यें मुडदे फाडतों, आणि माझी ही लाडकी झोंपाळ्यावर बसून झोके घेते; ह्या आधीनतेमुळेंच माझ्या लाडकीकरितां मी लोकांचा नोकर होतों, आणि ती माझ्याकरितां सुंदर बागेच्या शीतल सावलींत बसून सुगंधित व मनोहर फुलें वेंचीत असते. मी तिच्याकरितां रात्रंदिवस सक्त मेहनत करितों. ही आपल्या सुशोभित दिवाणखान्यांत बसून आपल्या केंसांशीं खेळत असते, तें पाहून मला कधींही असें वाटत नाहीं कीं, हीं कां अशी बसते, आणि आम्हींच कां फुकट धडपड करावी ? जर समान हक्क असते, तर तसें वाटलें असतें, पण आमच्या सेवाधर्मांत तर हे स्त्रियांचे खास हक्क असल्यामुळें आणि त्याची फेड करण्याकरितांच आमचा जन्म असल्यामुळें, आणि त्यांच्या निमित्तच आम्ही जगांत पुढें येणार असल्यामुळें, तसेंच लग्नाच्या यज्ञामुळेंच, आमच्या आत्म्याची उन्नति असते आणि आमच्या आयुष्यांत गोडी येते व पुरुषार्थ वाढतो. आम्हांला असें वाटतें कीं, काय केलें असतां अधिक चांगल्या रीतीनें ह्यांच्या सेवेचा मोबदला आम्ही देऊं शकूं ? हीच आमची इच्छा असते आणि स्त्रियांच्या आधीनतेमुळें त्यांच्या खेळांत आम्हांला गम्मत वाटते. तशी गम्मत

तुम्हीं कधीं पाहिली आहे का ? आणि तो खेळ पाहण्याचा आनंद तुम्हीं कधीं चाखला आहे का ? जर तुम्ही त्यांतील खुबी समजत असाल, तर सेवाधर्माचीं रहस्यें तुम्ही समजूं शकाल !

---

## केंसांचा खेळ,

"केंसांशीं खेळणें ! अहाहा! केंसांचा खेळ ! काय त्याची खुबी ! अरे ! मी तिचे ते नाजूक केंस पाहूं का बोटें पाहूं ? तिचें हंसतमुख पहात राहूं का मधुर शब्द ऐकूं ? तिचे तेजःपुंज डोळे पहात राहूं का तिच्या अंतःकरणांतील भाव पाहूं ? केंसांची लांबी मोजूं का शोभा निरखूं ! तिच्या केंसांतील सुंदरतेकडे लक्ष देऊं का ते पहाण्यापासून उत्पन्न होणाऱ्या हृदयांतील निरनिराळ्या कारांकडे लक्ष देऊं ? केंस विंचरतांना त्यावरून फिरणारा नाजूक आणि सुकोमल हात त्यांना व्यवस्थेनें बसविण्याकरितां वरखालीं होत असतो, आणि अशा वेळीं जर का चित्त कोठें विचारांत गेलें, तर त्या वेळेस जी एक अर्धवट समाधि लागते, आणि अशा स्थितींत ती जेव्हां आपल्या खासगी खोलींत उभी असते, त्या वेळचें चित्र तुम्हीं पाहिलें आहे का ? मीं जेव्हां तें चित्र पाहिलें तेव्हां त्या चित्राच्या प्रतापानें मींहि क्षणभर त्या समाधीचा आनंद अनुभविला. तुमच्या समान हक्कवाल्यांच्या नशिबांत तो आनंद कोठून असेल ! तुमच्या स्त्रियांना कोठें 'गव्हर्नेस्' होऊन जावयाचें असतें, कोठें दारूच्या दुकानांत 'बार-मेड' होऊन जावयाचें असतें, कोठें 'हॉटेलां'त आलेल्या पाहुण्याच्या सरबराईकरितां जावयाचें असतें, कोणाला मानपत्र द्यावयाच्या सभेंत जावयाचें असतें. समान हक्कामुळें लग्नासंबंधानें अप्रीति वाढते, आणि त्यामुळें नवरा मिळत नाहीं, या चिंतेंत त्या फिरत असतात; तेथें स्त्रियांत स्त्रीत्व कोठलें ? आणि मग स्त्रियांच्या रसिकतेचा अनुभव कोठून मिळणार ?"

---

# आरशाशीं खेळ.

"मित्रा ! तुम्हीं प्रेमभरित अशा आर्यस्त्रियांची आरशाबरोबरची गम्मत कधीं पाहिली आहे का ? जर ती पहाल तर तुम्हांला आमचा हेवा वाटल्यावांचून कधीं राहणार नाहीं. आरसा ! अहाहा ! त्या आरशाशीं स्त्रियांचें काय काम असतें, कोणास ठाऊक ? आपल्या सुस्वरूपांत आपणच भुलून गेलेल्या अशा रसिक स्त्रियांच्या खासगी खोलींत गुपचूपपणीं क्षणभर त्यांना न कळेल अशा रीतीनें तुम्ही कधीं गेलां आहां का? आणि त्या वेळचे त्यांचे हावभाव तुम्हीं पाहिले आहेत का ? त्यांचीं प्रेमानें ओथंबलेलीं अशीं अंतःकरणें उघडून प्रथम साध्या डोळयांनीं आणि नंतर ज्ञानचक्षूंनीं तुम्हीं पाहिलीं आहेत का ? आणि त्यांची प्रेमानें गद्गदीत झालेली वाणी तुम्हीं ऐकली आहे का ? आणि मुग्धावस्थेंत स्वाभाविकरीत्या आरशाशीं होणारा खेळ तुम्हीं पाहिला आहे का ? भांग काढतांना, कुंकं लावतांना, तोंड धुवून पुसतांना, नथ बुगड्या वगैरे दागिने घालून जेव्हां लग्नाला अगर मैत्रिणीच्या येथें एखाद्या समारंभाला त्यांना जावयाचें असतें त्या वेळेला, त्यांच्या आरशाशीं चाललेल्या स्वाभाविक चेष्टा तुम्हीं पाहिल्या आहेत ? जर त्या वेळचीं प्रासादिक काव्यें तुम्ही यदृच्छेनें वाचूं शकत असाल आणि त्या वेळचीं स्वाभाविक चित्रें तुम्हांला पहातां येत असतील, तर तुम्हांला असें वाटेल कीं, स्त्रिया घरांतील राज्य चालविण्याकरितांच उत्पन्न झाल्या आहेत; आणि सेवाधर्म बजावून मनुष्यांत देवपण आणण्याकरितांच व संसारांत स्वर्ग आणण्याकरितांच स्त्रियांचा अवतार आहे. कदाचित् तुम्हांला असें वाटेल कीं, मी ह्यांत नवीन काय सांगतों आहें ? आणि ह्या अशा साधारण गोष्टी मी इतक्या कां लांबवितों आहें ? असें समान हक्कामुळें वाटण्याचा संभव आहे. कारण जितके तुमचे हक्क तितकेच स्त्रियांचे हक्क असल्यामुळें तुमच्यापेक्षां कांहीं विशेष स्त्रियांत आहे, असें तुम्ही पाहूंच शकत नाहीं. पण आम्ही स्त्रियांच्या सेवाधर्मांतून उत्पन्न होणाऱ्या आक-

षणामुळें त्यांच्यांत एक प्रकारची विशेषता पाहूं शकतों, इतकेंच नव्हे, तर एक पवित्र आर्य ह्या नात्यानें आमच्या उत्तम आयुष्यांत आम्ही त्यांचा उपभोग घेऊं शकतों, आणि त्यामुळें तुम्हांला साधारण वाटणाऱ्या गोष्टी सांगण्यांतही आम्हांला मजा वाटते, म्हणून अजून मला स्त्रियांची पाण्याशीं होणारी चेष्टा कशी असते ते सांगूं द्या."

---

## पाण्याशीं खेळ

नदी–तलावाच्या कांठच्या शहरांतून किंवा खेड्यांतील मोठाल्या ओढ्याच्या घांटांवरून तुम्ही कधीं स्नान करावयाला गेले आहां का? स्त्रियांची निर्दोष चेष्टा तुम्हीं लक्षपूर्वक पाहिली आहे? जर त्या प्रेम-वेड्या स्त्रियांची ती चेष्टा—ते डोळे तुम्हीं प्रत्यक्ष पहाल तर तुम्हांला असें वाटेल कीं, पुरुषांच्या पुरुषार्थाची बरोबरी करण्याकरितां स्त्रिया उत्पन्न झाल्या नाहींत, पण घराचें राज्य चालविण्याकरितां, पुरुषांना लग्नस्नेहाचें सुख देण्याकरितां आणि ईश्वराचा महिमा वाढविण्याकरितांच त्या उत्पन्न झाल्या आहेत.

मित्रा! स्त्रीपुरुषांचे समान हक्क आहेत कीं सेवाधर्मामुळें स्त्रियांचे खास हक्क अधिक आहेत, हें समजण्याकरितां तुम्हांला थोडीशीं शुद्ध प्रेमाचीं स्वाभाविक चित्रें पहावीं लागतील. पाण्याशीं चेष्टा! –अहाहा! त्याचीं खुबी कांहीं वेगळीच आहे. अजब खुबीदार असें मंद मंद हास्य, प्रफुल्लित चेहरा, गोड खेळ, ओल्या चिरगुटासुद्धां पाण्यांत उभ्यानें असतां अंगाला चिकटलेलें तें ओलें वस्त्र, त्या नाजूक हातांनीं पाणी उडविणें, वगैरे तुम्हीं पाहिलें आहे का? तशांत उडविलेले पाण्याचे शिंतोडेरूपी बाण तुम्हीं कधीं अनुभविले आहेत का? तुमच्या समान हक्कांत तुमच्या प्रियेच्या हातून असें झाल्यास तुमची बेअब्रूबी होईल; पण आमच्या सेवाधर्मांत-वाटेल

तर गुलामगिरींत म्हणा-आमच्या स्त्रिया अंतःकरणाच्या स्वाभाविक प्रेरणेनें उत्पन्न होणारी अशी चेष्टा करून आनंद भोगूं शकतात. जर ते पाण्याचें बाण तुम्हांला लागतील, तर तुम्हीं स्त्रीपुरुषांचे समान हक्क आहेत असें म्हणणारच नाहीं. जर तुम्हीं त्यांना एकमेकींबरोबर पाण्यांत खेळतांना पाहाल, तर समान हक्कानें वाटेल त्याच्याबरोबर हिंडण्याफिरण्याची मोकळीक तुम्ही त्यांना देणार नाहीं. पाण्याच्या लहरींची तुम्हांला बरोबरी करतां येईल, तर पोट भरण्याच्या साधनाकरितां तुम्ही त्यांना इतस्ततः भटकूं देणार नाहीं. पाण्याच्या शिंतोड्यावर पडणाऱ्या सूर्याच्या किरणांनीं जे एक प्रकारचे निरनिराळे रंग दिसतात, त्यांच्याशीं जर तुम्ही तुमच्या स्त्रियांच्या मानसिक आनंदाची बरोबरी करूं शकाल, तर तुम्ही समान हक्काच्या नांवावर रसिकतेच्या नाजूकपणाच्या मूर्ति अशा ज्या स्त्रिया त्यांना तुम्हीं मिशांशिवायचे पुरुष करण्याच्या खटपटींत पडणार नाहीं. जर तुम्हांला पाण्याची शीतलता आणि पवित्रता समजत असेल आणि त्याचा अनुभव तुमच्या बायकांत घेण्याची शक्ति असेल, तर त्या मुग्धांमधून समान हक्काच्या नांवानें स्त्रियांचें स्त्रीत्व म्हणजे सेवाधर्म तुम्ही कधींही दूर करणार नाहीं, इतकेंच नव्हे तर स्त्रियांचे असे गोड खेळ पाहिल्याशिवायही त्यांच्या अंतःकरणांत असणाऱ्या स्वाभाविक प्रेमानें आणि त्यांच्या साध्या रीतीभातींनीं सुद्धां रसज्ञ पुरुषाला त्यांत कांहीं विशेष वाटतें." असें म्हणून माझ्या तोंडाकडे पाहून म्हटलें,

## माझ्या लाडकीसंबंधीं माझे विचार

" ह्या तुमच्या वहिनीसंबंधानें—माझ्या लाडकीसंबंधानें—माझा असा अनुभव आहे कीं, तिला जेव्हां जेव्हां मी पाहातों तेव्हां तेव्हां मला तिच्यांत नवीनच सुस्वरूपता दिसते. जेव्हां पाहतों तेव्हां नवीनच हावभाव, जेव्हां पाहातों तेव्हां नवीनच मोहकता ! जेव्हां ऐकतों तेव्हां नवेच उद्गार !

नव्या नव्या प्रतीच्या कल्पना ! तुमच्यामुळेंच मी जेव्हां या गोष्टींचा विचार करितों तेव्हां मी अद्भुत रसांत बुडतों, आणि दुनियेची स्मृति विसरतों अहाहा ! प्रेम ! प्रेम ! प्रेम ! वस्स प्रेम ! प्रेम हेंच आयुष्याचें कर्तव्य ! तीच जन्माची सार्थकता ! 'प्रेम' हा शब्द उच्चारण्यांत कांहीं अजब गोडी आहे, असा अनुभव आल्यानंतर मला असें वाटतें कीं, मी हिची खुशामत कां करितों ? हिचीं गाणीं कां गातों ? माझे कान ह्या रसिक मैनेचें गाणें ऐकण्याकरितां उत्सुक कां ? मी त्या निर्दोष हरणासारख्या दिसणाऱ्या डोळ्यांकडे कां पहात रहातों ? तिचें चिंतन कां करितों ? आणि तिच्या प्रेमाचें ध्यान करून मी तिच्या प्रेमबंधनांत कां बांधिला जातों ? तिच्यापेक्षां मला ह्या जगांत दुसरीकडे अधिक गोडी कां वाटत नाहीं ? माझ्या मनाशीं शहाणा ठरलेला मी ह्या प्रेमवेडीजवळ प्रेमवेडा कसा होतों ? ईश्वरा ! परमेश्वरा ! प्रेमा ! हें तूं काय केलेंस ? मला तूं खुषमस्कऱ्या केलेंस ? अहाहा ! जो पठ्ठ्या कधीं ब्रह्मदेवाची-सुद्धां खुशामत करणारा नव्हे, तो आज खुषमस्कऱ्या झाला ! अरे ! माझा तो ताठा कोठें गेला ? माझें मोठेपण कोठें गेलें ? माझा अभिमान कोठें गेला ? मी कोणाला मान देत नसें, कोणाचे पुढें नमत नसें, कोणाची स्तुति करीत नसें, कोणत्याही वस्तूंत मला खुबी दिसत नसे, आणि कशामध्येंही मी पडत नसे, आणि प्रेमासारख्या अमूल्य वस्तूला कल्पित समजून त्याची थट्टा करीत असें. त्या माझे हे हाल तर पहा. पण

## आतां मला असेंच वाटतें

कीं, जसें कांहीं तिच्याजवळ बसून रहावें, तिच्या तोंडाकडे पहात रहावें, तिचे हावभाव निरखीत बसावें, तिच्या गोष्टी ऐकाव्या, तिचीं वचनें गुंफावीं, तिच्या अंतःकरणांतील भावांचें मनन करावें, तिच्या हालचालींकडे लक्ष द्यावें, तिच्या खुब्या शोधाव्या आणि तिच्या गुणांचें स्मारक करून तिची आज्ञा ऐकावी. तिच्याजवळ बसण्यांत मला इतकी

मजा का वाटते ! ती मजा समजण्याचा सगळ्यांना अधिकार नाहीं. तिच्याजवळ बसण्यांत ज सुख आहे तें दुसऱ्या कोठें नाहीं. तिच्याजवळ बसलों असतां जो एक प्रकारचा सुगंध सुटलेला मला भासतो, तो माझ्याशिवाय दुसऱ्या कोणाच्या लक्षांत येईल काय ? तिच्या अंतःकरणांतून निघणारा मंजुळ घंटेचा नाद माझ्या कानांत नेमका ऐकूं येतो. त्याचा अर्थ प्रेमी मनुष्य शिवाय कोण समजूं शकेल ! ती जेथें बसलेली असेल तेथें आजूबाजूंस जी पवित्रता पसरलेली असते, ती प्रेमचक्षूंशिवाय ज्ञानचक्षूंना काय दिसणार ! तिच्या श्वासांतून जी ऊन निघते तिची किंमत प्रेमांत थंडावल्याशिवाय कशी समजणार ? तिच्या हलणाऱ्या ओंठांत, काम करणाऱ्या हातांत, नाजूक दंतपक्तींत, आणि सुशोभित वस्त्रांत जी कांहीं खुबी दिसते, ती तुमच्या जड स्पर्शेंद्रियाला कशी समजूं शकेल ? तिच्या वचनामृतांत जी शीतलता आहे, तिच्या सहांगांत जी अकृत्रिम श्रेष्ठता सांठविलेली आंह, तिच्या बसण्याउठण्यांत जी स्वाभाविक मनोरंजकता आहे आणि प्रसंगोपात् हलणाऱ्या तिच्या अवयवांकडे पाहून जो मानसिक आनंद उत्पन्न होतो, त्याचें वर्णन मीं कोठवर करों ! तें तुम्हांला कशा रीतीनें दाखवितां येईल ? फोटोग्राफी, फोनोग्राफी किंवा दुसरी कोणतीही कला अजून तें दाखविण्यास समर्थ झालेली नाहीं आणि होणारही नाहीं. तिची तसबीर जरी मीं तुम्हांला दाखविली, तरी संसारांत इतर ज्या तसबिरी तुम्ही पाहतां त्यांसारखीच ती तुम्हांला दिसेल. आकाशाच्या विजेचा फोटो घेतां येतो, 'मायक्रॉस्कोप'सारखीं यंत्रें झालेलीं आहेत, किरणांचा वेग शोधून काढण्यांत आला आहे, माशीचे डोळे आणि पतंगाचे पंख मोजले गेले आहेत, पण प्रेममापक यंत्र कोणीं अद्याप बनविलेलें नाहीं, त्यामुळें आपुकमाषुकाचा भेद तुम्ही कसा समजाल ? जेव्हां तुम्ही प्रेमाची किंमत समजाल, तेव्हां जसें ज्ञानानें श्रीकृष्णाच्या तोंडांतच अर्जुनानें ब्रह्मांड पाहिलें तसें तुम्ही तुमच्या पत्नीच्या तोंडांतच प्रेमानें प्रत्यक्ष स्वर्ग पहाल, तिच्या शब्दांत अमृतधारा

अनुभवाल आणि तिच्या श्वासाबरोबर निघणाऱ्या हवेंत तुम्हांला शांति आढळेल--तिच्या नाडीच्या हालण्यानें तुमच्या आयुष्यरूपी घड्याळाचा लंबक तुम्ही हालतांना पाहाल. स्त्रियांच्या डोळ्यांवरून कवि त्यांना हरिणाक्षी, कमलनयना वगैरे उपमा देतात. पण तुम्ही त्या डोळ्यांच्या हालण्याबरोबर अंतःकरणांत होणारी उलथापालथ पाहूं शकाल, तिच्या वाणींत तुम्हांला गंधर्वांच्या गायनापेक्षांही जास्त गोडी लागेल, आणि तिचें काम करण्यांत तुम्हांला सांगतां येणार नाहीं, इतका आनंद वाटेल. तिच्यापुढें नम्र होण्यांत तुम्ही आपल्यास नशिबवान् समजाल, तिच्यापुढें विचार करतांना तुम्ही फार उंच भराऱ्या माराल, तिचें चिंतन तुम्हांला मानसिक दुर्बलता आणि प्रापंचिक कटकटींपासून दूर करील, आणि जों जों तुम्ही खोल जाल तों तों आनंदी आनंद पाहाल. मोक्षाच्या ब्रह्मानंदांत आणि प्रेमाच्या आनंदांत फेर इतकाच कीं, पहिला अखंडित आनंद आहे, आणि दुसरा क्षणिक आहे; पण दैवयोगानें जर क्षणिक आनंदाचा अनुभव मिळाला, तर मग अखंड आनंद पावणें कांहीं मुष्किल नाहीं. मित्रा ! स्त्रियांमध्यें असणाऱ्या सेवाधर्मामुळें आणि प्रेमधर्मामुळें ज्याला आपल्या पत्नीसंबंधीं असे अनुभव येत असतात व इतका अभिमान वाटतो, तो इसम रसिक स्त्रीपुरुषांचे सारखे हक्क कसे कबूल करील? इतकेंच नव्हे, तर अशा प्रेमीजनाला तो विचार हलक्या प्रकारचा आणि कठोर वाटेल, कारण त्याचे अनुभवच निराळे असतात.

---

## आपल्या लाडकीसंबंधीं प्रेमीजनांना मिळणारा अनुभव.

"स्त्रीच्या डोळ्यांचे कोंपरे बनविण्यांत परमेश्वरानें जें कौशल्य खर्च केलें आहे, तिच्या त्वचेंत जी चमक ठेविली आहे, तिच्या तोंडावर मनमोहक,

चित्तवेधक, हृदयभेदक असे जे विकार भरले आहेत, ते जगांत कोठें सांपडणार ? स्त्रियांहून श्रेष्ठ रत्न जगांत कोठेंतरी आढळेल काय ? तिच्या कोणत्या वस्तूंत मजा नाहीं ? मुरडल्या जाणाऱ्या तोंडांत, मऊ आणि लांब अशा केंसांत, कोमल हातांत, लाजाळू व मर्यादशील डोळयांत, योग्य प्रमाणांत भरलेल्या नितंब भागांत, एकंदर पोषाखांत, गजगतीच्या चालण्यांत, कशांत म्हणून अलौकिकता नाहीं ! स्त्री सर्व अवस्थेंत सुखदात्री आहे. आणि सर्व स्थळीं रमणीय आहे. म्हणून आर्यशास्त्रांनीं स्त्रीविरहित पुरुषाला अर्धा म्हटलें आहे. स्त्रीसुखांत सुख वाढविणारी आणि दुःखाच्या वेळीं शांति देणारी, तशी दुःख सोसण्याची शक्ति देणारी आहे. तरुण बंधुहो ! आपण स्त्रियांच्या उदरांत उत्पन्न झालों आहों, स्त्रियांच्या मांडीवर वाढलेले आहोंत, स्त्रियांजवळ रहाण्याचीच इच्छा आपण करितों, स्त्रियांच्या अमृतमय दृष्टीनेंच आपण आनंदित होतों, आणि स्त्रियांच्या आश्रयानें जी वृद्धावस्था स्वाभाविक त्रासदायक आहे, तीही सुखदायक होते. लक्षांत ठेवा कीं, मेल्यानंतरही आपल्यासाठीं अश्रु गाळणारी स्त्रीच आहे. अशा प्रत्यक्ष संसारांतील देवीकडे तुमचा ओढा वहाणार नाहीं, तिच्याशीं तुम्ही बहुमानानें वागणार नाहीं, आणि तुमच्यापेक्षां जास्त हक्क तिला देणार नाहीं, तर मी तुम्हांला कृतघ्न म्हणेन. कारण स्त्रिया जगांत अमृत ओततात, स्त्रिया नेहमीं गोड असतात, त्यांची निर्दोष कौमार्यावस्था जगांत एक प्रकारचें माधुर्य वाढविते, त्यांची विजेसारखी चमकणारी, समुद्राच्या लाटांसारखी उसळणारी, वसंत ऋतूंत येणाऱ्या नवीन पालवीप्रमाणें फुटणारी, पौर्णिमेच्या भरतीसारखी चढणारी, मत्त हात्तिणीप्रमाणें प्रेमामध्यें मदोन्मत्तता आणि डोळ्यांवर धुंदी पसरणारी तारुण्यावस्था ह्या जगांत अमृत ओतीत असते, आणि वृद्ध माता स्वार्थी जगाला परमार्थ शिकविण्याकरितां, आपल्या इच्छांचा भोग देऊन स्वार्थीजगाला एक बेमालूम अमूल्य वारसा ठेवून जाते.

"मित्रा, अशा रीतीनें स्त्रिया जगांत अमृत ओतीत असतात. म्हणून रसज्ञ प्रेमी म्हणतो कीं, मला चमकणारी सोन्याची लगडी नको आणि

पाणीदार मोत्येंही नकोत. 'राजमान्य राजश्रीच्या पदाची मी अपेक्षा करीत नाहीं, तांब्याचें सोनें होणाऱ्या किमयेची मला इच्छा नाहीं, अप्सरांना वश करतां यावें अशी सिद्धि मला नको आहे, देवानें मला कामदेव करावें अशी माझी इच्छा नाहीं, किंवा पाटिलकी, रावसाहेब, रावबहादूर हे किताब देखील मला नकोत. मला पाहिजे काय ? तर मला माझी रसिक, नाजूक, गुणवान् आणि गोड अशी प्रिया हवी आहे. अरे, जिच्या शब्दानें माझे कान पवित्र होतात, जिचें नांव घेण्यानें माझ्या वाणींतून अमृत स्रवतें, जिच्या दर्शनानें माझे डोळे थंड होतात, प्राणायामापासून होतो तसा कंप जिच्या स्पर्शानें होतो, जिच्या चिंतनानें माझ्या हृदयांत आनंदाच्या ऊर्मी उठतात, जिच्या विचारानें मला एक प्रकारची समाधि लागते, आणि जिच्या सान्निध्यानें स्वर्गीय भावना अनुभवायला मिळतात, त्या रम्य मूर्तीच्या प्राप्तीशिवाय मी दुसरें कांहीं मागत नाहीं. तिचे ओंठ हालल्याबरोबर मी सगळ्या जगाला हालतांना बघतों, तिच्या पापणीच्या हालण्याबरोबर माझ्या सर्व शरीरावर रोमांच उभे राहतात, तिच्या कोमल हातांतून मला उदारता स्रवतांना दिसते, तिची वाणी आनंदपर्वतावर चढण्याची शिडीच आहे तिच्या रोमांचांत कामदेवाचे बाण भरले आहेत, तिच्या डोळ्यांतून अश्रु निघाले, म्हणजे आकाशपाताळ एक दिसूं लागतें, तिचें प्रासंगिक हास्य स्वर्गीचा आनंदच आहे, आणि ती जेव्हां कमरेवर हात ठेवून उभी असते, तेव्हां विचाररहित उभी असलेली ही शांतमूर्ति जशी कांहीं योगेश्वराच्या ध्यानांत लीन झाली आहे, अशीच दिसते. अशा देवीला मग काय म्हणावयाचें ! स्वाभाविक रीत्याच असें म्हटलें जातें कीं, 'माझे लाडके ! माझे हृदयेश्वरी ! माझ्या सुखाचा आधार व आनंदाचें स्थान अशा माझ्या प्रिये ! तुझी मधुर वाणी एकदां माझ्या कानाला ऐकून तृप्त कर.'

"जिच्या वचनांत इतकी गोडी आहे, जिच्या सौंदर्यांत सगळ्या जगाचें सौंदर्य दिसतें, आणि जी हृदयाची अधिष्ठात्री देवी झाली आहे, तिच्यासंबंधीं पुरुषार्थानीं युक्त अशा प्रेमी जनांच्या मनांत माझ्या इतकाच हक्क आहे" असा विचार येईल का ? कधीं नाहीं ! आपण जरी तिच्या हातांत नाचलों किंवा तिला जरी आपल्या हातांत नाचविली, तरी त्याला असें वाटेल कीं, मी अद्याप ह्या स्वर्गीच्या देवीकरितां कांहीं करूं शकलों नाहीं, आणि त्याहूनही पुढें गेलेल्याला तर असें वाटेल कीं, विधात्री श्रेष्ठ कां माझी अधिष्ठात्री श्रेष्ठ? विधात्रीनें माझी वृत्ति जड केली, आणि अधिष्ठात्रीनें रसिक बनवलें. अगे प्रिये ! तूं काय तप केलेंस ? कोणचें साधन केलेंस ? तूं कोणता मंत्र साधलास ? तुला कोणता गुरु भेटला होता ? तूं वयानें लहान, तुझ्यांतील आणखी पुष्कळ गोष्टी लहान, तरी पण तूं माझ्याहून श्रेष्ठ कशी झालीस ? तुला ही विद्या कोणीं शिकविली ? धन्य भाग्य माझें ! आणि धन्य तूं ! तूं पुष्कळ परोपकार केला आहेस, तूं एकामध्यें मनुष्यत्व आणिलें आहेस; तूं एकाला व्यवहाराच्या पैलतीरावर ढकलला आहेस, तूं एकाला अभेद - मंत्राची दीक्षा दिली आहेस, सत्वधर्माच्या मार्गाला लाविला आहेस, श्रीकृष्णानें अर्जुनाला जसें कर्म करवून संन्यास दीक्षा दिली आहे तसें तूं मला रसज्ञता देऊन संन्याशी केलास, व व ईश्वराच्या सन्निध नेण्यास शक्तिमान् झाली आहेस माझ्या हृदयाच्या रत्ना ! तुला लोखंडाचें सोनें करण्याची विद्या कोणीं शिकविली ? माझ्या अंतरात्म्याची ती धन्वंतरी आहे. जी क्रिया आयुर्वेदांत नाहीं, जी क्रिया चरक, सुश्रुत, वाग्भट, भावप्रकाश, शार्ङ्गधर, निघंट आणि इंग्रजी 'सायन्सा' मध्यें नाहीं; जी क्रिया अमेरिकेंच इंडियन, जपानचे सूर्यपुत्र किंवा पुरातन चिनी लोक यांच्यांत नाहीं, ती अद्भुत क्रिया तुला कोणीं शिकविली ? अहाहा ! माझ्या अंतःकरणाला नाचविणारी, नाड्यांना चलन देणारी, इंद्रियांना चेतविणारी, भटकणाऱ्या स्वभावाचें आकलन करणारी,

हृदयाला शांति देणारी, अद्भुत बेमालुम जादुगिरी कोणीं शिकविली ? माझे लाडके, तुला कदाचित् समजत नसेल, पण पहा तर खरी कीं, तुझ्या प्रेमामुळें काय काय फेरफार झाले आहेत ! तुझ्या प्रेमानें मला किती उंच चढविलें आहे तें तर पहा ! आतां मला खालीं टाकूं नकोस, नाहीं तर माझे हाल होतील.

" आपल्या पत्नींत अशा श्रेष्ठतेचा अनुभव आला म्हणजे रसज्ञांना असेंच वाटतें कीं, आपल्या पत्नीच्या हातांत पतंग होणें ही देखील खुबीच आहे, मजा आहे, तो एक संतोष आहे. तें एक महाभाग्य आहे. आपली दोरी तिच्या हातांत देऊन ती उडवील तसें आपण उडावयाचें त्या मोहिनीचे प्रेमाचे कटाक्षबाण सोसावयाचे ! ही मजा स्वर्गांत कोठें आहे ? जेव्हां वरील विचार जाऊन मी आपल्या व्यावहारिक भानावर येतों तेव्हां माझ्या मनांत येतें कीं, हें काय आहे ? असें कां होतें ? साध्या गोष्टींत मला विशेषता कां वाटते ! उणिवींमध्यें मला आनंद कां वाटतो ? व्यावहारिक बाबतींत गूढ मनोहरता मला कशी दिसते ? रोजच्या साध्या गोष्टींत असाधारणता कशी वाटते ? ज्या वस्तूंची मी किंमत करीत नव्हतों त्यांची आसक्ति कां वाटते ? ज्या विचारांना मी मान देत नव्हतों. त्या गोष्टींचा मी गुलाम कसा बनलों ! ज्या भावना कोणीं सांगितल्या तरी समजत नव्हत्या, त्या आज प्रत्यक्ष अनुभवास कशा येतात ? ज्या गोष्टी क्षुल्लक वाटत, त्यांमध्यें आतां मन कां गुंततें ? ज्यांना मी निःसार मानीत होतों त्यांच्यांत आतां रहस्य कसें दिसतें ? ज्या स्थळीं जाण्याची इच्छा होत नव्हती, तिकडेच आतां माझे पाय कसे वळतात ! आणि जिला साधारण मनुष्य समजत होतों, तिच्यांत आतां दैवत्व कसें दिसतें ! त्याचें कारण अखेर प्रेम ! पवित्र प्रेम ! स्वर्गीय प्रेम ! हेंच होय. प्रेमा ! तुझा जोर फार मोठा आहे ! प्रेमांत जी लज्जत आहे, प्रेमांत जी श्रेष्ठता आहे, प्रेमांत जो रस आहे, जी गोडी आहे, जो आनंद आहे, तो जगांतील कोणत्याही वस्तूंत मला दिसत

नाहीं. विचारांची ऐक्यता, मोठें मन, तीव्र ओढा, श्रेष्ठ होण्याची आतुरता, पवित्रता, सहनशीलता, स्वार्थत्याग, स्वात्मार्पण आणि तन्मयता हीं जितकीं प्रेमांत आहेत. तितकीं दुसऱ्या कोठें आहेत ? बंधुहो ! कोठेंहि नाहींत. म्हणूनच आम्ही म्हणतों कीं, होईल तसें करून स्त्रियांत प्रेमधर्म वाढविला पाहिजे. तो प्रेमधर्म स्त्रीपुरुषांचे समान हक्क मानण्यानें वाढणार नाहीं. तर सेवा करण्याकरितांच स्त्रिया उत्पन्न झालेल्या आहेत, असें मानण्यानें तो वाढूं शकतो. म्हणून स्त्रियांत सेवाधर्म वाढावा असें आम्ही इच्छितों.

"आतां मला सांगा कीं, स्त्रीपुरुषांचे समान हक्क मानणें उत्तम का ? स्त्रियांच्या संबंधीं इतका आदर ठेवणें, त्यांना स्वर्गींच्या देवी समजून मनूच्या आज्ञेप्रमाणें त्यांची पूजा करणें उत्तम ! ही स्थिति पाहिल्यानंतर तुम्हांला असें वाटत नाहीं कां कीं, पश्चिमेचे पंडित आर्यांच्या उत्तम प्रेमाला आणि त्यांच्या खऱ्या स्वरूपाला, ओळखूं शकले नाहींत. आणि मनुष्यस्वभावाचीं खोल रहस्यें समजण्याकरितां प्राचीन ऋषींप्रमाणें श्रेष्ट प्रकृतीच्या मूळापर्यंत अद्याप जाऊन ते पोंचले नाहींत म्हणून ? "

---

## नफ्यातोट्याचा हिशोब.

हें ऐकून प्रोफेसरसाहेब गप्प बसले; आणि काय जबाब द्यावा, ह्या विचारांत ते पडले; हें पाहून महाराज म्हणाले कीं, "हल्लीं आपल्याला वरवरचें शिक्षण मिळतें, आणि आपल्या मनांत आसपासच्या वृत्तीप्रमाणें खोट्या विचारांचा इतका केर सांठला आहे कीं, अशी उत्तम गोष्टही आपण सहज कबूल करूं शकत नाहीं. प्रोफेसरसाहेबांना तर उलट असें वाटत असेल कीं, असल्या अर्थहीन गोष्टी काय सांगितल्या ?

केंसांचा खेळ, आरशाचा खेळ, पाण्याशीं मस्ती, ह्या काय खुबीच्या गोष्टी आहेत ? ह्या तर मूर्खासारख्या गोष्टी ! तुमच्या स्त्रियांना तुह्मी अशाच पोरकट मुली राखूं इच्छितां काय ? केंसांचा खेळ आणि पाण्याची मस्ती ह्यांनीं काय दिवे लागणार आहेत ! ह्यापेक्षां स्त्रियांना समान हक्क दिले तर त्या निम्में काम तरी करूं शकतील आणि प्रसंगविशेषीं पुरुषांना मदतगार होतील. कां प्रोफेसरसाहेब, हेच विचार तुमच्या मनांत आतां आले आहेत कीं नाहीं ? ”

प्रोफेसर म्हणाले, “ होय महाराज, बरोबर ! हेच विचार आतां माझ्या मनांत आहेत. आपल्याला ‘थॉट-रीडिंग’ ( मनांतील गोष्ट समजण्याची विद्या ) समजते कीं काय ? ”

मीं म्हटलें, “ जे प्रकृतीच्या मूळापर्यंत ईश्वरी नियमापर्यंत जाऊन पोंचले आहेत, ते काय तुमच्या अंतःकरणापर्यंत पोंचूं शकणार नाहींत ? ”

स्वतः म्हटलें, “ मित्रा ! क्षमा कर; पण मला म्हणूं दे कीं, तुमचे वरील विचार तुमच्या रसज्ञतेवर दडपण घालीत आहेत. असे वाणी, मारवाडी हे व्यापारांत नफ्यातोटयाचा हिशेब करतात, तसा रसज्ञेंतही नफ्यातोटयाचा हिशेब होत असेल का ? आपल्या स्त्रिया आपल्याला थोडेसे रुपये मिळविण्याची मदत करतील म्हणून त्याकरितां त्यांच्यांतून प्रेम काढून टाकावयाचें का ? आपल्या स्त्रियांनीं कुत्रीं मांजरें बरोबरं बाळगून मुलें दायांजवळ देणें, अशा प्रकारचें शिक्षण त्यांना मिळालेलें तुम्हांला आवडतें का ? आपल्या स्त्रियांनीं थोडेंसें अधिक काम करावें म्हणून त्यांचें स्त्रीत्व हरण करणें तुम्हाला पसंत होतें का ? स्त्रियांना कायद्याची माहिती होण्याकरितां त्यांना मुलें व्हावयाचीं बंद करणें तुम्हाला कबूल आहे का? स्त्रियांना स्वतंत्र नोकरी करावयास मिळावी म्हणून लग्नस्नेहाला काढून टाकणें तुम्हांला आवडतें ? परक्या पुरुषांशीं हिंडण्याफिरण्याची सोय

करून देण्यासाठीं त्यांच्यांतून कुटुंबस्नेह काढून टाकणें योग्य आहे ? आणि पुरुषांच्या बाहेरख्यालीपणाशीं पटलें नाहीं, म्हणजे काडी मोडून देण्यापर्यंत वेळ आणावयाची कीं काय ? मित्रा ! मला सांग, समान हक्कांत स्त्रियांचे असे हाल नाहीं का होत ? तुम्ही जेव्हां ईश्वरी प्रेमाच्या रसज्ञतेंत नफ्यातोटयाचा हिशेब करितां तेव्हां कांहीं समान हक्काचा हिशेबही तपासा. ”

प्रोफेसर म्हणाले,“ मग तुमचें म्हणणें असें आहे का कीं, स्त्रियांना स्वतंत्रता नको, स्त्रियांना धंद्यारोजगाराला लावावयाच्या नाहींत, स्त्रियांना उच्च प्रतीचें शिक्षण नको, स्त्रियांना त्या आहेत तशाच ठेवून घरांत दडपून टाकावयाच्या. ह्याला तुह्मी आर्यत्व म्हणाल ? जर तुमचें आर्यत्व असेंच असेल, आणि जर तुमच्या स्त्रियांचें स्त्रीत्व असेंच असेल, तर त्याला दुरूनच नमस्कार असो. आम्हांला तें नको. ”

---

## मनूची आज्ञा.

हें ऐकून महाराज म्हणाले. “ प्रोफेसरसाहेब, उलटा अर्थ घेऊं नका. शब्दाची लढाई करूं नका. आमचे हेतु समजून घ्या. आह्मी कांहीं स्त्रियांच्या सुखाविरुद्ध नाहीं; कारण मनूनें आम्हांला असें शिकविलें आहे कीं,

यानि गेहानि शपन्त्या प्रतिपूजिताः ।
तानि कृत्या हतानीव विनश्यंति समन्ततः ॥

स्त्रियांचा मान राहिला नाहीं म्हणजे ज्या घराला स्त्रिया शाप देतात त्या घराचा नाश होतो.

शोचन्ति जामतो यत्र विनश्यत्याशु तत्कुलम् ।
न शोचन्ति तु यत्रैता वर्धते तद्धि सर्वदा ॥

जेथें स्त्रिया दुःखांत राहतात तेथें कुलाचा नाश होतो व जेथें त्या आनंदांत असतात तेथें वंशाची वृद्धि होते.

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ।
यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफला क्रियाः ॥

जेथें स्त्रियांची पूजा होते म्हणजे स्त्रियांना सुखी ठेवण्यांत येतें, तेथेंच देवता वास करितात; जेथें स्त्रियांचा मान रहात नाहीं तेथें कोणत्याही कर्माचें फळ मिळत नाहीं.

तस्मादेताः सदा पूज्या भूषणाच्छादनाशनैः ।
भूतिकामैर्नरैर्नित्यं सत्कारेषूत्सवेषु च ॥

म्हणून ज्यांना धनाची इच्छा असेल त्यांनीं धर्माच्या कोणत्याही प्रकारची क्रिया अगर उत्सवप्रसंगीं वस्त्र, दागिने वगैरेचें दान देऊन स्त्रियांना संतुष्ट ठेवावें.

संतुष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैव च ।
यस्मिन्नेव कुले नित्यं कल्याणं तत्रवै ध्रुवम् ॥

ज्या घरांत पुरुष आपल्या स्त्रीपासून व स्त्री पुरुषापासून आनंदांत असतात तेथें खरोखर सुख आहे.

"स्त्रियांच्या हक्कासंबंधीं ह्यापेक्षां जास्त चांगली आज्ञा दुसरी काय असणार तें मला समजत नाहीं. सगळ्या जगांतील कोणत्याही धर्मांत स्त्रियांच्या हक्कासंबंधीं ह्याहून चांगलीं वचनं दाखवून द्याल तर मी तो धर्म पाळण्यास तयार आहे. ज्यानें स्त्रिया जास्त सुखी होतील तें करण्यास आम्हीं सदैव तयार आहों. कारण तुम्ही समान हक्काच्या रीतीप्रमाणें स्त्रियांना भागीदार किंवा मित्र समजतां, पण आम्ही तर त्यांच्या सेवाधर्मामुळें त्यांना आपलें अर्धे शरीर—घराची मालकीण—समजतों;

इतकेंच नव्हे तर आर्यशास्त्र तर असें सांगतें आहे कीं, पुष्कळ प्रकारचीं धर्मकृत्यें स्त्रियांना बरोबर घेतल्याशिवाय होतच नाहींत; आणि धर्मा-खेरीज आत्मा आपल्या शुद्ध स्वरूपाला पोंचत नाहीं. स्त्रियांच्या मदतीनेंच आपण उत्कर्ष पावूं शकतों, स्त्रियांच्या आकर्षणानेंच आपण पुरुषार्थ करूं शकतों, असें उघड रीतीनेंच शास्त्रें सांगत आहेत. आपल्या आयु-ष्यांतील रोजच्या व्यवहारांत हीं तत्वें आपण अनुभवितों, तेव्हां असें असूनही जर आपण स्त्रियांच्या सुखाची पर्वा केली नाहीं, तर आपल्या-सारखे नीच दुसरे कोण ? आणि ज्ञानाशिवाय व कर्तव्य केल्याशिवाय सुख कोठून मिळेल ? म्हणून स्त्रियांना सुखी करण्याकरितां त्या आपल्या आपलें कर्तव्य करूं शकतील असें शिक्षण त्यांना देणें जरूर आहे.

" तुह्मीं 'समान हक्कवाल्यांची' हीच इच्छा आहे कीं, जेणेंकरून स्त्रिया सुखी होतील तें करावयाचें; आणि सेवाधर्मवाल्यांचीही तीच इच्छा आहे. जेणेंकरून स्त्रिया सुखी होतील, जगांत आबादानी होईल आणि धर्माची व आत्म्याची उन्नति होईल, तें करावयाचें, येथपर्यंत दोघांचे हेतु आणि मतें एकच आहेत; असें असून त्यामध्यें विरुद्धता आहे ती इतकीच कीं, तुम्ही स्त्रियांना पुरुषांप्रमाणें शिक्षण द्यावयाचें म्हणतां, आणि आम्ही त्यांना घरसंसाराचें शिक्षण द्यावयाचें म्हणतों. तुम्ही स्त्रियांकडून पुरुषांप्रमाणें बाहेरचीं कामेंकाजेंही करवूं म्हणता; आणि आम्ही म्हणतों कीं, ती निरुपायाची गोष्ट आहे. तुम्ही स्त्रीपुरुषांचे हक्क समान मानतां; आणि आह्मी म्हणतों कीं, स्त्रियांवर पुरुषांचें स्वामित्व आहे. तुह्मी स्त्रियांना स्वतंत्रता देण्यांत-घराबाहेर हिंडूं देण्यांत त्यांचें सुख आहे म्हणतां, आम्ही तें कुटुंबस्नेहांत आहे असें म्हणतों. वाटेल तितक्या मोकळेपणानें पुरुषांमध्यें स्त्रिया मिसळूं लागल्या म्हणजे तुह्मी चांगलें म्हणतां, आम्ही त्यांच्यांत मर्यादा असणें चांगलें म्हणतों. अशा रीतीनें आपल्या विचारांत आणि बाहेरील वागणुकींत

भेद आहेत. दोघांची अंतर्यामींची इच्छा एकच आहे, आणि ती हीच कीं, स्त्रियांना सुखी ठेवावयाचें, तेव्हां आतां आपल्यांला पाहिलें पाहिजे कीं, स्त्रियांचें खरें सुख कशांत आहे? हें समजण्यास समान हक्क आणि सेवाधर्म ह्यांची तुलना प्रथम केली पाहिजे."

---

## स्त्रिया चंद्र आहेत आणि पुरुष सूर्य आहेत.

महाराज म्हणाले, " स्त्रीपुरुषांच्या निरनिराळ्या गुणांमुळें महात्म्यांनीं पुरुषांस सूर्याची उपमा दिली आहे आणि स्त्रियांस चंद्राची उपमा दिली आहे. जशी चंद्राचे किरणांत शांति असते, तशी स्त्रियांमध्यें आधीनतेनें उत्पन्न झालेली शांति असते, सूर्याच्या किरणांत जशी उष्णता, तसाच पुरुषांत पुरुषार्थ. चंद्र जसा आपल्या आकर्षणानें समुद्रास भरती-ओहटी आणितो, तशा स्त्रिया आपल्या आकर्षणानें पुरुषांच्या हृदयांत भरती-ओहटी उत्पन्न करितात. चंद्रांत जसें अमृत असतें, तसें स्त्रियांतही अमृत आहे. सूर्यांत तें शोषण करण्याची शक्ति असते, तशी पुरुषांत थोडीशी कठोरता असते. चंद्रांत जसें सौंदर्य आहे तसें स्त्रियांत रूप आहे, पण सूर्यांत त्याच्याऐवजीं चंद्रांला मंद पाडावयाचें तेजस्वीपण आहे, तसा पुरुषांत स्त्रियांच्या स्वरूपाला दडपण्यासारखा पुरुषार्थ असतो. चंद्राला वरचेवर ग्रहण लागतें, तसें स्त्रियांच्या मनांतही सहज बोलण्याबोलण्यानें ग्रहण लागतें, आणि सूर्याचीं ग्रहणें जशीं थोडीं असतात तसें पुरुषांच्या अंतःकरणावर स्त्रियांपेक्षां फारच थोडे परिणाम होतात. दिवसाच्या त्रासानें दमलेल्या जनाला जसा चंद्र

शांतता देतो त्याप्रमाणें संसाराच्या दगदगीनें त्रासलेल्या जनाला स्त्रिया शांतता देतात. सूर्य उष्णता उत्पन्न करून थंडी उडवतो, तसे पुरुष आपल्या उद्योगानें जगांत उष्णता पसरतात. चंद्र आपल्या अमृतवृष्टीनें औषधींचें पोषण करितो, तसें स्त्रिया आपल्या प्रेमळदृष्टीनें मुलांचें पोषण करितात; पण सूर्य आपल्या कडक किरणांनीं औषधी वाढवितो, तसे पुरुष आपल्या धाकानें मुलांना सुधारतात. चंद्र पृथ्वीच्या आसपास लवकर फिरतो तसें स्त्रियांचें मन हें संसारचक्र फिरवितें; पण सूर्यास फिरावयास वेळ लागतो, तशी पुरुषांच्या मनांत दृढता पुष्कळ बाबतींत स्त्रियांपेक्षां जास्त असते. सूर्यापेक्षां चंद्र लहान आहे, तसा पुरुषांपेक्षां स्त्रियांचा मेंदू लहान आहे. चंद्र धुक्याचें पाणी आणितो, तशा स्त्रिया अश्रू आणितात, पण सूर्य जसें तें उडवून टाकितो, तसें पुरुष त्यांच्या डोळ्याचें पाणी पुसून टाकितात; चंद्र पृथ्वीच्या जवळ असल्यामुळें पृथ्वीवर त्याचा पुष्कळ परिणाम होतो, तशा स्त्रिया जगतावर पुष्कळ परिणाम करूं शकतात, तसेंच गृहप्रपंचांतील साधारण गोष्टींत सुद्धां दूरवर नजर ठेवून त्याचा परिणाम त्या लवकर ताडूं शकतात, पण सूर्य फार लांब आहे, त्याचा पृथ्वीवर परिणाम होऊं शकत नाहीं, तसेंच पुरुष आपल्या पुरुषार्थांत इतकें दूरवर लक्ष ठेवीत नसल्यामुळें, स्त्रियांप्रमाणें त्यांच्यावर लवकर परिणाम होत नाहीं. जसा द्वितीयेचा चंद्र दिसण्यांत लहान आणि नाजूक दिसतो, तशा स्त्रिया दिसण्यांत लहान आणि नाजूक आहेत; पण सूर्य जसा उग्र तसे पुरुष दिसण्यांत उग्र आणि कामकाजांत सक्त असतात. चंद्र जसा नेहमीं लहान--मोठा होतो, तसें स्त्रियांचें मनही क्षणोक्षणीं चंचळ असतें. पण सूर्यांत जसा विशेषसा फेरफार होत नाहीं, तसे पुरुषही विशेष कारणाखेरीज स्त्रियांच्या सारखे लवकर बदलत नाहींत. सूर्याच्या तेजानें जसा चंद्र प्रकाशतो, तसेंच पुरुषांच्या पुरुषार्थानेंच स्त्रिया शोभतात; म्हणून स्त्रियांची चंद्राबरोबर आणि पुरुषांची सूर्याबरोबर तुलना केली आहे. प्रोफेसरसाहेब आतां

तुम्ही मला दाखवा कीं, तुम्ही सूर्याचे आणि चंद्राचे हक्क कसे सारखे करणार, आणि दोघांचीं कामें एक कशीं करणार ? ”

## मांजरीचें पोर आणि वांदरीचें पोर.

हें एकून प्रोफेसरसाहेब फार विचारांत पडले आणि अर्धवट हरलेच म्हणावयाचे. कारण चंद्रसूर्याच्या तुलनेला जबाब देणें कांहीं सोपी गोष्ट नव्हती. इतक्यांत महाराज म्हणाले, “ साहेब ! तुम्ही मांजरीचें पोर आणि वांदरीचें पोर, ह्यांतील भेद समजतां का ? मांजराच्या पोराला त्याची आई जेथें जरूर असेल तेथें उचलून नेऊन ठेविते, पण वांदरीच्या पोरास हातानेंच धरावें लागतें—तो पडेल याबद्दल वांदरी काळजीच करीत नाहीं. तसेंच जेथें स्त्रियांत सेवाधर्म आहे, तेथें जशी मांजरी आपल्या आपणच आपल्या पिलांना नेते, तसे पुरुष स्त्रियांचा बोजा आपणच उचलतात; आणि जेथें स्त्रियांचे समान हक्क असतात, तेथें वांदरीच्या पोराप्रमाणें पुरुषांना स्त्रियांना धरून राहावें लागतें. मांजरीला जसें आपल्या पिलांना उचलणें जड वाटत नाहीं, उलट त्यांत आनंदच वाटतो, तसेंच सेवाधर्मांत आपल्या पुरुषार्थींनीं पुरुषांना स्त्रियांचा भार फार न वाटतां तो फुलाप्रमाणें वाटतो, आणि तो बोजा उचलण्यांत त्यांना उलट आनंद वाटतो. इकडे त्या पिलांलाहीं आईच्या तोंडांत असल्याचें मुळींच भय वाटत नाहीं, तसेंच पुरुषांच्या आश्रितांना—पुरुषांच्या स्वामित्वाखालीं राहणाऱ्या स्त्रियांना—कोणत्याही प्रकारचें भय नसतें, त्या निर्भय असतात. त्यांना यांत आनंद होतो. पण वांदरीच्या पोरांना आपल्या संरक्षणार्थ आपल्या

आईला जशी घट्ट धरावयाची अवश्यकता असते, तसें समान हक्कांत आहे. दोहींतही मुलांचा बोजा आईवरच पडतो, तसें दोहींतही स्त्रियांचा बोजा पुरुषांवरच पडतो. फेर इतकाच कीं, सेवाधर्मांतील स्त्रियांचा बोजा पुरुष आपण होऊन उचलतात, आणि समान हक्कांत स्त्रियांना आपण होऊन पुरुषांना मजबूत धरून ठेवावें लागतें. नाहीं तर वांद्रीच्या पोरांप्रमाणें खालीं पडावयाची भीति असते. ह्याचा परिणाम असा होतो कीं, स्त्रियांचें आयुष्य पुरुषांना पकडण्याच्या तजविजींत आणि पकडलें म्हणजे पडून न जाण्याच्या काळजींत जातें, आणि त्या काळजीनें त्यांच्या मृदु अंतःकरणांतील उत्कृष्ट गुण खुलूं शकत नाहींत आणि त्यामुळें स्त्रियांची खरोखर शोभा अथवा त्यांचे खरें स्त्रीत्व नष्ट होतें. प्रोफेसरसाहेब लक्षांत ठेवा कीं,

## स्त्रियांतून स्त्रीत्व कमी करणें म्हणजे पुरुषांतून पुरुषार्थ कमी करण्याप्रमाणें आहे.

कारण स्त्रियांच्या स्त्रीपणावरच पुरुषांचा पुरुषार्थ अवलंबून आहे, म्हणजे स्त्रियांतून स्त्रीत्व कमी झालें कीं, पुरुषांतून पुरुषार्थ कमी झाल्याशिवाय राहणारच नाहीं. पुरुषांतून पुरुषार्थ कमी होणें म्हणजे नुकसान आहे. ह्या गोष्टींचा तुम्ही कांहीं विचार करतां का? जर त्याचा विचार तुम्हांकडून होत असला, तर लग्नस्नेहाच्या मुळावर, प्राचीन ऋषींच्या सिद्धांतांवर, पवित्र आर्यधर्माच्या त्रिकालदर्शी हुकुमांवर, प्रकृतीच्या मुळांवर आणि ईश्वरी नियमांवर तुम्ही स्त्रीपुरुषांच्या समान हक्कांच्या नांवानें असा घाव घालावयास तयार झाला नसतां. तुम्ही म्हणालां कीं, 'समान हक्कांनीं स्त्रियांचें स्त्रीत्व कसें जातें?' पण त्याचा जबाब उघड आहे, आणि तो हाच कीं, समान हक्कांत वांद्रीच्या पोराप्रमाणें पुरुषांना पकडून ठेवण्याची तजवीज स्त्रियांना केली पाहिजे,

आणि पकडल्यानंतरही हात न सुटण्याची काळजी त्यांना ठेवावी लागते, आणि त्या व्यवस्थेंत व काळजीमुळें त्यांना आपल्या स्वाभाविक कर्तव्यांत, आपल्या अंतःकरणांतील इच्छेंत आणि मनाच्या स्वाभाविक कलांत छाटाछाट करावी लागते. इतकेंच नाहीं, तर पुष्कळ वेळां मनांत नसतात अशा प्रकारचे देखावे बाहेर करावे लागतात. असा वरकरणीपणा शरीरांत, मनांत, वागणुकींत, शिक्षणांत आणि पोषाखांत आणावा लागतो; आणि त्याचा परिणाम असा होतो कीं, स्त्रिया मिशां-शिवाय पुरुष होतात म्हणजे स्त्रियांचें जें खरें खरें स्त्रीत्व तें उमलल्या शिवायच कोमेजून जातें; आणि त्यांची खरी शोभा दिसत नाहीं त्यामुळें सेवाधर्माशिवाय रीतिप्रमाणें स्त्रियांची खरी खरी उत्तमता दिसत नाहीं, त्यामुळेंच शकुंतलेसारखें अद्भुत सौंदर्य दिसत नाहीं, त्यामुळच कादंबरीसारखी रसज्ञता दिसत नाहीं, त्यामुळेंच सावित्रीसारखें सतीत्व दिसत नाहीं, गार्गीसारखें ज्ञान दिसत नाहीं, अनुसयेसारखें व्यावहा-रिक शहाणपण दिसत नाहीं आणि त्यामुळेंच हल्लीं ज्याची जरूर आहे, तसला परोपकार व ऋषि–पत्नीप्रमाणें आतिथिसत्कार पाहावयास मिळत नाहीं. हा सर्व परिणाम स्त्रियांतून सेवाधर्म कमी होण्याचा आहे. कारण, पुरुषांत जसा पुरुषार्थ जरूर आहे, आणि त्यामुळेंच त्यांना शेवटीं ईश्वरासान्निध जावयास मिळतें, तसा स्त्रियांत सेवाधर्म ही महान् शक्ति आहे, ह्या शक्तीच्या बळावरच त्या संसारांत स्वर्ग आणूं शकतात, आणि स्वतः मोक्षापर्यंत जाऊं शकतात. पण समान हक्कानें त्या शक्तीचा नाश होतो. म्हणून स्त्रियांचें स्त्रीत्व संभाळण्याकरितां आम्ही स्त्रियांजवळ सेवाधर्म मागतों. पुरुषांचें खरें सुख पुरुषार्थांत आहे, तसेंच स्त्रियांचें खरें सुख स्त्रीत्वांत आहे, म्हणून ह्या संसारांत सर्वांच्या सुखा-करितां स्त्रियांचें स्त्रीत्व कायम ठेवावें अशी ईश्वराजवळ आमची प्रार्थना आहे. प्रोफेसरसाहेब, स्त्रीपुरुषांच्या समान हकाच्या हल्लींच्या काळांत चाललेल्या गोष्टी कांहीं नवीन नाहींत. ही बाबत मनुष्याच्या उत्पत्ती-

बरोबरच उत्पन्न झालेली आहे. मनुष्यजातींत स्वाभाविकरीत्याच एक अशी वृत्ति असते कीं, जितकें होईल तितकें आपल्या सुखाकडे कोणत्याही गोष्टीस ओढावयाचें. त्यासाठीं आपल्यांत जितकें बळ असेल तितकें खर्च करावयाचें अशा प्रकारची स्वार्थी वृत्ति स्त्रियांत व पुरुषांत असते. त्या वृत्तीमुळें जेव्हां अज्ञानाचा समय असतो तेव्हां देशांत तमोगुणी स्वभावाचे लोक असतात, व ते स्त्रियांचे हक्क लुटून घेतात, आणि स्त्रियांचें चाललें तर त्या पुरुषांचे हक्क लुटून घेतात. दरएक देशांत आणि दरएक प्रजेंत असें होतें. मग जेव्हां समाज सुधारतो, लोक थोडासा खरा धर्म समजतात, आणि प्रजा रजोगुणी वृत्तीची होते, तेव्हां त्यांना स्त्रियांच्या समान हक्काची आठवण होते. यांचा हेतु चांगला असतो, पण त्याचे परिणाम चांगले होत नाहींत. मी पहातों कीं, तुम्ही समान हक्काच्या गोष्टी सांगतां, त्या स्त्रियांच्या सुखाकरितांच असतात, तरी त्याचा परिणाम कांहीं चांगला होत नाहीं. जेथें समान हक्क चालतात, तेथें मीं पाहिलें आहे कीं, पुष्कळ स्त्रिया स्वच्छंदी होतात, इतकेंच नाहीं तर, स्त्रियांवर त्यामुळें फार बोजा पडतो, त्यामुळें त्यांचा स्वाभाविक नाजूकपणा, अनुपम सौंदर्य, स्वाभाविक आकर्षण आणि खरें खरें स्त्रीत्व दबून जातें, म्हणजे समान हक्काच्या स्त्रिया, स्त्रिया म्हणून असूनही त्यांची खरी खरी मजा पुरुष भोगूं शकत नाहींत, आणि स्त्रियांचें हृदय जी आनंदाची खाण तो आनंद त्या स्त्रिया आपणही थोडा देखील भोगूं शकत नाहींत म्हणून आम्ही स्त्रियांना सेवाधर्मांत ठेवण्याची तजवीज करितों. स्त्रियांत सेवाधर्म केव्हां येतो हें तुम्हांस माहीत आहे ? प्रोफेसरसाहेब, जेव्हां आपण उत्तमांत उत्तम असे आचार–विचार ठेवितो, जेव्हां आपल्याला उत्तमांत उत्तम धर्म मिळतो आणि जेव्हां आपण आपल्या पलीकडे पाहातों, तेव्हांच आपल्या स्त्रियांत सेवाधर्म येतो, आणि तेव्हां मांजरांच्या पोराप्रमाणें निर्दोष स्त्रियांचा बोजा आपण आनंदानें उचलतों. आम्ही कांहीं वेळां

स्त्रियांना अतिथि समजतों, आणि "अतिथिदेवो भव" ह्या वाक्याप्रमाणें आम्ही चाललों व प्राचीन ऋषींच्या तोंडून ईश्वरानें केलेली आज्ञा, 'जेथें स्त्रिया सुखी असतात, तेथें देवता राहतात,' हें लक्षांत ठेविलें म्हणजेच स्त्रियांत सेवाधर्म येतो. अशा उत्तमतेखेरीज स्त्रियांत सेवाधर्म कोठून येणार, आणि तुमच्या सारख्याच्या नशिबांत तो कोठून असणार ? कारण मग 'ईझी-चेअर' वर पडून चिरूट ओढायचा, हॉटेलांत मेजवान्या झोडायच्या, आणि 'पार्टी'ला जाऊन सुधारणेच्या नांवाखालीं परक्या स्त्रियांशीं मोकळेपणानें गप्पा झोडायच्या, तेव्हां अशांना समान हक्क कां नाहीं आवडणार ? स्त्रियांनीं दुकानांत आणि कारखान्यांत कामें करावीं, स्त्रियांनींच नवऱ्याकरितां वशिले लावावे, स्त्रियांनीं अपल्या पोटाकरितां परक्या पुरुषांची हांजी हांजी करावी, स्त्रियांनीं क्षुल्लक गोष्टीकरितां वाटेल तेथें भटकावें, स्त्रियांनीं नवऱ्यांना धमकवावें आणि स्वतः इच्छेस येईल तेव्हां वाटेल तेथें भटकावें, त्यांत पुरुषांना समान हक्काच्या नांवावर कांहीं एक बोलतां येऊं नये असा तो समान हक्काचा फायदा तुमचा तुम्हांलाच लखलाभ असो ! पोकळ समानत्व आर्यधर्माला कधींही रुचणार नाहीं. आर्यत्व तर असें म्हणतें कीं, अतिथींचा समान हक्क नसतोच, त्यांचे हक्क तर निःसंशय जास्त असतात, आपण उपाशीं राहूनही अतिथीला जेवावयास घालावें लागतें, तसेंच स्त्रिया आपल्या अतिथि आहेत, कारण त्या अबला आहेत, आणि त्यांचें नुसतें नांवच 'अबला' आहे असें नव्हे तर त्यांचें शरीरही पुरुषांपेक्षां कमी बलवान् आहे. त्यांचें अंतःकरणही पुरुषांपेक्षां लहान आहे, त्यांचा मेंदूही पुरुषांपेक्षां लहान आहे. आपल्या त्रिकालदर्शी ऋषींनीं स्त्रियांना अर्धांगाची उपमा दिली आहे; पण तें सुद्धां डावें अंग मानलेलें आहे, आणि मनुष्याची डावी बाजू नेहमीं कमी बलवान् असते; ह्याला अपवाद असेल, पण बहुतकरून डावी बाजू अशक्तच असते, तसेंच स्त्रिया क्वचितच पुरुषांपेक्षां बलवान् असल्या तरी

ईश्वरी योजना समजणाऱ्या ऋषींनीं स्त्रियांना 'अबला' च म्हटलें आहे, आणि त्याकरितांच आम्ही त्यांना अतिथि म्हणजे देवी म्हणतों, आणि त्यांना आमच्यापेक्षां जास्त हक्क द्यावयाचे म्हणतों. पण मनुष्यस्वभावांत स्वाभाविक स्वार्थवृत्ति असते, ती आपल्याला ह्या भूतलींच्या देवींची फुकट पूजा करूं देणार नाहीं म्हणून लग्नयज्ञाच्यामार्फत त्यांना सेवाधर्म देऊन आपण त्यांचें आतिथित्व कबूल केलें पाहिजे, म्हणजे सेवाधर्म त्याजवर सोंपवून आपण त्यांचे विशेष हक्क जाणले पाहिजेत. समान हक्क ही तर कृपणता आहे, ते तर साधारण लोकांकरितां आहेत. रोज रोज वाढणाऱ्या गरजांना, खटपटींना आणि नवीन नवीन मौज-मजेला पुरुष पुरे न पडल्यामुळें पुरुषार्थ करण्यांत निर्बल अशा स्त्रियांना आपल्याबरोबर खेंचण्याकरितां वरवर दाखविणाऱ्या ह्या समान हक्काच्या नांवानें त्यांनीं स्त्रियांना फसवावयाचें जाळें घातलें आहे. ह्यांत तुमच्यासारख्या सुशिक्षित माणसांनीं पडूं नये. तुह्मीं तर आर्यांचा उदार सेवाधर्मच स्वीकारला पाहिजे.

"प्रोफेसरसाहेब, जगताच्या कल्याणाकरितां आणि आपल्या उन्नतीकरितां दयाळू प्रभूनं आपल्याला पवित्र वेदशास्त्रामार्फत तीन रस्ते दाखविले आहेत:-( १ ) कर्म, ( २ ) उपासना, ( ३ ) ज्ञान. ज्ञानमार्ग हा फार कठीण आहे. मोठे मोठे पंडित, अतिशय मेहनत करणारे योगी, आणि तीव्र वैराग्यवान् संन्यासी सुद्धां ह्या रस्त्यानें जातांना चुकतात, मग चंचल स्वभावाच्या बारीक सारीक वस्तूंवर मन ठेवणाऱ्या सोप्या सोप्या गोष्टींही लवकर न समजणाऱ्या, आणि स्वाभाविकरीत्याच फार काठिण श्रम न करूं शकणाऱ्या स्त्रिया ह्या मार्गांत कशा टिकूं शकतील ? यांच्याकरितां तो रहदारीचा रस्ता नाहीं. त्यांच्याकरितां दोन रस्ते आहेत. कर्म व उपसना, हे ते दोन रस्ते होत. कर्म म्हणजे समान हक्क आणि उपासना म्हणजे सेवाधर्म. आतां तुम्ही विचार

करा कीं, ह्या दोहोंपैकीं स्त्रियांना कोणता मार्ग जास्त सोईचा आहे ? ज्या रस्त्यानें सहज जातां येईल, जो स्वाभाविक असेल आणि जो सुरक्षित असेल, तसेंच जो रस्ता स्त्री आणि पुरुष ह्या दोघांना हितकर असेल, तोच रस्ता धरा. आम्हांला कांहीं ह्या बाबतींविषयीं खास ममत्व नाहीं; तरी पण आमची अशी इच्छा आहे कीं जेणेंकरून आर्यत्व अस्सल रूपांत राहील, तें चांगलें."

---

## सेवाधर्म आणि समान हक्क यांची बरोबरी

करण्याकरितां कर्मकांड आणि भक्तिकांड ह्यांत काय भेद आहे हा तुम्हांला समजून घेतला पाहिजे. कर्म करण्याकरितां तर चांगले मुहूर्त पाहिजेत, चांगलीं शरीरें पाहिजेत, चांगला देशकाल पाहिजे, लायक पात्र पाहिजे, जवळ समृद्धि पाहिजे, आणि कर्माचें फळ देणाऱ्या देवताही पाहिजेत. जोंपर्यंत ही सर्व सामुग्री नाहीं तोंपर्यंत चांगल्या रीतीनें कर्म होऊं शकत नाहीं; तसेंच तुमच्या समान हक्कांतही समजावयाचें; पण भक्तिमार्गांत असें नाहीं. भक्ति जेव्हां कराल तेव्हां सहज होऊं शकते; कारण कीं, भक्तीचा संबंध कांहीं बाहेरच्या वस्तुशीं नाहीं, तो अंतःकरणाशींच आहे. तसाच सेवाधर्माचा संबंध किंवा सेवाधर्माचा आनंद कांहीं बाहेरील वस्तूवर नाहीं. सेवाधर्म हा अंतःकरणांतील प्रेम आहे, आणि समान हक्काचा आनंद कर्मकांडाप्रमाणें बाहेरील वस्तूवर आहे, म्हणून जसे सर्व लोकांकडून नेहमीं यज्ञ होणार नाहींत, तसें सर्व स्त्री-पुरुषांकडून नेहमीं समान हक्काचें पालन होणें शक्य नाहीं, पण जसें आपल्याला फावेल तेव्हां थोडें थोडें ईश्वरस्मरण करतां येतें, तसा

सेवाधर्म हा स्त्रीपुरुषांना थोडा थोडा पाळतां येतो, कारण तो अंतःकरणाचा धर्म आहे. प्रोफेसरसाहेब, कर्मकांडांची कल्पना जर तुम्हांला नसेल तर हल्लींच्या विधवा स्त्रियांचा सेवाधर्म पहा. त्याच्याबरोबर तुमच्या समानहक्काची बरोबरी करतां येईल. त्यांना जसा येथें विटाळ होईल, हें चालणार नाहीं, त्याला विटाळ झाला, ह्याचा शिंतोडा उडाला वगैरे तऱ्हेचे घटकोघटकीं ग्रहण लागतें, तसें समान हक्कांत स्त्रीपुरुषांना बोलण्याबोलण्यांत ग्रहण लागतें, बोलण्याबोलण्यांत ‘ पोझशन ’ चा प्रश्न निघतो, सहज गोष्टींत राग येतो, सहज गोष्टींत कायद्याची मदत घ्यावयाला कोर्टांत जावें लागतें, आणि सहजासहजीं काडी मोडून देण्यापर्यंत मजल येते; इतकेंच नव्हे, तर समान हक्काच्या योग्यतेला चढण्याकरितां त्यांना स्वाभाविकतेचा बळी देऊन इतके कष्ट करावे लागतात आणि पुरुषांना ताब्यांत घेण्याकरितां इतकी मेहनत करावी लागते कीं तें सगळें तुह्मी बरोबर समजलांत तर जशी तुम्हांला वरचेवर डोक्यावरून अंग धुणाऱ्या म्हाताऱ्यांची दया येते तशी तुमच्या समानहक्कवाल्या स्त्रियांची दया आल्याशिवाय राहणार नाहीं.

“जसें बांधलेल्या रूढीमध्यें बाहेरची पवित्रता पुष्कळ असते, पण स्वाभाविकता थोडी असते, तसें समान हक्कांतसुद्धां स्त्रियांमध्यें बाहेरचें ज्ञान पुष्कळ असतें, पण आंत सर्व पोकळ; कारण बाहेरील ज्ञानाकरितां स्वाभाविकतेचा बळी दिलेला असतो. आतां तुह्मीं सांगा कीं, तुम्हांला काय आवडतें ? जेव्हां फावेल तेव्हां व येईल तशी भक्ति–भावानें केलेली प्रार्थना कीं पाण्याच्या शिंतोड्याबरोबर धुतला जाणारा रूढिमार्ग ? साधी भक्ति आवडते कीं खर्चाचें अवडंबर घालणारें कर्म कांड आवडतें ? हल्लीं आपल्या पडत्या स्थितींत–आपल्या शारीरिक, मानसिक आणि देशाच्या दरिद्र स्थितींत आपल्याला कोणतें सोईचें ? मोठे मोठे यज्ञ कां ‘ पत्रं पुष्पं फलं तोयं ’ यांनीं केलेली भक्ति ?

तुम्ही सांगा कीं, आपल्या स्त्रिया काय करूं शकतील ? यज्ञ का भक्ति? आणि त्यांचें जास्त कल्याण कशांत आहे? ह्याचा विचार करा."

प्रोफेसर म्हणाले, " महाराज, तुम्हीं तर कमाल केली. मी आपला मूढच्च झालों. हे सर्व मुद्दे आपण कोठून शोधून काढतां ? मला कबूल केलें पाहिजे कीं, चंद्र सूर्यांची बरोबरी मांजरीच्या आणि वांनरांच्या पोरांची जोडी, आणि कर्मकांड व भक्तिकांड ह्यांचा बरोबर खुलासा माझ्या हातानें होणार नाहीं, इतकेंच नव्हे तर मला कबूल केलें पाहिजे कीं, मी आतांपर्यंत अर्धा हरलों आहें, तरी पण मी इतकें तर अजूनही सांगतों कीं, अज्ञानांत पडलेल्या आपल्या देशांतील स्त्रियांना सुधारण्याकरितां, जरा जास्त सढळ हातानें शिक्षण दिलें पाहिजे, आणि समान हक्काच्या शिक्षणाखेरीज स्त्रियांमध्यें यावें तसें तेज येणार नाहीं, कारण कीं, देशाचार, कुलाचार आणि लोकोपचाराच्या इतक्या खुळ्या चाली आमच्यांत पडल्या आहेत कीं, त्यांतून समान हक्काच्या शिक्षणाखेरीज सुटतां येणार नाहीं. समान हक्कांनीं स्त्रियांना पुरुषांबरोबर आणि पुरुषांना स्त्रियांबरोबर चढाओढ करावी लागेल आणि त्यामुळें त्यांच्यांत आपल्या आपण जागृति उत्पन्न होईल, आणि असें होण्याकरितां आम्ही समान हक्काच्या शिक्षणाची जरूरी आहे, असें म्हणतों.

"महाराज, दुसरें आपण असें लक्षांत घ्या कीं, हें कांहीं ऋषींच्या वेळचें सत्ययुग नाहीं तर हें इंग्रजी अंमलांतील कलियुग आहे. माझ्या मित्रांनीं ज्या केंसांचा खेळ, आरशांचा खेळ व पाण्याचा खेळ वगैरे गोष्टी सांगितल्या त्या रसिक व स्वाभाविक आहेत; इतकेंच नव्हे तर तशा प्रकारचीं चित्रें दिसावीं अशी आपण इच्छा ठेवितों, असें असूनही मला सांगितलें पाहिजे कीं, हल्लींच्या काळांत आपल्या स्त्रियांकडून जर आपल्याला मदत मिळणार नाहीं, तर आपण ह्या जगांतील व्यवहारांत पुढें येऊं शकणार नाहीं. मी कबूल करितों कीं, स्त्रियांना बाहेरची

म्हणजे पुरुषांच्यासारखीं कामें दिल्यानें त्यांच्या स्वाभाविक नाजूकपणाला आणि आनंदी स्वभावला त्रास दिल्यासारखें होईल ह्यांत संशय नाहीं. पण त्यांची नाजुकता संभाळण्याकरितां ह्या सुधारलेल्या काळांत आपण कोठपर्यंत दरिद्रता भोगणार ? आणि या स्वतंत्रतेच्या काळांत ह्या बाबतींत आपण कोठपर्यंत आपल्या मनाला ताब्यांत ठेवणार ? तें मी अजून समजूं शकत नाहीं. जरी मी आपल्या ह्या वादांत हरलों आहे, तरी पण अजून मला असें वाटतें कीं, आपल्या देशांत आणि आपल्या प्रजेंत नवा जोम आणण्याकारितां स्त्रीपुरुषांना समान हक्काच्या तत्त्वाचें शिक्षण देण्याची जरूरी आहे. त्याखेरीज—स्त्रिया सुधारल्याखेरजि—म्हणजे त्यांच्याकडून कामकाजाची मदत मिळाल्याशिवाय, एका चाकानें गाडी चालावयाची नाहीं. म्हणजे स्त्रियांच्या मदतीशिवाय एकट्या पुरुषांनीं कांहीं देशाची उन्नति होणार नाहीं."

---

## स्त्रीपुरुषांच्या समान हक्कानें होणारें नुकसान.

महाराज म्हणाले, " एका चाकानें गाडी चालणार नाहीं. हें खरें आहे. त्याकरितांच परमेश्वरानें स्त्रियांमध्यें सेवाधर्म ठेविलेला आहे आणि त्यासाठींच प्रपंचांतील लहान लहान कर्तव्यें केल्यानें त्यांचा उद्धार होऊं शकतो, असें शास्त्रांनीं म्हटलें आहे. कारण व्यावहारिक कामकाजांत स्त्रियांची मदत मिळाल्याशिवाय पुरुषांची उन्नति होणार नाहीं, व जगताचें कल्याण साधणार नाहीं, असें ऋषींना वाटत असे व म्हणूनच त्यांनीं स्त्रियांच्या हातून होण्यासारखा सोपा सेवाधर्म त्यांजवर सोंपविला आहे; आणि त्या सेवाधर्माचीं त्यांनीं चार लक्षणें

मानिलीं आहेत. त्या चार लक्षणांसंबंधीं ते असें म्हणतात कीं, अंतःकरणांत प्रेम, डोळ्यांत मर्यादा, जिभेंत गोडी आणि हातांत काम यांखेरीज स्त्री काय उपयोगाची ? प्रोफेसरसाहेब, तुमच्या समान हक्कांत हातांत काम आणि तोंडांत गोडी असते, पण अतःकरणांत प्रेम व डोळ्यांत मर्यादा नसते. त्यामुळें तुमच्या समान हक्काचा धर्म अपूर्ण आहे. समान हक्कांत स्त्रियांना पुरुषांची खुशामत करावी लागते, त्यामुळें गोड शब्द नेहमीं हजर ठेवावे लागतात. तसेंच कामकाजावरच त्यांच्या जीविताचा आधार असल्यामुळें तें सदैव हातांतच लागतें. पण त्यांच्यामधील डोळयांतील मार्दव आणि अंतःकरः-णाचें प्रेम उडून गेलेलेंच असतें, त्याची वाट काय ? डोळयांतील मार्दव गेल्यानें त्यांच्यांत विनय कसा राहील ? आणि अंतःकर गेल प्रेम गेल्यानें त्यांच्यांत पवित्रता कशी राहूं शकेल ? आतां तुम्ही विचार करा कीं, स्नेह, प्रेम ह्यांशिवाय बायको काय कामाची ? अशा स्त्रियां-पासून पुरुष कशाप्रकारें आनंद मिळवूं शकतील ? अशा स्त्रियांकडून पुरुषांच्या मनाचें आकर्षण कसें घडणार ? आणि स्त्रियांच्या आकर्षणा. खेरीज पुरुष पुरुषार्थ कसे करूं शकतील ? हें आम्हांला समजत नाहीं. स्त्रियांच्या वरकरणी भाषणांनीं भुलण्याकरितां सर्वच पुरुष मूर्ख असतील असें आम्हांला वाटत नाहीं. जर तसें असतें तर स्त्रियांच्या चेहऱ्यांत मोहकता व ठराविक गोड शब्द असून युरोप व अमेरिकेंत दिन प्रतिदिन ब्रह्मचारी पुरुषांची संख्या कां वाढते ? दुसरें असें लक्ष्यांत ठेवा कीं, स्त्रियांनीं पुरुषांच्या सारखीं कामकाजें केलीं म्हणजे कांहीं पुरुष स्त्रियांकडे ओढ घेत नाहींत, कारण स्त्रिया जें जास्तींत जास्त आणि चांगल्यांत चांगलें काम करितात, त्यापेक्षांही पुरुष जास्त व चांगलें काम करूं शकतील, म्हणजे पुरुषांसारखीं कामें केल्यानें कांहीं स्त्रिया पुरुषांना वश करितील असें नाहीं. त्याकरितां अंतःकरणांतील प्रेम व डोळयांतील मर्यादा—विनय—पाहिजे. पण खेदाची गोष्ट अशी

आहे कीं, हीं दोन तत्त्वें, जीं स्त्रियांचें स्त्रीत्व आहे, तीं तुमच्या समान हक्कांत नाहींत, तेव्हां तुमचा संसार कसा सुखी होणार ? आणि तुम्हांला खरी विश्रांति कशी मिळणार, तें मी समजत नाहीं. इतकें खरें कीं, तशा समान हक्कानें तुम्ही स्त्रियांबरोबर उघड रीतिनें व्हिक्टोरियांत बसूं कशाल, तुमच्या स्त्रिया आपल्या मित्राबरोबर फिरावयास जाऊं शकतील, वाटेल तेथें नाटकी पोषाख करूं शकतील—कौटुंबिक मंडळीसंबंधीं थोडें बेपर्वाईनें राहतां येईल, आयांच्या हातांत मुलें देऊन कुत्र्याबरोबर खेळण्यांत मोकळ्या होतील, वगैरे वगैरे पुष्कळ गोष्टी होतील, आणि हें सर्व तुम्ही समान हक्काचे नांवानें करूं शकाल. त्यांत जर तुमचें सर्व सुख येणार असेल, आणि ती जर उत्तम नीति वाटत असेल, ह्यांतच ईश्वराला संतोष आहे, आयुष्याचें कर्तव्य आहे अशी समजूत असेल, तर मग कांहींच म्हणणें नाहीं. पण मला वाटतें कीं,प्राचीन ऋषींनीं ज्याला खरें सुख म्हटलें आहे, त्याची तुम्हांला खरी खरी कल्पनाच नसेल म्हणून मला अजून हा वाद थोडा . लांबवावा लागेल.

---

## हक्कानें जास्त मिळवितां येईल का प्रेमानें ?

“ प्रोफेसरसाहेब, मला सांगा कीं हक्कानें जास्त मिळवितां येईल कीं प्रेमानें ? समजा तुम्हांला दोन मित्र आहेत; एक मित्र त्या च्या हक्क कांहीं मागेल, व दुसरा नुसता तुमच्या भेटीवर खुष राहून तुम्हांल स्नेहानें वरचेवर भेटत जाईल. तुमच्यापासून जास्त कोण मिळवील ? हा नें मागणारा का स्नेहानें गप्प बसणारा ? त्या दोहोंपैकीं तुम्हाला कोणता

आवडेल ? हक्काचा दावा आणणारा कीं स्नेहाच्या आधीन राहणारा ? दुसरें उदाहरण घ्या. तुम्हांला दोन मुलगे आहेत, त्यांतील एक तुमच्याबरोबर मुलाच्या नात्याचा हक्क दाखवितो, आणि दुसरा आपल्या हक्काबिक्काचा प्रश्न मनांत सुद्धां न आणितां स्वाभाविक प्रेमानें मुलगा ह्या नात्यानें तुमची चाकरी करितो, तर सांगा बरें ह्या दोघांपैकीं स्वाभाविकरीत्या तुम्ही कोणावर माया कराल ? तिसरें उदाहरण, तुम्हांला दोन बायका आहेत; एक तुमच्या मिळकतीवर माझा हक्क आहे म्हणून दागिने मागेल, आणि दुसरी तुमचें प्रेम हेंच सर्वस्व आहे असें समजेल, तर त्या दोहोंपैकीं तुम्हांला जास्त प्रिय कोणती होईल ? हक्क सांगणारी स्त्री कीं प्रेम करणारी ? हक्क सांगणारी बायको सुरेख आहे, गोडबोली आहे, लाघवी आहे, चांगल्याची मुलगी आहे, आणि दुसरी सांवळ्या रंगाची, विशेष बोरणी नाहीं, दूरवर नजर नाहीं अशी, जिचें स्नेहीमंडळ विशेष नाहीं अशी, गरीब आईबापाची मुलगी, जगाकडे विशेष लक्ष न देतां तुमचें प्रेम हेंच सर्वस्व समजून तुमची सेवाचाकरी करणारी आहे, तर ह्या दोहोंत तुम्हांला [illegible] कोणती आवडेल ? हक्कवाली कीं प्रेम इच्छिणारी?"

महाराजांचें हें बोलणें पेकून प्रोफेसरसाहेब तर गप्पच बसले, कारण स्नेह आणि हक्क ह्या दोहोंमधील भेद आतां त्यांना नीटसा समजला. ते गप्प बसलेले पाहून महाराज म्हणाले, " प्रोफेसरसाहेब, मनुष्यस्वभावाचीं रहस्यें जर तुम्हांला बरोबर समजतील, तर तुम्ही स्नेह आणि हक्क ह्यांतील रहस्यें समजूं शकाल, आणि भेद समजल्यानंतर मग तुम्हांला वाटेल कीं, हक्क हा शब्दच जात्या कठोर आहे, तेव्हां नाजूक अबलांच्या हंसत मुखांत हा शब्द कधींही शोभणार नाहीं, आणि पुरुषांचा पुरुषार्थ 'हक्क' शब्दाची कठोरता सहन करूं शकणार नाहीं. कारण पुरुषार्थ जात्याच वज्रासारखा कठोर आहे, ह्याच्याबरोबर हक्काच्या कठोरतेला पहातांक्षणींच मोठा आवाज होईल आणि अग्नीच्या ठिणग्याच पडतील पुरुषार्थाच्या खटकापुढें बिचाऱ्या हक्करूपी दगडाचें काय चाल

णार ! त्या दोन्ही दगडांना एकमेकांवर आपटूं देण्यांत कोणता फायदा ? शहाणपण ह्याला म्हणावयाचें कीं, पुरुषार्थाच्या खडकाला प्रेमाच्या समुद्रांत हळूच सोडून द्यावें, आणि त्यांतून लहान मोठीं वर्तुळें होतात, तीं कांठावर उभें राहून आनंदानें पहावीं. प्रोफेसरसाहेब, लक्षांत ठेवा कीं, पुरुषार्थाचा खडक स्नेहाच्या समुद्रांत सहज बुडत जातो, हक्काच्या हातोडीनें फोडल्यास त्याच्यावर त्याचा कांहीं परिणाम होत नाहीं, म्हणूनच आपल्या पवित्र शास्त्रांत ऋषींनीं म्हटलें आहे कीं, लग्न म्हणजे यज्ञ आहे; कारण कीं, लग्नस्नेहानेंच नवराबायको एकमेकांला वश होतात. हक्कानें वश होऊं शकणार नाहींत, याकरितां त्यांनीं प्रेमाला प्राधान्य दिलें आहे आणि प्रेमांतूनच स्वाभाविकरीत्या सेवा प्रकट होते, म्हणूनच आर्यांनीं स्त्रियांमध्यें सेवाधर्म ठेविलेला आहे. समान हक्क कसा खालच्या प्रतीचा आहे हें तुम्ही समजलां कीं नाहीं ? जर समजलां नसाल तर अजूनही ऐका.

---

## हक्क मागायला जाणें याचा अर्थ काय ?

"ह्याचा अर्थ इतकाच कीं, ज्याच्याजवळ मागावयास जावयाचें त्याची पुरती नालायकी आणि मागणाराच्या अंगांतील कमकुवतपणा, ह्या दोन बाबींशिवाय ह्याचा अर्थ काय ?"

हें ऐकून प्रोफेसर एकदम चपापून म्हणाले, "आं ! आणखी हें काय ? हक्क मागायला जाणें म्हणजे ज्याच्याजवळ मागावयास जावयाचें त्याची नालायकी सिद्ध करणेंच होय, आणि आपलाही कमीपणा दाखविणेंच होय. असेंचना ?"

महाराज म्हणाले, "हो तसेंच ! जर नामदार सरकार जरा जास्त निःपक्षपती व उदार राजनीति सुरू करतील, आणि आपल्याला लवकर आपखुषीनें हक्क देतील, तर आपल्याला ते कशाला मागावयास जावयास लागेल ? पूर्वी जेव्हां धर्माच्या बळामुळें राजे लोकांचा लोभ अंकुशांत राहात असे, तेव्हां प्रजेस हक्क मागावे लागत होते का ? नाहींच, आणि हल्लीं आपल्याला कां मागावें लागतें? इतक्याचकरितां कीं आपल्या स्पार्थासाठीं अज्ञानामुळें आणि धार्मिक बळ नसल्यानें अंमलदार लोक कोत्या मनानें गाडी हांकतात, आणि त्यामुळें मागावें लागतें. आपल्या कॉंग्रेस आणि कॉन्फरन्स प्रजेच्या हक्काकरितां ओरडतात. त्याचा अर्थ अंमलदाराच्या चुका आणि निःपक्षपात व उदार राजनीतीची उणीव हाच होय, दुसरें काय ? आणि आपल्याला मागावें लागतें ह्याचा अर्थ आपला कमीपणा हें तुम्ही कां नाहीं समजत ? जर आपल्याला आपलीं कर्तव्यें योग्य रीतीनें बजावितां येतीं, आणि जे हक्क आपण मागतों ते मिळविण्याची आपल्यांत योग्यता असती, तर लवकर वा उशिरां ते आपल्याला कां नाहीं मिळणार ? प्रोफेसरसाहेब, लक्षांत ठेवा कीं, स्वाभाविकरीत्याच असा एक नियम आहे कीं, हक्कदाराला त्याचा हक्क मिळालाच पाहिजे; आणि त्याप्रमाणें शेंकडा सत्याण्णव टक्के मिळतोच; पण आपल्याला जें वाटतें कीं, आम्हांला आमचे हक्क अजून मिळत नाहीं—ती आपली घाई होय, तो आपला कमीपणा आहे, तीं आपलीं कर्तव्यें बजाविण्यासंबंधींची चूक आहे. जर आपल्यांत योग्यता असेल आणि त्या योग्यतेला योग्य दिशेनें नेतां येईल, तर काय बिशाद आहे कीं, आपल्याला आपले हक्क मिळणार नाहींत ! अवश्य मिळालेच पाहिजेत. पण त्याकरितां फार धीर आणि मोठा पुरुषार्थ लागतो."

## स्वाभाविकरीत्याच हक्कदाराचे हक्क चुकवावे लागतात.

"प्रोफेसरसाहेब, आतां तुम्ही हक्काची दुसरी बाजू पहा. कोणी निस्पृही ज्ञानी साधु आलेला असतो, तेव्हां त्याच्या दर्शनाला तुम्ही कां जातां ? आणि महाराज, माझ्यायोग्य असें कांहीं कामकाज सांगा असें कशाकरितां म्हणतां ? ते कोठें तुमच्या येथें मागायला येतात ? पण असें असूनही तुम्ही त्याचा स्वाभाविक हक्क देण्याकरितां त्याच्याकडे जातांना ? कोणी मोठा राजा अगर युवराज तुमच्या गांवांत येतो, तेव्हां तुम्ही त्यांना मानपत्रें कां देतां ? आणि चांगल्या चांगल्या भेटी कशा कशाकरितां देतां ? तो कोठें तुमच्याजवळ भेटी मागावयास येतो ? पण तुम्ही त्याचा जन्मसिद्ध हक्क चुकवून देतांना ? तुमचे मित्र तुमच्या जवळ कांहीं एक मागत नाहींत, तरी तुम्ही प्रसंगविशेषीं त्यांना कांहीं कांहीं देतांच. तुमचा प्रिन्सिपाल विलायतेस जावयास निघाला म्हणजे तुम्ही त्याला हारतुरे घालतांच, हे सर्व तुम्हांला असें असें करा म्हणून सांगतात का ?

"प्रोफेसरसाहेब, ते सगळे कांहीं तुम्हांला सांगत नाहींत, तरी तुम्हा त्यांचे हक्क आपल्या आपण चुकवितां. कारण कीं त्या हक्काला ते योग्य आहेत आणि जे योग्य आहेत त्यांना त्यांचा हक्क दिल्यानें आपल्यालाही अंतःकरणापासून आनंद होतो. आपल्या ह्या मानासिक अगर आध्यात्मिक आनंदाकरितां त्यांचे हक्क देण्याची आपल्याला स्वाभाविक प्रवृत्ति होते. अशी प्रवृत्ति ईश्वरानें मनुष्यस्वभावांतच ठेविलेली आहे. ह्या ईश्वरी सार्वजनिक प्रवृत्तींतून आपल्या स्त्रिया हक्क मिळविल्याशिवाय कशा राहतील, तें मला समजत नाहीं. ज्यांचा तुमचा कांहीं संबंध नाहीं, त्यांना तुम्ही, त्यांचे हक्क आपल्या आपण देतां, आणि तुमच्या बायकांना देत नाहीं,

ह्याचें कारण काय? कशाकरितां तुम्ही तुमच्या बायकांशीं इतक्या कठोरतेनें वागाल, तें मला कळत नाहीं; आणि जर तुम्ही इतकी कठोरता ठेवणार नाहीं, तर मग त्यांना हक्क मागायचें कारण काय? काय? तुमच्या अंतःकरणांत इतका मनुष्यपणा नाहीं कीं, तुम्ही आपल्या हक्कदारांचे हक्क देणार नाहीं? आणि ते दिल्यानें जो मानसिक आनंद होतो तो भोगणार नाहीं? सगळ्यांचे हक्क चुकविणार, आणि आपल्याच स्त्रियांचे चुकविणार नाहीं, ह्याचें कारण काय? तुमच्या स्त्रियांनीं असा काय अपराध केला आहे कीं, त्यांनाच तुम्ही न्याय देणार नाहीं! आणि जर तसें नाहीं, तर मग तुमच्यापाशीं हक्क मागण्याचें कारण काय? इतकेंच नाहीं तर तुमच्या स्त्रियांनीं तुमच्याजवळ मागावयास येण्यांत तुमचाच कमीपणा आहे, आणि मागणारांतही आपलीं कर्तव्यें बजावावयाची उणीव आहे, असें होतें."

---

## प्रेमांत हक्क असतो काय?

"प्रोफेसरसाहेब, आपण सत्याकरितां पुष्कळ मोकळेपणानें बोलतों, तेव्हां आतां मला उघडच सांगूं द्या कीं, तुम्ही तुमच्या कॉलेजांत अधिकार चालविण्यांत मोठे हुशार असाल, आणि तुमच्या शिष्यांत तुम्ही शहाणे ठरले असाल, तरीपण प्रेमाचीं रहस्यें समजण्यांत तुम्ही अजून कच्चे आहां. प्रेमांत हक्क असतो का? आणि जेथें हक्काचा प्रश्न आहे, तेथें प्रेम असेल का? माझ्या मित्रा! प्रेमांत आपल्याला आपलेपणा विसरून जावा लागतो, प्रेमांत तर एकमेकांच्या आनंदाच्या समाधींतच रहावयाचें असतें. प्रेमांत तर एकमेकांकरितांच आपलं जीवित अर्पण करावयाचें असतें. प्रेमांत अद्वैत असतें; आणि प्रेमांत 'तत्त्वमसि'चाच

साक्षात्कार असतो; म्हणजे मी तोच तूं, आणि तूं तोच मी, असें अद्वैतपण असतें. त्यांत माझा हक्क आणि तुझा हक्क हा प्रश्न कोठें आला ? हक्काच्या गोष्टी प्रेमापासून किती दूर आहेत ह्याचा तुम्ही विचार कराल तर तुम्हांला असें वाटेल कीं, प्रेमी माणसाजवळ हक्काच्या गोष्टी करणें म्हणजे त्याला शिव्या देणें अगर श्राप देण्याप्रमाणें आहे. कारण कीं, अद्वैत आणि द्वैत ह्यांमध्यें जितका भेद आहे, सूर्य आणि चंद्र ह्यांमध्यें जितका भेद आहे, पृथ्वी व आकाश ह्यांत जितका भेद आहे, तितका भेद हक्क आणि प्रेम ह्यांत आहे. म्हणूनच प्रेम-धर्मांत आयुष्य घालविणाऱ्या ऋषींनीं लग्नस्नेहाला यज्ञ म्हटलें आहे; आणि लग्नस्नेहावरच सगळ्या आयुष्याच्या सुखदुःखाचा आधार ठेविलेला आहे. आतां सांगा कीं, इतक्या उत्तमतेपुढें तुमचे समान हक्क किती टिकाव धरूं शकतील ? कोठें उभे रहातील ? लक्षांत ठेवा कीं, आर्यत्वाच्या प्रेममंदिरांत कोन्याकोंपऱ्यांलाही किंवा पायरीवर सुद्धां हक्काला उभें राहण्यास जागा नाहीं. तुम्ही त्याला तुमच्या मर्जीप्रमाणें पाहिजे त्या योग्यतेवर चढवा, पण प्रेमींच्या अंतःकरणांत तर त्याला जागा नाहींच. कारण आर्यांचें जीवन ईश्वरी प्रेमाकरितां आहे. ईश्वरी प्रेमांतूनच-ईश्वरी प्रेमाकरितांच-लग्नस्नेहरूपी यज्ञ निर्माण झाला आहे. म्हणजे लग्नस्नेह हा त्या संसारसागरांतील दुसऱ्या सर्व स्नेहांचें केंद्र आहे. अशा श्रेष्ठ प्रेमांत, अशा प्रकृतीच्या मुळांत, उत्पन्न झालेल्या स्वाभाविक प्रेमांत समान हक्काचें लांकूड घालण्याची तजवीज करणें हीसुद्धां या विसाव्या शतकांतील तुमच्यासारख्या प्रोफेसरसाहेबांची लीलाच होय.

"प्रोफेसरसाहेब,मी त्या दैवी प्रेमाच्या आणि त्यांतून स्वाभाविकरीत्या उत्पन्न होणाऱ्या सेवाधर्माच्या ज्या गोष्टी सांगतों तसलें प्रेम आणि तशी सेवा हल्लींच्या काळांत नाहीं हें मी समजतों, इतकेंच नव्हे, हेंही मी समजून आहें कीं, माझ्या ह्या विचाराचा हल्लींच्या काळांत कोठेंच

अम्मल होणें नाहीं. कारण हल्लीं आपल्या शिक्षणाचें सर्व धोरण युरोपियन लोकांच्या नकलेवर आहे, तेव्हां त्यांत समान हक्क आणि स्वतंत्रता असल्याशिवाय रहाणें नाहीं, तरी पण अशा हेतूंनीं ह्या गोष्टी मी सांगतों कीं, तुमच्यासारख्या संस्कारी माणसाच्या मनांत ह्याचें बीं पडलें असलें म्हणजे केव्हां तरी वेळ येईल तेव्हां त्याचा चांगला परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाहीं. स्त्रियांना उच्च दर्ज्याचें शिक्षण देऊं नये, किंवा स्त्रियांकडून कामें करवूं नयेत, आणि नाजूकपणाच्या नांवावर त्यांना शोभेच्या बाहुल्या बनवाव्या, असा कांहीं आमचा हेतु नाहीं. तसेंच त्यांना पडद्यांत ठेवाव्या, गुलामगिरीच्या स्थितींत ठेवाव्या, असे आकुंचित विचारही आम्हां ईश्वरकृपेनें बाळगीत नाहीं, पण आमची इच्छा इतकीच आहे कीं,

## स्त्रिया आपल्या खऱ्या खऱ्या स्त्रीत्वांतच रहाव्या.

"जसें बायकी पुरुष शोभत नाहींत आणि बायक्या पुरुषांनीं जगाचें कल्याण होणार नाहीं, तसेंच आपण स्त्रियांना दाढीशिवायचे पुरुष केल्यानें त्याही शोभणार नाहींत, आणि त्या अंतःकरणाचा संतोष मिळवूं शकणार नाहींत. असें होऊं नये म्हणून स्त्रिया आपल्या स्वभावांत आपल्या कामकाजांत आणि आपल्या आचारविचारांत, स्त्रियाच रहातील अशा प्रकारचें शिक्षण त्यांना देण्याला आमची कांहीं हरकत नाहीं. पण आमचें मागणें इतकेंच आहे कीं, ईश्वरानें त्यांना जे गुण दिले आहेत, तेच गुण जास्त खुलतील अशा प्रकारचें शिक्षण त्यांना द्या; आणि ईश्वरानें त्यांच्या शरीराची रचना जशी केली आहे तशाच प्रकारचें कामकाज त्यांना दिलें पाहिजे. सारांश, अंतःकरणाचे गुण स्त्रियांना भूषणास्पद आहेत, आणि स्त्रियांचें स्त्रीत्व आहे, त्यांचें त्यांच्यांत प्राधान्य पाहिजे. जर तुम्ही

तसें करणार नाहीं आणि त्यांना पुरुषांसारख्या कराल तर त्याचा परिणाम चांगला होणार नाहीं, आणि तसें करण्यानें 'इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः' होईल, आणि त्या आपला स्वाभाविकपणा घालवून बसतील, आणि जिचा स्वाभाविकपणा जातो, ती वस्तु काय कामाची ?

"जसें अग्नीमधून अग्नित्व गेल्यानें मग त्याच्यांत अग्निपणा कसला ? फळांतून गोडी गेल्यावर मग तें फळ काय कामाचें ? जें घड्याळ वेळ दाखवूं शकत नाहीं तें घड्याळ कसलें ? ज्या औषधींत स्वाभाविक गुण नाहीं ती औषधी काय कामाची ? कारण वस्तूंना जी किंमत आहे, ती त्यांच्यांत असणाऱ्या गुणांमुळें आहे, आणि गुणस्वभावाच्या आधारावर आहे; तसेंच स्त्रियांची किंमत त्यांच्या गुणावर आहे; आणि प्रेम, आधीनता व सौंदर्य हेच त्यांचे गुण आहेत; आणि ते सेवा करण्याच्या स्वभावांतून निघाले आहेत. आनंद मिळविण्याच्या इच्छेंतून सेवा पैदा झाली आहे. म्हणजे स्त्रियांच्या प्रकृतीचें मूळतत्त्व आनंद आहे. अशी स्त्रियांची रचना असतांना त्यांना पुरुषांचे हक्क देऊन पुरुष बनवून त्यांच्याकडून स्त्रीधर्म काढून घेऊन त्यांना प्रेमाशिवायच्या, आधीनतेशिवायच्या, सौंदर्याशिवायच्या करावयाच्या, इतकेंच नाहीं पण त्यांना आनंदविरहित करावयाच्या, हें किती पाप आहे ? ह्याचा जरा विचार तर करा."

प्रोफेसर म्हणाले, "महाराज, जें काम करण्याची आमची इच्छा नाहीं, तें करावयाचा आरोप तुम्ही आम्हावर कां ठेवितां ? आमची स्त्रियांना स्त्रियाच ठेवण्याची इच्छा आहे. आम्ही कांहीं त्यांना पुरुष करावयाचें ह्मणत नाहीं, पुरुषांप्रमाणें त्यांना हक्क द्यावे असेंच म्हणतों. त्यांचें सौंदर्य, प्रेम किंवा आनंद ह्यांच्या आड येण्याची आमची मुळींच इच्छा नाहीं, उलट ते सर्व वाढावे अशी आमची इच्छा आहे; आणि त्याकरितां त्यांना समान हक्क द्यावे असें आम्ही म्हणतों."

महाराजांनीं जरा दिलगिरीसूचक चेहऱ्यानें हंसून प्रोफेसरांकडे पाहून म्हटलें, " अजूनही तोच प्रश्न ! अजून सुद्धां पहिले पाढे

पंचावनच कां ? खरोखर मनुष्याच्या मनांत ज्या तऱ्हेनें विचार पहिल्याप्रथम येतात, ते सहज रीत्या जाऊं शकत नाहींत ! तुम्ही म्हणतां कीं, आम्ही कांहीं स्त्रियांना पुरुष करण्याची इच्छा ठेवीत नाहीं, फक्त त्यांना पुरुषांप्रमाणें हक्क द्यावे म्हणतों. पण मी असें म्हणतों कीं—

**जोंपर्यंत स्त्रिया पुरुषांच्या सारख्या झाल्या नाहींत तोंपर्यंत त्यांना पुरुषांप्रमाणें हक्क देतां येणार नाहींत.**

आणि पुरुषांसारख्या झाल्याखेरीज कधीं त्यांना हक्क दिले, तरी त्या ते भोगूं शकणार नाहींत; आणि त्यांचा त्यांना कांहीं फायदा होणार नाहीं. कारण कीं, ईश्वराचा असा एक नियम आहे कीं, कोणत्याही एका वस्तूला दुसऱ्या वस्तूसारखी बनवावयाची असल्यास त्या वस्तूला दुसरीचे सर्व गुण आले पाहिजेत. जोंपर्यंत तसे गुण त्या वस्तूंत घालतां येत नाहींत, तोंपर्यंत ती वस्तु दुसऱ्या वस्तूसारखी होत नाहीं. जसा अग्नींत जाळण्याचा गुण आहे तसा जर तो लोखंडांत आणावयाचा असेल तर तो फार थोडा वेळ येऊं शकेल, पण तो गुण आणण्याकरितां लोखंडाला तापवावें लागतें तापविल्याशिवाय लोखंडांत अग्नीचा गुण येत नाहीं, तसेंच पाणी प्रवाही आहे, पण आपल्या मनांत आल्यास त्याचें बर्फ होऊं शकते. पण तसें दगडासारखें करण्याकरितां त्याला कृत्रिम थंडाई द्यावी लागते. अशा थंडाईच्या संयोगाशिवाय बर्फ होणार नाहीं. चुन्याचा रंग सफेत आहे त्याला लाल रंगाचा करतां येतो. पण तसा करण्याकरितां त्यांत थोडासा दुसरा रंग मिसळावा लागतो. फार मेहनतीनें आणि फार श्रमानें एखाद्या झाडाला हंगामाविरहित फळ आणितां आलें तरी हंगामी फळासारखी गोडी किंवा स्वाद हुबहूब त्यात उतरणार नाहीं. त्यामुळें ती खर्चाची व श्रमाची गोष्ट सर्वांनाच परवडणार नाहीं. तसेंच स्त्रियांच्या गुणांत

आणि स्वभावांत जोंपर्यंत फरक झाला नाहीं, तोंपर्यंत म्हणजे जों॰ पर्यंत त्यांना दाढीमिशांशिवायचा पुरुष बनविलें नाहीं, तोंपर्यंत त्या पुरुषांजवळ हक्क भोगूं शकणार नाहींत. कारण त्यांची प्रकृति त्याच्याविरुद्ध आहे. म्हणून तुमच्यासारख्या गुणाच्या आणि स्वभावाच्या त्यांना केल्याशिवाय तुम्ही तुमचे हक्क त्यांना द्याल आणि त्याचा फायदा त्यांच्याकडून घेण्याकरितां त्यांच्यावर सक्ती कराल तरी सुद्धां त्या आपल्या खुषीनें ते भोगूं शकणार नाहींत, हें म्हणणें तुम्हांला पटतें का नाहीं?"

प्रोफेसरसाहेब माझ्याकडे पाहून म्हणाले, "ताई, ही तर माझ्याच घरची गोष्ट महाराजांनीं सांगितली. तुम्ही महाराजांजवळ कांहीं बोललां होतां वाटतें ?"

महाराज म्हणाले, "तुमचें घर कांहीं जगाविरहित आहे का ? आम्ही तर जगाच्या महान् सिद्धांताच्या मनुष्यजातीच्या स्वभावाच्या स्वाभाविक प्रकृतीच्या आणि ईश्वरी नियमाच्या गोष्टी करितों आहों, मग त्यांतून तुमचें घर, तुमची बायको कोठें जातील ?"

प्रोफेसर म्हणाले, "खरोखर तसेंच आहे. मी तुमच्याशीं दरेक प्रश्नांत हरतां आहें. मी आजपर्यंत असें समजत असें कीं, स्त्रियांना स्त्रिया ठेवून पुरुषांसारखे हक्क देतां येतील, पण आपल्या ह्या गोष्टी ऐकल्यापासून माझी खात्री झाली कीं,

## स्त्रीला स्त्रीच ठेविली तर ती पुरुषांसारखे हक्क भोगूं शकणार नाहीं.

कारण कीं, मी माझ्या घरांत दररोज पाहात असें कीं, माझ्या पहिल्या बायकोला मी जी स्वतंत्रता देत असें, ती स्वतंत्रता ती आनंदानें भोगूं शकत नसे; कारण ती जुन्या विचारांच्या कुटुंबांत

वाढली असल्यामुळें पुरुषांसारखें शिक्षण तिला मिळालें नव्हतें, तेव्हां माझ्यासारखे हक्क ती भोगूं शकत नसे. मी तिला सांगत असें कीं, माझी इतकी लाज ठेवण्याची कांहीं जरूरी नाहीं. पण ती म्हणे कीं, मामंजी आणि भाऊजी ह्यांच्या देखत इ..........तरी लाज वाटलीच पाहिजे, बाकी तुम्ही सांगाल तसें करीन. मी तिला म्हणें कीं, सभेस जातेस, तेव्हां एखादे वेळेस कांहीं वाचावें अगर बोलावें; तशी ती म्हणे कीं, परक्या माणसांत माझी जीभ उचलत नाहीं. एखादे वेळेस जवळचे गांवाला जावयाचें असलें कीं मी तिला सांगें, तूं एकटी जा, तर ती नाहीं म्हणे, आणि मला घरचें मनुष्य द्या म्हणे. मी तिला सांगें कीं, तूं महिला सभेची सेक्रेटरी हो; तर ती म्हणे कीं ही कटकट कोठें करूं, मला माझें घर संभाळूं द्या. माझ्या मुलांनीं घरांत रहावें आणि मीं बाहेर भटकावें ? तें माझ्यानें होणें नाहीं. मी तिला म्हणें कीं, आपण सहा महिने विलायतेस जाऊन येऊं, पाहाण्यासारखी आहे, मागून तुला वाईट वाटेल. ती म्हणे, छे तसें नाहीं, इथें सासूबाईनीं रडावें आणि आपण भटकावें,हें बरें नाहीं; मी कांहीं तुमच्यासारखी निर्दय नाहीं, मी म्हणे कीं आपल्या सरलेला आपण एम. ए. ची परीक्षा द्यावयाला लावूं, म्हणजे ती म्हणे नको रे देवा ! तिच्याहून विद्वान् नवरा मिळाला नाहीं कीं तिचें कोणावरच प्रेम राहावयाचें नाहीं, त्यापेक्षां तिनें आपलें घर सांभाळावें, नवरा, सासू सर्वांवर प्रेम करावें, असें मी शिकवीन. मी जेव्हां तिला माझ्याबरोबर पार्टीला बोलावीत असें, तेव्हां ती नेहमीं नवीं नवीं कारणें काढून नाहीं म्हणे. यदाकदाचित् आली तर तेथें ती संकोचानें वागे आणि जर वेळेस तिला एखाद्या परक्या पुरुषाचा धक्का लागला तर तिला असें वाईट वाटे कीं, तें पाहून मला तिची कींव येई, व कांहीं वेळीं रागही येई कीं, तिला इतकी स्वतंत्रता देत असून ती तिला कां आवडत नाहीं ? आपण खुलासा केल्यापासून आता समजावयास लागलें आहे कीं,

पुरुषांसारखें शिक्षण दिल्याशिवाय स्त्रिया पुरुषांच्यासारखे हक्क भोगूं शकणार नाहींत."

---

## घाणीचे बैल आणि शर्यतीचे घोडे.

महाराज म्हणाले, "इतकेंच नाहीं, पण मी तर असें म्हणतों कीं, स्त्रियांना पुरुष बनविल्याशिवाय तसे हक्क स्त्रियांना उपभोगितां येणार नाहींत. कारण कीं घाणीचे बैल कांहीं शर्यतीच्या घोड्यांबरोबर पळणार नाहींत. जे बैल शर्यतीच्या घोड्यांबरोबर पळतील त्यांच्यानें घाणीच्या लहान वर्तुळांत हळू हळू फिरवणार नाहीं, तसेंच ह्या जगाच्या व्यवहारांत आणि संसारांत स्त्रियांना जीं कामें आहेत तीं लहान वर्तुळांत हळू हळू चालावयाचीं आहेत. आणि पुरुषांची कामगिरी शर्यतींतल्या घोड्यांसारखी आहे. कारण कीं, स्त्री हें प्रेमाचें रूप आहे; आणि पुरुष ज्ञानाचें रूप आहे. म्हणून प्रेमाची नजर आपल्या प्रेमी जनांवर राहते; आणि त्यांतच तिला सर्वस्व मिळतें. पण ज्ञानाची दृष्टि फार दूरपर्यंत पोंचूं शकते; आणि ती जेव्हां तशी पोहोंचते, तेव्हांच तिला आनंद होतो. म्हणून पुरुषांची तुलना शर्यतीच्या घोड्यांबरोबर केली आहे.

---

## भरती-ओहोटी.

" स्त्रिया ओहोटीप्रमाणें व पुरुष भरतीप्रमाणें आहेत. कारण ओहोटीमध्यें आपल्या मूळ स्थानाकडे येण्याचा गुण आहे. ओहोटीमध्यें

आपलें संभाळून ठेवण्याचा गुण आहे आणि नम्रता आहे, ह्या रीतीनें पहातां स्त्रियांची प्रकृति तिच्याशीं मिळते, म्हणून स्त्रियांची ओहोटीशीं तुलना करतां येते. पुढें पुढें जाणें हा भरतीचा स्वभाव आहे. खडकाशीं भांडून त्यांना तोडणें, आपल्या आसपासच्या किनाऱ्यावर ओलावा पसरणें, हलक्यासलक्या निरुपयोगी वस्तु बाहेर फेंकणें, हेही भरतीचे स्वभाव आहेत. तसेंच पुरुषांत असणाऱ्या पुरुषार्थाचा तोच स्वभाव आहे. म्हणून भरतीच्याबरोबर पुरुषांची तुलना केली आहे. त्याशिवाय पृथ्वी आणि आकाशाशींही स्त्रीपुरुषांची बरोबरी करतां येते. जसें पृथ्वी जड आहे, पृथ्वी लहान आहे, पृथ्वी खालीं आहे, पृथ्वी सौंदर्यवान् आहे, आणि पृथ्वीमध्यें आकर्षणाचा गुण आहे, तसाच स्त्रियांचा स्वभाव आहे; म्हणून पृथ्वीशीं स्त्रियांची तुलना होते आणि आकाश विशाल आहे, गंभीर आहे, उंच आहे, विकाररहित आहे व तें पृथ्वीला झांकून टाकितें, म्हणून आकाशाशीं पुरुषांची बरोबरी होऊं शकते.

"प्रोफेसरसाहेब, आतां मला सांगा कीं, घाणीच्या बैलांना शर्यतीच्या घोड्यांबरोबर कसें धांववेल ? भरती आणि ओहोटीकडून एकच कामगिरी कशी करून घेणार ? आणि पृथ्वीचे व आकाशाचे हक्क सारख कसे करणार ? तुमच्याजवळ असा कोणता मंत्र आहे कीं, सूर्यातील उष्णता चंद्रांत आणूं शकाल ? तुमच्याजवळ अशी कोणती किल्ली आहे कीं, भरती आणि ओहोटी एक होतील ? तुमच्याजवळ असें काय आहे कीं, घाणीचा बैल शर्यतीच्या घोड्याबरोबर धांवेल ? तुमच्यामध्यें असें काय आहे कीं, पृथ्वी आणि आकाश एक होतील ? प्रोफेसरसाहेब, लक्षांत ठेवा कीं, तें कधींही होणें नाहीं, आणि कदाचित् जरी जोराजुलुमानें तसें केलें तरी त्यापासून कांहीं फायदा होणें नाहीं; कारण ईश्वरी नियमाच्या उलटें चालून, प्रकृतीच्या विरुद्ध जाऊन, स्वभावापेक्षां निराळें वागून गुणांना फिरवून जगाचे नियम बदलून, उन्नतीच्या क्रमांना लाथ मारून, आणि ईश्वरी

इच्छेला बाजूला सारून, तुम्ही जय कसा मिळवाल, तें मला सांगा तर खरें."

प्रोफेसर म्हणाले, "स्त्रियांना पुरुषांसारखे हक्क देण्याकरितां त्यांच्या शिक्षणांत आणि स्वभावांत थोडासा फेरफार केला पाहिजे. तसा फेरफार केल्याखेरीज स्त्रियांना पुरुषांसारखे हक्क भोगतां येणार नाहींत, हें बरोबर आहे. इतकेंच नाहीं, पण तसा फेरफार केल्यानें स्त्रियांमधील प्रेम, सौंदर्य आणि आधीनता हीं कमी होतील. आणि पुरुषांची लग्नासंबंधानें अप्रीति उत्पन्न होईल, ह्यांत कांहीं संशय नाहीं, हें सर्व खरें ! पण महाराज, ज्या स्त्रियांची आपण स्वर्गीच्या देवांबरोबर तुलना करतां त्या स्त्रियांच्या-संबंधानें तुम्ही घाणीचे बैल वगैरे शब्द वापरतां हें वाजवी आहे का ? जरी स्त्रियांचे हक्क पुरुषांच्या हक्कासारखे नसले तरी त्यांना पुरुषांपेक्षां हलक्या समजावयाच्या, त्यांना त्यांच्याहून लहान समजावयाच्या, व पुरुषांपेक्षां त्यांना कमी उपयोगी लेखावयाच्या आणि त्यांचा मान कमी समजावयाचा, हें योग्य आहे का ? "

---

## स्वाभाविक गुण खुलावयाला सोपे जातात.

हें ऐकून जरा गंभीरतेनें महाराज म्हणाले, "आतां पुन्हां शब्दांच्या लढाईंत कां पडतां ? बेटा आमच्या हेतूकडे पहा ! आमच्या शुभेच्छेकडे पहा आणि आमचें अंतःकरण कशाकरितां तीळ तीळ तुटतें तें बघा, व्यावहारिक शब्दांकडे बघूं नका, कारण बाहेरील उदाहरणें सगळींच सर्वस्वी लागूं नसतात. घाणीचे बैल, शर्यतीचे घोडे, सूर्य, चंद्र, वगैरे वगैरे उदाहरणें दाखवून माझा कांहीं असें सांगण्याचा उद्देश नाहीं कीं, स्त्रिया

हलक्या आहेत आणि पुरुष श्रेष्ठ आहेत. पण ह्या तुलनेवरून माझ्या सांगण्याचा हेतु इतकाच कीं, स्त्रिया आणि पुरुष यांचे स्वाभाविक गुण निरनिराळे आहेत, दोघांची प्रकृति निरनिराळी आहे आणि दोघांचीं कर्तव्येंही निरनिराळीं आहेत; म्हणून ज्याच्यांत जो स्वाभाविक गुण असतो तो जर खुलविला तर तो सहज खुलूं शकतो; आणि त्यामुळें जगाचें अधिक कल्याण होऊं शकतें. पण ह्या स्वाभाविक गुणांना जर मुद्दाम दडपून टाकिलें आणि त्यांच्या बद्दला जर दुसरे गुण घातले तर त्याला जास्त मेहनत पडते, आणि फायद्याच्या बद्दला नुकसानच विशेष होतें. समुद्राच्या पाण्यांत स्वाभाविकरीत्याच खार आहे, उंसांत गोडी आणि लिंबांत आंबटपणा, मिरचींत तिखटपणा, हे ज्याचे त्याचे स्वाभाविक गुण आहेत, ते सहजरीत्या वाढवून त्यांची किंमत वाढवितां येते, पण जर ते गुण त्यांतून काढावयाचे असतील तर फार मेहनत पडते; आणि त्यांतला स्वाभाविक गुण काढल्यानें त्यांची किंमत कमी होते. जसें साखरेंत जी गोडी आहे, ती कोणी रसायनशास्त्री वाढवूं शकला, तर शेराच्या ठिकाणीं अर्धाशेर साखर घेऊन आपलें चालेल. मिठांतील खारटपणा चौपट वाढविल्यास थोडें मीठ वापरून आपला फायदाच होईल, आणि त्यामुळें वेळ, मेहनत आणि पैसा यांचा बचाव होईल, पण त्याच्या बद्दला जर कोणीं मिठाचा खारटपणा चौथाईपर्यंत आणण्याची मेहनत केली, तर त्याला मेहनत पडून आपल्याला दोन तोळ्यांच्या ठिकाणीं आठ तोळे मीठ आणावें लागेल. तसेंच जर कोणी साखरेंतून तीन हिस्से गोडी कमी करील तर चौपट पैसे पडतील. असें झाल्यानें किती त्रास आणि नुकसान होईल ह्याची कल्पना करा. साखरेंतून गोडी कमी करणें वाजवी आहे का वाढविणें योग्य आहे? मिठांतून खारटपणा काढून त्यांत तिखटपणा आणणें सोपें आहे का त्यांतील खारटपणा वाढविणें सोपें आहे? गुलाबाच्या फुलांतून वास कमी करण्यांत खुबी आहे का वाढविण्यांत?

---

## स्त्रियांचे स्त्रीत्वाची खुबी.

जरा विचार तर करा, शर्यतीचा घोडा आणि घाणीचा बैल हे शब्द ऐकून घाबरूं नका. इतकें खरें आहे कीं, ह्यापेक्षां एखादें चांगलें उदाहरण असतें तर बरें झालें असतें. लहानथोर किंवा उंचनीच दाखविण्याकरितां नाहीं, परंतु निरनिराळ्या तऱ्हेचे स्वाभाविक गण दाखविण्याकरितां ते दाखले दिलेले आहेत, तेव्हां तुम्ही त्या शब्दांकडे बघूं नका, तर आमच्या हेतूकडे बघा.

---

## स्त्रियांची उच्चता.

"आम्ही असें समजतों कीं, स्त्रीजातीचा अपमान करणें म्हणजे आपल्या आईचा अपमान करण्यासारखें आहे; इतकेंच नव्हे तर महा-समर्थ प्रभूच्या राज्यांतील कोणत्याही वस्तूला दुसऱ्या वस्तूपेक्षां हलकी मानणें हें आम्हां अभेदमार्गी लोकांच्या धर्माविरुद्ध आहे. ह्याच्याही पुढें जाऊन आम्ही असें मानतों कीं, ईश्वरानें उत्पन्न केलेल्या एखाद्या वस्तूला हलकी समजणें म्हणजे आपल्या मनाचा हलकेपणा दाखविणें आहे. तसें करण्यांत ईश्वराचा अपमान होतो; कारण कीं, दरएक वस्तु आपा-पल्या जागीं आपापल्या वेळेला, आणि आपापल्या कामांत जगाला सारखीच उपयोगी पडते. आम्ही कोणत्याही वस्तूला वाईट म्हणत नाहीं. तेव्हां ईश्वराच्या कृपापात्र अशा देवांच्या प्रतिनिधींना—दयारूप देवींना—आम्ही हलक्या कशा मानूं? स्त्रियांना तर आम्ही आमचे अतिथि मानितों. स्त्रिया अशक्त आहेत, नाजूक आहेत, पराधिन आहेत. म्हणून

त्यांना सुखी करण्याकरितां तर देवानें आम्हांला पुरुषार्थ दिलेला आहे. स्त्रिया म्हणजे ईश्वराचीं फुलें आहेत; स्त्रिया ह्या जगताची शोभा, स्त्रिया म्हणजे पुरुषांच्या आयुष्याची गोडी, स्त्रिया म्हणजे पुरुषांचा पुरुषार्थ वाढविणारी प्रत्यक्ष जादू, स्त्रिया ह्या जगताचा प्रवाह पुढें वाढविणारी आदिशक्ति व महात्म्यांना प्रसवणाऱ्या खाणी आहेत. भविष्यकाळच्या प्रजेच्या सुखाची दोरी स्त्रियांच्या हातांत आहे. सौंदर्याचा स्वामी स्त्रियांच्या चेहऱ्यांत आहे, दया त्यांच्या हातांत आहे, लीनतेचा स्वामी त्यांच्या नेत्रांत आहे. संगीताचा देव स्त्रियांच्या कंठांत आहे. स्वर्गीचें अमृत त्यांच्या जिभेंत आहे. स्वर्ग स्वतः स्त्रियांच्या प्रेमांत आहे; आणि जर समजूं शकाल व मिळवूं शकाल, तर मोक्षधामही स्त्रियांच्या हृदयांतच आहे. इतकेंच नाहीं, पण आमचा तर असा अनुभव आहे, कीं, दरएक पळाला नव्या नव्या खुब्या दाखविणाऱ्या युवतींमध्यें रसिक शामसुंदर, आपण प्रत्यक्ष खेळून राहिला आहे. त्यामुळेंच जगांतील दुसऱ्या कोणत्याही वस्तूपेक्षां स्त्रियांकडे आपला जास्त ओढा असतो, आपणास जास्त गोडी वाटते. अशा दयेच्या देवींना, जगताच्या गोडीला, अशा आनंदाच्या अवतारांना—ज्या खुबीचें भांडार, सौंदर्याचे नमुने, स्नेहाचा समुद्र, पुरुषार्थाची किल्ली आणि जगतांतील महान्शक्ति आहेत, त्यांना—आम्ही हलक्या कशा लेखूं ? जर त्यांना हलक्या मानल्या तर आमचे किती हाल होतील, ह्याचा जरा विचार तर करा. म्हणून प्रोफेसरसाहेब, आम्ही जितकें होईल तितकें ह्या देवींना सुखी राखावयालाच इच्छितों. असें माहीत असून आणि त्यांना सुखी ठेवण्याची शास्त्राची आज्ञा असून जर आम्हीं त्यांचा अनादर केला, तर आमच्यासारखे नालायक आम्हीच नव्हे काय ? ”

प्रोफेसरसाहेब म्हणाले, “शाबास. अहाहा ! महाराज स्त्रियांच्यासंबंधानें आपले इतके उत्तम विचार असतील आणि आपण इतका आदर बाळगीत असाल, असें मला माहीत नव्हत.”

[महाराज म्हणाले, "प्रोफेसरसाहेब, चूक होऊं नये म्हणून मला सांगावें लागतें कीं माझे जे विचार आहेत, ते स्त्रियांच्या बाह्य स्वरूपासंबंधीं नाहींत, स्त्रियांच्या देहासंबंधीं नाहींत, तर स्त्रियांत जें स्त्रीत्व आहे त्याबद्दल आहेत. तुमच्या समान-हक्क वाल्या स्त्रियांसंबंधीं माझे हे विचार नाहींत, रोजच्या व्यवहारांत पुरुष ज्यांच्यावर मोहित होतात, तसल्या स्त्रियांसंबंधीं हे विचार नाहींत, हल्लीं आपल्या देशांत ठिकठिकाणीं जे मूर्खपणाचे नमुने आणि रोगांचीं घरें अशा स्त्रिया आहेत, त्यांच्यासंबंधींचे हे विचार नाहींत, तर स्त्रियांत जें स्त्रीत्व आहे, त्या स्त्रीत्वासंबंधींचे ते विचार आहेत. इतकेंच नव्हे तर असल्या स्त्रियांना आह्मी स्त्रिया समजत नाहीं, त्यांना स्त्रीरूपी अर्धवट चित्रें समजतों, किंवा स्त्रीरूपी यंत्रांतील बाहुल्या समजतों. कारण स्त्रीच्या स्वरूपांतच कांहीं खुबी नाहीं; स्त्रियांत स्त्रीत्वआहे, ह्यांतच खुबी आहे. स्त्रियांचें स्त्रीत्व कांहीं पढ्यांत किंवा समान हक्कांत नाहीं, तर तें सेवाधर्मांत आहे, म्हणून जगांत आनंद वाढवि-ण्याकरितां स्त्रियांपासून प्रकृतीच्या मुळांतून निघालेल्या सेवाधर्माची आम्ही इच्छा करितों."]

प्रोफेसर म्हणाले, "समान हक्काशिवाय घरांत गुरफटून रहाणाऱ्या स्त्रिया कशा रीतीनें सेवा करूं शकतील आणि जगांत आनंद कसा वाढवूं शकतील ?"

---

## स्त्रियांच्या प्रेमाचें बळ.

महाराज म्हणाले, "मोठें आश्चर्य आहे कीं, अजून तुम्ही असे प्रश्न विचारतां ? मला वाटतें कीं, तुम्ही कॉलेजांतील प्रोफेसर आहां, पण प्रेमाच्या ज्ञानाचे किंवा मनुष्यस्वभावाच्या ज्ञानाचे प्रोफेसर नाहीं. जर

असतां तर तुम्हांला समजलें असतें कीं सुरुंगापुढें हातोडी काय काम करूं शकेल ? स्त्रियांचें प्रेम हा सुरुंग आहे व दुसऱ्याची नोकरी करणें म्हणजे हातोडी आहे. विजेच्या गाडीबरोबर बैलाच्या खटाऱ्याला किती धांवतां येईल ? तसेंच स्त्रियांचें प्रेम हें विजेसारखें आहे आणि स्त्रियांनीं रोजगारधंद्यांत मिळविलेलें यश हें बैलाच्या खटाऱ्याच्या कामगिरी-प्रमाणें आहे. आगीचें तेज आणि सूर्याचें तेज यांची बरोबरी होईल का ? घराबाहेरील स्त्रियांच्या कामगिरीचें तेज आगीसारखें आहे, आणि प्रेमाचा प्रकाश सूर्यासारखा आहे. विहिरींत कितीही खोल पाणी असलें तरी त्याच्यानें सागराची बरोबरी होणार नाहीं; तसें प्रेम हा महासागर आहे, आणि पुरुषाप्रमाणें नोकरी करणें हें एखाद्या खळग्यांतील पाण्या-प्रमाणें आहे. यंत्राची बरोबरी हातानें होणार नाहीं. प्रेम हें यंत्र आहे आणि बाहेरील कामें हीं हाताप्रमाणें आहेत. ज्याच्याजवळ यंत्र नाहीं तो मनुष्य हातानें काम करितो ही निराळी गोष्ट. तसेंच ज्यांच्याजवळ प्रेम नाहीं त्यांना पुरुषाबरोबर धांवाधांवी करावी लागते. त्या ती खुशाल करोत. पण ही गोष्ट लक्षांत ठेवा कीं, यंत्रावर काम करणाऱ्या मँचेस्टरवाल्यां-बरोबर हातमागावर काम करणारे विणकर कधींही टिकाव धरूं शकणार नाहींत. तसेंच प्रेमाच्या यंत्रानें स्त्रियांच्या हातून जगताचें जितकें कल्याण होईल, तितकें कल्याण स्त्रिया कारकुनी करूं लागल्यानें होणार नाहीं आणि भक्ताच्या ईश्वरी आनंदाची बरोबरी या जगांतील क्षुल्लक कामानें होणार नाहीं. पतिव्रता स्त्रियांच्या कुटुंबस्नेहाच्या आनंदाची बरोबरी परक्या पुरुषाबरोबर स्वतंत्रतेनें हिंडून वरकरणी हास्य दाखवि-णाऱ्या स्त्रियांच्या हातून होणें नाहीं. कारण तें सर्व वरकरणी—घटकेपुरतें असतें. आणि अंतःकरणाला तृप्ति न देणारें असतें. पण जें प्रेम आहे तें अंतःकरणापासूनचें असतें. पूर्ण प्रेम अक्षय आणि अगदीं मनाच्या अंत-रात्म्यापर्यंत पोंचलेलें असतें. म्हणून प्रेमापासून जितकें आपलें व जग-ताचें कल्याण होईल, जितका आनंद मिळेल आणि देतां येईल, प्रेमा-

पासून आपल्या आत्म्याला जितकी तृप्ति आणितां येईल, आणि ईश्वरास प्रसन्न करतां येईल तितकें स्त्रियांस पुरुषांसारखीं कामें शिकविल्यानें करतां येणार नाहीं. कारण ईश्वराचा हा नियम तुम्हांला माहीत असेलच कीं, स्थूल वस्तूंपेक्षां सूक्ष्म वस्तू जास्त काम करूं शकतात. दगडापेक्षां मातीचें जडत्व कमी आहे, म्हणून जसें दगडापेक्षां मातींत जास्त बळ असतें व त्यामुळें दगडापेक्षां ती जास्त उपयोगांत येते, तसें पाणी मातीपेक्षां पातळ आहे त्यामुळें मातीहूनही पाण्यांत जास्त बळ आहे. पाण्यापेक्षां अग्नि सूक्ष्म परमाणुवाला आहे म्हणून तो त्याहूनही बलवान् आहे, तसेंच त्याच्याहून वारा व वाऱ्याहून आवाज सूक्ष्म तत्वाचा आहे. अशा रीतीनें जितकें जास्त सूक्ष्म तितकें त्यांत जास्त बळ असा नियम आहे. "वीज व ईथर" हीं ह्यांहूनही सूक्ष्म तत्वें आहेत. जसजसें जग सुधारत जातें, तसतशीं तीं सांपडतात; व ह्याहूनही जास्त सूक्ष्म अशीं तत्वें आपल्या पुढच्या पिढीच्या अनुभवास येतील. जसजशीं सूक्ष्म तत्वें समजत जातील, तसतशी ईश्वरी गुप्त शक्ति समजूं लागेल आणि त्याप्रमाणें मनुष्यजातीची उन्नति होत जाईल. म्हणून आपल्या त्रिकाळदर्शी प्राचीन आर्यांनीं सूक्ष्मांत सूक्ष्म प्रेमतत्वाला लग्नस्नेहांत प्राधान्य दिलें आहे; आणि त्याच्या उलट जडतत्वांना तुम्हीं मोठीं करूं म्हणतां ह्याचा जरा विचार तर करा. कारण कीं शास्त्रांत म्हटलें आहे तें सहज समजेल असें आहे. हातपाय वगैरे इंद्रियांकडून जीं जड कामें करितों तीं कामें करविण्याची शक्ति ज्या इंद्रियांत आहे तीं सूक्ष्म इंद्रियें जास्त बलवान् आहेत. मन सूक्ष्म आहे, परंतु तें जास्त बलवान् आहे. मनापेक्षां बुद्धि सूक्ष्म आहे, तरी ती मनाहून बलवान् आहे. बुद्धीपेक्षां इच्छाशक्ति जास्त बलवान्, इच्छाशक्तीपेक्षां अहंकार, अहंकारापेक्षां प्रेम जास्त सूक्ष्म आहे, म्हणून प्रेम हें जास्त बलवान् आहे. तें अहंकाराला आपल्या ताब्यांत ठेवूं शकतें. सगळ्यांत सूक्ष्म प्रेम आहे. त्याचा आत्म्या-

बरोबर निकट संबंध आहे. त्याची बरोबरी शरीराकडून होणाऱ्या कामाशीं कशी करावयाची ? ह्याचा जरा विचार करा."

हें ऐकून प्रोफेसरसाहेब फार आश्चर्यचकित झाले. कारण ज्यांत प्रेमधर्माचें प्राधान्य आहे अशा सेवाधर्मापेक्षां स्त्री-पुरुषांच्या समान हक्काची गोष्ट किती खालच्या दर्जाची आहे हें त्यांना उघड रीतीनें समजलें. त्यामुळें ते म्हणाले, "महाराज, मीं जेव्हां हा प्रश्न विचारला, तेव्हां अशा रीतीनें आपण मला एका उत्तरांतच जिंकाल असें वाटलें नव्हतें. खरोखरच तुम्हीं काळाला अनुसरून उदाहरणें दिलींत."

महाराज म्हणाले, "आम्ही तर अगदीं साध्या रीतीनें, सोप्या भाषेंत, आणि घरगुती उदाहरणांनीं काम करण्याची इच्छा ठेवितों, पण तुमच्यासारख्या बिघडलेल्या कुलुपांना जुन्या किल्ल्या लवकर लागू पडत नाहींत; म्हणून शास्त्राला जवळ ठेवून अशा नव्या किल्ल्या लावाव्या लागतात."

प्रोफेसर म्हणाले, "त्यांतच खुबी आहे; आणि त्यामुळेंच तुम्ही दुसऱ्यावर ताण करूं शकतां."

महाराज म्हणाले, "प्रोफेसरसाहेब, आतां जरा विचार करा कीं, स्वाभाविकरीत्या उत्पन्न झालेल्या अंतःकरणाच्या गाढ प्रेमानें जास्त काम होईल का बाहेरील स्थूल साधनांनीं जास्त काम होईल ? बाहेरील कोणतेंही साधन अंतःकरणाच्या स्वाभाविक प्रेमाची बरोबरी करूं शकणार नाहीं. म्हणून जीं कामें तुम्ही तलवारीच्या मदतीनें करूं शकत नाहीं तीं कामें नाजूक स्त्रिया आपल्या डोळ्याच्या खुणेनें करूं शकतात. जें ज्ञान शेंकडों पुस्तकें वाचून तुम्हाला मिळत नाहीं, तें ज्ञान प्रेमळ स्त्रिया तुमच्या चेहऱ्यावरून मिळवूं शकतात. समुद्राच्या पैलतीरीं जाऊनही जीं कामें तुम्हीं करूं शकत नाहीं, तीं कामें स्त्रिया आपल्या मधुर गायनानें करितात जीं कामें तुम्ही सरकारी कायद्याच्या मदतीनेंही करूं शकत

नाहीं तीं कामें रसिक स्त्रियांच्या जरा तोंड हालविण्यानें होतात. वर्षानुवर्ष शास्त्रांचें अध्ययन करून जे सिद्धांत तुमच्या डोक्यांत उतरत नाहींत, ते सिद्धांत भोळ्या स्त्रियांच्या अंतःकरणांत कोरलेले असतात; आणि स्त्रियांच्या हरतऱ्हेच्या जिनसांनीं दिलेल्या 'पार्टी'पासून जी गोडी तुम्ही तुमच्या मित्रमंडळींत आणूं शकत नाहीं, ती गोडी गोड स्त्रिया आपल्या गोड गोड बोलण्यानें आणि मंद हास्यानें उत्पन्न करितात. जीं कामें तुम्ही मोठमोठ्या तोफांनीं करूं शकत नाहीं, तीं कामें भक्तिमान् स्त्रिया आपल्या थोड्याशा पवित्र अश्रूंनीं करितात. शेंकडों प्रकारची जबाबदारी घेऊनसुद्धां जो लाभ तुम्हांला मिळवितां येत नाहीं, तो लाभ चतुर स्त्रिया घरांत बसल्या बसल्या फक्त आपल्या बाहेरच्या सौंदर्यानेंच मिळवूं शकतात. लाखों शिपायांच्या लष्कराच्या मदतीनें जो जय तुम्हांला मिळवितां येत नाहीं, तो जय लाघवी स्त्रिया आपल्या थोड्याशा शब्दानें मिळवितात. पुष्कळ यज्ञ करूनही जें तुम्हांला मिळवितां येत नाहीं तें फळ प्रेमळ माता मुलांचीं हगोलीं धुवून मिळवूं शकतात. मोठमोठे परोपकार करून सुद्धां तुम्हांला जो आनंद मिळवितां येत नाहीं, तो आनंद गरीब स्त्रिया चतकोर भाकरी भिकाऱ्याला घालून मिळवितात. पुष्कळ पुराणें आणि शास्त्रें वाचूनही जा श्रद्धा तुमचेजवळ नसते, ती श्रद्धा भाविक स्त्रिया वेड्यावांकड्या देवांच्या मूर्तींची पूजा करून मिळवूं शकतात. तुमच्या योजना मोठमोठ्या असून त्यापासून आनंद मिळत नाहीं, आणि एखाद्या कामांत यश येत नाहीं, तें काम सुशिक्षित स्त्रियांच्या मदतीनें थोड्या वेळांत तुम्हांला करतां येतें, कारण स्त्रिया बाहेरील स्थूल साधनांनीं कामें करीत नाहींत—सर्वव्यापी, निःस्वार्थी अशा स्वाभाविक प्रेमाच्या बळानें त्या कामें करितात; इतकेंच नाहीं तर प्रेम हा ईश्वराचा मोठा नियम आहे, तें खोलांतलें खोल तत्व आहे, त्यांत स्वाभाविक आकर्षण आहे, अलौकिक बळ आहे, प्रेम ही ईश्वराची इच्छा आहे, ईश्वरी कृपा व आज्ञा आहे, म्हणून प्रेमाच्या हातून जितकें तुमचें व जगाचें कल्याण

होईल तितकें दुसऱ्या कशानेंही होणार नाहीं. अशा पवित्र प्रेमानें काम करणाऱ्या महाशक्तीमधून प्रेम काढून टाकावयाचें आणि त्याच्याबद्दल स्वाभाविक रीत्याच त्यांना ज्यांत त्यांची शक्ति कमी आहे अशा रोजगारधंद्यांत पाडावयाचें, हें किती वाईट आहे ? व तें कोठपर्यंत टिकेल ? आणि त्याचा परिणाम तरी काय होईल ? याचा जरा विचार करा. असें करणें म्हणजे उत्तम कवीजवळून बिगार घेण्याप्रमाणें, चिताऱ्याकडून दळून घेण्याप्रमाणें, अगर तत्वज्ञानी माणसाला स्वयंपाक करावयाला सांगण्याप्रमाणें, सोन्याच्या अंबारींत कुत्र्याला बसविण्यासारखें, सोन्याच्या खाणींत जाऊन सोनें टाकून माती घेण्याप्रमाणें, अगर मैनेच्या पिंजऱ्यांत कावळा बाळगण्याप्रमाणें आहे. गंगेच्या कांठीं जाऊन गंगोदक न पितां विहिर बांधून पाणी पिणें जसें होईल तसें तें होईल. अशा रीतीनें पुष्कळ उदाहरणें देतां येतील; पण सारांश हाच कीं, असें करणें ह्मणजे ईश्वराचा मोठा अपराध करण्यासारखें आहे; कारण असें केल्यानें आपण जगांतून ईश्वरी प्रेमाला कमी करितों. ईश्वराला आपल्या अंतःकरणांतून दूर करण्याप्रमाणें हें आहे, कारण या जगांत आपल्याला दिसेल असें ईश्वराचें दुसरें रूप म्हणजे 'प्रेम' हेंच होय. म्हणून त्याला कमी करणें म्हणजे ईश्वराला दूर करणें होय. ईश्वरच आपलें जीवन, तोच आपलें सर्वस्व, तो कमी झाला म्हणजे मग राहिलें काय ? चैतन्य गेल्यानंतर नुसतें जड काय कामाचें ? अरे भल्या माणसा, तूप-साखरेशिवायच्या लाडवांत जशी गोडी नसते तसें ईश्वरी प्रेम व ईश्वरी ज्ञान यांविरहित असलेल्या जीवनांतही गोडी कोठून ? नसणारच. म्हणून महात्मे म्हणून गेले आहेत कीं,

## प्रेम हें जगताचें जीवन आहे.

"प्रेम ही आत्मा आणि परमात्मा ह्यांना जोडणारी सांखळी आहे. तें ईश्वराचा मध्यबिंदु आहे. म्हणुन प्रेमाच्या रस्त्यानें जगांत ईश्वरी प्रेम

पसरण्याकरितां सगळ्यांना अनुकूल, सोपा आणि रासिक असा लग्नरूपी यज्ञ दयाळू परमेश्वरानें ठरविलेला आहे. म्हणून होईल तसें करून हा स्नेह वाढेल असे उपाय आपण सगळ्यांनीं योजिले पाहिजेत. त्याच्याऐवजीं तुम्ही प्रेमाच्या मुळांतच कुऱ्हाड मारण्याचें करितां, तें किती वाईट आहे, याचा जरा विचार करा. आम्हांला तर असें वाटतें कीं, जगांतील सोन्याच्या खाणी नाहींशा झाल्यानें जितकें नुकसान आहे, त्यापेक्षां देखील ज्यास्त नुकसान स्त्रियांतील प्रेम गेल्यानें आहे. समुद्र सुकण्यानें किंवा चंद्र नाहींसा होण्यानें जगताचें जितकें नुकसान होईल, त्यापेक्षांही जास्त नुकसान स्त्रियांतील प्रेम गेल्यानें होणार आहे. या गोष्टी आज तुम्हांला रुचावयाच्या नाहींत; तेव्हां तुम्हांला समजण्यासारखीं उदाहरणें मला घेऊं द्या. कोळशाच्या खाणी सांपडल्या नव्हत्या तेव्हां जगाचा व्यवहार चालत होता. जेव्हां शेतीची विद्या माहीत नव्हती तेव्हांही माणसांचा निर्वाह होत होता. हत्यारें, घरें वगैरे नव्हतीं तरी—पुष्कळ गोष्टींशिवाय—जग चालत होतें पण प्रेमाखेरीज एक क्षणभर सुद्धां जग चालूं शकणार नाहीं. कारण कीं, प्रेम हा ईश्वरी किरण आहे. जसा सूर्य दूर असूनही त्याच्या किरणांनीं आपल्याला प्रकाश मिळतो, तसें ईश्वर दूर असूनही प्रेमरूपी त्याच्या किरणानें हें जगत टिकलें आहे. अशीं ईश्वरी स्नेहांचीं किरणें—ज्याला आपण प्रेम म्हणतों तें प्रेम स्त्रियांत आहे, त्याला तुम्ही अंधुक करावयाचें अगर नाहींसें करावयाचें म्हणतां, म्हणून आम्ही म्हणतों कीं, बाबांनो तसें करणें हा मोठा अपराध आहे. म्हणून अशा पापांत न पडतां जगतांत खरें प्रेम वाढेल असें करा. कारण कीं, लग्नाचा यज्ञ जितका चांगल्यांत चांगला होईल तितकें जास्तींत जास्त प्रेम उत्पन्न होईल; आणि जसें मनुष्यांत प्रेम वाढेल तसतसा जगांत ईश्वरी स्नेह वाढत जाईल म्हणून कोणत्याही रीतीनें लग्नाचें माहात्म्य कमी होणार नाहीं, नवरांबायकोंचें प्रेम कमी होणार नाहीं, अशा दरएक गोष्टीला आपणा सर्वांनीं संमति देणें

हें आपलें कर्तव्य आहे. लग्नस्नेह हा बाकी सर्व स्नेहाचें मूळ तत्व आहे; म्हणून लग्नाला यज्ञ समजून अतिशय प्रेमानें आयुष्य घालवून अंतीं त्यांतूनच ईश्वरमय होणें हीच आपली उत्तमता आहे.

---

## आपल्या गृहराज्यांत स्त्रियांची सत्ता

"प्रोफेसरसाहेब तुम्ही म्हणतां कीं, घरांत राहणाऱ्या स्त्रिया काय करूं शकतील ? पण हा प्रश्नच तुमची व्यावहारिक ज्ञानाची कमतरता सिद्ध करितो. तुम्ही स्वतःच म्हणतां कीं अद्याप आपण आपल्या स्त्रियांना कांहींच अधिकार दिलेले नाहींत, त्या अद्याप गुलामगिरीच्या स्थितींत आहेत, त्यांचें आपल्याजवळ कांहींच चालत नाहीं. त्यांच्यांत अद्याप पुष्कळ अज्ञान आहे, आपले बंधु त्यांना अद्याप पायांतील खेटराप्रमाणें लेखतात, आपण आपल्या स्त्रियांचा जराही मान ठेवीत नाहीं; आणि ह्मणून आपल्या स्त्रियांना आपण पुरुषांप्रमाणें हक्क दिले पाहिजेत, असें तुमचें म्हणणें आहे. पण प्रियसाहेब, तुम्हीं तुमच्या भाऊबंदांच्या घरांत अगर आपल्या जातींत कोठें पाहिलें आहे का कीं स्त्रियांचें घरांत किती वजन असतें तें ? स्त्रियाचें का पुरुषांचें ? तुमचे मित्र मिस्तर दत्त मला भेटले होते. ते म्हणाले, कीं, विलायतेस जाण्याची माझी इच्छा आहे पण माझी बायको मला नको ह्मणते त्यामुळें उपाय नाहीं. संसार सुधारण्याचे कामीं मोठमोठीं व्याख्यानें देणाऱ्या रावसाहेबांकडे लग्नाला गेलों होतों, तेव्हां ते म्हणाले कीं, 'माझें मत पंधरा वर्षांखेरीज स्त्रियांचीं लग्नें करूं नयेत' असें आहे, पण घरांतील बायकांपुढें चालत नाहीं. दोन वर्षें भांडण होऊन शेवटीं

मी हरलों. पुनर्विवाह–सभेच्या सेक्रेटरीशीं चांगली ओळख आहे. त्यांची एक बालविधवा मुलगी आहे; पण घरांतील बायकांच्या अडचणीमुळें तिचें पुनर्लग्न करतां येत नाहीं. कारण ती म्हणते कीं, ' मी आत्महत्या करीन, मी जरी पुष्कळ निश्चयी आहें, तरी तिच्या ह्या निश्चयापुढें माझें चालत नाहीं. आमचे रावसाहेब पुष्कळ सुधारक आहेत, त्यांचा विचार जातिबंधनें नकोत, असा असल्यामुळें ते आपल्या क्लबांत वाटेल त्याच्याबरोबर चहापाणी पितात, पण घरीं गेल्याबरोबर बाईसाहेब त्यांना आपल्या पाण्याला शिवूं देत नाहींत आणि पान लांब वाढतात. हें पाहून एक वेळां खासगी रीतीनें मीं त्यांना म्हटलें, ' हें काय ? सभेंत म्हणतां कीं, जातिभेद हा आपल्या पायमल्लीचें मूळ आहे. शास्त्रांत जो कोणी असा जातिभेद दाखवून देईल त्याला इनाम देईन. आणि हें काय ? घरांत तुम्हांला पाण्याचे घागरीला शिवण्याचा हुकूम नाहीं. ' तेव्हां ते म्हणाले, 'महाराज तुम्ही म्हणतां तें खरें, पण बायका पडल्या अज्ञान ! त्यांच्याशीं रोज भांडत बसण्यापेक्षां दूर राहिल्यांत आपलें काय खरचतें ? मीं हट्टच धरिला तर तिचें काय चालणार आहे ? पण तिचें माझ्यावर फार प्रेम आहे. तेव्हां क्षुल्लक कारणाकरितां मी तिला नाखूष करीत नाहीं. कारण ती माझी फार सेवा करिते, आणि ह्या एका गोष्टीखेरीज दरएक गोष्टींत माझी मर्जी सांभाळते आणि असें असल्यामुळें तिच्याही मूर्ख वागणुकी मी चालवून घेतों.'

---

## स्त्रियांची श्रद्धा.

"एकदां एका पंडितजीशीं माझी गांठ पडली. ते मूर्तिपूजेच्या विरुद्ध होते; आणि ती बंद करण्यासाठीं देशोदेशीं व्याख्यानें देत हिंडत होते,

पण त्यांची बायको घरांत देवाच्या मूर्तीचें दर्शन घेतल्याशिवाय जेवीत नसे. तेव्हां मीं त्यांना ह्मटलें कीं, ' हा काय अंधेर ? लोकांना व्याख्यानें देतां आणि घरांत काय ? सुधारणेच्या कोणत्याही कामांत आपले लोक यशस्वी होत नाहींत, त्याचें हेंच कारण. तुम्ही व्याख्यानें देण्यांत बहादूर असाल, पण घरांत बायकोपाशीं तुमचें कांहीं चालत नाहीं, तेव्हां लोकांत तुमचें वजन कोठून पडणार ? ' यावर ते म्हणाले, 'मी पुष्कळ हिंडलों, पुष्कळांना वादांत हरविलें, त्याकरितां एकदां दोन महिने कैदेंतही जाऊन आलों, पण येथें लाचार आहें. मीं पुष्कळ उपाय करून पाहिले, पण तिच्या प्रेमापुढें व श्रद्धेपुढें माझे सर्व प्रयत्न फुकट जातात. एकदां मीं तिच्या देवाची तसबीर फोडली, व मूर्ति विहिरींत फेंकून दिली, त्यामुळें तिनें लागोपाठ तीन उपास केले. इतकेंच नव्हे तर त्या वेळेस तिला इतकें वाईट वाटलें कीं, तीन दिवसांत तिची दशा मरणप्राय झाली व तिचें अंतःकरण इतकें दुखावलें कीं, माझ्यानें तें पाहवेना. मला वाटलें कीं, ही नक्की एक दोन दिवसांत खास मरणार. शेवटीं मी हरलों आणि विहिरींतून तिची मूर्ति काढून देववली व नवी तसवीर आणून तिच्या प्रतिष्ठापनेचा खर्चही केला. तसें करणें मला आवडलें नाहीं, पण विचार केला कीं, ही मेल्यास अशी प्रेमळ, प्रपंच सांभाळणारी, सेवा करणारी दुसरी बायको मिळणार नाहीं आणि मी रखडेन. त्यामुळें हें सारें चालविलें झालें ? आणि दुसरें, ह्या भांडणांनीं माझी अशी खात्री झाली आहे कीं, मूर्तिपूजकही पवित्र राहूं शकतात आणि ईश्वरास ओळखतात; तेव्हां ह्यासंबंधीं ज्यांची भावना दृढ झाली असेल, त्यांची ती भावना काढून टाकावयाची कांहीं जरूरी नाहीं, कारण मी पहातों कीं, मी एकेश्वरी मताचा आहें आणि माझी बायको मूर्तिपूजक आहे, असें असूनही मी खरोखर सांगतों कीं, जो आनंद मला संध्या करण्यानें होत नाहीं तसा आनंद तिला तसबिरीच्या दर्शनानें होतो. पदें म्हणण्यानें व अर्वाचीन भक्तांच्या भजनानें तिचा जसा लय लागतो, तसा ऋग्वेदाचे मंत्र म्हणण्यानेंही

माझा लागत नाहीं. मी पंडित असूनही मनानें पवित्र राहूं शकत नाहीं. आणि ती अशिक्षित असून तिच्या अंतःकरणांत व चेहऱ्यावर मी अद्भुत पवित्रता पहातों, तेव्हां मी थक्क होतों. मी मिळवितों व परोपकार करण्याच्या गोष्टी बोलतों; पण माझ्या हातानें कांहीं होत नाहीं. तिच्याजवळ पैसे नसतात व माझी इतकी देखरेख असतांही ती कांहींना कांहीं देतच असते. मी निरंजन निराकार अशा ईश्वराचा भक्त असूनही मला शांति मिळत नाहीं आणि ती मूर्तिपूजक असून अंतःकरणाची शांति मिळवूं शकते. तें पाहून व तिचें माझ्या ठिकाणीं व माझ्या कुटुंबाच्या ठिकाणीं असणारें प्रेम पाहून मी तिला खूष ठेवण्याकरितां माझ्या मर्जीविरहित मूर्तिपूजा घरांत ठेवितों."

---

## स्त्रिया काय करूं शकतील.

"प्रोफेसरसाहेब, अशीं निरनिराळ्या तऱ्हेचीं शेंकडों उदाहरणें आपल्याला रोज हजारों कुटुंबांत मिळतील; आणि प्रेमधर्मामुळें व सेवाधर्मामुळें ह्यांपैकीं शेंकडा नव्वद गोष्टी स्त्रियांच्याच असतात. आतां विचार करा कीं, अज्ञान स्त्रियाही सेवाधर्मानें आपल्यावर इतकी सत्ता गाजवूं शकतात, विजोड लग्नांत सुद्धां स्त्रियांचें इतकें चालतें, गुलामगिरीच्या स्थितींतील स्त्रियाही अशा रीतीनें आपल्या तळहातावर पुरुषांना नाचवूं शकतात, आणि तुमच्या मताप्रमाणें पुरुषांपेक्षां कमी हक्कदार स्त्रियाही जेव्हां आपल्या सेवेच्या बळानें सगळ्या देशाला, सगळ्या प्रजेला आपल्या मनाप्रमाणें झुकवूं शकतात; तेव्हां लग्नाला यज्ञसमज-

णाऱ्या, खरें प्रेम ठेवणाऱ्या, सेवाधर्मानें युक्त, अशा पवित्र साध्वी आपल्या प्रेमानें जगतावर किती तावा गाजवितात ह्याचा थोडा विचार करा. आपल्या संसारांत हल्लीं स्त्रिया आहेत त्यांत खऱ्या स्त्रिया फार थोड्या आहेत; आणि बाकीच्या नुसत्या स्त्रियांच्या प्रतिमा आहेत. त्या आपल्या संसारांत इतकी सत्ता भोगूं शकतात; तेव्हां देशाच्या देवी, प्रेमाच्या मूर्ति, सौंदर्याचीं मंदिरें, आनंदाचे अवतार, ईश्वराच्या सख्या, अशा ज्या देवींच्या प्रतिनिधीरूप स्त्रिया, ज्यांचें कर्तव्य संसारांत स्वर्ग आणण्याचें आहे, त्या ह्या जगताचें किती कल्याण करूं शकतील ! व आपल्या प्रेमानें किती पुरुषांवर सत्ता गाजवूं शकतील ? ह्याचा विचार करा. स्त्रिया आपल्या अंतःकरणाच्या सरळतेमुळें जगतांतील किती पापें कमी करतात, त्या आपल्या दयेमुळें जगांतील किती तऱ्हेचीं दुःखें कमी करूं शकतात, स्त्रिया आपल्या आकर्षणानें चंचल स्वभावाच्या पुरुषांना मुठींत किती ठेवूं शकतात, त्या आपल्या मधुर वाणीनें जगांत कशी गोडी आणूं शकतात, आपल्या प्रेमानें पुरुषांत पुरुषार्थ कसा वाढवूं शकतात याचा विचार करा. आपल्या सौंदर्याच्या बळावर जगांत स्त्रिया नवें सौंदर्य कसें उत्पन्न करितात, चांगल्या इच्छेनें जगाचें कल्याण कसें करूं शकतात, इतकेंच नाहीं तर आपली दीनता, पवित्रता आणि प्रेम ह्यांमुळें त्या साक्षात् ईश्वर कसा उभा करूं शकतात, हें मनांत आणा. समुद्राच्या जोरदार लाटांपेक्षां स्त्रियांच्या वाणींत जास्त जोर आहे. चंद्रसूर्याच्या आकर्षणापेक्षां स्त्रियांत जास्त आकर्षण आहे. अग्नींत जितकी उष्णता आहे, त्यापेक्षां स्त्रियांत जास्त उष्णता आहे. जगाला पुढें ढकलणाऱ्या विजेच्या शक्तीपेक्षां स्त्रियांच्या चंचलतेची जास्त शक्ति आहे. जड पृथ्वीच्या सहनशीलतेपेक्षां स्त्रियांत दुःख सोसण्याची सहनशीलता जास्त आहे. जगांतील सर्व सौंदर्यापेक्षां स्त्रियांचें सौंदर्य जास्त आहे आणि सर्व प्रेमापेक्षां स्त्रियांचें प्रेम मोठें आहे. कारण लग्नस्नेह हाच सर्व प्रेमाचें मूळ आहे, म्हणजे थोडक्यांत असें कीं,

स्त्रियांच्या हातांत परीस मणी आहे, डोळ्यांत कल्पवृक्ष आहे, जिभेंत रसायन आहे, हृदयांत अमृत आहे, आणि स्त्रियांच्या स्त्रीत्वांत स्वतः परमात्मा आहे.

" प्रोफेसरसाहेब, ह्या गोष्टी तुम्हाला अतिशयोक्तीच्या आहेत असें वाटेल, पण मी म्हणतों ह्यांत मुळींच अतिशयोक्ति नाहीं, उलट कित्येक कारणांमुळें जितकें सांगावयास पाहिजे, तितकें मी सांगूं शकत नाहीं, ह्याबद्दल मला वाईट वाटतें. असें असून माझ्या बोलण्यांत अतिशयोक्ति वाटली तर वाटूं द्या, पण हें लक्षांत ठेवा कीं, ह्या गोष्टी कांहीं आमच्या घरच्या नाहींत, ते आर्यशास्त्राचे सिद्धांत आहेत. याबद्दल पुरावा पाहिजे असल्यास फार लांब जावयास नको, सगळ्या जगांत चांगल्यांत चांगलीं रसिकांत रसिक, व अद्भुत कृतींचीं जीं दोन मोठीं पुस्तकें "

## महाभारत आणि रामायण

आहेत, तीं कशामुळें झालीं तें पहा. तीं स्त्रियांच्या प्रेमामुळेंच झालीं आहेत. तीं अद्भुत गोष्टींचीं, महान् युद्धांचीं महापुस्तकें रचलीं गेलीं, याचें कारण स्त्रियांचें प्रेम हेंच होय. लक्षांत ठेवा कीं, सीतेमध्यें पवित्रता नसती तर तो महान् ग्रंथ झाला नसता; व द्रौपदींत आधीनता नसती तर महाभारत रचलें गेलें नसतें. त्याखेरीज आणखी जीं दोन पुस्तकें घरोघर हौसेनें वाचलीं जातात, तीं शिवपुराण व भागवत. हींसुद्धां स्त्रियांच्या प्रेमामुळेंच झालीं आहेत. कारण पार्वतीनें कठीण तप केलें नसतें तर शिवपुराण झालें नसतें व गोपी अनन्य प्रेमानें कृष्णास न भजत्या तर भागवत झालें नसतें. रामाला काय सीतेशिवाय दुसरी बायको मिळत नव्हती? कीं मुद्दाम समुद्र ओलांडून रावणासारख्या भयंकर राक्षसाशीं तो युद्धाला गेला? पण स्त्रीच्या स्त्रीत्वानें रामाला ओढलें आणि त्याचेकडून रामायण करविलें. तसेंच अर्जुनाला सुभद्रा वगैरे स्त्रिया होत्या व भीमासुद्धां सर्व पांडवांना आणखी निरनिराळ्या स्त्रिया होत्या. धनुर्धर म्हणविणारा

अर्जुन थोडासा विरागी होता, सगळ्यांत मोठा युधिष्ठिर कीं ज्याच्या सल्लामसलतीनें सर्व चालत, त्याला राज्याची मुळींच जरूरी नव्हती. असं असून महाभारताचें भयंकर युद्ध झालें, त्याचें कारण काय ? त्याचें कारण दुर्योधनानें द्रौपदीचे केंस आणि वस्त्रें ओढविलीं हें होतें. तिच्या मुलांना मारणाऱ्या अश्वत्थाम्याला द्रौपदीनें माफी दिली होती, त्यामुळें अर्जुनानें त्याला वांचविलें; तशी दुर्योधनाला माफी दिली असती तर महाभारताचें युद्ध झालें नसतें. पण द्रौपदीनें सेवाधर्मानें आपल्या नवऱ्यांना प्रसन्न करून, त्यांना युद्धाकरितां तयार केलें होतें, आणि आपल्या अपमानाचा बदला घेण्याकरितां महाभारताचें युद्ध तिनें करविलें. अशा रीतीनें त्या त्या ग्रंथांतील मुख्य स्त्रिया सोडल्या म्हणजे त्यांत काय उरलें ?

" प्रोफेसरसाहेब, अशा रीतीनें हे चारही मोठे ग्रंथ स्त्रियांच्या स्त्रीत्वामुळें झाले आहेत. तेव्हां स्त्रिया आपल्या प्रेमानें जगाच्या कल्याणाचीं चांगलीं कामें कां करूं शकणार नाहींत ? जर मनांत आणतील तर अवश्य करतील. कारण स्त्री म्हणजे काय ? हें तुम्हांला माहीत आहे ? तें तुम्हांला ठाऊक नाहीं. जर तें ठाऊक असतें तर स्त्रीपुरुषांचे सारखे हक्क असें तुम्ही म्हणालां नसतां. "

---

## स्त्री म्हणजे काय ?

तें समजावयाचें असेल तर जेव्हां ईश्वरी स्नेहाची आपण दीक्षा घेतों तेव्हां प्रेमाच्या पोथींतून तें वाचावयास मिळतें. त्यावरून समजतें कीं, स्त्री म्हणजे अद्भुत बीज आहे, स्त्री म्हणजे सर्व तऱ्हेच्या प्रेमाचा महामंत्र,

जीवन देणारी संजीवनी, प्रेमरूपी आकाशांत उडावयाचें विमान, मनुष्य-रत्न उत्पन्न करावयाची खाण, ईश्वरानें धारण केलेलें मोहिनीरूप, व्यव. हारांतील शहाणपण शिकविणारी प्रोफेसर, स्त्री म्हणजे प्रेमाची ए. बी. सी. डी., ईश्वरी स्नेहाचें होकायंत्र, म्हाताऱ्याला तरुण करणारें रसायन ह्या जगताचें अमृत, स्त्री म्हणजे परमार्थाचें कुलूप उघडणारी लहानशी स्नेहरूपी सोन्याची किल्ली, ह्या संसारसागरांत कुटुंब संभाळणारी व ह्या संसारतापांतील दुःखें निवारणारी मात्रा, पुरुषाचा दैवी विसावा; काम, क्रोध, लोभ, मोह ह्यांना उडवून देणारा ' डायनामाईट, ' पुरुषांत पुरुषार्थ वाढविणारी ' ब्याटरी, ' लोखंडाचें सोनें करणारा परीस, ह्या संसाराचा प्रवाह पुढें नेणारी नदी, पुरुषाच्या मनाची सर्दी-गर्मी पाहणारा ' थर्मामिटर, ' प्रेमाचीं गीतें गाणारा ' फोनोग्राफ ' अगर आयुष्याचें कर्तव्य दाखविणारें घड्याळ आहे. स्त्री म्हणजे धर्माची बखर, प्रेमाची ' ग्यारंटी, ' अधर्माचा खडक दाखविणारी दिवादांडी आहे. स्त्री म्हणजे ईश्वराजवळ निरोप पोंचविणारा ' टेलिफोन, ' स्वर्ग दाखविणारी दुर्बिण, पुरुषाची लायकी मापावयाचें यंत्र आहे. स्त्रिया ह्या जगतावरील ' एक्स रेज ' किरणें आहेत. स्त्री म्हणजे आपल्याला पहातां येईल, समजतां येईल व वापरतां येईल अशी ईश्वराची महान् शक्ति आहे; इतकेंच नाहीं तर ज्याला सांख्यशास्त्रांत पुरुष आणि प्रकृति म्हणतात, त्याचेंच स्थूलरूप ह्या संसारांत पुरुष व स्त्री आहे, किंवा शास्त्रांत ज्याला माया व शक्ति म्हणतात, त्याचेंच स्थूलरूप जगतांतील स्त्रिया आहेत. म्हणून आम्ही असे समजतों कीं, प्रेमाच्या बलावर स्त्रिया पाहिजे तें करूं शकतील. म्हणून होईल तसें करून स्त्रियांत ईश्वरी स्नेह वाढविला पाहिजे. "

हें ऐकून स्वतः म्हटलें कीं, " तर मग माझ्या लाडकीला मी ज्या ज्या उपमा देतों त्या अर्धवटच आहेत; आणि असें असून माझे मित्र

मला म्हणतात कीं, तुम्ही अतिशयोक्ति करतां. आणि हीसुद्धां म्हणते कीं, 'तुम्ही मला हरभऱ्याच्या झाडावर चढवितां.' असें म्हणून माझेकडे पहांतें पहात म्हटलें कीं, ' माझ्या सुकाणू यंत्रा ! महाराज काय म्हणतात तें ऐक, म्हणजे आपणांला भांडावें लागणार नाहीं. कारण स्वामीजी म्हणतात तितकें सगळें मी सांगतही नाहीं व म्हणतही नाहीं. मी तर फक्त इतकेंच म्हणतों कीं, कोठें आहे, कोठें आहे, माझा स्वर्ग कोठें आहे माझ्या जीविताची दोरी, डोळ्यांच्या बाहुल्या, माझी कामधेनु कोठें आहे ? हे ईश्वरा ! माझ्या प्रिय बांधवांनों ! ह्यापेक्षांही जास्त माझ्या लाडकींत आहे—माझ्या ह्या गोड, प्रेमळ व नाजूक अशा लाडकींत आहे. तें तुम्हांला व्यावहारिक चक्षूंनीं दिसणार नाहीं, त्याला प्रेमाची आरशी पाहिजे. तें पाहण्याकरितां प्रथम स्वार्थाचें बलिदान दिलें पाहिजे. हे देवी ! तुझें प्रेम, तुझें सौंदर्य, तुझी आधीनता आणि तुझा स्त्रीपणा यांमुळें स्वाभाविकरीत्याच असें वाटतें कीं, तुला सोडून मी दुसऱ्या कोणालाही भजूं नये. तुझ्याशिवाय दुसरें कोण माझ्या अंतरात्म्याला शांति देईल ? तुझ्याशिवाय माझ्या जीवनांत अमृत ओतील ? तुझ्या खेरीज दुसऱ्या कशानें मी तृप्त होईन ? तुझ्याशिवाय ह्या श्रेष्ठतेच्या शिडीवर मला कसें चढतां येईल ? तुझ्या डोळ्यांतून पडणाऱ्या अमृताखेरीज मी कसा वांचूं शकेन ? तुझ्या अंतःकरणांतून वाहणाऱ्या प्रेमाच्या झऱ्याखेरीज मी कसा पोहूं शकेन ! तुझ्याशिवाय मला मोक्षाचा रस्ता कोण दाखवील ! असा कोणताही रस्ता, कोणताहि धर्म किंवा कोणतीही जडीबुटी आहे का ? कीं, जेथें माशुकांच्या गोष्टी, ध्यान व दर्शन घडेल. कोणतीही युक्ति, विद्या किंवा शोध असा काढा कीं, ज्यामुळें तिच्या सौंदर्याच्या गोष्टी व नांवाच्या अभ्यासाखेरीज दुसरें कांहीं सुद्धां शिकावें लागणार नाहीं. आत्मज्ञानानें परमात्म्याच्या ज्ञानाखेरीज दुसऱ्या सर्व वस्तु लय पावतात. तसें स्त्रीच्या—धर्मपत्नीच्या ज्ञानाखेरीज बाकी सर्व वृत्ति लय पावतील, असें कांहीं मला दाखवा.

अरे लपून राहिलेल्या स्वाभाविक फोटोग्राफा ! तुझ्यासंबंधीं जेव्हां मला अशा प्रकारची ऊर्मि येते तेव्हां कांहीं वेळां असा विचार येतो कीं,

## तुझ्यांत ही शक्ति कोठून आली ?

अग, तूं मला सांग तर खरें कीं तुझ्यांत इतकी गोडी कां ? इतकें आकर्षण कां ? तुझ्यांत कशाकरितां इतकें सौंदर्य आहे ? तुझ्यांत इतकें सुख, इतकी जादू व इतकें रहस्य कां आहे कीं, मी वेड्यासारखा तुझ्या पाठीमागें भ्रमतों ? ईश्वरी विभूति म्हण कीं स्वर्ग म्हण, तें मला तुझ्याच ठिकाणीं भासमान वाटतें ! तूं माझ्या संसारसागराची नौका आहेस व माझ्या आयुष्यांतलि सुखनिधान तूंच आहेस. मला वाटतें कीं, आपल्या दृष्टिबळानें मला समाधि देणारी तूं कोणी योगिनी आहेस. हजारों गुरूंना मला जें शिकवितां आल नसतें, शेंकडों भयंकर भयांनीं माझ्या मनावर जो परिणाम झाला नसता, लाखों पुस्तकें वाचण्यानें जें मीं मिळविलें नसतें, शेंकडों सभांनीं जें मला समजलें नसतें, हजारों कायद्यांनीं जें कोडें सोडविलें नसतें, अनेक धर्मक्रियांनीं जें मिळवितां आलें नसतें, अशा ज्या ज्या कांहीं गोष्टी त्या सर्व तुझ्या प्रेमयुक्त दृष्टीच्या हलण्यानें, तुझ्या एका शब्दानें, तुझ्या दर्शनानें, अगर फक्त तुझ्या स्मरणानें मी करूं शकतों ! वेडे ! हें सर्व तुला दिसतें का ?. पहा तर खरें कीं हें कशाकरितां आहे ? सगळ्या जगांतलि कोणत्याही वस्तूनें जो परिणाम होणार नाहीं, त्यापेक्षां जास्त तूं करूं शकतेस, हें आश्चर्य नाहीं का ? प्रिये ! ही शक्ति तुझ्यांत कोठून आली ?

## आतां मला असें वाटतें

कीं, मोरांच्या पिसांत, हरणांच्या नेत्रांत, समुद्राच्या तरंगांत, चंद्राच्या प्रभेमध्यें, आकाशाच्या रंगांत अगर निरनिराळ्या वनस्पतींत जें सौंदर्य आहे तें सर्व स्वाभाविकरीत्याच तुझ्या सौंदर्यांत आहे.

"अहो गोड मैनांनो ! तुम्ही कोणाचीं गाणीं गातां ? अहो नाजूक बुलबुलांनो ! तुम्ही कोणाची स्तुति करतां ? अहो रसिक कोकिलांनो ! तुम्ही आपल्या कू कू शब्दांनीं कोणाला हांका मारितां ? हे काव्य-लहरींनो ! तुम्ही कोणाच्या हृदयाचीं द्वारें उघडतां ? हे दैवी रसज्ञते आणि मधुर वाद्यांनो ! तुमचा भोक्ता कोण ? हे मधुर गायना ! तुझ्यांत स्वर्गीयता कोणीं आणिली ? सगळेजण एकदम म्हणा कीं, 'प्रेमानें ! प्रेमानें ! !"

" अशा रीतीनें जर तुझ्या सौंदर्यानेंच जगाचें सौंदर्य वाढतें तरें मला अशी प्रार्थना करूं दे कीं, तुझ्या मनोहारित्वामुळें माझें मन हरण होऊं दे ! मी तुझ्यामुळें जरी संतुष्ट आहें, तरी एकही बाबतींत कसा तृप्त होत नाहीं ? तूं माझे सर्व विकार नष्ट केले आहेस. तुझ्या-जवळ माझा मद–सर्व अहंभाव–मी विसरून जातों. तुझ्याजवळ माझा काम भक्त होतो. अशाच रीतीनें दुसरे विकारही तुझ्या जादुगारपणानें नाहींसे झाले आहेत; आणि त्यांनीं आपला जातिस्वभाव सोडला आहे; आणि असें असूनही एका गोष्टींत मी बुभुक्षितच राहिलों आहें. तुझ्या-सारखा कल्पवृक्ष असूनही माझी इच्छा पुरी झाली नाहीं. तुझ्यासा-रखी मोहिनी हजर असतां मी मोहांत राहिलों; आणि तुझ्यासारखा गुरु असून माझी तृप्तता झाली नाहीं; तेव्हां आतां मी कोणाला शरण जाऊं ? मला सर्व मिळालें. माझा सर्व मोह नाहींसा झाला आहे. तरी हे देवी ! तुझ्या मधुरतेसंबंधीं माझी तृप्ति होत नाहीं. कितीही पाऊस पडला तरी चातक जसा तान्हेलाच राहतो; सूर्याचा प्रकाश जों जों

जास्त तों तों घुबडाचा आंधळेपणा जास्त जास्त, तसें जों जों तुझी मधुरता जास्त तों तों माझी रसिकताही वाढतेच आहे. जसें गरीब भिकाऱ्यांना आणि श्रीमंत सावकारांनाही कांहीं कांहीं खाण्याची इच्छा असतेच, तसें अगर पावसाच्या पाण्यानें नदीचे मोठमोठे पूर सागराला मिळतात तरी सागर आपली मर्यादा सोडीत नाहीं, तसेंच हें आहे.

"तुझ्यांत जेव्हां मला अशी अलौकिक गोडी वाटते, तेव्हां स्वाभाविकरीत्याच मला अशी इच्छा होते कीं, तुझ्या गुणाची जी गोडी मी अनुभवतों ती दुसऱ्याला दाखविण्याचा एखादा मार्ग आहे का ? हें पहावें. माझ्या मित्रांना एखादी नवी गोष्ट दाखवून देणें हें माझें कर्तव्य आहे. ह्या जगांत मनुष्य स्वसुखार्थ नवे नवे शोध आपल्या बुद्धीच्या जोरावर करीतच असतो; पण हे लाडके, ते तुझ्या मधुरतेपर्यंत पोहोंचूं शकत नाहींत. तूं ती तूंच आहेस. तुझी मधुरता ही एक अलौकिक वस्तु आहे. शास्त्रें म्हणतात कीं, स्वर्गांत फार सुख आहे, पुष्कळ गोडी आहे, पण तुझी मधुरता सोडून स्वर्गांत जाण्याचें कोणता बुभुक्षित पत्करील ? हे लाडके ! तुझी मधुरता दिव्य आहे, ती कोणाच्याही शब्दानें सांगतां येणार नाहीं, कोणत्याही भाषेंत सांगितल्यानें ती समजणार नाहीं, तिला कोणतीही उपमा देतां येणार नाहीं, असें मी जेव्हां लोकांना सांगेन, तेव्हां ते हें कसें खरें मानतील ? माझ्या बोलण्यावर ते कसा विश्वास ठेवितील ? शंकाखोर स्वभावाच्या, मायेच्या मोहांत फसलेल्या, इंद्रियजन्य भोग देणाऱ्या पदार्थांखेरीज दुसरे सुख देणारे पदार्थ न समजणाऱ्या माणसांना अनुभवाशिवाय तुझ्या मधुरतेची कशी खात्री होणार ? हे देवी, मी लाचार बनलों आहें कीं कोणत्याही तऱ्हेनें मानवांच्या विचित्र मनांत तुझ्या मधुरतेचें महात्म्य उसवावयाची शक्ति माझ्यांत नाहीं; आणि जोंपर्यंत आम्ही तुझी मधुरता समजूं शकत नाहीं– अनुभवूं शकत नाहीं–तोंपर्यंत सृष्टि स्वर्गमय कशी होणार ? तोंपर्यंत मनुष्यें देवता कशीं होतील ? तोंपर्यंत अंतःकरणें ब्रह्मांडासारखीं

विशाल कशीं होतील ? आणि आत्म्याचें स्वरूप कसें ओळखूं लागेल ? हे प्रिये ! तुझ्या मधुरतेच्या रसानें, तुझ्या खुबीच्या अंजनानें, तुलाही न समजणाऱ्या वशीकरणविद्येनें जग वश होत आहे. माझ्या बोलण्यानें कांहीं होणें नाहीं. म्हणून तुझी जी मधुरता मला मिळते, ती जगताला मिळेल असें कांहीं कर. महाराज, माझ्या प्रियेसंबंधीं मी जेव्हां असें समजतों तेव्हां आम्हां दोघांमध्यें वाद सुरू होतो.

---

## आमचा वाद.

" ती म्हणते, 'तुमच्यामुळेंच मी आहें.' पण मी एंजिन आहें; आणि वाफ तर तूं आहेस. मी झाड असलों तर पोसणारा वारा तूं आहेस. मी समुद्र असलों तर भरती ओहटी आणणारा चंद्र तूं आहेस. अशा रीतीनें मी कांहीं जरी असलों तरी अर्धा आहें व त्याला पूर्ण करणारी तूं आहेस. म्हणून तूं माझा प्राण—माझा स्वर्ग—आहेस, तेव्हां जन्मोजन्मीं तूंच मला मिळावीस अशी माझी प्रार्थना आहे, असें मी म्हणतों.

---

## प्रियेमध्यें ईश्वरभाव.

"स्त्रियांत असणाऱ्या स्त्रीत्वामुळें माझ्या प्रियेसंबंधीं जेव्हां मला असें अनुभव येत तेव्हां मी प्रेमाचीं पुस्तकें वाचीं. त्यांत मला एक गोष्ट आढळली कीं, एकदां मजनूला एका धार्मिक माणसानें म्हटलें कीं, 'अरे

मजनू ! तूं लयलाच्या पाठीमागें इतका वेडा झाला आहेस. तर हेंच प्रेम ईश्वरावर ठेव, म्हणजे ताबडतोब तुझा उद्धार होईल.' तेव्हां मजनूनें विचारलें कीं, 'ईश्वर कोठें आहे ?' तेव्हां तो मनुष्य म्हणाला, ' ईश्वर सर्वत्र आहे, कोणतेंही स्थळ किंवा वस्तु अशी नाहीं कीं, जेथें ईश्वर नाहीं. ' तेव्हां मजनु म्हणाला, ' माझ्या लयलामध्येंसुद्धां ईश्वर आहे ना ? ' तेव्हां तो म्हणाला ' होय. ' तेव्हां मजनु म्हणाला, ' अहाहा ! माझी प्रिया ! ईश्वराचा ईश्वर ! आतां मी दुसरा ईश्वर शोधण्यास कशाला जाऊं ? '

" महाराज ! स्त्रीपुरुषांचे समान हक्क मानणाऱ्या प्रोफेसरसाहेबांना ही गोष्ट रुचण्यासारखी नाहीं. त्यांना त्यांत अतिशयोक्ति वाटेल. पण मला माझ्या लाडकीवरच्या प्रेमामुळें ते विचार फारच आवडले, इतकेंच नव्हे तर असें वाटलें कीं, मजनूप्रमाणें मीही माझ्या प्रियेला केव्हां ईश्वर मानावयास लागेन ? " असें म्हणत म्हणत त्यांनीं अर्थपूर्ण अशा गोड नजरेनें माझ्याकडे पाहिलें; आणि माझी नजर त्यांच्या नजरेस मिळतांच लाजेमुळें मी खालीं पहावयास लागलें. तेव्हां स्वतः म्हटलें, ' महाराज, हे विचार फार उत्तम आहेत असें समजण्यांत मी कांहीं चूक तर नाहींना करीत ? '

तेव्हां महाराज म्हणाले, " आपल्या प्रियेंत ईश्वरभाव पहाणें ही प्रेमाची उत्कृष्टता आहे, प्रेमांतील सत्य व रहस्य आहे; प्रेमी जनांची पुरती परीक्षा आहे; आयुष्याची सार्थकता आहे. आपल्या प्रियेमध्यें ईश्वरभाव पहाणें ही कांहीं सोपी गोष्ट नाहीं. पण स्त्रिया म्हणजे पायांतील जोडा असें समणाऱ्या पुष्कळांना हें मुळींच आवडणार नाहीं. तेव्हां काय ? एक तर तसे मानणारे मूर्ख तरी किंवा प्रेमाचे देव तरी असले पाहिजेत. अशांना देव मानणें हें आम्हांला योग्य वाटतें. त्यांच्या एकतानतेला व मनोनिग्रहाला आम्ही मान देतों. आम्हीच असें म्हणतों असें नाहीं; पण आपले जुन्यांत जुने व मोठ्यांत मोठे देव महादेव ह्यांनीं

आपली स्त्री उमा हिला उमामहेश्वर रूपानें मान देवविला आहे. रामाच्या प्रियेच्या नांवानें पहाड आणि गुंफा दणाणल्या आहेत; आणि वानरांसारखे अज्ञान प्राणी व पोपट यांच्या सारख्यांच्या तोंडांत 'सीताराम' हें नांव खेळून राहिलें आहे. कृष्णानें राधेला जगांत पूजनीय केलें, तें तर असो; पण वृंदावनच्या गोपी आणि त्यांच्या बरोबरच भक्ति करणाऱ्या दोनशेंबावन वैष्णवांनाही त्यानें श्रेष्ठ ठरवून त्यांचीं कीर्तनें झालीं आहेत. हे देवाधिदेव! आपण जर आपल्या भक्तांना अशा रीतीनें सर्वांच्या देखत नमलां आहां; आणि जगाला वांकवायला लाविलें आहे; तेव्हां हे देवेंद्र! मी माझ्या प्रियेला ईश्वररूप मानून भजूं लागलों तर त्याबद्दल मला माफ करा. याहून जास्त चांगला रस्ता मला ठाऊक नाहीं; कारण मला माझ्या गुरूनें असें शिकविलें आहे कीं, प्रियेमध्यें ईश्वररूप पहाणें ही प्रेमाची परिपक्वता आहे, तें प्रेमाचें रहस्य आहे, ती प्रेमाची सार्थकता आहे, तें मोक्षाच्या शेवटल्या पायरीवर चढणें आहे. कारण स्वाभाविकतेचा ईश्वरी रस्ता म्हणजे प्रेम होय. जरी भक्ति आणि ज्ञानाशिवाय ईश्वरी रस्त्यावर चालतां येत नाहीं तरी

## भक्ति आणि ज्ञानाचा दरवाजा प्रेम आहे.

प्रेमाखेरीज भक्ति अगर ज्ञान यांत दाखल होतां येत नाहीं आणि समजा कीं, दुसऱ्या रस्त्यानें कदाचित् दाखल होतां आलें तरी, प्रेमाशिवाय त्या स्थानीं आपण शोभतही नाहीं आणि खरा आनंद मिळवूं शकत नाहीं. ह्या जगतांतील व स्वर्गांतील कोणत्याही वस्तूपेक्षां जास्त सौंदर्य व जास्त आनंद प्रेमांत आहे. त्यामुळेंच लहान मुलांचें बोबडें बोबडें बोलणें आपल्याला गोड लागतें, त्यामुळेंच तरुणपणचें मुग्ध हास्य आपल्यास प्रिय वाटतें; आणि त्यामुळेंच गरिबांकडे दया धांवते, वृद्धांची सेवा करावीशी वाटते, आणि शिक्षेपेक्षां क्षमा आपल्याला गोड वाटते. प्रेमामुळेंच आपण सर्व एका सांखळीनें जोडलेले

आहों. ह्या सर्वांचा हेतु सौंदर्य व आनंद आहे; व तो प्रेमांत आहे. म्हणून तो ईश्वरी रस्ता आहे व तो स्त्रियांमध्यें राहिलेला आहे; आणि म्हणून ह्या जगांतील स्त्रियांत कोणत्याही रीतीनें प्रेम कमी होऊं नये असें आम्ही इच्छितों."

आम्ही असें बोलतों तों आमच्या ओळखीचे एक शास्त्री तेथें आले. त्यांची प्रोफेसर साहेबांशीं ओळूख करून देऊन बोलणें पुढें सुरू केलें. प्रोफेसर म्हणाले, "महाराज, आपलें सर्व ह्मणणें खरें व स्त्रियांसंबंधीं आपण इतके उच्च प्रतीचे विचार ठेवितां ह्यासाठीं मी आपला आभारी आहें. मला कबूल केलें पाहिजे कीं, आमच्यापेक्षां अपाले विचार उच्च दर्जाचे आहेत. आमच्यापेक्षां तुम्ही स्त्रियांची प्रकृति चांगली समजतां, आमच्यापेक्षां तुम्ही त्यांचें सौंदर्य संभाळूं शकाल, त्यांना उच्च दर्जावर चढवूं शकाल, आमच्यापेक्षां लग्नस्नेह तुम्ही जास्त मजबूत करूं शकाल; आणि आमच्यापेक्षां स्त्रियांना सुखी करायची तुमची योजना जास्त चांगली आहे. पण हें सर्व आचरणांत कोठें आहे ? विचार जरी फार चांगले तरी ते आपल्या आचरणांत नसल्यानें त्यांनीं आपलें कल्याण होणार नाहीं. कारण कीं, आपला देह स्थूल आहे, तेव्हां सूक्ष्म विचारांनीं आपलें पोषण होणार नाहीं; म्हणून सूक्ष्म विचारांबरोबर त्याला अनुसरणारे स्थूल आचार पाहिजेत, तरच आपलें जीवंन टिकूं शकेल, तरच आपण पुढें जाऊं शकूं, व तरच हे विचार शोभूं शकतील; इतकेंच नाहीं तर आचारांत न येणाऱ्या विचारांनीं सरळ हृदयी मनुष्यालां उलट त्रास होतो. कांहीं तरी बडबडणाऱ्या दांभिकांना तशीं कारणें पुरतात; आणि आमच्या सारख्याला थट्टा करावयास ठीक फावतें. जसे वेदांतांतील विचार फारच चांगले आहेत, पण आमचे हल्लींचे लोभी वेदांती वेदांतांतले विचार आचारांत आणूं इच्छित नाहींत; आणि त्यामुळें किती नुकसान होतें हें तुम्हांला ठाऊकें नाहीं काय ? तोंडानें म्हणावें 'मी ब्रह्म आहें,' आणि साध्या गोष्टीला भ्यावें;

लोकांना सांगावयाचें ' जग मिथ्या आहे, ' आणि आपण आपला देह खरा मानावयाचा, त्याला कांहीं सोसत नाहीं, अर्धा तास चहा उशीरां मिळालेला खपत नाहीं ! माया मिथ्या आणि माझा पैसा खरा. सर्व ब्रह्म पण दुसऱ्या ब्रह्मापासून मला विटाळ होतो, हें कसें चालेल ? तत्त्वें बोलण्यांत उत्तम पण वागण्यांत नाहींत. तसें स्त्रियांत असणाऱ्या सेवाधर्मासंबंधीं तुमचे विचार उत्तम असले तरी तसें आचरण कोठें आहे ?

---

## आपल्या हल्लींच्या स्त्रिया.

" तुम्ही प्रेमाच्या गोष्टी सांगतां; तसलें प्रेम उत्पन्न होणारीं लग्नें तरी आपल्यांत कोठें आहेत ? तुम्ही ज्या सौंदर्याच्या गोष्टी सांगतां तें सौंदर्य हल्लींच्या स्त्रियांत कोठें आहे ? आणि तुम्ही स्त्रियांकडून ज्या तऱ्हेच्या सेवाधर्माची अपेक्षा करितां त्याची त्यांना कल्पना तरी कोठें आहे ? तुम्ही प्रेम, सौंदर्य, आधीनता आणि आनंद यांच्या स्वर्गीय गोष्टी बोलतां, पण तें सर्व तुमच्यासारख्या एका दोघांच्या डोळ्यांतील एका कोंपऱ्यांत घटकाभर पडलेलें असतें; त्यानें काय होणार ? कारण आम्ही प्रत्यक्ष पाहतों कीं, प्रेमाच्या जोड्यांऐवजीं विजोड पुष्कळ आहेत, लग्नाच्या यज्ञाऐवजीं रूढीची गुलामगिरी आहे; प्रेमाच्या जागेवर स्वार्थ आहे, कठोरता आहे, नफ्यातोट्याचा हिशेब आहे, रसहीनता आणि पशुवृत्तीचें प्राधान्य आहे. सौंदर्याऐवजीं बेडौलपणा आहे, नकलीपणा व उधळपट्टी आहे. दागदागिन्यांनीं मढविलेलें शव जसें दिसतें, तशा हल्लींच्या सुंदर स्त्रिया दिसतात. आधीनतेसंबंधीं सुद्धां असाच वरकरणीपणा ! त्यासंबंधीं उदाहरणें आपणच आधीं

दिलीं आहेत; तींच मी आपल्याला परत करितों. आपण स्त्रियांच्या आधीनतेलाच मुख्य तत्त्व समजतां; पण तुमच्या स्त्रियांत ती कोठें आहे ? जर आपल्या स्त्रियांत आधीनता असती व त्या आपल्या विचाराप्रमाणें चालत्या तर आपल्या देशाचे असे हाल कां होते ? तुम्ही मोठ्या जोरानें सेवाधर्माच्या गोष्टी बोलतां आणि स्वर्गीच्या देवाप्रमाणें दयेच्या कामाकरितांच त्यांचा जन्म आहे असें म्हणतां,पण शेजारणीला केर काढावयास केरसुणी देण्यांत आपल्या स्त्रियांचें मन किती मागें पुढें होतें हें तुम्हांला ठाऊक आहे ना ? जरा कोणी विळी मागितल्यास ती द्यावी लागेल म्हणून ' कालपासून सांपडत नाहीं,' असें स्त्रिया खोटें बोलतांना तुम्हीं ऐकिलें आहे कीं नाहीं ? आणि जर हें सर्व खरें आहे, तर आपल्या स्त्रिया आपल्या समाजाची सेवा कशी करणार ? स्त्रिया आनंदाचा अवतार आहेत, असें तुम्ही म्हणतां; पण महाराज, आम्हीं तर त्यांच्यांत दुःखाखेरीज कांहींच पाहिलेलें नाहीं. शेंकडा नव्वद दोष स्त्रियांत आहेत; त्यांत आनंद कोठेंही दिसत नाहीं. आपल्या उच्च कल्पनांत आनंद आहे हें खरें; पण आपल्या स्त्रियांच्या आचरणांत तो कोठें दिसत नाहीं; म्हणून तसे काल्पनिक विचार सोडून त्यांच्या हातांनीं होण्यासारखीं कामें त्यांना सांगितलीं पाहिजेत. मी हल्लीं पहातों कीं, आपल्या स्त्रियांपैकीं शेंकडा पन्नास स्त्रिया तर आपल्या आचारविचारानें, रीतिभातीनें, रूपारंगानें आणि अज्ञानपणानें, कोणाही चांगल्या माणसांत असंतोष उत्पन्न करणाऱ्या आहेत. चाळीस स्त्रिया साधारण माणसांना साधारण प्रकारचा संतोष देऊं शकतील, अशा मध्यम प्रकारच्या आहेत. पण त्या सर्व स्त्रियांमध्यें कांहींना कांहीं दोष असतातच आणि ते त्यांच्या चेहऱ्यांत, डोळ्यांत, पोषाखांत व चालचलणुकींत उघडपणीं दिसतात. बाकी दहा राहिल्या; त्यांच्यांत एक एक कांहीं तरी खास गुण असतो. कोणी रूपरंगानें, कोणी आचारविचारांत, कोणी सेवा-

धर्मनीतींत अगर कोणी भक्तींत श्रेष्ठ आढळतात; तरी पण त्यांच्यांत दोष दिसतात; त्यामुळें आरंभापासून त्यांच्यांत ते न येण्याकारितां सुरुवातीसच त्यांच्या योग्य कामें त्यांना द्यावयाचीं आणि तीं देण्याकरितांच त्यांना पुरुषासारखे हक्क द्यावयाचे असें आम्ही म्हणतों; आणि त्याच्या ऐवजीं दोष, रोग वगैरे पाहूनही तुम्ही म्हणतां कीं, स्त्रिया दयेच्या देवी आहेत, स्वर्गाचें दुसरें रूप आहेत, प्रेमाच्या जिवंत मूर्ति आहेत, सौंदर्याचा अवतार, आनंदाचें भांडार आणि ईश्वराची महान् शक्ति आहेत. महाराज हें सर्व कोठपर्यंत टिकेल! रावसाहेबांना एक ह्या देवी मिळाल्या आहेत, तेव्हां त्यांना वाटतें कीं, सर्व स्त्रिया अशाच असतात; पण जेव्हां ते वहिनी सोडून जगांतील इतर स्त्रिया बघतील तेव्हां दोष आणि अपूर्णता ह्याशिवाय त्यांना कांहीं दिसणार नाहीं. ही स्थिति लौकर सुधारण्याकरितां आम्ही समान हक्क देण्याचें म्हणतों, कारण जरी महाराजांचें विचार फार उत्तम आहेत, तरी पण त्यांचा अंमल त्यांचेकडून लौकर होणार नाहीं आणि आमची योजना आजपासून अंमलांत येण्यासारखी आहे. म्हणून आम्ही स्त्रियांना स्वतंत्रता देण्याचें म्हणतों."

स्त्रीजातीचा अपमान करणारे प्रोफेसरसाहेबांचे हे विचार शास्त्रीबोवांना फार पसंत पडले, त्यामुळें मी बोलणार इतक्यांत मला थांबवून ते म्हणाले, "वाहवा प्रोफेसरसाहेब, तुम्हीं खुबी केलीत. खरोखर तसेंच आहे. महाराजांबरोबर माझा नेहमीं तंटा होतो. ते म्हणतात, स्त्रिया सुधारतील तेव्हांच आपणांस पुढें जातां येईल, तोंपर्यंत आपण कधींही पुढें जाऊं शकणार नाहीं; आणि मी म्हणतों कीं, त्या कधीं सुधरावयाच्या नाहींत. ह्या बाबतींत तुम्हांला माझा अभिप्राय जास्त महत्त्वाचा मानावा लागेल! कारण मी माझ्या अनु-

भवाच्या आणि घरच्याच गोष्टी सांगतों आणि महाराज कल्पनेबरोबर खेळतात. महाराज म्हणतात, स्त्रिया जगताच्या देवी आहेत, त्या आनंदाचा अवतार आहेत, त्यांच्या हातांत भविष्याची दोरी आहे, त्यांच्याशिवाय पुरुष अर्धे असतात; ह्मणून त्यांच्या मदतीशिवाय आपलें व आपल्या देशाचें कल्याण होणार नाहीं. महाराजांचे हे विचार ऐकून मला असें वाटतें कीं, महाराज संन्यासी झाले तरी पण त्यांचा अजून स्त्रियांची स्तुति करण्याचा मोह गेला नाहीं; आणि असें वाटण्याचें कारण माझा अनुभव असा आहे कीं, स्त्रिया म्हणजे उपाधि, स्त्रिया म्हणजे माया, ह्या जगतांतील सर्वांत थंड चालणारे प्राणी, दुःखाच्या मूर्ति, रोगांचीं घरें, फुकटखाऊंच्या प्रतिमा, हटवादी-पणाचे नमुने, थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे कमी अकलेचा, मनाचे कोतेपणाचा आणि मूर्खपणाचा स्त्री हा एक नमना आहे. त्यांना फुकट भांडण घेऊन भांडतां येतें, लोकांचीं घरें मोडण्याची 'कंपनी' काढतां येते, अशा प्रकारचे शेंकडों दोष त्यांच्यांत आहेत. त्या कधींही सुधारू शकणार नाहींत, म्हणून ज्ञात्यांनीं त्यांना 'नरकाचें द्वार' म्हटलें आहे. महाराज माझे हे विचार ताईंना मुळींच आवडणार नाहींत; त्यांना ते अपमानकारक वाटतील. पण मी माझ्या स्वतःच्या अनुभवाचें सांगतों; त्यांत कांहींसुद्धां खोटें नाहीं. मला कांहीं तुमच्यासारखें कल्पनेशीं खेळावयाचें नाहीं, किंवा असें झालें पाहिजे, तसें झालें पाहिजे, असेंही सांगावयाचें नाहीं. पण मी आपल्या घरसंसारांतील दररोजचे अनुभव तेच सांगतों. या गोष्टी कांहीं लोकांच्या घरच्या नाहींत; माझ्याच घरच्या आहेत, आणि त्या दहा पांच वर्षांपूर्वींच्या नसून आजच्याच आहे.

## शास्त्रीबोवांच्या घरच्या गोष्टी.

"मला सकाळीं आठ वाजतां उठण्याची संवय आहे. कारण मी रात्रीं बारा वाजेपर्यंत जागतों व लोकांच्या येथें फुकट जेवणावर बराच हात मारलेला असतो, यामुळें मला लौकर उठवत नाहीं. पण आज घरांत थोडासा खटका उडाला, त्यामुळें मी सहा वाजतां लौकर जागा झालों. भांडणाचें कारण असें होतें कीं, माझ्या नुकत्या लग्न झालेल्या, भावजयीला नेण्याकरितां तिची चुलती वगैरे आली आहे, त्यांना रात्रीं मेजवानी झाल्यामुळें जरा भजीं वगैरे जास्त खाण्यांत येऊन तहान तहान झाली, तेव्हां सकाळीं तिच्या चुलतीनें तिच्याजवळ गार पाणी मागतांच,तिनें माझ्या बहिणीच्या घागरींतील पाणी नेऊन दिलें. झालें. तिचें पित्त खवळलें. 'श्रीमंताची झालीस म्हणून काय झालें ? पारोशानें माझ्या माठाला शिवायचें कां ? काल आली नाहींस तों आज माहेरच्यांची बाजू इतकी संभाळतेस ? आम्ही म्हणजे कोण ? वगैरे वगैरे बोलणीं सारा दिवस चाललीं होतीं. माझी बहीण बालविधवा आहे, शिवाय ती धर्मिष्ठ आहे, आणखी श्रीमंतही आहे; असें असून दोन दमडीच्या मातीच्या घागरीसाठीं तिनें नव्या सासुरवासणीला इतकें बोलावें का ? शिवाय बहिणीशीं भांडण झालें. मी दोन शब्द बोलावयास गेलों, तों ती रुसून बसली आहे आणि आज जेवली नाहीं. अशा आपल्या स्त्रिया. त्यांना स्वर्गीच्या देवी म्हणाव्या का काय म्हणावें ? ह्या दयेचीं कामें करणार का दुष्टतेचीं ? सांगा आतां तुमच्या कल्पना खऱ्या कीं आमचे अनुभव खरे ? हा तर फक्त प्रातःकाळचा पहिला अध्याय झाला. आतां

### दुसरा अध्याय

ऐका. त्यानंतर मला दोन वेळां जास्त शौचास जावें लागलें तेव्हां माझी भावजय म्हणाली, ' कां आज जास्त वेळासें ? पोटबीट बिघडलें

कीं काय ? ' तसें मीं म्हटलें, ' होय, असें थोडेंसें झालें आहे खरें. कारण रात्रीचा शिरा कच्चा होता. मी थोडा खाल्ला तरी पाणी पाणी झालेंच. ' तेव्हां ती म्हणाली, ' तुमच्या राधाबाईनींच तो केला होता. तेव्हां मीं बायकोला म्हटलें,' हें ग काय ? असा का कोणी शिरा करितात ? ' तशी ती मोठ्या ताऱ्यांत म्हणते, ' मग त्यांत काय झालें ? जसे देव तशी पूजा. त्यांनीं आम्हांला लग्नांत कसें हिरवें बेसन घातलें होतें ? ' सांगा आतां मीं काय जबाब द्यावा ? आणि सांजा गिच्च गोळा झाल्यामुळें तो मोकळा करण्याकरितां आणखी जास्त शेरदीड शेर तूप मात्र खपलें. हें सर्व कशाकरितां तर तिची उसनफेड करण्याकरितां. ह्यांच्या मदतीनें आपण कसें पुढें सरणार ? आतां

## तिसरा अध्याय

ऐका. माझी धाकटी बहीण म्हणते, ' आतां सुनेला पाठवावयाची नाहीं. दोन तीन खेपा पडल्या म्हणजे बरं. व्याही तसेच आहेत. जर बोलावणें येतांक्षणीं पाठवावयास लागलों, तर ते डोक्यावर बसतील. तुम्हांला तीनदां परत पाठविल्यानंतर माझ्या सासूनें मला पाठविलें होतें; शिवाय मला तर तेथें अतिशय कैचींत राहावें लागे. आपल्या मावशीच्या यमुनेचीही तीच स्थिति; आणि ही तर घोड्याएवढी मोठी आहे. तेव्हां हिला सध्यां पाठवावयाची कांहींच जरूरी नाहीं. त्यांना गरज असेल तर पुन्हां येतील. ' माझ्या आतेला ही मसलत पसंत पडली. त्यामुळें तिनें आम्हांला कोणाला न विचारतांच विहिणीला सांगितलें कीं, ' मुलीला सध्यां पाठवीत नाहीं, दोन तीन महिन्यांनीं या. ' बर, इतकेंच नाहीं, तर आणखी चार पांच नात्यागोत्यांच्या घरीं जाऊन सांगितलें, त्यामुळें विहिणीनें मारे गोंधळ घातला, तिनें आपल्या ओळखीचीं चार पांच माणसें मध्यस्थी करण्याकरितां आणलीं, तिच्या भावानें चार पांच गृहस्थ मंडळी माझ्या वडील भावाकडे चार शब्द सांगावयास आणली व त्यामुळें त्यांना वाईट वाटलें. ते म्हणाले, ' आपण पंधरा

दिवसांच्या बोलीनें मुलीला आणली आणि त्याला एक महिना झाला. शिवाय त्यांचीं दोन चार पत्रें आलीं, त्यांच्या उत्तरांत आपण 'हो' म्हणून लिहिलें. वायकांना कांहीं कळत नाहीं: नव्हती पाठवावयाची तर आरंभाला हो कशाला म्हणावें ? शिवाय आपले येथें आज कांहीं कारण नाहीं, त्यांच्या येथें मुंज आहे; तेव्हां पाठविली पाहिजे. चार लोक काय म्हणतील ? तुम्हीं उगीच गांवांत कां सांगितलें कीं, सुनेला पाठवीत नाहीं म्हणून; आणि विनाकारण चांगल्या व्याह्यांशीं वांकडें कां आणतां? तें ऐकून माझी वडील बहीण म्हणते, 'मग असले श्रीमंत तर ते आपल्या घरचे असतील. मुलीची गरज असेल तर येतील पुन्हां. पत्र लिहिलें म्हणून काय झालें ? हो म्हणावेंसें वाटलें हो म्हटलें; आतां नाहीं म्हणतों. पाठवीत नाहीं, असें फक्त मावशीला सांगितलें होतें, ती कोणापाशीं बोलली असेल. त्यांत अब्रू कसली ? कां आत्याबाई खरें ना ? ' आत्याबाई म्हणाल्या, 'हो, हो, त्यांत काय ? चाललेंच आहे.' महाराज असें सारखें चाललें होतें पण अद्याप कांहीं ठरलें नाहीं. तें पाहून मला वाटतें, स्त्रिया कधींही सुधरूं शकरणार नाहींत. आतां आजच

## चौथा अध्याय

ऐका. माझ्या भावाचे वरील शब्द ऐकून माझ्या आईला वाटलें कीं, मुलीला तर पाठवावी लागणारच; तेव्हां ती म्हणाली, 'तिला जावयाचें असेल तर ती जाईल. पण मी तिच्या बरोबर उंची साड्या आणि दागिने देणार नाहीं. तुम्हां सर्वांना आतां शहाणपण आलें आहे; पण मी सासरीं जात होत्यें तेव्हां माझी सासू कांहीं एक देत नव्हती. दोन जुन्या साड्या घेऊन मी जात असें. खोटें असल्यास विचारा आजीला. आपल्या यमुनेलाही उंची कपडे आणायला मिळतात का ? आपल्या घरांतही कोणाला न्यावयास मिळाले नाहींत. मग ही कोण लाडकी? सर्व सुनांना एकच कायदा कीं, उंची कपडे व दागिने माहेरीं न्यावयाचे नाहींत.' हें ऐकून माझे वडील म्हणाले, 'बरं, बरं. कांहीं अक्कल आहे

कीं नाहीं ? एवढ्या मोठ्या दिवाणाची मुलगी आणि तिला साडी नेऊं नका म्हणावयाचें ! तुझा बाप तर भिकारी होता, इतकेंच नव्हे तर तुझ्या वडील बहिणीचे दागिने मोडून खाल्ले होते, त्यामुळें माझी आई दागिने वगैरे देत नसे. थोरल्या सुनेचा बाप कर्जबाजारी आहे. यमुनेंत अकल नाहीं, तिनें एक दोन जिन्नस हरवले आहेत; म्हणून अशांची बरोबरी करतां येत नाहीं. तुझीं लुगडीं शेंदीडशेंचीं आहेत, आणि तिनें दोन हजार आणले आहेत; आणि आणखी आणील. तेव्हां अशा चांगल्या माणसाशीं अशा क्षुल्लक तक्रारी करावयाच्या कां ? ' असें जेव्ह पुष्कळ सांगितलें, तेव्हां अर्धवट ' हो ' येतें आहे. सांगा महाराज ! स्त्रिया उदारतेचा अवतार आहेत का हलक्या मनाचे नमुने आहेत ? ताई, तुम्ही माझ्यावर डोळे वटारा, पण मला अजून पांचवा अध्याय सांगावयाचा आहे.

## स्त्रियांची किंमत समजविणारा पांचवा अध्याय

आतां ऐका. माझ्या गंगूला तुम्ही ओळखतांच. ती लहान दहा वर्षांची आहे; पण आपल्या आईसारखीच दुष्ट व हलक्या मनाची आहे. माझ्या बहिणीनें तिला हल्लीं सून आणि विहीण ह्यांच्यावर गुप्त ' डिटेक्टिव्हा ' चें काम दिलें आहे. ती पोरगी सर्वांचें बोलणें मुकाट्यानें ऐकून घेऊन घरीं येऊन त्यांत तिखटमीठ घालून सांगते. तें ऐकून सर्व तिची स्तुति करितात; त्यामुळें तिला उत्तेजन मिळून ती तोच उद्योग करिते. ती म्हणाली, ' धाकटी काकू मैत्रिणीजवळ सांगत होती कीं, ' माझ्या सास्वा ओरडेनात कां ! माझी आई मला नेल्याशिवाय कांहीं रहावयाची नाहीं. सर्वांनीं आपला मान ठेऊन घेतला तर बरें; नाहीं तर फार त्रास दिल्यास मी सर्वांना पुरून उरण्याइतकी आहें. ' तिची मैत्रीण म्हणाली, ' तुझ्या सासूंत कोठें इतकी अक्कल आहे ? ती मुलींच्या सांगण्यानें नाचते. तूं म्हणतेस तें बरोबर, तुम्ही थोडा जोर दाखवीत जा; नाहीं तर सर्व विकून खातील.' हें सर्व ऐकून माझी बहीण म्हणाली,

'आई, तूं मला सांग कीं त्यांची खोडच मोडतें. माझ्या नणंदेसारखी वाईट कोणी गांवांत नव्हती; पण मी तिला पुरून उरलें. ह्या काळच्या पोरी, ह्यांची किंमत काय? मुलगा ताब्यांत असला कीं सर्व चालतें.' महाराज, सांगा स्त्रिया दयेच्या मूर्ति का त्रासाचीं कोठारें? स्त्रिया एकीची शक्ति कीं भांडणाऱ्या पीडा? जगाला पुढें नेणाऱ्या कीं मार्गे हटविणाऱ्या? हें प्रत्यक्ष पाहण्याकरितां अजून किती तरी अध्याय ऐकिले पाहिजेत.

---

## बायकांचे स्वभावधर्म.

शिवाय बायका तरी बघा. माझ्या शेजारणीनें आईला व बायकोला सांगितलें कीं, 'तुम्ही कांहीं असें ऐकूं नका. आजपासून सून डोक्यावर चढविली कीं पुढें जड जाईल. मी कशी माझ्या सुनेला ताब्यांत ठेवितें; आणि तुम्ही आतां नाहीं जपलांत तर बघा ह्या आतांच्या पोरी पुढें ताब्यांत राहणार नाहींत.' पुढें संध्याकाळीं कांहीं कामाकरितां आमची नवी भावजय गेली, तेव्हां तिला म्हणते, 'काय बाई, तुझ्या नणंदेपुढें कमाल आहे.' तेव्हां ती म्हणाली, 'नाहीं पाठविली तरी चालेल, आणखी महिन्यांनीं जाईन; पण वन्सं वाटेल तें बोलून आईला दुःख देतात; आणि गांवांत व जातींत विनाकारण ओरडा होतो.' तशी ती म्हणाली, 'खरें तें. तुझा बाप अब्रूदार मनुष्य आहे, तो अब्रूला भितो. त्यांना काय? त्यांना अब्रू म्हणजे काय ठाऊक आहे का पण? तूं आतां असें म्हणूं नकोस कीं दोन महिन्यांनीं जाईन म्हणून. म्हणजे आतांपासून सगळीं तुला विकून खातील. मुकाट्यानें बसावें, करायाचें तें करावें, तोंड बंद ठेवावें आणि सगळ्यांना पुरून उरावें. आपण रडूं मात्र नये तर सासरीं निभाव लागतो.

तुझ्या नणंदेपेक्षां माझी नणंद पुष्कळ बरी आहे, तरी मीं तिला घरांत-सुद्धां पाय ठेवायची सोय ठेविली नाहीं. असें करावें, तेव्हां भिभाव लागतो. असें तूं कर, म्हणजे चट्ट ठिकाणीं येतील.' इतकें बोलणें होतें तो माझा धाकटा भाऊ तिच्या मुलाबरोबर बोलत बोलत तेथें गेला, तशी सून घरीं आली; तेव्हां त्या बाईनें माझ्या भावाला हांक मारून म्हटलें, 'कायरे नाना, मला वाटत असे कीं, तुम्हां शिकलेल्यांच्या बायका जास्त सुखी असतात, पण तुझ्या घरांत पहातें तों उलटें. मार धुमश्चक्री चालली आहे. इतकं शिकला तरी विहिणीशीं कांहीं चालत नाहीं. कालची ती कोंवळी पोर, तिला सगळ्याजणांनीं खाऊन सोडली आहे. आणि तूं आपला मजा बघतोस ? तुझ्यांत बायको संभाळण्याचा पराक्रम नव्हता तर लग्न करून लोकांची पोर कां बुडाविलीस ? चांगल्याच्या मुलीला असें दुःख देणें ही काय रीत झाली का ? बिचारी रडून रडून अर्धी झाली आहे. गरीब आहे म्हणून बरें. माझ्यासारखी असती तर समजतें कीं किती पंच वेशी म्हणजे शंभर तें; दुःखासुखाला बायकोच कामीं येते, बाकी सर्व जेवणापुरते.' हें सर्व तिनें आमच्या ठिकाणीं असणाऱ्या प्रीतीमुळें केलें ! त्याचा परिणाम काय होईल याची तिला काळजी नव्हती. कोणीकडून वेळेला येईल तें बोलून सर्वांशीं गोड रहा-वयाचें. पण दर एकाशीं असें बोलून तिनें आमच्या घरांत कशी होळी पेटविली ती तर बघा जा. आतां सांगा कीं स्त्रिया उत्तमतेचे अवतार कीं नीचतेचे नमुने ? ज्ञानाच्या चाव्या कां अज्ञानाचीं भांडारें तें पहा. महाराज, तुम्हीं थोड्याशा गोडबोल्या स्त्रिया सभांतून पाहिल्या असाल, आणि दुसऱ्यांकडून लिहून घेऊन घोकून तयार केलेलीं भाषणें बोलतांना ऐकलें असाल, आणि त्यामुळें तुम्हांला स्त्रिया म्हणजे ज्ञानाच्या किल्ल्या वाटतात. तुम्हीं तरुणपणीं कादंबऱ्या वाचल्या असाल, त्यामुळें तुमच्या मनावर त्या कविकल्पना बसल्या असतील. शिवाय सणावारीं चिरगूट-पांघरूण, डागदागिने घालून देवळांत जाणाऱ्या स्त्रिया तुम्हीं पाहिल्या

असाल, त्यामुळें तुमच्या अशा कल्पना झाल्या असतील आणि त्यामुळेंच स्त्रिया ह्मणजे 'सौंदर्याचे नमुने' असें तुम्हीं ठरविलें असाल. तुम्हांला कधीं तरी जेवायला आमंत्रण येऊन पुष्कळ खीर-पुरी मिळत असेल तेव्हां स्त्रिया म्हणजे ' दयेचे अवतार ' असें तुम्हांला वाटतें. पण महाराज, एवढ्यावरून स्त्रियांची परीक्षा होत नसते. मी पुराण सांगतों; तेव्हां पुष्कळ स्त्रिया मला प्रदक्षिणा घालतात, माझ्या पायां पडतात व माझ्या पायाचें तीर्थोदक घेऊन मला दक्षणा देतात; तरी मी मनांत समजतों कीं, त्या सर्व ब्यादी दुरून नमस्कार करण्यापैकीं आहेत. कारण काम पडलें नाहीं तोंपर्यंत चांगलेपणा ठेविल्यानें कांहीं परीक्षा होत नाहीं—त्या संसारांत कशा वागतात हें पाहून त्यावरून किंमत करावयाची असते. देवळांत जाऊन पायां पडणाऱ्या स्त्रिया शेजारणीशीं कशा भांडतात, सुनेला कशा जाच करितात, नणंदादीर दूर होण्याकरितां काय युक्त्या लढवितात, विहिणीची कशी नक्कल करितात, सासूचा कसा अपमान करितात, आणि रिकामटेकडा वेळ कसा घालवितात्त, तें सर्व पहावयास हवें, आणि तें ऐकण्याची तुमची इच्छा असल्यास संसारगीतेंतील सातवा अध्याय ऐका. "

हें ऐकून माझे प्राणनाथ म्हणाले, " महाराज, हात जोडतों. आतां पुरें करा ती तुमची गीता. ती तुम्हांलाच लखलाभ होवो ! तिचे शिंतोडे आमच्या स्वर्गांत उडवूं नका. " असें म्हणून त्यांनीं महाराजाकडे पाहिलें. तेव्हां महाराज म्हणाले, " लोकांना सुधारण्याकरितां

## उपदेश करण्याचे दोन रस्ते आहेत.

एक असा आहे कीं, दुर्गुणांचें वर्णन करून त्यापासून होणारें नुकसान दाखवून लोकांना सावध करावयाचें, भीति दाखवावयाची आणि त्यांना ठिकाणीं आणावयाचें; आणि दुसरा असा आहे कीं, लोकांना आवडतील आणि स्वाभाविक रीत्या त्यांचा ओढा लागेल, त्यांच्या

हातून होऊं शकतील, असे सद्गुणाचे उत्तमांत उत्तम नमुने त्यांना दाखवावयाचे. या दोन रस्त्यांनीं माणसें सुधारतात. पण दुर्गुणाच्या वाईट उदाहरणांनीं भीति उत्पन्न करून काम घेणें हें हलक्या प्रकारचें आहे; आणि इंद्रियांना, मनाला आणि बुद्धीला आवडतील अशीं आत्मिक बळाचीं व आत्म्याच्या सौंदर्याचीं चित्रें दाखवून मनुष्यांत असणाऱ्या उत्तम गुणांना, स्वार्थाचा व भयाचा बाऊ दाखविल्याखेरीज, पुढें आणणें हें श्रेष्ठ प्रतीचें काम आहे. ह्या दोहोंपैकीं प्रसंगाप्रमाणें व जातिस्वभावाप्रमाणें दरएकजण कोणता तरी मार्ग स्वीकारितो. शास्त्रीबोवांना त्यांची गीता आवडत असल्यास त्यांनीं खुशाल ती काढावी; आमची हरकत नाहीं. मुद्दा इतकाच कीं, कोणत्याही रस्त्यानें माणसांनीं पुढें गेलें पाहिजे. स्त्रियांच्या हातून कांहीं होणार नाहीं आणि त्या कधीं पुढें जाऊं शकणार नाहींत, असें बडबडून कांहीं होणें नाहीं." असें म्हणून महाराज गप्प राहिले.

---

## स्त्रियांचा बचाव.

स्त्रियांची बेअब्रू करणारें भाषण ऐकून स्वाभाविकरीत्याच माझें मन उचंबळलें आणि मीं प्रोफेसरसाहेबांना म्हटले, "स्त्रियांची दुसरी बाजू पाहिल्याशिवाय एक बाजू पाहूनच कां मत देतां ? तुमच्या आवडत्या बाजूकडे पाहून मत देणें हं स्त्रियांचा अपमान करण्याप्रमाणें आहे; आणि तें तुमचा उतावीळपणा दाखवितें. शास्त्रीबोवांच्या मताची मला किंमत नाहीं, कारण त्यांना कांहीं कर्तव्य नाहीं, सत्य समजून घ्यावयाचें नाहीं, समजलेलें करावयाचें नाहीं, आणि कोणी करील त्याच्या उलट त्यांना उठावयाचें आहे, तेव्हां त्यांच्या हातून कांहीं होणें नाहीं; कारण त्यांना सुधारणेमध्यें विघ्नेंच घालावयाचीं आहेत; आणि आपलेंच म्हणणें खरें करावयाचें आहे."

हें ऐकून शास्त्रीबोवांना राग आला. त्यामुळें जरा तोंड वांकड करून ते ह्मणाले, " पाहिलेंत महाराज, ताईंना कसें वाईट वाटलें तें. खरें बोलणें सख्ख्या आईलासुद्धां आवडत नाहीं. "

मीं म्हटलें, " त्यांत मला झोंबण्यासारखें कांहीं नाहीं. कारण त्या गोष्टी कांहीं माझ्यासाठीं किंवा तुमच्यासाठीं नाहींत. त्या सर्व देशासाठींच आहेत. ह्या गोष्टी सार्वजनिक आहेत; म्हणून त्या आपण कोणीही आपल्यावर ओढून घेऊं नयेत; आणि उगीच रागावूं नये. हा एक प्रश्न आहे, आणि त्यावर मला कांहीं बोलतां येतें म्हणून नव्हे, किंवा वाईट वाटलें म्हणून नव्हे अगर मी एक स्त्री आहें म्हणून नव्हे, तर सत्य समजण्याकरितां मी सांगतें कीं, स्त्रियांची दुसरी बाजू पहाणें आपलें कर्तव्य आहे; आणि तसें आपण पहाल तेव्हां आपल्याला समजेल कीं, महाराज म्हणतात तशा स्त्रिया फारच थोड्या आहेत व तुम्ही म्हणतां तशा जास्त आहेत. तरी तेवढ्यावरून कांहीं स्त्रियांचेसंबंधानें अन्याय करूं नका. कारण मी माझ्या स्वतःच्या अनुभवानें पहातें कीं, महाराज ह्मणतात तशा उच्च दर्जाच्या स्त्रिया फार नाहींत; तसे गुण ज्यांच्यांत आहेत अशा स्त्रिया शेंकडा ५ आहेत; तुम्ही ह्मणतां इतक्या खालच्या दर्जाच्या नव्हेत पण थोड्याशा वरच्या दर्जाच्या शेंकडा १५ आहेत; आणि बाकी शंभरांतील ८० स्त्रिया मध्यम प्रकारच्या आहेत. त्यांच्यांत घरसंसार चालविण्यापुरतें सामर्थ्य असतें, आपल्या नवऱ्याला संतुष्ट ठेवण्यापुरतें प्रेम असतें, आणि वाईट प्रसंग आले नाहींत तर आपली नीति त्यांना सांभाळतां येईल, इतकें बळ त्यांच्यांत असतें, आपल्या कुटुंबाची व्यवस्था लावितां येण्यापुरतें कामकाज त्यांना करतां येतें; ज्या धर्माचे संस्कार त्यांना लहानपणापासून घडतात, त्या धर्मावर त्यांची फार श्रद्धा आणि भक्ति असते, आपल्या मुलावर त्यांचें अतिशय प्रेम असतें, कौटुंबिक दुःख सोसण्यांत त्या फार सहनशील असतात, काटकसरीनें व प्रसंगवशात् गरिबींतही त्यांना रहातां येतें.

आपल्या नित्याच्या व्यवहारांत एकदम त्या मोठा फेरफार करूं शकत नाहींत हें खरें; तरी पण हळू हळू त्यांची सुधारणा करतां येईल. इतकेंच नव्हे तर, हळूहळू आणि समजुतीनें त्यांच्याशीं वागलें तर थोड्याच दिवसांत त्या तुम्हांला मदत करण्यायोग्य होण्याइतक्या सुधारतील. स्त्रियांमध्यें जें स्त्रीत्व आहे म्हणजे उत्तमतेकडे जाण्याचा जो एक स्वाभाविक ओढा आहे, तो ओढा, ती प्रेरणा, तो स्वभाव, ती शक्ति, ती वृत्ति, जें म्हणाल, तें सर्व ह्या स्त्रियांत आहे, तें कांहीं त्यांच्यांतून निघून गेलेलें नाहीं. तेव्हां जरी त्यांची खालच्या दर्जाची स्थिति आहे, तरी त्यांच्यांत असणाऱ्या ह्या स्त्रीत्वामुळें त्या हळूहळू सुधारूं शकतील. मात्र इतकाच कमीपणा आहे कीं, तुमच्या आधारावर पडलेल्या स्त्रियांना पुढें येण्याकरितां जें केलें पाहिजे, त्यांतील तुम्ही कांहींच करीत नाहीं; आणि शेंकडा १५ मूर्ख स्त्रियांकरितां ५० चांगल्या स्त्रियांची निंदा मात्र करितां. थोडा विचार करा कीं, जेव्हां तेव्हां स्त्रियांना हलक्या मानावयाच्या, त्यांची निंदा करावयाची, ह्यानें त्यांचें व तुमचें कल्याण होईल का ? " इतकें म्हणून मी गप्प बसलें, तेव्हां प्रोफेसर म्हणाले, तर मग

## आपण काय केलें पाहिजे ?

———o(:)o———

स्वत म्हटलें, " स्त्रियांमध्यें सद्गुण आहेत; ज्ञान आणि दया आहे. त्या आनंदाचे अवतार आहेत व संसारांत स्वर्ग आणण्याकरितां त्यांचा अवतार आहे, अशी लोकांचीं खात्री करून दिली पाहिजे; आणि तशीं कामें करून दाखविण्याची स्त्रियांना संधि देणें हें आमचें काम आहे. "

प्रोफेसर म्हणाले, " स्त्रियांमध्यें पुष्कळ जातीचे सद्गुण आहेत हें कबूल आहे. पण हे सद्गुण घरांतच राहून कसे खुलतील ? त्या सद्गुणांना वाढावयाला आपण अवकाश दिला पाहिजे, नाहीं का ?"

हें ऐकून महाराज म्हणाले, "स्त्रियांच्या शरीराची रचना, त्यांचें मन स्वभाव आणि ह्या संसारांतील स्त्रियांची कामगिरी ईश्वरानें अशा प्रकारची केली आहे कीं, सर्व स्त्रियांना बाहेरचीं मैदानें मिळूं शकत नाहींत, म्हणून त्यांच्या लहानशा घरामध्येंच त्यांच्या सद्गुणाचा प्रकाश झाला पाहिजे, आणि जेव्हां तो असा दरएक घरांत उत्पन्न होईल तेव्हांच आपलें व आपल्या देशाचें कल्याण होईल. आपले सद्गुण सभांतून, पुस्तकांतून, वर्तमानपत्रांतून आणि मानपत्रांतूनच जोंपर्यंत राहतील, तोंपर्यंत आपलें व आपल्या देशाचें कल्याण होणें नाहीं; जेव्हां हे सद्गुण आपल्या लहान लहान खेड्यांतून, लहान लहान झोंपड्यांतून फैलावतील, आणि तशी वृत्ति सर्वांची होऊन आपल्याला आपल्या देशाकरितां आणि आपल्या आत्म्याच्या कल्याणाकरितां कांहीं चांगलें काम केलेंच पाहिजे असें वाटेल, तेव्हांच आपल्या देशाचें कल्याण होईल व आपली मेहनत सफळ होईल. पण ह्या सर्वांचा आधार आपल्या घरांत सद्गुण वाढण्यांत आहे; म्हणून प्रथम आपलीं घरें सुधारलीं पाहिजेत. कारण जगांत जितके पवित्र स्नेह आहेत, तितके सर्व घरांतूनच उत्पन्न होतात. सर्व तऱ्हेच्या परमार्थांचा मध्यबिंदु गृहच होय; सर्व ज्ञानाचें मूळ घरच आहे; आणि म्हणून घर हेंच सर्वांत मोठें मैदान आहे. घरांतच स्नेह वाढेल असें केलें पाहिजे; आणि घरांत स्नेह वाढला कीं, तो केव्हांना केव्हां बाहेर पडल्याशिवाय राहणार नाहीं. ईश्वरी नियम आहे कीं, लहानांत मोठी वस्तु राहिलेली असते व ती आपल्या आपण योग्य प्रसंगीं बाहेर पडते. अंडीं पिकल्यानंतर पोर कांहीं आंत बसत नाहीं; तसें जेव्हां स्नेह वाढेल तेव्हां तो घरांत राहूं शकत नाहीं, तो बाहेर पडून आळींत पसरतो; तेथें राहीनासा झाला कीं, गांवांत पसरतो; आणि अशा रीतीनें तो वाढत वाढत जाऊन शेवटीं ईश्वरमय होतो. तो पण लक्षांत ठेवा कीं, त्याचें मूळ घरच आहे; आणि तो घरांतच वाढतो. म्हणून तुमच्या सर्व योजना जर पार पाडावयाच्या असतील, खरें खरें देशाचें

कल्याण करावयाचें असेल तर आणि ह्या संसारांत स्वर्ग भोगण्याची इच्छा असेल तर, प्रथम आपलीं घरें सुधारा; आणि तीं स्नेहानें भरा."

प्रोफेसर म्हणाले, "स्नेहाचें मूळ घर आहे आणि घरांतून म्हणजे स्त्रियांपासूनच सर्व स्नेह उत्पन्न होतात, हें मला कबूल आहे. पण घरांतील स्नेह बीजरूपानें असतात; त्यामुळें तेवढ्यानें कांहीं तृप्ति होत नाहीं. म्हणून पुन्हां मी असेंच म्हणतों कीं, आपण त्यांना बाहेरील मैदान खुलें करून दिलें पाहिजे."

---

## प्रेमाच्या वाढत्या जोराला कोण थांबवूं शकेल?

महाराज म्हणाले, "स्त्रियांना बाहेरील मोकळीक देऊं नये, असें कोण म्हणतें? पुरुषांकरितां दुनिया जितकी मोकळी आहे तितकीच ती स्त्रियांकरितांही आहे; पण एवढें लक्षांत ठेवावयाचें कीं, स्त्रियांचा स्वभाव आणि आपल्या संसारव्यवहारांत स्त्रियांची मुख्य कामगिरी अशा प्रकारची आहे कीं, सर्व स्त्रियांना कांहीं बाहेरील मोकळीक मिळूं शकणार नाहीं. दुसरें, स्नेह जेव्हां वाढतो तेव्हां तो आपल्या आपणच बाहेर पडतो; आणि एकदां तो बाहेर पडला कीं, वाहत्या झऱ्यासारखा तो वाहतो व पसरतो—त्याला कोणी थांबवूं शकत नाहीं. भक्तिमती पवित्र गार्गीला महाराज जनकाच्या सभेंत जातांना कोण थांबवूं शकलें! पतिप्रेमाधीन सुकुमार सीताबाईला वनांत जातांना कोण थांबवूं शकलें! धर्मबळाची प्रतिमूर्ति अशा द्रौपदीला जेव्हां भरसभेंत दुर्योधनानें मांडीवर बसण्यास सांगितलें तेव्हां सर्वांच्या देखत निराधार द्रौपदीनें 'भीमाची गदा बसेल' असा जो जबाब दिला तो कोणीं शिकविला? जेव्हां रजपूत स्त्रिया सतिवेष धारण करून रणमैदा-

नावर येत, तेव्हां त्यांचा पडदा कोठें जाई ! आणि जेव्हां त्या शत्रूला 'त्राही भगवन्' करून सोडीत, तेव्हां त्यांचा जनानी नाजुकपणा कोठें राही ! प्रभुप्रेमांत तन्मय झालेली मिराबाई जेव्हां आपला नवरा राणा याला सोडून चालती झाली, तेव्हां तिला कोण आडवें आलें ! तेव्हां स्त्रियांना संसारिक बंधन नव्हतें ? 'स्त्रिया स्वतंत्र नाहींत' ही मनूची आज्ञा तेव्हां नव्हती का ? तेव्हां लोकलाज नव्हती का ? तेव्हां काय स्त्रियांचीं राज्यें होतीं ! नाहीं हें सर्व उलट होतें. तेव्हां आतांपेक्षां जास्त कडक अशी बंदी होती, पण जेव्हां प्रेम घरांत राहीना तेव्हां तें बाहेर जाऊन जगांत पसरलें. मधल्या अंधकाराच्या दिवसांत सुद्धां जर असें झालें तर मग हल्लींच्या सुधारलेल्या काळांत—समान हक्काच्या राज्यांत—स्त्रियांना बाहेरील मोकळीक मिळणार नाहीं, असें कसें होईल ? आणि आम्हीही त्याच्याविरुद्ध नाहीं. उलट आम्ही असें म्हणतों कीं, स्त्रियांना जगांत स्नेह वाढावयास चांगल्यांत चांगली संधि अनेकदां मिळाली म्हणजे आमचें पुष्कळ कल्याण होईल; कारण सर्वांचें मूळ जर घर आहे. तर तें जितकें सुधारेल तितकें जग जास्त सुधारेल हें उघड आहे. आम्ही स्त्रियांना सुधारण्याच्या गोष्टींना जास्त महत्व देतों, आणि तुम्ही तें हक्कांना जास्त देऊन जी बाबत मागें ठेविली पाहिजे ती पुढें आणतां; त्यामुळें तुम्ही लवकर फळ मिळवीत नाहीं आणि तुमची सुधारणा सर्वांना उपयोगी पडण्यासारखी होत नाहीं.

---

## हक्क व अधिकार.

"प्राणी आपआपल्या अधिकाराप्रमाणें, आपआपल्या योग्यतेप्रमाणें आणि देशकालाप्रमाणें हक्क मिळवूं शकतात. पण जर असें म्हटलें

कीं, हा हक्क सर्वांचा आहे, तर मग त्यांत खरा अधिकारी दिसणार नाहीं; आणि त्यामुळें पुष्कळ तऱ्हेचे अनर्थ ओढवतील. म्हणून पूर्वींचीं शहाणीं माणसें हक्काचा प्रश्न काढीत नसत, ते प्रथम अधिकाराच्या गोष्टी बोलत; कारण हक्क हा अधिकाराचें पिलूं आहे. म्हणून जेथें अधिकार आहे तेथें हक्क आहेच. ते असें समजत कीं, पाणी अद्याप जमिनींत आहे, किती खोल आहे हें माहीत नाहीं, फार आहे कीं, थोडें आहे तें ठाऊक नाहीं, तेथून झरा केव्हां वाहील ह्याचा नेम नाहीं, आणि जर आधींच कोणीं म्हटलें कीं, 'झरा कोठपर्यंत वाहूं द्यावयाचा हें ठरवून द्या,' तर तो मूर्खपणा होणार नाहीं काय ? तसेंच प्रोफेसरसाहेब, आपल्या देशांत स्त्रीशिक्षणासंबंधानें आहे. त्या झऱ्याच्या प्रवाहास अद्याप अवकाश आहे; आणि तसें असून आतांच त्यांचे हक्क नक्की करीत बसणें हें चुकीचें नाहीं काय ? तसेंच जमिनींत कधीं तरी धरणीकंप होतील, तेव्हां नवे पहाड येतील, करितां त्यांची लांबीरुंदी ठरविण्याकरितां आतांच कमिशन नेमणें हा शहाणपणा आहे काय ? स्त्रियांमध्यें शिक्षण वाढावयाच्या पूर्वींच त्यांना बाहेरील मोकळीक देणें आणि त्यांच्या हक्काच्या गोष्टी बोलून लोकांना आधापासूनच भेवडाविणें हें त्याप्रमाणेंच आहे. आपण स्त्रियांच्या प्रेमाची किंमत समजत नाहीं, म्हणून असें बरळतों. पण जर असें समजेल कीं, स्त्रियांच्या अंतःकरणांतील प्रेम हें अग्नीसारखें आहे, तर आपण असें बोलणार नाहीं. आपण कधीं अग्नीला विचारतों का कीं, अरे बाबा जेव्हां तूं आमच्या घरास लागशील, तेव्हां कोणकोणच्या वस्तु जाळशील व कोणच्या ठेवशील ! तूं कोठून लागशील व केव्हां विझशील ? तसा स्त्रियांत असणारा ईश्वरी स्नेह हा एक तऱ्हेचा अग्नि आहे. तो वाढला कीं पुष्कळ तऱ्हेच्या रूढी, संशय, लोकलज्जा वगैरे सर्व त्यांत जळून जाईल. म्हणून ती आग किती लागूं द्यावयाची ह्या वादांत वेळ घालविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. ती आग लावण्याकरितां पंखा चालूं द्या.

म्हणजे वेळ येईल तेव्हां आपल्या आपण निरुपयोगी वस्तू जळून जातील. ”

---

## प्रेमाच्या पुराला कोणी थांबवूं शकणार नाहीं.

“ प्रोफेसरसाहेब, पावसाळ्यांत आकाशांत तुम्ही ढग पाहतांना? त्या ढगांना सांगावं लागतं का कीं, तुम्ही आमच्या घरावर पाऊस पाडा, आणि सांगूनं ते ऐकतील तरी का ? पण ईश्वरी नियमाप्रमाणें वेळ येते तेव्हां आपल्या आपण तो पडतोच. तसेंच जेव्हां आपल्या भगिनींचीं मनें स्नेहानें भरून येतील तेव्हां त्या आपल्या आपण आपल्या बंधुभगिनींच्या हिताकरितां त्या स्नेहाचा उपयोग करितील. वेळ येतांच ढगांना पाण्याचा भार सहन न होऊन त्यांना तो कमी करावा लागतो; मग नाजुक स्त्रियांचा पवित्र आत्मा स्नेहाचा भार कसा सहन करील ! आकाशांत आणि पाताळांतही न रहाणाऱ्या, अनंत ब्रह्मांडाला पुरून उरणाऱ्या ईश्वररूप स्नेहाला स्त्रियांचें हृदय कसें थांबवूं शकेल ? ती थांबविण्यासारखी वस्तु नाहीं. आणि तें प्रेम जर थांबवितां आलें तर असें समजावें कीं, अद्याप पुरती जागृति झालेली नाहीं. जर पुरती जागृति झाली, तर त्याला कसें थांबवितां येईल ? होण्यासारख्या गोष्टी नाहींत, तरी लक्षांत ठेवा कीं, कदाचित् सूर्याचीं किरणें थांबवितां येतील, चंद्रांत उष्णता आणितां येईल, आकाश वायुरहित करितां येईल, पण खऱ्या प्रेमाच्या ओघाला कोणाच्यानेंही थांबवणार नाहीं. ‘ रेडियम’ मधून जशी आपल्या आपण उष्णता निघते व कित्येक वर्षें झालीं तरी त्यांत तोटा पडत नाहीं, तशी स्त्रियांच्या प्रेमांत एक प्रकारची गोड गोड उष्णता वाहत असते; आणि ती कधींही नाहींशी

होत नाहीं. किरणें जशीं वाटेल तितक्या जड वस्तूंतून जाऊं शकतात, तसें प्रेम वाटेल तितक्या ईश्वरी बंधनांतून जाऊं शकतें. सूक्ष्मदर्शक यंत्र दरएक वस्तु ज्याप्रमाणें मोठी करून दाखवितें, त्याचप्रमाणें स्त्रियांचें प्रेम आपल्या दरएक बंधुभगिनीचें लहानसें दुःख मोठें करून दाखवितें. ईश्वरी स्नेह ओळखणारा आत्मा, आपल्या बंधुवर्गाचीं दुःखें पाहिल्यानंतर वेदांत विचार करून गप्प बसेल का? तेव्हां त्याला सामाजिक बंधनें आड येतील का? म्हणा नाहींच. कारण तीं बंधनें आपल्या आपण तुटून जातात, आणि सर्व जग मोकळें होतें. आतां सांगा, अशा माणसाला तुम्ही काय स्वतंत्रता देणार? आणि तुमच्या बळानें नाचणाऱ्या माणसाच्या हातून तुमचा काय उपयोग होणार आहे? म्हणून म्हणतों, बाबांनो! अनंत ब्रह्मांडांत ज्याची सत्ता आहे, आपल्या आत्म्याचें जें तत्व आहे, आपल्या जीवाचें जें जीवन आहे, आपल्या शास्त्रांचें जें रहस्य, महात्म्यांचा उपदेश आणि खुद्द ईश्वराचें दुसरें रूप असें जें प्रेम त्याचा ओघ आपल्या बहिणींच्या अंतःकरणांतून वहावा. कारण ह्या संसारांत जें खरें सुख मिळावयाचें आहे आणि मेल्यानंतर अंतीं जें कल्याणकारी व्हावयाचें आहे तें वरकरणी दिसणारी शांतता नव्हे तर खरें प्रेमच होय."

---

## आम्ही हक्काकडे नाहीं तर प्रेमाकडे पाहतों.

"प्रेम हा हक्काचा दादा आहे. प्रेमानेंच अधिकार आहे आणि अधिकारानेंच हक्क उत्पन्न होतो; म्हणून प्रेम हा हक्काचा दादा होय. हक्काला सीमा असते पण प्रेमाला नाहीं; म्हणून कोणत्याही तऱ्हेच्या हक्कांत प्रेम राहूं शकत नाहीं; पण प्रेमांत सर्व हक्क येतात. इतकेंच नाहीं तर, व्यवहारांतील मोठ्यांत मोठें हक्क प्रेमाच्या पुढें नमून जातात. म्हणून आम्ही

ह्या लहान लहान हक्कांची तक्रार करीत नाहीं, पण प्रेम थेट इश्वरासन्निध बशिल्याशिवाय जाऊं शकतें. असें जें प्रेम तें आमच्या भगिनींमध्यें वाढावें, असें आम्ही इच्छितों."

---

## प्रेमाचें बळ.

" प्रोफेसरसाहेब, प्रेमांत किती बळ आहे, हें तुम्हांस ठाऊक नाहीं. सूर्य उगवला म्हणजे त्याला असें सांगावें लागतें का कीं, तुझ्यापुढें येणाऱ्या ढगांना तूं उडवून टाक. नाहीं. तें त्याचें कामच आहे तसें स्त्रियांत प्रेम उत्पन्न झालें कीं, बारीसारीक अडचणी नाहींशा होतातच. त्याचा आपल्याला बाऊ वाटतो, याचें कारण अजून आपल्यांतील प्रेम वरकरणी आहे. बाकी प्रेमाची सत्ता तिन्ही लोकांत आहे; म्हणून आम्ही आपल्या स्त्रियांत प्रेम वाढावें असें इच्छितों. कारण स्त्रियांच्या स्वभावांत, प्रकृतींत, शरीररचनेंत, इंद्रियांत आणि मनांत प्रेम भरलेलें आहे. त्यांची बुद्धि प्रेम शोधते, त्यांचे संकल्पविकल्प प्रेमाकरितां असतात, त्यांची इच्छा प्रेमाची गोडी चाखावयाची आहे. म्हणून ईश्वरी स्नेहानें, स्त्रियांच्या आत्म्याच्या रूपानें, अवतार घेतलेला आहे. तेव्हां व्यावहारिक बंधनें कशीं तोडावयाचीं, ह्या विचारांत राहूं नका; प्रेमाला कसें जागृत करावयाचें त्याचा विचार करण्याची कृपा करा.

" प्रोफेसरसाहेब, झाड लावावयाचें, त्याला खत व पाणी द्यावयाचें, हें आपलें काम आहे. 'बाबा, फळ आणि फूल दे.' म्हणून त्याची प्रार्थना मग करावी लागत नाहीं. कारण त्याचा ऋतु आला कीं, फळें हीं यावयाचींच. चांगलें बीं आहे व योग्य मशागत केली आहे, तर फळें आल्याशिवाय कशीं राहतील? व आलीं

कीं तीं आपलींच. कारण झाड कांहीं फळें खात नाहीं. तसेंच स्त्रियांत स्नेह वाढविला असेल तर तो कोठें जाईल ? त्याचा उपयोग जगाला व्हावयाचाच. जसा गर्भ योग्य दिवसानंतर पोटांत राहात नाहीं, तसें प्रेमाची उत्पत्ति झाल्यानंतर तें त्यांच्याजवळ रहाणार नाहीं. म्हणून हक्काची व स्वतंत्रतेची तक्रार न करितां आपल्या स्त्रियांत पुष्कळशा प्रेमाचीं बीजें लावण्याची तजवीज करा; म्हणजे योग्य प्रसंगीं ईश्वर आपल्याला साह्य करील. तोंपर्यंत घरांत राहून, शेंकडों बंधनें सांभाळून, आमच्या स्त्रिया आपल्या बंधुभगिनींच्या उपयोगीं कशा पडतात, तें पहा. " असें म्हणून महाराजांनीं माझ्याकडे पाहिलें.

---

## हें सर्व कशांतून सांगतां ?

---

प्रोफेसर तर हें ऐकून आश्चर्यचकितच झाले होते, व महाराजांकडे पहात होते. 'हा बोवा हें सर्व कोठून सांगतो ! आम्हीं पुष्कळ बुकें वाचलीं आणि पुष्कळ परीक्षा दिल्या; पण असलें कांहीं वाचलें नव्हतें व ऐकलेंही नाहीं,' असें त्यांना वाटत होतेंसें दिसलें.

प्रोफेसरसाहेबांच्या मनांतील विचार लक्षांत घेऊन महाराज पुढें म्हणाले, "हें सर्व ईश्वरी स्नेहांतून येतें, हें सर्व स्वतंत्र विचार करण्याची संवय केली म्हणजे समजतें. पवित्रपणांतून, आत्मिक बळांतून हें उगम पावतें. महात्म्यांची सेवा केल्यानें हें समजतें. ह्याचा खजिना अलोट आहे; आणि तो सर्वांसाठीं मोकळा आहे. म्हणून आपल्या पुष्कळ बंधूंना त्याचें मालक होतां यावें असें आम्ही इच्छितों."

हें ऐकल्यावर प्रोफेसरसाहेबांचे डोळ्यांत व चेहऱ्यावर ‘आपल्यावर उपकार झाला’ असें वाटल्याचें दिसलें; आणि त्यांचें अंतःकरण महाराजांपुढें नमूं लागलें. नंतर थोड्या वेळानें माझ्याकडे पाहून प्रोफेसरसाहेब म्हणाले, “ ताई, आपल्या घरांत राहून स्त्रिया कशीं चांगलीं कामें करूं शकतात, तें समजावून सांगण्याची कृपा करा.”

मीं म्हटलें, “तें समजून घेणें असेल तर माझ्याबरोबर ‘भगिनी मंडळांत’ चला. तेथें पुष्कळ स्त्रिया आहेत. ”

मी पुढें बोलणार तों मला थांबवून प्रोफेसर म्हणाले, ‘स्त्रियांच्या सभेंतील व्याख्यानें ऐकावयास मला नेतां ? त्यांतील पोकळपणा मला चांगला ठाऊक आहे. त्यांत कितपत तथ्य असतें, तीं कशीं कशीं केलेलीं असतात, तीं कोणीं तयार करून दिलेलीं असतात, व्याख्यानें देणाराची खाजगी वर्तणूक कशी असते, तें सर्व मला चांगलें माहीत आहे. कारण मी सुधारक असल्यामुळें पुष्कळ सुधारकांच्या बायकांना मी ओळखतों. तसेंच पूर्वी मी ह्या स्त्रीसमाजांत बरेंच मन घालीत असें, आणि आमची बायको पण त्यांपैकींच एक व्याख्याती होती. ’

हें ऐकून मीं म्हटलें, “तुम्ही इतकी घाई कां करितां ? तुम्हांला व्याख्यानें ऐका म्हणून कोण म्हणतो ? मी तर घरांत राहून चांगलीं कामें करणाऱ्या अनुभविक स्त्रियांचे अनुभव ऐकण्यास येण्याविषयीं सांगतें आहें. ”

महाराज म्हणाले, “ प्रोफेसरसाहेब, तें खातें योगिनीमातानें काढिलेलें आहे; आणि ताई त्यांत बरेंच काम करीत असतात. तें पाहण्यासारखें आहे; आणि मला त्यामुळें संतोष झाला आहे. कारण त्यांत पुष्कळ चांगल्या स्त्रिया आपल्या देशी रिवाजाप्रमाणें सतरंजीवर बसून आपल्या घरगुती शब्दांत आपल्या अनुभवाच्या

गोष्टी सांगतात. असें झालें पाहिजे, असें केलें पाहिजे, अमका कवि असें बोलून गेला, भविष्यकाळीं असें होईल, वगैरे कागदी घोडे तेथें नाचवीत नाहींत; तर अंतःकरणाच्या कळवळ्यापासून निघालेल्या अनुभवाच्या गोष्टी तेथें सांगतात. इतकेंच नाहीं, तर तरुण स्त्रियांना दुपारच्या वेळीं तेथें शिक्षण देण्यांत येतें, आणि तें आपल्या रोजच्या व्यवहारांत लागणारेंच असतें."

---

## स्त्रियांच्या सभेसंबंधीं शास्त्रीबोवांचा अभिप्राय.

प्रोफेसरसाहेब म्हणाले, "तर मग मी तयार आहें, बोला केव्हां जावयाचें ?" मीं म्हटलें, "उद्यां दुपारीं दोन वाजतां येथें या म्हणजे महाराज, शास्त्रीबोवा वगैरे सर्वजण मिळून आपण जाऊं." हें ऐकून शास्त्रीबोवा डोकें खाजवीत खाजवीत व हातांतील पागोट्यावरील केर झाडीत झाडीत म्हणाले, तें तर सर्व अवडंबर आहे. तुम्ही सर्व गंधर्वनगरीच्या गोष्टी सांगणारे हवाई, विचाराचे शेखसली जमा झाले आहां. कसलें भगिनीमंडळ आणि कसलें काय ? पांच दहा बाटग्या एका ठिकाणीं जमत असतील आणि कामधंदा करायला नको, तर्‍हां मडम होण्याच्या गोष्टी बोलत असतील झालें. तेथें जाऊन काय करावयाचें ? शेण लावतां आलें, भाडीं घांसतां आलीं, कीं स्त्रियांचीं चांगलीं कामें झालीं .नुसत्या लांब लांब गप्पांनीं काय होतें ! फक्त दोन आणें ट्रामभाडें मात्र जातें, तें मात्र तुम्ही कोणी देणार नाहीं. तीन वर्षें झालीं तुमच्या येथें येतों, तेवढ्यांत पुष्कळ मोठे मोठे लोक आले असतील; पण कोणी असें म्हणतें का कीं, घ्या ही दक्षणा शास्त्रीबोवा ! सगळे धुतलेल्या तांदुळासारखे; पदरचें गोपी-

चंद्न मात्र उलट जातें. त्यापेक्षां आमच्या गरीब विधवा बऱ्या; ग्रहण, पर्वणी आली कीं, आण्या दोन आण्यांची प्राप्ति होते. तुमच्या त्या वाडग्यांत येऊन काय मिळणार आहे ! त्यापेक्षां एखादें श्राद्धपक्ष तरी पहातों, " असें म्हणून शास्त्रीबोवा उठले व चालते झाले.

ते गेल्यानंतर प्रोफेसर म्हणाले, " हा गांवढळ मनुष्य कोठून आणलात ? काय सगळे शास्त्री असेच असतात ? "

महाराज ह्मणाले, " नाहीं; नाहीं तो कांहीं शास्त्री नाहीं. पुष्कळ शास्त्री चांगले असतात. हा आपल्या जुन्या विचाराचा एक साधारण ब्राह्मण आहे. थोडें शिकलेला आहे, पण ढोल मोठा ठेवितो. तो आपल्याला शास्त्री म्हणवितो, म्हणून आम्हीही गमतीखातर त्याला तसेंच म्हणतों एवढेंच. आपल्या मंडळींत तो पाहिजे अशांतला तो मनुष्य नाहीं; पण आपल्या पुष्कळ बंधूंना त्याच्यापासून थोडी करमणूक होते. जरी केव्हां केव्हां आम्ही कंटाळतों तरी त्याला तसाच निभावून घेतों. त्याच्या बोलण्याला कांहीं फारसें वजन द्यावयाचें नाहीं; पण आपल्या देशांत स्त्रीशिक्षणाविरुद्ध याच्यासारख्यांचा एक मोठा वर्ग आहे, हें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. "

---

## भगिनीमंडळ.

त्यानंतर दुसऱ्या दिवशीं आम्ही सर्व भगिनीमंडळांत गेलों आणि आमच्या येण्याचा हेतु योगिनी मातेला सांगितला. आम्हीं त्यांना म्हटलें, " आम्ही तुम्हाला तसदी देण्यांकरितां आलों आहों " तेव्हां त्यांना फार आनंद झाला आणि त्या म्हणाल्या, " काम करणारीं

माणसें तर आपल्या देशांत नाहींत; पण करणाऱ्यांशीं सहानुभूतीनें वागणारीहि माणसें नाहींत. तुम्ही मुद्दाम आमच्या गोष्टी ऐकण्याकरितां इतक्या लांब आलांत, हें आमचें नशीबच समजलें पाहिजे; आणि तुमचा उपकारच मानला पाहिजे; कारण व्याही, जांवई, भाचे, सुना, लेकी वगैरे सर्व सर्वांच्या घरीं जातात; पण आपल्या देशाच्या, आपल्या बंधूंच्या कल्याणाच्या गोष्टी ऐकण्याच्या हेतूनें चांगलीं माणसें आपल्या घरीं येण्याचा सुदीन कोठला? ह्यापेक्षां जास्त आनंद कोठला? म्हणून तुम्ही आल्यानें आम्हांला फार आनंद होत आहे, तुम्हीं असेंच यावें आणि प्रसंगविशेषीं आमचा समाचार घेत जावा. ह्या संस्थेचा अद्याप आरंभ आहे; त्यामुळें तिच्या हातून व्हावें तसें काम अजून होत नाहीं. तरी पण अशा संस्थेकडे उदार बुद्धीनें पाहाणारांपैकीं तुम्ही आहां, त्यामुळें मला आशा वाटते कीं, विदुराच्या कण्यांनीं जसा श्रीकृष्ण संतुष्ट झाला, तसे तुम्ही आमच्या ह्या घरगुती गोष्टीनें व्हाल." इतकें औपचारिक बोलणें झाल्यानंतर त्यांनीं तेथें काम करणाऱ्या स्त्रियांपैकीं एकीला हांक मारून म्हटलें, "पार्वतीबाई, आपल्या येथें पाहुणे आले आहेत. त्यांना तुमच्या अनुभवाच्या गोष्टी सांगा. लाजूं नका. हे आपल्या आत्म्याचें नातेवाईक आहेत. देहाचे नातेवाईक, तर रोज त्रास देतातच पण आत्म्याचे नातेवाईक जे नशीबवान् असतात त्यांनाच मिळतात. हें नातें चित्रगुप्ताच्या राजनिशीपर्यंत जातें; म्हणून कोणीसुद्धां संकोच करूं नका, आणि मोकळ्या मनानें तुमच्या अनुभवाच्या खऱ्या खऱ्या गोष्टी सांगा. तुमचा अनुभव सांगतांना तुम्हांला आत्मस्तुति करावी लागली तरी हरकत नाहीं. जीं चांगलीं कामें आपल्या हातून होतात, त्यांत थोडीशी आपली स्तुति असणारच. जर गुण नाहीं तर मग तीं कामें चांगलीं कशीं म्हणावयाचीं? आपल्या स्वतःच्या गोष्टी जेव्हां आपल्याला सांगाव्या लागणार तेव्हां स्तुति ही येणारच; आणि

सत्याकरितां ती केलीही पाहिजेच; कारण त्यांतील स्तुतीचा भाग गाळला, तर आपल्या गोष्टीपासून ऐकणाराच्या मनावर जसा परिणाम व्हावयास पाहिजे तसा होणार नाहीं, आणि जर तो होणार नाहीं, तर आपलें सांगणें काय कामाचें ? दुसरें असें लक्षांत ठेवा कीं, हें कांहीं आपल्याला स्वार्थाकरितां सांगावयाचें नाहीं, तर आपल्या इतर भगिनींना उपयोगी पडावें म्हणून सांगावयाचें आहे, तेव्हां थोडासुद्धां संकोच न धरतां तुमच्या चांगल्या कामाची हकीकत तुम्ही सांगा. ”

---

## पार्वतीबाईच्या गोष्टी.

हें ऐकून पार्वतीबाई म्हणाल्या, “ बरें आपल्या मर्जीप्रमाणें मी माझ्या अनुभवाची एक गोष्ट सांगतें. माझ्या धाकट्या मुलाची बायको जरा मूर्खच होती. आपल्या हिंदू लोकांस लहान लहान जातींत स्थळें पाहून भागवून घ्यावयाचें; त्यामुळें पुष्कळांना योग्य वर किंवा योग्य मुली मिळूं शकत नाहींत. दुसरें, आपण लहानपणीं मागणी घालतों, त्यामुळें भविष्यकाळीं वधूवरें कशीं निघतील तें कांहीं सांगवत नाहीं; आणि लहानपणीं लग्न केल्यानें संसार चालविण्यापुरतें शहाणपण कांहीं त्यांच्यांत नसतें. अशा कारणांनीं पुष्कळ विजोड लग्नें होतात. त्यांपैकींच एक विजोड आमच्या येथें होता. माझा नाना पुढें गेलेला, चांगल्याचा लोभी, हुशार, पण थोडा कडक व मिजासी होता; आणि त्याची बायको अगदींच वेडगळ होती. तिला दागिने व कपडेही नीट व्यवस्थेशीर वापरतां येत नव्हते. कोणाशीं कसें बोलावें हें तिला समजत नसे. दिसण्यांत,

चरी, नीतिमान्, सर्वांवर प्रेम करणारी, दोन शब्द बोलल्यास सोसणारी, पण खेडेगांवांत वाढलेली अशी ती होती, तिला आई नव्हती. आई लहानपणांत मेल्यामुळें लाडावलेली आणि वय लहान त्यामुळें विशेष न समजणारी अशी ती होती. पण सासरचीं माणसें अशीं कारणें थोडींच बघतात ? ' लग्न झाल्यानंतर माझी नणंद म्हणाली, ' तुम्हीं मुलाचा संसार बिघडविलात. सुनेंत कांहीं हांशिल नाहीं. हें रत्न कोठें पैदा केलें ? माझ्या मुली तिची थट्टा करूं लागल्या, आणि माझ्या दुसऱ्या सुना तिला हिडिसफिडिस करूं लागल्या. तिचा नवराही बोलतां बोलतां जरा टोमणे मारूं लागला; आणि ही मजा पाहण्यासाठीं शेजारीपाजारीही कांहीं कांहीं निमित्त करून येऊं लागले. सुनेंत हांशिल नाहीं ह्मणून ऐकल्या न ऐकलेल्या गोष्टी सांगूं लागले. आमच्या येथें नाना फार लाडका आणि ते जुन्या विचाराचे, त्यामुळें ह्या गोष्टी ऐकून तेही म्हणत: 'नाना, तूं काळजी करूं नकोस. तुझ्याहून का पैसे जास्त आहेत ? मी तुझें दुसरें लग्न करून देईन. आपल्या घरांत असें होतच आलें आहे. मग तुला दोन बायका केल्या म्हणून काय नवल ? त्यांत दोनचार शेजारीपाजारी जमले कीं, त्यांच्या अशा गोष्टींना अवसानच येई. पण त्यामुळें मुलाच्या मनांत कसें विष ओतलें जातें, ह्याचा त्यांनीं मुळींच विचार केला नव्हता; आणि एका निर्दोष मुलीचें आयुष्य कसें फुकट होईल हा विचार त्यांच्या मनांत सुद्धां येत नसे. हें पाहून मला फार वाईट वाटे. पण नुकतेंच लग्न झालेलें, यामुळें नव्या नव्या सुनांच्या गोष्टी करावयाच्या आवडीच्या उकळीला मी थांबवूं शकत नव्हतें. पण पुढें मीं पाहिलें, तों हें वाढायला लागलें, व मुलाचें मन उडण्याच्या मार्गाला लागलें; त्यामुळें मला वाईट वाटलें. मग मी घरांत व शेजाऱ्यांस सांगितलें कीं खबरदार माझ्या सुनेचें नांव कोणी काढाल तर; आणि घरांत त्यांनाही जरा रागानें म्हटलें: ' दुसरी दुसरी काय करतां ? तो काय खेळणें आहे ?

जरा विचार करा. ब्राह्मणाचा जन्म आहे, कांहीं भिल्लकोळ्याचा नाहीं. अजून असें काय झालें आहे कीं तुम्ही मुलाचें दुसरें लग्न करण्यास तयार झालां आहां ? मुलगा तर अद्याप सोळा वर्षांचा आहे आणि मुलीला नुकतेंच तेरावें वर्ष लागलें आहे. तिनें अजून जग काय पाहिलें आहे ? तिला सुधारण्याला अजून पुष्कळ अवधि आहे. इतक्यांत असें बोलणें ? ह्यांत आपल्या घराची अब्रू जाते. मुलांच्या मनावर जसे संस्कार करावेत तसे होतात. त्याला इतक्यांत वाईट चांगलें काय समजतें ? अशा बोलण्यानें एकदां त्यांचीं मनें विटलीं तर त्यांचा संसार कसा दुःखरूप होईल ह्याचा विचार करा. मग आपण आईबाप काय कामाचे? "

---

## चूक सुधारून घ्यावयाची कां वाढवावयाची ?

'तुम्ही वडील माणसें असें बोलूं लागलां, म्हणजे घरांतील इतर काय न बोलतील ? तुमच्या आजोबांनीं कांहीं केलें तरी तो फार जुना काळ. अलीकडे म्हणजे तुमच्या चुलत्यांनीं दुसरी बायको केली तिची तुमची पहिली चुलती रोज काय व्यवस्था करते तें नाहीं पहात? अशीं वाईट उदाहरणें मुलाला कशाला दाखवावीं ? वडिलांचें कर्ज अद्याप फिटलें नाहीं. सुनेच्या अंगावर बोलीप्रमाणें दागिने अद्याप घातले नाहींत धाकट्या मुलीच्या लग्नाचा हुंडा अद्याप तयार करावयाचाच आहे. कांहीं यात्रेचा नवस केला आहे, पण पैशाकरितां ती राहिलीच आहे; आणि काल लग्न झालें नाहीं, तों दोन हजार खर्चून मुलाला आज दुसरी बायको करून द्यावयास तयार झालां आहां. वा ! अशा लोकांबरोबर फुशारक्या मारण्यापूर्वीं जरा विचार करावयास हवा. माझें ऐका, जरा घरांत सुनालेकींवर दाब ठेवा, आणि धाकटीची

थट्टा करीत जाऊं नका, म्हणून सांगा. आपण दोघेंही असें करूं लागलों, और येथें तिचें कोण आहे ? तिला सहन करणें भाग आहे, पण ईश्वराला तें सहन होणार नाहीं; म्हणून जरा शांतपणा धरा. वडिलांचा मान वडिलांनीं ठेवून घ्यावा. ती मर्यादेंत आहे तों ठीक आहे. तिनें लाज सोडली कीं मग आपल्याला जड जाईल. आपण जर नेहमीं तिच्या पाठीस लागलों तर बोलतां न येणारीलाही तें येईल; आणि एकदां ती निरढावली कीं मग जड जाईल. म्हणून आतांच समजाल तर तें ठीक. नाहीं तर मी आपल्याला उघड सांगतें आहें कीं, जातींत, गांवांत, आपली व आपल्या घराची अब्रू राहणार नाहीं.' असें नेहमीं नेहमीं बोलून ते माझ्या बाजूचे झाले. पुढें आमच्या धाकानें सर्व जरा भिऊन चालावयाला लागलीं, तरी पण फावेल तेव्हां तिची थट्टा करून आपलें मन शांत करण्यास कोणीही चुकत नसे. तें पाहून मीं विचार केला कीं, हें असें चालूं देऊन फार दिवस निभावणार नाहीं. म्हणून मी सुनेला दुरुस्त करण्याचा प्रयत्न करावयास लागलें. कारण नुसत्या दाबानें नेहमीं काम भागत नाहीं. कांहीं वेळ सरळ चालेल पण शेवटीं अडेल. नेहमीं बोलण्यानें कांहीं सून सुधारणें नाहीं, तिला प्रेमानें शिकविलें पाहिजे. अशा मूर्ख माणसासंबंधानें अंतःकरणापासून प्रेम उत्पन्न होणें कठीण. अंतःकरणाचें प्रेम नसेल तोंपर्यंत आपण त्या माणसावर परिणाम करूं शकत नाहीं. दुसरें, शिकवावें म्हणणें सोपें असतें, पण तसें करून दाखविणें फार कठीण असतें. त्यांत स्वतः मेहनत करावी लागते. माझ्या सुनेला मी कसें शिकवीं, कसें सुधारीं, तिच्याकरितां मला कसा त्रास होई, वगैरे गोष्टी फार लांब आहेत, पण स्त्रिया घरांत राहून कशीं चांगलीं कामें करूं शकतात तें समजण्याकरितां त्यांतील कांहीं सांगतें.

---

# काम शिकविण्याची रीत.

" भाजी चिरण्याच्या वेळेस मी तिच्याजवळ बसें आणि तीं कशी चिरावी, वांग्याच्या फोडी केवढ्या कराव्या, दोडक्याच्या कशा करावयाच्या, कोथिंबीर कशी बारीक चिरावयाची, आलें कसें सोलावयाचें, फार जाड साल काढल्यास कसा नाश होतो, दुधीचें साल पातळ काढल्यानें ती लवकर शिजत नाहीं, काकडी कडू गोड बघावी लागते, दोडका बघावा लागतो वगैरे वगैरे बारीकसारीक माहिती मी तिला करून देत असें. हें करीत असतांना मला पुष्कळ वेळीं कंटाळा येई; पण पुन्हां विचार येई कीं, मी ह्यांत जास्त काय करतें ? माझ्या मुलांचा संसार सुधारून देणें हें माझें कर्तव्यच आहे. मग मी तें भाज्या चिरलेलें ताट सगळेजण बसलेले असतील तेथें नेई; आणि त्यांना दाखवून म्हणे, ' बघा धाकट्या सूनबाईनीं कशी भाजी चिरली आहे. असें आपल्या लीलेलाही येत नाहीं. ' मग तें ताट पाहून सर्व म्हणत, ' वा ! सूनबाईचें काम वाढलें. आई, तुम्ही खूप करतां हो. असें केलेंत तर ती दोन वर्षांत आमच्या सर्वांपेक्षां जास्त होईल. त्यानंतर मी हळू हळू तिला स्वयंपाकाला लावूं लागलें. कणीक कशी भिजवावी, मोहन किती घालावें, तीं कशी मळावी वगैरे सर्व गोष्टी मी तिला शिकवीं. पहिल्यापहिल्यानें ह्यांत मला त्रास पडे, तिला लवकर समजत नसे, शिकविलेलें ती विसरे, तरी पण मी बाबापुता करून चालवून घेई. एकदां ती पोळी करीत होती ती त्रिकोणी झाली. इतक्यांत माझी नणंद तेथें आली; आणि म्हणाली, 'तुझ्या बापाच्या घरीं ही पोळी चालत असेल. चौदा वर्षांची घोडी झाली आणि पोळी येईना. आमच्या येथील कुत्रीं सुद्धां अशी पोळी खाणार नाहींत. माझ्या सुनेनें जर अशी पोळी लाटली असती तर

मीं तेंच लाटणें तिच्या पाठींत घातलें असतें; पण तुझ्या नाशिबानें ही पार्वती बरी मिळाली आहे म्हणून बरें,' अशा रीतीनें खूप बोलल्या. ती काय करणार ? रडली बिचारी ! मीं नणंदेची पुष्कळ समजूत केली. पण त्या जुन्या विचाराच्या बालविधवा, कडक मिजासी, ह्यामुळें त्यांना घरांत कोणी बोलत नसे. सहज बोलण्यांत भांडावयाच्या. वयानें पोक्त आणि समजूत अशी कीं, सुनांना बोललें म्हणून काय झालें ? सुनेचें घरांत चालूं द्यावयाचें नाहीं, आम्ही म्हणूं तेंच खरें, अशा बादशाही विचाराच्या त्या होत्या. आपल्या बोलण्याचा काय परिणाम होईल ह्याची त्यांना किंमत नव्हती; आणि आपण करतों हें वाईट असें वाटत नसल्यानें नातेवाइकाच्या येथें त्या अशी आग पेटवून ठेवीत. त्याच-प्रमाणें ते दिवशीं सहज माझ्या येथें आल्या तों इतकें केलें. महाराज, हें ऐकून तुम्हाला वाईट वाटेल आणि स्त्रियांची कामगिरी दाखवीत असतांना मी मध्यें ह्या अशा गोष्टी कां बोलतें असेंही आपल्याला वाटेल; पण मीं तें सर्व फार सोसलें आहे आणि माझ्या लेंकीसुनांनाही तें केव्हां केव्हां सोसावें लागतें. इतकेंच नव्हे तर आपल्या देशांत हजारों मुली अशा विचारांच्या सासूंच्या व नणंदांच्या हातांत आहेत; आणि त्यांतूनें त्यांचें सुटणें नशिबावर अवलंबून आहे. त्यांच्याकरितां आपल्यासारख्या महात्म्यांच्या, प्रोफेसरसाहेबांसारख्या विद्वानांच्या, शेटसाहेबांसारख्या श्रीमंतांच्या आणि ताईसारख्या विदुषींच्या हृदयांत दया उत्पन्न होऊन त्यांच्याकरितां कांहीं उपाय काढल्यास आमच्या रडकथांचें सार्थक होईल."

# सुनेला शिक्षण देण्याची पद्धति.

" त्यानंतर मी सुनेजवळ बसून तिच्या हातांत थोडी कणीक देऊन तिला गोळा कसा करावा तें शिकवीं, तिच्याकडून लोणचें घालवावें, भाजी करावी, सांजा करायाला शिकवावें, तेव्हां सुद्धां जवळ बसून रवा कसा किती भाजावा तें शिकवावें, अशी दरएक गोष्ट करावी. तसें करतांना पुष्कळ वेळां सामानाचा नाश होई, मला त्रास येई, पण तें सर्व सहन करून त्यांतला चांगला जिन्नस मी सर्वांना वाढून ' हा तिनें केला ' म्हणून सांगून त्याचा भलेपणा तिला देववीं. प्रथम प्रथम दरएक वस्तूंत अर्धे अधिक मला करावें लागे; पण सर्वांनीं चांगलें म्हटल्यानें तिला उत्साह येई व ती जरा जरा हौसेहौसेनें शिके. माझ्यावर ती आईसारखें प्रेम करूं लागली; पण जसजशी ती जास्त जास्त करीत असे तसतशी तिची हुषारी वाढत जात असे. त्यानंतर दागदागिना कसा घालावा—कसा वापरावा; कपडेलत्ते कसे सांभाळावे, दुखणाइताचा सांभाळ कसा ठेवावा, बोलण्याचालण्यांत कसें जपावें, मुलें कशीं सांभाळावीं वगैरे मीं तिला शिकविलें; त्यामुळें चारपांच वर्षांत ती माझ्या सर्व सुनांपेक्षां जास्त शहाणी झाली, इतकेंच नव्हें तर माझी दुसरी कोणतीही सून किंवा मुलगी तिची बरोबरी करूं शकली नाहीं. पण तसें होण्यापूर्वीं मात्र तिला व मला फार त्रास सोसावा लागला. एकदां एका जेवणावळीच्या प्रसंगीं तिला सर्वांचा आदरसत्कार करण्याला ठेविलें होतें; आणि तेव्हां तिनें थोडा घोंटाळाही केला. त्यामुळें सगळ्या माझ्यावर रागावल्या. माझी नणंद म्हणाली, ' गाढवावर कोणीं अंबारी घातली आहे काय? तूं फार शहाणी म्हणून अशा शहाणीच्या हातीं कारभार दिलास. ' मोठी मुलगी म्हणाली, 'तुझी सून आवडती तर तिचे घरांत लाड कर, पण व्यवहारज्ञान असलेल्या थोरल्या सुनेला सोडून ह्या रत्नाला कोठें शोधलेंस !' मी तिला जेवावयाला बरोबर नेई,

देवदर्शनाला बरोबर नेई, आमच्या येथें कोणी जेवावयाला आलें कीं, तिला वाढायाला लावीं, हें सुनांनाच काय पण माझ्या मुलींना सुद्धां पसंत पडत नसे. त्यामुळें त्या सगळ्या तिचा दुष्टावा करीत; पण मी मुळींच भीत नसें. मला ठाऊक होतें की, ह्या सर्व पक्क्या आहेत; त्या आपलें सांभाळतात. पण ही पक्की नसल्यामुळें माझ्या किंवा दुसऱ्या कोणाच्या मदतीशिवाय तिचें कांहीं होणें नाहीं. म्हणून जसा डॉक्टर अशक्त रोग्याला आधीं जपतो, मास्तर मठ्ठ विद्यार्थ्यांवर फार मेहनत करतो, तसें मला त्या गरीब सुनेवर जास्त लक्ष ठेवावें लागे; कारण तें माझें कर्तव्य होतें व तें केल्यानें परमेश्वर संतुष्ट होतो, अशी माझी समजूत होती व आहे. त्यामुळें दुसऱ्यांच्या बोलण्याकडे मी मुळींच लक्ष देत नसें आणि अखेरीस ईश्वरकृपेनें माझ्या श्रमाचें चांगलेंच चीज झालें."

---

## आतां होणारी सुनेची स्तुति.

"आतां जेव्हां जेव्हां आमच्या घरांतील स्त्रीमंडळ गप्पा करीत बसतें, तेव्हां तेव्हां पहिल्या गोष्टी निघून सगळ्यांना गंमत वाटते. जी माझी लीला म्हणे कीं, 'मला अशी अजागळ भावजय नाहीं आवडत, झोंकदार आवडते;' तीच म्हणते कीं, 'माझ्या ह्या वहिनीसारखी वहिनी कोठें मिळावयाची नाहीं.' माझी गंगा म्हणे, अशी मूर्ख भावजय कोठेंही पाहिली नव्हती; ' पण तीच आतां म्हणते, भावजय असावी तर अशी असावी. काय तिची नम्रता ? काय तिच्या नजरेची खुबी ? त्यांत मुळीं विकारच नाहीं. अंतःकरणांत प्रेम तरी किती ? आमच्या बोलण्याकडे जर तिनें पाहिलें असतें तर आम्हांला तिनें उभें राहूं दि

नसतें; पण वहिनीच्या मोठ्या मनाची कमाल आहे. माझ्या दोन्हीं मुलांना आपल्या मुलांजवळ ठेविते आणि शिकविते. जगांत मुलें झालीं तर अशींच होवोत.' असें बोलतां बोलतां पश्चात्तापानें तिच्या डोळ्यांतून अश्रू येतात. त्यावेळेस माझी रतन तिला प्रेमानें आपल्या पोटाशीं धरून आपल्या लुगड्याच्या पदरानें तिचे डोळे पुसते; आणि आपल्या गोड शब्दानें तिचें सांत्वन करते. हें पाहून माझ्या सगळ्या कुटुंबांत आनंदी आनंद होतो; व तें पाहून कोठलें तरी राज्य मिळाल्यासारखा आनंद मला होतो. कारण ईश्वरी कृपेमुळें माझ्या श्रमाचें सार्थक झालें आहे. तिच्या बापासंबंधीं माझी नणंद प्रथम म्हणत असे कीं, 'तीं माणसें योग्य नाहींत. त्या भिकाऱ्याची मुलगी कोण करतें'? त्याच्या मुलीनें कधीं कोणाचा संसार चालविला आहे ?' असें वाटेल तें बोलत. आतां म्हणतात, नानाची बायको घराचें नाक आहे. तिच्या पाय-गुणानें थोरल्या सूनेला मूल झाले.आपल्या थोरल्या मुलाला हिच्या पाय-गुणानें चाकरी लागली.आपला नाना कोणाच्या हातांत कधीं रहावयाचा नाहीं;त्याचे पाय सुनबाईनीं घराला लाविले; इतकेंच नव्हे तर आपल्या सर्व जातींत आज तो वरिष्ठ दर्जावर आहे. अशा पुष्कळ गोष्टी झाल्या आहेत. माझी खात्री आहे की, ती चांगल्या पायगुणाची आहे व बाळबोध घराण्यांतील आहे; तिची बरोबरी इतरांकडून होणें नाहीं.' महाराज एका साध्या गोष्टीनें मला किती करतां आलें आणि किती चांगलेपणा व मोठेपणा मिळाला ? ईश्वराची आमच्यावर पूर्ण कृपा आहे, म्हणूनच आम्हां स्त्रियांकडून यत्किंचित् दिसणारें कर्तव्य बजाविलें गेल्यानें असे फायदे होतात. आतां

## आमच्या नानासंबंधींची हकीकत

ऐका. सर्वांच्या बोलण्यानें तोहीं म्हणे कीं, 'मुलींत कांहीं हंशील नाहीं. असल्या हलकटाची मुलगी कोण पतकरतो ? मीं कांहीं

लग्न केलें नाहीं, ज्यांनीं करून दिलें ते त्याचा परिणाम भोगतील. 'असले शब्द कानांवर आल्यामुळें मींहि त्याला एक दोन वेळां धमकावलें. पण तो मला चोरून चोरून म्हणेच कीं, 'मग ? मी काय करूं ? मीं कधीं आर्जवा केल्या होत्या कीं हें रत्न मला द्या म्हणून.' त्याचे स्नेही व भावजया चेष्टा करीत कीं, 'आम्हांला हंसत होतास; पण आतां पाहूं तुझा तमाशा.' त्यामुळें त्याच्या मनांत बायकोविषयींचा आदर कमी होत गेला. पण आतां तोच म्हणतो कीं, 'बालविवाह न करणाऱ्या जातींत अशी चांगली मुलगी मिळेल अशी मला कल्पनाही नव्हती. पण माझें भाग्य थोर कीं ईश्वरकृपेनें मला असें रत्न मिळालें. त्यामुळें मला घरांत संसाराची मुळींच काळजी नसून त्यासंबंधीं पूर्ण सुख मिळालें आहे. कदाचित् मला माझ्या धंद्यांतही इतकें यश आलें नसतें, पण हा सर्व माझ्या आईचा प्रताप आहे. जर तिनें दूरवर नजर देऊन शहाणपणानें काम केलें नसतें; तर मी माझ्या मूर्ख व उतावीळ स्वभावानें या रत्नाला दगड म्हणून टाकून खऱ्या रत्नापासून होणाऱ्या सुखाला मुकलों असतों; पण ह्या होणाऱ्या चुकींतून माझ्या आईनें माझा बचाव केला. आतां माझें माझ्या रत्नाशिवाय जराही चालत नाहीं. त्या रत्नांत जो रत्नपणा आहे तो पुष्कळ दगडपणाखालीं लपला होता. त्याच्यावरचीं पुटें काढून माझ्या आईनें त्याची खरी किंमत मला करून दाखविली. त्यामुळेंच मी काय आहें हें मला समजलें, आतां हें सर्व नश्वर जग तिच्यावरून ओंवाळून टाकावें असें मला वाटतें. मी जेव्हां तिच्याकडे बघतों तेव्हां तिच्या अंतःकरणांतील वीज मला तिजकडे ओढूं लागते; आणि मग पूर्वींची आठवण येऊन मला पश्चात्ताप होतो. माझ्या पोरवयांत मीं तिला फार दुःख दिलें, माझ्या आयुष्यांत मीं एक मोठी चूक केली आहे; ती ही कीं, माझ्या रत्नाचा मीं अपमान केला.' अशा रीतीनें त्याला पश्चात्ताप होऊन त्याच्या डोळ्यांत अश्रू चमकूं लागतात, आणि ते जसे काय तिची

क्षमा मागत आहेत असें वाटतें. तेव्हां मला अगदीं धन्य धन्य वाटलें; आणि त्या प्रेमवेड्याच्या त्या निर्दोष गोष्टी ऐकण्याची मला इच्छा होते. ”

---

## आम्हांला कुटुंबस्नेहांतून मोक्ष मिळावयाचा आहे.

त्यानंतर योगिनी माता म्हणाल्या, “ महाराज, अशा रीतीनें शत्रुत्वाच्या मनोवृत्ती प्रेमांत फिरवावयाच्या; कडू टीकांचा प्रभाव थांबवून आत्मिक सौंदर्यापर्यंत पोंचवावयाचें; मूर्खतेला काढून ज्ञानाचा आनंद अनुभवावयाचा; जें मनुष्य नजरेपुढेंही नको असतें, तें मनुष्य पूज्य व वंदनीय स्थितीला नेऊन पोंचवावयाचें; हें काय पुण्याईचें काम नाहीं? खरोखर तें मोठें पुण्य आहे; आणि असा परोपकार करण्याचें आपल्या हरएक भगिनीच्या हातांत आहे. कारण घरसंसार चालवितांना व कुटुंब संभाळतांना असे कांहींना कांहीं प्रसंग प्रत्येक माणसाला येत असतात. कोणाचा मुलगा वाईट तर कोणाची मुलगी अगर कोणाची सून भांडखोर, कोणाचा नवरा डोकेंफिरू तर कोणाची आई जुन्या विचाराची, असें असतें; आणि ह्या सर्वांना निभावून घेणें आणि त्यांना उच्च दर्जाला नेऊन पोहोंचविणें हें महापवित्र काम स्त्रियांचें आहे. मार्ग चुकलेल्या ईश्वराच्या लेंकरांना रस्ता दाखविणें, त्यांच्या चुका माफ करून त्यांना आपला धर्म शिकविणें, आणि त्यांना आधार देऊन वर चढविणें, हें ईश्वराचें सर्वांत आवडतें काम आहे; आणि तें घरांत राहूनच सर्वांच्या हातून होण्यासारखें आहे. अशा साध्या कामांनींच दयाळू प्रभू स्त्रियांना स्वर्गी नेतो. कारण हीं कामें जरी आपल्याला लहान वाटतात तरी त्या चांगल्या कामांचा परिणाम फार

दूरवर पोहोंचलेला असतो. पार्वतीबाईंनीं फक्त आपल्या सुनेला सुधारिलें ! त्यांत मोठें काय केलें ? असें तुम्हांला वाटेल. पण ज्यांन कर्तव्याची ओळख झाली आहे, मनुष्याच्या मनाचा कोतेपणा समजल आहे आणि ईश्वरी प्रेमाचा अनुभव मिळाला आहे, त्यांना ह्या जगांत कांहीं तरी काम करणें हेंच जीविताचें कर्तव्य आहे असें वाटतें. ते कधीं रिकामे बसणार नाहींत, कांहींना कांहीं आपल्या बंधुवर्गाच्य कल्याणाचीं कामें करतील; आणि त्याचा फायदा बीं पेरणाराला मिळ णारच. प्रथम आपणाला लहान वाटणाऱ्या कामांचा परिणाम स्वर्गा पर्यंत पोंचतो, आणि त्यामुळें तीं करणाराला दयाघन परमेश्वर मोब दला देतो. म्हणून कामाच्या लहानमोठेपणाला बघावयाचें नाहीं. पा तीं कशा हेतूंनीं करतो तें पहावयाचें आहे, योग्य प्रकारें कढी फोड णीस टाकण्यानें, मुलाला ओंव्या म्हटल्यानें, केर काढण्यानें व मुला खेळवण्यानेंही, स्त्रिया स्वर्ग मिळवितील. कारण गीतेंत श्रीकृष्णा म्हटलें आहे कीं, जे कर्तव्य करतात ते मोक्ष मिळवितात. आम्हां संन्यास घेऊन मोक्ष मिळवावयाचा नाहीं किंवा योगसाधन अ तप करून मोक्ष मिळवावयाचा नाहीं, तर आमच्या कुटुंबस्नेहां आणि संसाराच्या कामांतूनच तो मिळवावयाचा आहे. म्हणून आम भगिनीवर्गांत त्या तऱ्हेचें ज्ञान वाढवावें असें आम्ही इच्छितों; आ [illegible] चांगलीं कामें कशीं करतां येतील तें शिकवावें [illegible]

म्हणतों; व म्हणूनच संसारांतील बारीकसारीक लांब लांब गोष्टी सांग कदाचित् प्रोफेसरसाहेबांना ह्या गोष्टी हलक्या वाटत असतील; का ह्यांत कांहीं तत्त्वज्ञान नाहीं. आपल्या प्रोफेसरांना करावयाचें तर व नाहीं, पण डोकेफोड करावयास हवी, आणि आमच्या येथें तर करून दाखवावयाचें. त्यांत खोल गोष्ट एखादीच असते. त्यामुळें प्रो सरसाहेबांना त्या निरस वाटल्यास नवल काय ? ”

## स्त्रिया पुष्कळ करूं शकतील, पण त्याचीं साधनें कोठें आहेत ?

प्रोफेसर म्हणाले, " नाहीं नाहीं; ह्या गोष्टी फार चांगल्या आहेत. तरी पण मी असें म्हणतों कीं, आपण इतक्यांवर कां थांबावें ? ह्यापेक्षां जास्त चांगलीं कामें स्त्रियांनीं कां करूं नयेत ? "

योगिनी म्हणाल्या, " खुशाल करावीं. त्या चांगलीं कामें कां नाहीं करणार ? पण प्रथम रस्ता दाखविणारा पाहिजेना ? आपल्या संसारांत उपयोगी पडणाऱ्या गोष्टी जशा आम्ही करून दाखवितों तशीं दुसरीं चांगलीं कामें सोप्या रीतीनें करण्याची पद्धति दाखवा, म्हणजे आमच्या बायका तीं आनंदानें करतील. "

प्रोफेसर म्हणाले, "उदाहरणार्थ, स्त्रियांनीं व्यापार कां करू नये? त्यांनीं बॅरिस्टर कां होऊं नये ? लष्करांत नोकरी कां करूं नये ? नवीन शोध कां लावूं नये ? ईश्वरानें हें जग सर्वांच्याकरितां उत्पन्न केलें आहे, तर मग स्त्रियांनीं आपल्या घरांत राहण्यांतच कां संतोष मानावा ? '

योगिनी म्हणाल्या, " तुम्ही म्हणतां तें सर्व—त्याहूनही जास्त करण्यास स्त्रिया तयार आहेत, पण त्याचीं साधनें कोठें आहेत ? नुसतें तोंडानें बोलून, हातानें खात्यांचीं नांवें मोजलींत त्यानें काय होतें ? जर खरी इच्छा असेल आणि पक्क्या पायावर काम करावयाचें असेल तर हें भगिनी—मंडळ जसें संसारांतील चांगलीं कामें करून दाखवितें, तसें तुम्ही तीं कामें करण्याचीं साधन आणि योजना दाखविण्याची कृपा करा. तुमच्या कल्पना लोकांना उपयोगी पडण्यासारख्या करा; तुमचा हेतु पार पाडण्यास मार्ग करून द्या, आणि सांगा कीं: ही पहिली पायरी, अशा साधनांनीं हिच्यावर चढा, म्हणजे दुसरी चढतां येईल;

तेथें अमका लाभ आहे, अशा तुमच्या योजना स्पष्ट करून दाखवा म्हणजे आपल्या स्वार्थाकरितां त्या आपल्याआपण वाट शोधीत येतील. पण मला वाटतें, हे सर्व विचार तुमच्या कल्पनेंतच आहेत. तुम्ही त्यांस व्यवहारांत आणण्याचे सोपे रस्ते शोधूं शकलां नाहींत, तेव्हां ते विचार आपल्या आयुष्यांत अमलांत आणण्याचें तुमच्यांत बळ नाहीं. हें कांहीं मी तुमच्यासंबंधानेंच म्हणतें असें नाहीं, पण हल्लींच्या जवळ जवळ सगळया विद्वानांचें असेंच आहे. त्यांचे विचारच चाललेले आहेत, पण त्यांना कोणी कृतींत आणीत नाहीं. त्यामुळें मोठमोठ्या इच्छा सुद्धां अजून किती वर्षें झालीं तरी कल्पनासृष्टींतच तरंगत आहेत."

प्रोफेसर म्हणाले, "मातोश्री, खरी गोष्ट आहे. माझ्या योजना फार मोठ्या आहेत; पण अद्याप त्यांतील एकही मी अंमलांत आणूं शकलों नाहीं. आता तुम्हीं बरें सुचविलेंत. आतां मी त्यांचा जास्त खोल विचार करीन. पुनः केव्हां तरी आपण त्यासंबंधानें बोलूं."

योगिनीबाई म्हणाल्या, "फार चांगलें, माझ्या भगिनीवर्गाच्या कल्याणाच्या गोष्टी ऐकणें मला फार आवडतें. तरी पण एवढें लक्षांत ठेवा कीं, तुम्ही म्हणतां तशीं कामें अपवाद म्हणून, मान मिळविण्याकरितां धंदा म्हणून, कांहीं स्त्रिया करतील. पण तसें काम करणें स्त्रियांना भूषण आहे असें मी मानीत नाहीं. कारण व्यवहारदृष्टीनें जरी तीं कामें आपल्याला मोठीं वाटतात, तरी ईश्वरानें स्त्रियांना जी पवित्र कामगिरि सांगितली आहे, तिच्यापुढें तीं कामें लहान आहेत असें मला वाटतें. कारण त्या कामाकरितां जगांतील सर्व स्त्रिया योग्य नाहींत. दुसरें असें कीं, तशा कामासाठीं बाहेरच्या पुष्कळ साधनांची जरूरी लागते आणि तीं स्त्रियांना सहज मिळूं शकत नाहींत. शिवाय अशा कामांत पगाराकडे आणि मानमरातबाकडे बघावयाचें असतें. दुसरें असें

कीं, अशीं कामें केलींच पाहिजेत अशी कांहीं ईश्वरी आज्ञा नाहीं, म्हणून आयुष्यांतील कर्तव्यापेक्षां त्या कामांना आम्ही हलकें लेखतों. आमची खरी कामगिरी काय याचा आपण विचार करा."

## स्त्रियांचीं कर्तव्यें.

"जगांत सौंदर्य वाढविणें, पुरुषांत अमृत ओतणें, मुलांत मनुष्यत्व आणणें, जगांतील दुःख कमी करणें, काम, क्रोध, लोभ, मोह वगैरे राक्षसांशीं लढाई करून जय मिळविणें, वगैरे कामें आमचीं आहेत, जगांत ईश्वरी प्रेम वाढविणें, तुम्हांला परमार्थ शिकविणें, रसिक करणें, पुरुषार्थ - वाढविणें, हें आमचें काम आहे. तुमचा आनंद वाढविणें, नीतिमत्ता वाढविणें आणि तेणेंकरून संसारांत स्वर्ग ओढून आणणें हें आमचें काम आहे; इतकेंच नव्हे, तर तुम्हांला खुद्द ईश्वरासन्निध ओढून नेणें, हें आमचें काम आहे. हीं महत्वाचीं कामें सोडून, कोठें आगबोटीचें सुकाणूं धर, कोठें खाणीचीं हत्यारें वापर, तलवार धर, हीं कामें आम्हीं काय म्हणून करावीं? जरा विचार करा कीं, आपल्या भगिनी शिवाजीचे सरदार झालेल्या चांगल्या कीं स्वदेशाभिमानी पुत्रांच्या माता झालेल्या चांगल्या? प्रतापसिंहातर्फे लढावयाला गेलेल्या चांगल्या, का तसे प्रतापसिंह उत्पन्न करणाऱ्या चांगल्या? अशानें त्यांना प्रतापसिंह कायम ठेवून दुसरे प्रताप उत्पन्न करतां येतात. एखादी स्त्री कवि भवभूति उत्पन्न होण्याचें बीं पेरणारी झाली तर काय वाईट! न्यूटन, लूथर, वॉशिंग्टन, स्पेन्सर, ॲडिसनसारखे मुलगे उत्पन्न करणाऱ्या माता होणें चांगलें, का रेल्वेंत, दुकानांत सरकारी खात्यांत कारकुनी करणाऱ्या होणें चांगलें? बोला तुम्हांला,

काय आवडतें तें ? जरूरीकरितां म्हणून नोकरी-धंदा केल्याची गोष्ट वेगळी; परंतु खरें स्त्रियांचें स्त्रीत्व प्रेमांत आहे. ”

आम्ही असें बोलतों तों पार्वतीबाईचा धाकटा चिरंजीव नाना-आतां वकीलसाहेब-पार्वतीबाईंना फिरावयास नेण्यासाठीं आले. पार्वतीबाईंनीं आम्हां सर्वांना त्यांची ओळख करून दिली; आणि म्हणाल्या, “आतां तुमच्या गोष्टी चालत होत्या, ” “ वा ! आमच्या गोष्टी ! त्या तर मला जरूर ऐकल्या पाहिजेत. ” असें म्हणून ते एका खुर्चीवर बसले. तेव्हां योगिनीमाता म्हणाल्या कीं, “तुमच्या रत्नप्रभेची स्तुति चालली होती. ”

तेव्हां वकीलसाहेब म्हणाले कीं, “ तर मग मलाही थोडीशी स्तुति करावयास लागलें पाहिजे. कारण माझ्या रत्नाची स्तुति ऐकण्यांत अगर करण्यांत मला स्वर्गीय आनंद होतो; इतकेंच नव्हे, तर कारण नसतांना माझ्या तारुण्यावस्थेंत मीं तिचा फार अपमान केला आहे; आणि तिला फार दुःख दिलें आहे. तेव्हां आतां जेव्हां तिची स्तुति करतों किंवा ऐकतों तेव्हां तेव्हां मला वाटतें कीं, मी एक प्रकारचें प्रायश्चित्त घेत आहें. जसें एखादा गृहस्थ आपल्या हातून झालेल्या पापाबद्दल शास्त्र-विधीप्रमाणें प्रायश्चित्त घेतो तसें मी माझ्या मनाचें समाधान करण्या-करितां, जिवाला आनंद देण्याकरितां, तिची स्तुति ऐकणें अगर करणें हें प्रायश्चित्त समजतों. त्यायोगानें मला आनंद आहे व त्यामुळें मी पवित्र होतों. ”

तें ऐकून हंसतमुखानें, गोड वाणीनें, रत्नप्रभाबाई म्हणाल्या, “जेथें तेथें ह्याच गोष्टी कसल्या ! अशा लहानपणाच्या गोष्टी काढून मला कां लाजवितां ? अशा महात्म्यांचे जवळ कांहीं ज्ञानाच्या गोष्टी कराव्या.”

---

## "अनुभविक प्रेमाच्या गोष्टींपेक्षां जास्त श्रेष्ठ ज्ञान.

मला तर जगाच्या इतिहासांत असेलसें वाटत नाहीं; आणि तें ज्ञान जर महाराजांना आवडत नसेल तर माझें व त्यांचें पटावयाचें नाहीं. कारण प्रेमाचें ज्ञान न आवडण्यांतच जर महाराजांचें माहात्म्य असेल तर त्या माहात्म्याला दुरूनच नमस्कार असो. कारण मी असें समजतों कीं, ब्रह्मांडाच्या उत्पत्तीचें मूळ ईश्वरी स्नेह होय, आणि ह्या जगांतील स्नेहाची 'बॅटरी' स्त्रिया होत. ती बॅटरी जितकी चांगली, मोठी, मजबूत व किंमतवान् असेल, जितकी जास्त उपयोगी असेल, तितकी आपल्या जीवनांत जास्त वीज मिळवितां येईल; म्हणून माझ्या ज्ञानाला मी प्रेमाकडे वळवितों. ह्यामुळें ज्या गोष्टी तुला लहानपणच्या वाटतात त्यांतून मी माझा स्वर्ग तयार करीत आहें. म्हणून जेथें जेथें पुनः पुनः फिरून त्याच गोष्टी सांगत जाईन आणि नवीन आनंद मिळवीत जाईन. कारण आतां माझें ज्ञानच मला कर्तव्य म्हणून प्रेमाकडे वळवितें. म्हणून आतां मी प्रेमाखेरीज दुसरी गोष्ट बोलूं शकण्यासारखा नाहीं." असें म्हणून त्यांनीं प्रेमयुक्त नजरेनें आपल्या प्रियेकडे पाहिलें. मग महाराजांचा अभिप्राय ऐकण्याकरितां अभिमानयुक्त दृष्टीनें त्यांच्याकडे पाहिलें.

महाराज म्हणाले, "वकीलसाहेब, तुम्ही माझ्या भगव्या कपड्यांकडे पाहून भिऊं नका. मी पण तुमच्यासारखा प्रेमांतला किडा आहें, आणि त्या प्रेमाला वाढविण्याकरितां व हा वेष मीं घेतलेला आहे; म्हणून प्रेमासंबंधींचे तुमचे विचार ऐकून मला मोठा अभिमान वाटतो. तुमच्या प्रेमी अनुभवाच्या गोष्टी खुशाल सांगा- अशा गोष्टी हेंच आमच्या जीवनाचें तत्त्व; कारण त्यानेंच जगाचें कल्याण होणार आहे, असें आम्ही समजतों. म्हणून निरनिराळ्या तऱ्हेनें प्रेमाला जागृत करावयाचें काम आम्ही करतों, त्यांत तुमच्या गोष्टी पुष्कळ उपयोगी होतील; करितां

त्या खुशाल सांगा. रत्नप्रभाबाईला ज्या ह्या गोष्टी लहानपणच्या वाटतात त्या इतक्याचकरितां कीं, आपल्या स्त्रियांना अद्याप प्रेमाची किंमत कळत नाहीं; आणि त्यांत त्यांची चूकही नाहीं. आपल्याला रस्ता दाखविणारे शास्त्री, धर्मगुरु, साधु वगैरे सर्व 'संसारमिथ्या' म्हणून सांगतात, पण तो कोणाला सुटत नाहीं. त्यांत प्रेमानें काय मिळवितां येईल हें ते सांगत नाहींत; कारण तेच त्यांत मग्न आहेत; तर मग स्त्रियांना तें कोठून कळणार ? त्यांच्याजवळ तीर्थ, नेम, मंत्र, तंत्र, भूत वगैरेच्या गोष्टी असणार. पण ईश्वरी कृपेनें मी अशा आकुंचित विचाराचा नाहीं. मी तर माझ्या देशाचें व बंधुवर्गाचें कसें कल्याण होईल हेंच पहात असतों; आणि त्यासंबंधींच्या गोष्टी नेहमीं बोलत व ऐकत असतों. नुसतें 'मी ब्रह्म आहें' म्हटल्यानें व जप, तप, ह्याचेयोगानें मुक्ति मिळेल असें मला वाटत नाहीं. जगाची सेवा केल्यानेंच चांगलें होईल अशी माझी समजूत आहे व म्हणून मीं सेवाधर्म स्वीकारला आहे; आणि प्रेमाशिवाय सेवा होणार नाहीं, म्हणून प्रेम हा आमचा धर्म आहे. प्रेममंत्राचा प्रसार करण्याकरितां तुमच्यासारख्या बंधुभगिनी जें सांगतील तें ऐकण्याला मी सदैव तयार असतों. म्हणून आमच्या अंतःकरणावर चांगला परिणाम करणाऱ्या तुमच्या प्रेमळ अनभवाच्या गोष्टी आनंदानें सांगा."

---

## मला बायको कशी पाहिजे ?

वकीलसाहेब म्हणाले: "मी जेव्हां कॉलेजांत बी. ए. चा अभ्यास करीत असें, तेव्हां बायकोसंबंधानें माझे विचार असे होते कीं, मला फार सुरेख बायको नसली तरी पण वाईटही नको. मला विद्वान्, शूर, श्रीमंत अगर अभिमानी बायको नको; पण अगदींच मूर्ख, भित्री, गरिब...

अशीही बायको नको. पण तिला कांहीं तरी आपलेपणा. हवाच. अगदीं स्वतंत्र विचाराची बायको नको खरी, पण गुलामगिरी पत्करणारीही नको. कोणाची पर्वा न करणारी, डोळ्यांत नम्रता नाहीं, दुःख किंवा हर्ष हे विकार जिला नाहींत, सुस्त, क्षणोक्षणीं रडणारी, जनमन राहिलेंच, पण माझ्याही मनाची जरा सुद्धां पर्वा न करणारी अशी बायको मला नको; पण योग्य प्रमाणांत सर्व गुण जिच्यांत आहेत आणि आपला संसार योग्य तऱ्हेनें चालविण्यापुरतें जिच्यामध्यें प्रेम, धिटाई, स्वतंत्रता वगैरे गुण आहेत अशी बायको मला पाहिजे. सारा दिवस नट्टापट्टा करणारी जरी नको, तरी योग्य प्रमाणांत आपल्या योग्यतेनुसार आपल्या शरीराची, कापडचालत्यांची व मुलाबाळांची काळजी घेणारी पाहिजे. जिला पहाण्यानें माझें चित्त शांत होईल, अंतःकरणांत प्रेमविकार उद्भवतील, मला पाहिल्यानंतर दुसरें कांहींएक करण्याची जिची इच्छा राहणार नाहीं व जिच्या दर्शनानें माझी बुद्धि खुलेल; जिला पाहातांक्षणीं आदर, आणि प्रेम जगाच्या मनांत उत्पन्न होतील आणि मला पाहाण्यांतच जिला स्वर्ग मिळाल्याप्रमाणें वाटेल, अशी बायको मला हवी; थोडक्यांत असें कीं, जिला पहाण्यानें मी तिचाच असें होईल आणि मला पहाण्यानें जी माझीच असें होईल; सारांश, दोन अर्धीं अंगें मिळून एक पूर्ण अंग होईल आणि जिच्यामुळें मी व माझ्यामुळें ती पूर्ण होईल, असें रत्न मला पाहिजे आणि तसें रत्न ईश्वरानें मला दिलें आहे. लहानपणीं मला अद्भुत गोष्टी वाचण्याचा फार नाद असे. आणि त्यामुळें मी त्या पुष्कळ वाचीत असें. एकदां एक गोष्ट मीं अशी वाचली होती कीं, एका माणसाजवळ एक जादूची आरशी होती, तींत आपल्या इच्छेला वाटेल तें त्याला पहावयास मिळे. समुद्र, पर्वत, माणसें असें सर्व कांहीं दिसे. हें ऐकून मला वाटे कीं ती आरशी मला मिळाल्यास कशी मजा होईल! सारा दिवस त्यांतील मजा माझ्या इच्छेप्रमाणें पहावयास

मिळेल; व तें सर्वांना दाखवून मी सर्वांना खुष करीन. पुढें मी ती गोष्ट विसरलों. पण दयाळू प्रभूनें माझी ती कामना पूर्ण केली. कारण त्याहून चमत्कारिक आरशी ईश्वरानें मला दिल्यामुळें त्यांत दयेच्या देवींचीं दर्शनें होतात; प्रेमाच्या लाटा व रसिकतेचे प्रवाह वाहतांना दिसतात; नित्य नवें नवें सौंदर्य दिसतें; उच्च मनोवृत्तींचें दर्शन होतें; इतकेंच नव्हे, तर जो जो मनुष्य ती घेऊन पाहील त्या त्या दरएकाला थोडें थोडें सगळें दिसतें .जादूची आरशी कांचेची असते, पण माझी आरशी तर खऱ्या रत्नाची आहे. " असें म्हणून त्यांनीं आपल्या रत्नाकडे पाहिलें. त्या वेळची ती आनंदी मुद्रा—तो सहास्य चेहरा—पाहून जसें कांहीं ते तिच्या डोळ्यांतील कांहीं तेज आपल्याकडे ओढून घेत आहेत असें वाटत होतें. त्या प्रेमळ जोडप्याची ती प्रेमसमाधि पाहून आमच्या सर्वांच्या मनावर एक प्रकारचा विशेष परिणाम झाला आणि त्यांच्यासंबंधानें अभिमान उत्पन्न झाला. आम्ही सर्वजण तो आनंदजनक देखावा घटकाभर पहात राहिलों. मग मीं म्हटलें, " वकीलसाहेब, तुम्हांला अशी आरशी मिळाल्याबद्दल मी तुमचें अभिनंदन करतें. खास तुम्ही भाग्यशाली आहांत; कारण अशीं प्रेमळ जोडपीं सर्वत्र दिसत नाहींत. जर असतीं तर मग दुःख राहिलेंच नसतें."

हें ऐकून वकीलसाहेब म्हणाले, " ताई, एक आरशी मिळाली आहे, इतकेंच नव्हे, तर ईश्वरी कृपेनें मला त्यापेक्षां पुष्कळ जास्त मिळालें आहे."

तें ऐकून शास्त्रीबुवा म्हणाले, " हें काय आणखी ? जादूच्या आरशीपेक्षां आणखी जास्त काय असणार ? कारण सूर्याचें ग्रहण बघण्याकरितां आपण ज्याच्यावर काजळ धरतों तशी एक आरशी मला मिळाली आहे. त्यांतून ग्रहण दिसतें. त्यावरून मला तुमची आरशी चांगली वाटली. तेव्हां मला वाटलें ह्याहून चांगलें कांहीं नसतें."

तें ऐकून महाराज म्हणाले, " शास्त्रीबोवा, ग्रहण पाहण्याची आरशी तर पुष्कळांना मिळते, पण ग्रहण पाहण्याच्या आरशीसारख्या आरशीचीच जादूची आरशी केली तर विशेष खुबी आहे. हाच स्त्रियांचा परमार्थ आहे, तेंच महाभाग्य आहे, आणि त्याच्यावरच परमेश्वराची पूर्ण कृपा असते. कारण आपल्या गरीब घरांत राहून स्त्रिया किती परमार्थ करतात ! पहा कीं, त्या ग्रहण पहाण्याच्या आरशीला जादूची आरशी करतात, हें किती कल्याणकारक आहे ? विचार करा कीं, आपलें आणि परक्याचें हें काय थोडें कल्याण आहे ! तुम्ही पुष्कळ वेळां भागवत वाचतां आणि पैसे गोळा करतां, पण त्यामुळें कांहीं कोणाचें आयुष्य सुधारूं शकतां का ? मग आयुष्याचें सार्थक करण्यांत तुमच्याहून पार्वतीबाईचा नंबर वर लागतो कीं नाहीं ? " असें म्हणून प्रोफेसरसाहेबांकडे पहात पहात म्हणाले, " मला वाटतें कीं, ह्या उदाहरणानें तुमची खात्री झाली असेल कीं, स्त्रिया घरांत राहून चांगलीं कामें करूं शकतात. "

प्रोफेसर कांहीं म्हणणार होते, इतक्यांत शास्त्रीबोवा म्हणाले, "त्या गोष्टी राहूं द्या. आधीं वकीलसाहेबांना जादूच्या आरशीपेक्षां आणखी दुसरें काय मिळालें आहे तें तर ऐकूं द्या. "

## मांत्रिक आंगठी.

हें ऐकून वकीलसाहेब म्हणाले कीं, " मी जेव्हां लहान होतों तेव्हां एका पुस्तकांत एका आंगठीची गोष्ट वाचली होती ती अशी:— एका गृहस्थाजवळ एक आंगठी होती. ती जरा घांसली कीं, एक राक्षस उभा राही, आणि त्याला तो मनुष्य जें सांगेल तें काम तो करी व

मागेल तो जिन्नस आणून देई. तें वाचून मला वाटलें कीं, असें एखादें भूत मला मिळेल तर बरें होईल. म्हणजे मग मी आकाशांत उडेन व समुद्रांत बुडया मारीन, पण आपलें नशीब कोठें आहे कीं, अशी मंत्राची आंगठी मिळेल. बरें, माझ्या दैवानें ती मला मिळाली, परंतु तिला कोठें घासावें, हेंच मला ठाऊक नव्हतें, माझ्या आईच्या शहाणपणानें तिला कोठें घांसावयाचें हीं खुबी मी समजलों. आणि तिचा उपयोग करूं लागलों. तेव्हां आतां मला वाटतें कीं, त्या गोष्टींतील आंगठीपेक्षां ही चांगली. कारण ती फक्त बोटांतच घालतां येत असे; तेव्हां वेळेस पडून हरवायची भीति! पण ही तर माझ्या अंतःकरणांत बसून आत्मरूप झाली आहे. शिवाय त्या आंगठीनें प्रत्यक्ष एक काळेंकुट्ट भूत येत असे; परंतु ह्या आंगठीचा मी स्वतः मदतनीस देव झालों आहें. तिला बाहेरून घांसावें लागे. पण ही अंतःकरणांतील हेलकाव्यानें माझ्या इच्छा परिपूर्ण करते. किल्ली दिलेला फोनोग्राफ जसा आपल्या आपण गाणें गातो, तशी माझी रसवृत्ति गायला लागते. ईश्वरी वरदानानें सनत्कादिक जसे नेहमीं लहान राहूं शकतात, तसें प्रेमाच्या बाबतींत माझें मन बाळकच आहे. विमानांतून उडणाऱ्याला जसें सर्व खोल वाटतें, आणि वाटेल तेथें उडतां येतें, तसें आंगठीच्या घर्षणानें माझें होतें, आणि मी उंच जाऊन स्वाभाविकतेचा आनंद मला मिळतो. हिमालयांतून जशी गंगा वाहते, तशी त्या आंगठीच्या घर्षणानें माझ्या अंतःकरणांतून प्रेमाची गंगा वाहते. जसा समुद्राला चंद्र उचंबळावितो तसें आंगठीचें घर्षण माझें अंतःकरण उचंबळवितें. महाराज, अशा खुबीची माझी आंगठी कोणती ती आपल्याला माहीत आहे का? दैवी प्रकाश देणारी अलौकिक शक्ति अशी ही माझी रत्नाची आंगठी तीं ही रत्नप्रभा पाहिलीत का?"

---

## प्रेमाची समाधि

असें म्हणून त्यांनीं हातांतील काठी बायकोकडे करून जवळच बसलेल्या आपल्या बायकोकडे प्रेमाच्या गोड नजरेनें एकसारखें दोन तीन मिनिटें पाहिलें. ती इतका वेळ खालीं मान घालून जवळच पडलेल्या एका पुस्तकाचीं पानें उगीच चाळीत बसली होती. तिनें नवऱ्याची काठी पाहून वर मान केली. आणि नवऱ्याची आपल्याकडे लागलेली दृष्टि पहातांच तिच्या शरीरांत जणूं काय वीज उत्पन्न झाली. अशा रीतीनें तिच्या रोमारोमांत आनंद व्यापून राहिला. त्याचें वर्णन करणें मुष्कल आहे. तिची ही स्थिति पाहून आम्ही सर्व तिच्याबरोबर आनंदांत गटंगळ्या खाऊं लागलों आणि एखाद्या वस्तूचें ध्यान धरावें त्याप्रमाणें सर्व तिच्याकडे एकाग्रतेनें पाहत राहिलों.

मग महाराज म्हणाले, "पाहिलंत का प्रोफेसरसाहेब, नुसत्या दृष्टीनं अशी प्रेमाची समाधि लागते ती ? हें केवढें भाग्य ! ह्याचा जरा विचार करा. मला वाटतें, मनुष्यजातीवर देवाची जी सर्वांत मोठी कृपा आहे ती प्रेमाची होय; आणि तें प्रेम स्त्रियांच्या स्वभावांत, शरीररचनेंत आणि प्रकृतींत आहे; म्हणून स्त्रियांत असणाऱ्या स्वाभाविक प्रेमाला वाढविणें हेंच त्यांचें मोठें कल्याण आहे. त्याखेरीज दुसरें मोठें स्त्रियांचें कल्याण काय असणार ? तें मला समजत नाहीं; इतकेंच नव्हे, तर घरांत राहून स्त्रिया आपलें इतकें कल्याण करून घेतात कीं, बाहेरच्या धंद्यानें, स्वतंत्रतेच्या नांवानें मनसोक्त वागण्यानें, किंवा युनिव्हर्सिटीच्या डिग्ऱ्यांनीं, त्यांचें इतकें कल्याण कधीं झालें नसतें. अशी ह्या प्रेमाच्या समाधीवरून तुमची खात्री होते कीं नाहीं ?"

हें ऐकून प्रोफेसर विचारांत पडले; कारण कीं, पार्वतीबाईच्या गोष्टी ऐकिल्यानंतर आणि वकीलसाहेब व रत्नप्रभाबाईचें प्रेम पाहिल्यानंतर त्यांना असें वाटलें कीं, मी कमनशिबी आहे. कारण मी

प्रेमाच्या गोष्टी बोलतों पण प्रेम काय तें मला समजत नाहीं, तेव्हां अनुभव तर कोठून असणार ? शिवाय त्यांना असें वाटलें कीं, स्त्रिया घरांत राहून चांगलीं कामें करूं शकतील, ह्यांत कांहीं संशय नाहीं. तरी आपण आपल्या विद्वत्तेला साजेसा कांहीं तरी जबाब द्यावा म्हणून ते गाढ विचारांत होते. इतक्यांत शास्त्रीबोवांच्यानें रहावेना म्हणून ते आपल्या स्वभावाप्रमाणें म्हणाले, " मला वाटत असे कीं, तुम्ही सर्व एकत्र जमलां म्हणजे काय बोलत असाल कोण जाणे. पण पहातों तों तुम्ही सर्व

## स्त्रियांचे भाट

आहांत. असा भाटपणा राजेरजवाडे किंवा शेटसावकारांकडे कराल तर पांचपंचवीस रुपये तरी मिळत जातील ! फुकटची बायकांची स्तुति करून काय मिळतें ? मी जर माझ्या बायकोची अशी स्तुति करूं लागलों तर ती अशी डोक्यावर बसेल कीं, दुसरे दिवशीं मला जेवायला सुद्धां मिळणार नाहीं. म्हणून त्यांना आणखी शहाण्या करणाऱ्या असल्या गोष्टी बोलूं नका. नाहीं तर लोकांचीं घरें मोडतील आणि मग तुमच्यासारख्यांना सुद्धां त्या डोईजड होतील. त्यांना आपल्या साध्याभोळ्याच राहूं दिल्या नाहींत तर मग जग चालेल कसें, ह्याचा विचार करा. "

प्रोफेसरसाहेबांच्या विचारांत अडचण पडल्यानें ते इंग्रजींत म्हणाले, " अशा निरुपयोगी माणसाला तुम्ही कशाला बरोबर ठेवतां ?" तें ऐकून वकील इंग्रजींत म्हणाले, " हा मूर्ख कोण आहे ? तो आपल्या रसिकतेचा भंग करितो ! आपल्या रसिकतेंत ही कठोरता कशास पाहिजे ? " महाराज म्हणाले, " रसिकतेला खुलविण्याकरितां थोड्याशा कठोरतेचीही जरूरी असते. "

तें ऐकून वकीलसाहेब म्हणाले, " जर आपल्याला शास्त्रीबोवा भाट म्हणतात, तर मला तें भाटपणा आणखी थोडेंसें करूं दे. कारण

आपल्या बायकोचा भाट होऊन स्तुतिपाठ करणें हें माझें मोठ्यांत मोठें सुख आहे. इतकेंच नाहीं पण मी जेव्हां तिची स्तुति करितों तेव्हांच माझ्या जिवाला शांति येते व तेव्हां मला शेर शेर मांस चढतें. जरी अद्याप माझें मन चंचल आहे, तरी तिची स्तुति करतांना तें दुसऱ्या कोठें जात नाहीं; तर तेथेंच स्थिर होतें. दुसऱ्या एखाद्या विषयावर बोलायचें असल्यास मला आगाऊ विचार करावा लागतो, पण जेव्हां माझ्या प्रियेसंबंधीं बोलायचें असतें तेव्हां आपल्या आपण स्फूर्ति होऊन भराभर शब्द तोंडावाटे बाहेर पडतात. कोणत्याही व्यावहारिक गोष्टीविषयीं मला लवकर कंटाळा येतो; इतकेंच नव्हे, पण कायद्याचा अभ्यास, कीं ज्यांत माझी स्तुति होते, त्यानें सुद्धां मी कंटाळतों पण माझ्या लाडकीची स्तुति करतांना मी कधीं कंटाळलों आहें असें मला आठवत नाहीं. शास्त्रीबोवा लक्षांत ठेवा कीं, शुद्ध, सरळ स्वभावाच्या ब्राह्मणाला पूजेच्या वेळेस वेदमंत्र म्हटल्यानें जितका आनंद होतो तितकाच आनंद मला माझ्या प्रियेची स्तुति केल्यानें होतो कारण मी असें समजतों कीं, माझ्या प्रियेची स्तुति ती प्रेमाची स्तुति आणि प्रेमाची स्तुति म्हणजे ईश्वराची स्तुति होय. म्हणून शास्त्रीबोवा, तुम्ही मला खुशाल बायकांचा स्तुतिपाठक म्हणा मी कांहीं तें काम सोडणार नाहीं. जर कधीं इंद्र येऊन मला म्हणेल कीं, बायकोची स्तुति करणें तूं सोडून दे, म्हणजे मी तुला स्वर्गाला नेईन. तर मी म्हणेन कीं, तो तसा स्वर्ग मला नको. कारण माझ्या बायकोनें मला मनुष्य केलें आहे, मला ईश्वरासन्निध जाण्याचा रस्ता तिनें दाखविला आहे, म्हणून तिची स्तुति करणें हें माझें मोठ्यांत मोठें सुख आहे. तिची स्तुति करणें, उपकार मानणें आणि मनःपूर्वक तिला नमन करणें हें मी माझें कर्तव्य समजतों. म्हणून मला आणखी स्तुतिपाठकच होऊं द्या."

---

# कामरू देशाची जादू.

" महाराज, मला लहानपणीं चमत्कारिक गोष्टी वाचण्याचा नाद होता, म्हणून मीं मागें सांगितलेंच आहे. त्यांत एकदां मीं असें ऐकिलें कीं, कामरू देशांतल्या बायकांजवळ अशी जादू आहे कीं, त्या पुरुषांना बैल करून टाकतात. तेव्हां मला असें वाटे कीं, त्या अशा कशा बायका असतील कीं, ज्या माणसांना बैल करतात. मीं जेव्हां मोठा होईन तेव्हां जरूर त्या देशांत जाईन, आणि त्या बायका पाहीन, असे विचार मनांत येत आणि मग मी ते विसरून जाई. पण ईश्वरी कला पहा कीं, त्यानें मला घरांतच कामरू देश दिला; आणि माझ्या रसिक स्त्रीनें मला बैल बनविलें आहे. " हें ऐकून आवेशांत येऊन शास्त्रीबोवा म्हणाले, " हें काय वकीलसाहेब, तुम्हांला तुमच्या बायकोनें बैल केलें आहे ? "

वकीलसाहेब म्हणाले:-" हो, यांत काय संशय ! जर तिनें मला बैल केला नसता तर मी अद्याप हिंस्र पशु राहिलों असतों. त्यापेक्षां बैल काय वाईट ? बैल म्हणजे काय हें तुम्हांला ठाऊक आहे का ? ईश्वरानें—सदाशिवानें—नेहमीं आपल्याजवळ राहण्याकरितां पसंत केलेला प्राणी तो बैल. बैल हा शेतीचा आधार आहे. बैलावर जगाचा भार आहे. बैलाची आई पूज्य गाय मातोश्री आहे. दुसऱ्याला उचलून दूर नेण्याची शक्ति बैलांत आहे. बैलाच्या स्वभावांत शांति, बळ व सहनशीलता आहे, म्हणून व्यासांनीं श्रीमहाभारतांत धर्माला बैलाचें रूप दिलें आहे. शास्त्रीबोवा, समजलां कीं नाहीं, मला माझ्या बायकोनें कशा तऱ्हेचा बैल केलें आहे तें ? बैल केला आहे असें म्हणतांक्षणीं थट्टा वाटते आणि तुमच्या बायकोला तुम्ही 'रांडेचे' वगैरे शिव्या देतां आणि ती तुम्हाला 'ठाऊक आहे. मोटी तलवार गाजविलीत ! रिकामटेकडे भटकायचें आणि मग घरीं येऊन ताशेरा

झाडायचा ! ' असें म्हणते. तें चांगलें, कां मला बैल केलेलें चांगलें ?" हें ऐकून शास्त्रीबुवा डोकें खाजवूं लागले, आणि आम्हांला त्यांची कींव आली, व हंसेंही येऊं लागलें.

त्यानंतर आपली थट्टा थांबविण्याकरितां जरा आळस देत देत शास्त्रीबुवा म्हणाले, "मग तुमचें प्रेमाचें पुराण झालें कीं नाहीं ?"

हें ऐकून वकीलसाहेब म्हणाले, " अहो, तुम्हांला ठाऊक नाहीं का ? कीं प्रेमाचें पुराण कधीं सरत नाहीं; कारण जेव्हां सृष्टि नव्हती तेव्हांही ईश्वराच्या अंतःकरणांत प्रेम होतें. त्या प्रेमांतूनच सृष्टि उत्पन्न झाली आहे, आणि जेव्हां सृष्टीचा प्रलय होईल तेव्हां सुद्धां जीवांच्या अंतःकरणांत प्रेम राहीलच; आणि त्या वासनेमुळें पुन्हां सृष्टि उत्पन्न होईल. म्हणून तें सृष्टीच्या आदिअंतांत आहे. तेव्हां त्याच्या गोष्टी कशा पुऱ्या होतील ? जर या गोष्टी तुम्हांला दूरच्या वाटत असल्या, तर तुम्हांला समजतील अशा माझ्या अनुभवाच्या गोष्टी मी तुम्हांला सांगतों. "

---

## माझी प्रेमळ जोगीण.

विद्यार्थिस्थितींत मीं एकदां अशी गोष्ट ऐकली कीं, एक जोगी होता. तो आपल्या बायकोला माशी करून एका डबींत घालून ती डबी झोळींत ठेवी. तें ऐकून सर्वांना मिशांवर ताव देऊन मी सांगें कीं, मी देखील माझ्या बायकोला माशी करून डबींत घालून ठेवीन. पण आतां आपण पाहतच आहां कीं, मला कांहीं तसें योगी होतां आलें नाहीं. त्या गोष्टींतील योग्यापेक्षां माझी जोगीण फार पराक्रमी आहे, कारण तिनें असा कांहीं मंत्र केला आहे कीं, मी माशी व्होतां तिच्या

हृदयाच्या ऊर्मीत राहूं शकतों. इतकेंच नव्हे, पण त्या योग्याला जप-तप करण्याकरितां जंगलांतून जावें लागे; पण माझी जोगीण घरांत आणि कुटुंबांत राहून आपला प्रेमयोग साधून घेते. योग साधण्याकरितां गुंफेंत बसलेला योगी कांहीं परमार्थ साधूं शकत नव्हता; पण तिच्या हातून हमेशा पुष्कळ तऱ्हेचा परमार्थ घडतो. त्याला गुरु लागे तर तिला प्रेम गुरु भेटतो. सारांश, सर्व तऱ्हेनें ती त्या गुरूपेक्षां श्रेष्ठ आहे. त्यामुळें मला ती माझीपेक्षांही लहान करून आपल्या अंतःकरणांत ठेवीत आहे. हें काय अशक्य आहे? जीवात्मा अमर आहे, तेव्हां शास्त्रीबुवा, विचार करा कीं, माझें प्रेमाचें पुराण इतक्यांत कसें संपणार? तें जिवाबरोबरच संपेल."

---

## श्रीकृष्णाचा योग आणि माझ्या लाडकीचा योग.

"इतकेंच नव्हे, तर श्रीकृष्णाचा योगही माझ्या लाडकीच्या योगापेक्षां मला कमी दर्ज्याचा वाटला. मी कॉलेजांत अभ्यास करीत असतांना गीता वाचीत असें, तींतील अकराव्या अध्यायांतील विश्वरूपदर्शन वाचतांना मला फार मजा वाटत असे. जसे अर्जुनाला दिव्यचक्षु देणारे कृष्णपरमात्मा भेटले होते, तसे मला कोणी भेटले तर किती चांगलें! असे विचार जेव्हां माझ्या मनांत येत तेव्हां मला ठाऊक नव्हतें कीं तसे दिव्यचक्षु देणारे महात्मे मला मिळाले आहेत; आणि त्यामुळेंच मला तिचा योग जास्त श्रेष्ठ वाटतो. कारण कृष्णांनीं दिव्यचक्षु घटकेपुरतें दिले होते, पण माझ्या योगिनीनें मला दिलेले दिव्यचक्षु माझ्या सगळ्या आयुष्यभर कामीं पडणार आहेत. श्रीकृष्णानें दाखविलेल्या दर्शनानें अर्जुन भ्याला होता, आणि तें भयंकर रूप काढून घ्या म्हणून

प्रार्थना करूं लागला होता; पण माझ्या लाडकीनें आपल्या सौंदार्याच्या दर्शनानें मला वेडा केलें आहे. देवानें विश्वरूपांत काळाच्या तोंडांत योद्ध्यांचीं शवें दाखविलीं होतीं, पण माझ्या प्रेमळ योगिनीनें मला दिव्यचक्षु देऊन त्यांत मला देवतांचीं दर्शनें घडविलीं आहेत आणि त्यामुळें मी स्वर्ग पाहूं शकतों. इतकेंच नव्हे तर असेंही वाटतें कीं, जर अशी स्थिति आणखीं कांहीं वेळ टिकेल तर मोक्ष कांहीं फार लांब नाहीं. आणि लक्षांत ठेवा कीं, तेथेंही प्रेमाशिवाय कांहींच नाहीं. तेव्हां ह्या गोष्टी कशा सुटतील ? खरेंना रत्ना! " असें म्हणून आपल्या हातांतल्या फुलांतील एक फूल तिच्याकडे टाकलें. तें तिच्या अंगावर पडतांक्षणीं जसें मंतरलेलें अगर स्वर्गांतील एखादें फूल अंगावर पडावें तसा तिच्यावर परिणाम झाला, त्याचें शब्दांत काय वर्णन करावें ? काय तिचें तें दिव्य प्रेम ! तें अनुभवाशिवाय समजणार नाहीं.

---

## माझें लग्न झालें त्यावेळेस मी कशी होतें ?

त्यानंतर थोड्या वेळानें जरा स्वस्थ झाल्यावर गंभीरतेनें रत्नप्रभाबाई म्हणाल्या, "प्रेमासंबंधीं जें कांहीं म्हणतां तें सर्व बरोबर आहे, पण माझ्यासंबंधीं जें कांहीं म्हणतां तें सर्व ठीकच आहे, झालें ! कारण माझी किंमत मी बरोबर समजतें. मी गरीब आईबापांची मुलगी, खेड्यांतली रहाणारी, आईशिवायची, शिवाय अशिक्षित. मला चालरीत कांहीं ठाऊक नाहीं; लाडांत वाढलेली आणि माझ्या आतेसासुबाईच्या शब्दांत बोलावयाचें म्हटलें म्हणजे 'निव्वळ दगड' ज्याच्या पदरीं पडेन त्याच्या आयुष्याची घाण करीन, अशी होतें. इतकेंच नव्हे तर माझें लग्न झालें तेव्हां मी तुम्हांला थोडी देखील आवडत नसें,

तुम्ही माझ्यापासून दूर राहण्याचा प्रयत्न करीत होतां; माझ्या नणंदा तोंड वांकडें करीत, जावा व शेजारणी माझ्या मूर्खपणाची थट्टा करीत, दरएकाजवळ सांगत आणि म्हणत कीं, 'कोणाला पाहणें असेल तर ह्या पार्वतीबाईची सून पहा. एक नमुनाच आहे, आणि मामंजी तर दुसरी करून देण्यास तयार झालेही होते. ह्या सर्व गोष्टी कांहीं मी विसरलें नाहीं. आतां आपण पाहिजे तर माझी स्तुति करा. पण मीं पुष्कळ वेळां भाजींत जास्त मीठ घालून तुमचें जेवण बिघडवीत असें, माझी फोडणी करपे, आणि एकदां कढत कढी सांडल्यानें वन्संचा बाळ भाजला होता. अर्धकच्चीं विझविलेलीं लांकडें कोपऱ्यांत उभीं केल्यामुळें स्वयंपाकघराला आग लागली होती. अर्धा मण खीर माझ्या हातून नासली होती. पुष्कळ वेळां लोणचें काढलें कीं बरणी उघडी राही, कित्येक दिवस चूल पेटवितां येत नसे, हें सर्व मी विसरलें नाहीं. महाराज, माझी किंमत तर अशी होती. त्या वेळेस सर्व नात्यागोत्याचीं माणसें जसें मला हिडिस फिडिस करीत, तसें जर माझ्या सासूनें केलें असतें, तर मला कोठेंही थारा नव्हता. कारण त्या वेळेस माझा नवराही माझा नव्हता, आणि माहेरीं तीच स्थिति होती. आई मेली होती व बाप गरीब. पण या खाऱ्या समुद्रांत गोड विहीर ती माझी सासू होय; आणि त्यांच्या दयेमुळें, शहाणपणामुळें व प्रेमामुळें मी आतां सुखी आहें. पण जर त्यांच्यांत प्रेम नसतें तर मी कधींच मरणाशिवाय मेलें असत. कारण त्या वेळेस मी कोण आणि माझी काय किंमत ? माझ्यावर सवत आणून त्रास दिला असता तर मी काय करूं शकणार होतें ? "

## सासूबाईचे उपकार.

"महाराज ! त्या वेळेस माझा एकही उपाय नव्हता. पण वडिलांच्या पुण्यप्रतापानें आणि ईश्वरी दयेमुळें मला ह्या स्वर्गीय देवींसारख्या सासूबाई मिळाल्या; आणि त्यामुळें मी आतां सुखी आहें, म्हणून हात जोडून मी त्या परमेश्वराजवळ असें मागतें आहें कीं, हे परमेश्वरा, मला जन्मोजन्मीं ह्याच सासूबाई दे, आणि ह्या मृत्युलोकीं तर ह्यांचें कल्याण करच, पण स्वर्गांत सुद्धां ह्यांना सुखी ठेव." असें म्हणतां म्हणतां त्या आपल्या सासूपुढें बसल्या आणि त्यांच्या डोळ्यांतून अश्रुप्रवाह सुरू झाला. त्या वेळेस पार्वतीबाईनीं तिला पोटाशीं धरिलें आणि वकीलसाहेबांच्या डोळ्यांना थोडें पाणी आलें आणि त्यांच्या मनावरही एक प्रकारचा परिणाम झाला. पार्वतीबाई आपल्या मोठ्या कुटुंबांत नेहमीं असे देखावे पाहात, त्यामुळें शांति ठेवूं शकल्या. त्यांच्या तोंडावर एक प्रकारचा दैवी आनंद चमकूं लागला.

ह्या गोष्टी ऐकून व हा देखावा पाहून आम्ही सर्व दिङ्मूढ झालों व आमच्या डोळ्यांतही प्रेमाचे अश्रु आले. त्यांतले त्यांत सर्वांपेक्षां प्रोफेसरसाहेब तर फारच गर्भगळित झाले. त्यांना तर एक प्रकारची मूर्च्छाच आली आहे असें मला वाटलें. पार्वतीबाईच्या भलाईनें, रत्नप्रभा बाईच्या उपकारवृत्तीनें, आणि वकीलसाहेबांच्या प्रेमानें, आम्ही सर्व मंडळी ओली झालों, फक्त शास्त्रीबोवा कोरडे राहिले; त्यांच्यावर थोडेसे शिंतोडे उडाले, पण ते पुरते भिजले नाहींत. कारण अंतःकरणापासून त्यांची भिजण्याची इच्छा नव्हती, त्यामुळें ते दूर दूर राहिले होते.

ह्यानंतर थोड्या वेळानें योगिनीबाई म्हणाल्या, " पार्वतीबाई, पहिल्यानें मी तुमच्या गोष्टीचा अर्थ समजत असें कीं, तुम्ही तुमच्या कुटुंबांत चांगल्या तऱ्हेनें वागतां व त्यामुळें तुम्ही सुखी आहां. पण तुमच्या मुलाचें व सुनेचें प्रेम पाहिल्यानंतर आतां आम्हांला असें वाटतें कीं,

आम्ही समजत होतों त्यापेक्षां तुम्ही खास जास्त सुखी आहां. तुम्ही तुमचें आयुष्य फार चांगल्या तऱ्हेनें घालविलें आहे. ह्याकरितां मी तुम्हांला धन्यवाद देतें."

---

## आमच्या घरांत चालणारी शाळा.

पार्वतीबाई म्हणाल्या, "मातोश्री, अद्याप आपण आमच्या घरांत चालणारी शाळा पाहिली नाहींत, ती पहाल तेव्हां तुम्हांला खास आनंद होईल."

योगिनीबाई म्हणाल्या, "आतां तर जरूर पाहूं. पण ती पाहण्यापूर्वीं तिची थोडीशी हकीकत तर प्रोफेसरसाहेबांना सांगा."

पार्वतीबाई म्हणाल्या, "माझ्या नानाला तीन मुलगे आहेत आणि दोन मुली आहेत. सर्वांत थोरला मुलगा मॅट्रिकमध्यें आहे. माझे दुसरे दोन मुलगे परगांवीं नोकरीकारितां असतात त्यांचा प्रत्येकाचा एक एक मुलगा आहे. ते तेथेंच कॉलेजांत शिकतात. मांझी एक मुलगी विधवा असून गरीब आहे; तिचे दोन्ही मुलगे येथेंच शिकण्याकरितां ठेविलेले असतात. सूनबाईच्या भावाच्या मोठ्या मुलाला इंग्रजी शिकावयाचें आहे, पण खेड्यांत शाळा नसल्यामुळें तो येथेंच असतो. आमच्या जातीची एक गरीब बाई आहे तिचा मुलगा मोठा हुषार आहे, पण देशांत शाळा नसल्यामुळें व शहरांत राहण्यास पैसा नसल्यामुळें रखडत होता त्याला पाहून आमच्या नानाला वाटलें कीं, भविष्यकाळीं हा चांगला निघेल; तेव्हां वाढत्या झाडाला पाण्याशिवाय मरूं देऊं नये, म्हणून त्याला येथें आणलें आहे. त्याखेरीज आणखी तीन मुलगे आहेत. त्यांत ला एक मुलगा माझ्या नानाच्या मित्राचा आहे. ती मैत्री शाळेंतली

आहे. त्या मुलाचा बाप प्राथमिक स्कूलमध्यें १५ रु० चा मास्तर आहे, तेवढ्यांत तो आपल्या मुलाला वरिष्ठ प्रतीचें शिक्षण कोठून देणार? म्हणून त्याच्या एका मुलाला आमच्या येथें नानानें आणलें आहे. एकाला धर्मार्थ बोर्डिंगांत दाखल करविलें आहे. तो कांहीं आमच्या जातीचा नाहीं; पण जुना स्नेह व चांगल्या माणसाला उदयाला आणण्याची इच्छा एवढेंच. दुसरा मुलगा आमच्या जुन्या शेटजींच्या मुलाचा आहे. या शेटजींच्या येथें आमच्या येथें नोकरी होती. तेव्हां शेटजींचे दिवस चांगले होते व आमची गरिबी होती. तेव्हां माझ्या लग्नासाठीं म्हणून ५०० रु० मदत त्यांनीं दिली होती, पण दिवस फिरला व त्यांच्या दुकानाचें दिवाळें निघालें. त्यांना वारल्याला पुष्कळ दिवस झाले. आतां त्यांचे मुलगे आहेत; त्यांतील दोघे साधारण रीतीनें आपलें चालवितात पण एक फार गरीब आहे. त्याचा मुलगा खूप हुशार आहे. त्याला आमच्या येथें शिकायला ठेविलें आहे. ज्यांनीं आपल्या चांगल्या दिवसांत आम्हांला मदत केली त्यांना सध्यां आम्हीं न विचारलें तर याहून आमची नीचता ती कोणती? माझा एक चुलत चुलत सासरा आहे. तो म्हणतो, 'असें वागाल तर लक्ष्मीच्या वडील बहिणीचें लवकरच बोलावणें येईल.' पण आमचा नाना म्हणतो कीं, 'त्यांच्या नशिबानें त्यांच्यापुरतें मिळेल.'

---

## दुष्काळांतील दयाजनक देखावा.

"तिसरा मुलगा दुष्काळांत सांपडलेला आहे. तीन वर्षांपूर्वी आम्ही महाबळेश्वरास गेलों होतों; तेव्हां मोठा दुष्काळ होता. त्याकरितां आमचा नाना केव्हां केव्हां आसपासच्या खेड्यांतून गरिबांची हालत पाहण्या-

करितां व शक्त्यनुसार मदत करण्याकरितां जात असे. अशा रीतीनें जात असतां एका झाडाखालीं एक मुलगा रडत बसलेला व जवळ नुकतीच मेलेली एक बाई पडलेली दिसली. तिचा हात ओढून तो मुलगा ओरडे व 'आई, ऊठ ना. मला तहान लागली. कां बोलत नाहींस ग? चल ना, आपण गांवांत जाऊं. येथून गांव किती दूर आहे? ऊठ ना.' असें बोलून तिच्या डोळ्यांत बोटें घालूं लागला. तो हृदयभेदक देखावा पाहून, नाना त्या मुलाला म्हणाला, 'तुझी आई मेली आहे. तूं माझ्याबरोबर चल. मी तुला तुझ्या गांवीं नेतों. अनोळखी मनुष्य पाहून तें पोर घाबरलें; पण मग घोड्यावर बसलें. मग त्यानें आपल्या गांवाचें नांव सांगितलें. तो गांव तेथून तीन कोस होता. तेथें तपास करतां समजलें, कीं तो अंतोबा कासाराचा मुलगा विठू आहे. हा कासार त्या गांवांत अब्रुदार आणि सुखी मनुष्य होता. तो सहा वर्षांपूर्वीं पटकीनें मेला. त्या वेळेस त्याच्या घरांत पांच माणसें होतीं, तीं सर्व मेलीं; मात्र त्याची बायको बाळंतपणाकरितां माहेरीं गेली होती. तिला मुलगा झाला, तो हा विठू. त्याला घेऊन ती आली तेव्हां तिच्याजवळ पांचशेंचे दागिने, घरचें घर व एक म्हैस इतकें होतें व तेवढ्यावर ती त्या खेड्यांत सुखी मानली जात असे. पुढें दुष्काळांत तिच्याजवळचे दागिने चोरीस गेले व तिचा सर्व आधार म्हशीवर आला. पण दुसरे वर्षीं मोठा दुष्काळ पडला, गांवांत गवताची काडी नाहीं, परगांवाहून आणण्याचें सामर्थ्य नाहीं, तेव्हां ती एखाद्या चांगल्या माणसाला फुकट देण्याचें पाहूं लागली; पण तसें कोणी मनुष्य मिळेना. शेवटीं लाचारीनें ती ऐशीं रुपयांची म्हैस एका मुसलमानाला चार रुपयांला विकली. मागाहून कळलें कीं तो कसाई होता. त्यानंतर तिला कांहीं आधार उरला नाहीं, तेव्हां तिनें भावाला लिहिलें कीं, 'मला तेथें बोलाव अगर कांहीं मदत पाठीव.' त्या पत्राची व मनिऑर्डरीची वाट पाहाण्यांत पंधरा दिवस गेले. त्यांत ती दोन दिवसांची उपाशी होती. शेवटीं

जबाब आला कीं, तेथल्यापेक्षां येथें मोठा दुष्काळ आहे. आमच्याजवळ कांहीं नाहीं, आम्ही दुष्काळ–कामावर दीड आणा रोजानें जातों; आणि त्यांतूनही पगार वांटणाऱ्याला द्यावे लागतात. पांच दिडक्यांला एक रत्तल ज्वारी मिळते; त्यांनीं पोट भरत आहों ! सारा दिवस काम करावें लागतें; अशी आमची स्थिति आहे. उत्तराला उशीर झाला, त्याचें कारण कार्ड नव्हतें. ताई, दिवस वाईट आहेत, ईश्वर काय लाज ठेवील ती खरी. त्याच्यावर निष्ठा ठेव, पोराकरितां जिवंत रहा, आत्महत्त्या करूं नको, आपले काका, सौ० यमुना व धाकटा भाचा सर्व मेलीं. आम्ही वांचलों तर भेटूं, नाहींतर हेच शेवटचे राम राम. पुन्हां पत्र पाठवूं नको. 'हें वाचल्यावर ती दुष्काळ–कामावर जावयास निघाली; पण दोन दिवसांची उपाशी, त्यांत चार पांच दिवस झाले. थोडा थोडा ताप येत होता; त्यांत यमुनेच्या मरणाच्या हकीगतीनें ती बरीच रडली होती, तरी पोरांकरितां म्हणून ती कामावर जावयास निघाली. पण तेथें पोहोंचण्यापूर्वीं रस्त्यांतच तिची अशी स्थिति झाली.

---

वरील हकीकत तिच्या शेजारणीकडून कळल्यावर पोलीस पाटलास सांगून मृताची व्यवस्था करविली व पोराला घेऊन नाना घरीं परत आला. तो मुलगा हुशार आणि पुढें मागें चांगला निघण्याचा संभव आहे त्यामुळें त्याला आमच्या येथें ठेविलें आहे. एकंदर चौदा मुलांत त्याचा नंबर पहिला आहे. त्यामुळें तो सर्वांचा लाडका आहे. त्याला आणलें ते दिवशीं नानाला एक मोठी केस मिळाली व ती दोन वर्षे चालल्यामुळें पुष्कळ पैसे मिळाले त्यावरून तो म्हणतो कीं, निःस्वार्थीपणानें गरिबांकरितां कामें केल्यास तीं फुकट जात नाहींत. ”

## आमचा आनंद.

" ह्या सर्व मुलांना दिवस रात्र संभाळणारा एक मास्तर आहे. शिवाय दोन नोकर एक स्वयंपाकी आहे. त्यांच्याकरितां आमच्या बंगल्यांत स्वतंत्र जागा ठेविली आहे व निरनिराळ्या विषयांचें शिक्षण देणारे निरनिराळे मास्तर आहेत. आम्ही सर्व आठवड्यांतून एकदां सुटीच्या दिवशीं व सणावारीं एकत्र भोजन करितों आणि मग सर्व फिरावयास जातों. तेव्हांचा आनंद काय वर्णावा ?

" महाराज, त्या मुलांना जेव्हां प्रेमानें बोलतांना, अभ्यास करतांना, नवे नवे उद्योग शिकतांना वगैरे मी पहातें, व ते भविष्य-काळीं कसे हुशार निघतील ह्याचें चित्र जेव्हां माझ्या डोळ्यांपुढें उभें रहातें, तेव्हां आनंदाचें माझ्या अंगांत जणों नवें रक्त येतें. तरी पण बोलावयाचें म्हणजे मला सांगितलें पाहिजे कीं, त्यासंबंधीं मी स्वतः कांहींच करीत नाहीं. त्याचा सर्व मान नाना व रत्नप्रभा यांनाच दिला पाहिजे; कारण ही योजना नानाची असून ती सुनबाई चालविते आहे, तेव्हां खरी मेहनत तिची आहे."

## ह्या संस्थेचें श्रेय कोणाचें ?

रत्नप्रभाबाई म्हणाल्या, " माझें श्रेय ? खर्च करणार कोण आणि श्रेय कोणाचें ! वहावा ! हें चांगलें ! महाराज, त्याचें खरें श्रेय तर सासूबाईंचें आहे. कारण त्यांनींच आमच्यामध्यें अशा प्रकारच्या विचाराचें बीज पेरिलें आहे. जर त्यांनीं असें शिक्षण आम्हांला दिलें नसतें, तर आमच्या हातून अशीं चांगलीं कामें झालींच नसतीं.

म्हणून जसें शिष्याच्या उत्तम विद्येचें श्रेय गुरूला असतें, तसेंच माझ्यांत जर कांहीं चांगले गुण असतील तर त्यांचें सर्व श्रेय माझ्या ह्या पूज्य सासूबाईचेंच आहे; आणि त्यानंतर माझ्या प्राणनाथांचें आहे, कारण ज्या वयांत श्रीमंत लोक आपला पैसा चैनीपणांत, किताब मिळविण्याच्या हौसेंत, पुढें पुढें येण्याकरितां, अंमलदार लोकांची खुशामत करण्यांत वगैरे खर्च करतात त्या वयांत आपल्या निढळाच्या घामानें मिळविलेल्या पैशाचा उपयोग माझे प्राणनाथ अशा चांगल्या कामाकडे करीत आहेत तेव्हां त्यांना खरोखर धन्यवाद दिले पाहिजेत. मला फुकटाचें श्रेय कसलें देतां ?"

हें ऐकून वकीलसाहेब म्हणाले, "माझ्या आईच्या उपकाराचा तर कांहीं अंतच नाहीं, तेव्हां तें कांहीं शब्दानें सांगतां येणें शक्य नाहीं व त्याची फेडही होणें नाहीं, कारण सध्यां आम्ही जें सुख भोगतों आहों तें तिच्यामुळें आहे. तेव्हां तें तोंडानें बोलणें फुकट आहे."

---

## माझ्या रत्नांत कांहीं तरी आहे.

"पण ह्या संस्थेचें सर्व श्रेय तिचेंच आहे, कारण तिची मदत व इच्छा नसती तर अशा चांगल्या स्थितींत ही संस्था रहातीच ना. जरी ही योजना माझी आहे, घर माझें आहे व मुलेंही मीच आणतों, शिक्षकांची पसंती मीच करतों, व पैसाही मी देतों, तरी हीं सर्व साधनें असून सुद्धां त्यांत कांहीं तरी कमीपणा राहिलाच असता; व तो माझ्या रत्नाशिवाय कोणालाही नाहींसा करतां आला नसता. चांगले मास्तर मोठमोठे सिद्धांत विद्यार्थ्यांना सांगतील, त्यांच्या डोक्यांत ते

उतरवितील, पण त्यांच्या आयुष्यांत कृतींत उतरविणें, त्यांना शक्य नसतें; पण माझ्या रत्नांत असें कांहीं आहे कीं, ती आपल्या थोड्या वेळच्या सहवासानें विद्यार्थ्यांत हें आणतें. मी मुलगा पसंत करतांना तो बुद्धिवान् व हुषार आहे कीं नाहीं हें पाहातों, व तें बहुतकरून खोटें ठरत नाहीं; तरी पण ती बुद्धिमत्ता उलट्या रस्त्याला जाऊं लागली असतां माझ्यानें कांहीं थांबवत नाहीं. बाहेरील बंदोबस्त जरी ठेविला तरी तो वेताच्या काठीसारखा—वांकडी ठेवावी तोंपर्यंत राहावयाची, व सोडली कीं पुनः पूर्वीसारखी. माझ्या ह्या उपायाचें असें आहे कीं, परिस्थिति चांगली असेपर्यंत ते टिकतील; पण माझ्या रत्नांत असें कांहीं आहे कीं, उपदेश केल्याशिवाय व धाक दाखविल्याशिवाय सगळें सरळ चालतें. मीं पैसा देऊं शकतों पण सहृदयता फुकट मिळते का? वेळेस पैशानें कठोरता वाढेल. पण ती ज्याच्या सहवासांत येईल त्याची सहृदयता वाढते. मास्तरच्या धाकानें, इनामाच्या लालचीनें जें काम होत नाहीं तें काम या रत्नाच्या आगमनानें व हंसतमुखानें होतें, असें कांहीं तिच्यांत आहे. तें काय आहे तें कांहीं मला समजून सांगतां येत नाहीं; पण जसें स्वयंपाकाची सर्व सिद्धता जरी असली तरी अग्नीशिवाय कांहीं होत नाहीं, तसें माझ्या रत्नाच्या प्रेमरूपी अग्नीशिवाय कांहीं होत नाहीं. जसें, उत्तम कारागिरांनीं केलेला पुतळा पॉलिशच्या हाताशिवाय सुरेख दिसत नाहीं, व खरें पहातां कारागिराच्या मेहनतीचा शंभरावा भागही त्यांत नसतो, तसेंच माझें आहे. माझीं सर्व कामें ओबडधोबड पुतळ्यासारखीं आहेत. त्यांत तिच्या प्रेमरूपी पॉलिशचा हात पाहिजे. म्हणून ह्या संस्थेचें सर्व श्रेय ह्या रत्नाकडे आहे." असें म्हणून प्रेमपूर्ण नजरेनें त्यानें तिच्याकडे पाहिलें.

हें ऐकून आनंदी चेहेऱ्यानें रत्नप्रभाबाई म्हणाल्या, "माझ्यांत कांहींच अर्थ नाहीं. माझी किंमत काय आहे ती मीं पूर्वीच सर्वांना सांगितली

आहे. पण असें असूनही जर आपल्याला त्यांत कांहीं विशेष वाटत असेल तर त्या आपल्याच उच्च भावना आहेत असें म्हटलें पाहिजे. कारण, तुमच्याच उच्च भावना तुम्हांला माझ्यांत दिसतात. त्यांत माझें असें कांहीं नाहीं."

महाराज म्हणाले, "शाबास बेटा. फार चांगला जबाब दिलास. तुमच्यासारखीं प्रेमी जोडपीं ईश्वर आमच्या देशांत वाढवो अशी मी त्याला प्रार्थना करतों." असें म्हणून आम्ही सर्व उठूं लागलों. तेव्हां शास्त्रीबोवा म्हणाले, "जरा थांबा. हें पहा, नशिबाची गोष्ट कीं तुमचा शेजार मला नाहीं. नाहींतर माझ्या घरीं रोज भांडणें झालीं असतीं." तें ऐकून मला फार आश्चर्य वाटलें व मीं म्हटलें, "काय अशा बाईचा शेजार तुम्हाला आवडला नसता ?

---

## शास्त्रीबोवांचें बायकोशीं झालेलें भांडण.

शास्त्रीबोवा म्हणाले, "आवडेल खरा; पण तें पाहून भांडण झाल्याशिवाय रहाणार नाहीं. कारण कीं साहेब म्हणतात, बायको मोठी, व ती म्हणते, नाहीं. पण माझ्या येथें काय होतें, माहीत आहे ? तुम्हांला उशीर झाला आहे तरी एवढें ऐकून घ्या. आमच्या गांवीं आमच्या शेजारीं एक गरीब धोब्याचें घर आहे. तो एका अवसेला आमच्या येथें शिधा घ्यावयास आला; आणि म्हणाला कीं, लाडू करून जेवा. हें ऐकून आम्हाला फार आनंद झाला. मग मीं बायकोला म्हटलें, 'पाहिलीस माझी युक्ति, हा धोबी कांहीं कोणाच्या बापाला ऐकणारा नाहीं; पण त्याला मीं सरळ केलें.' तेव्हां ती म्हणाली, 'तो माझ्यामुळें आहे तसा. त्यांत

तुमचा संबंध नाहीं.' मीं म्हटलें, 'मोठी नाशिबाचीच कीं नाहीं ?' ती म्हणाली, 'यांत काय संशय ? परवां आलेला शिधा माझ्याचमुळें व आजचाही माझ्याचमुळें. तो माझ्या भावाचे कपडे फुकट धुतो. माझा भाऊ त्याला कचेरींतले कपडे देववितो व त्याबद्दल त्याला चांगले पैसे मिळतात. हें जेव्हां मला समजलें तेव्हां मी त्याला म्हणे, 'अरे तुझा फायदा झाला पण आमचें तोंड गोड तर कर. असें वरचेवर म्हणण्यानें हा आला.' मीं म्हटलें, 'हो. अशा बायकी बोलण्यांनीं येतो आहे तो. मीं भेटला कीं त्याला म्हणायचा, 'कांरे असा वाळलास कां ? तुझा हात पाहूं बरें.' तसा तो म्हणे: 'आतांसें बरें नसतें खरें. पाहा बरें कांहीं समजलें तर. तसें मीं त्याला म्हटलें, 'तुला चवथा राहू नडतो आहे, तेव्हां ब्राह्मण घाल. असें बोलणें पांच सात वेळां झालें, त्याचा हा परिणाम,' असें भांडण सुरू झालें. तेव्हां तें ऐकून शेजारीण म्हणाली: 'अरे असें भांडतां कां ? त्याला उदक सोडायला बोलवा म्हणजे झालें.' मला ती युक्ति पटली व त्याला बोलावून मीं म्हटलें: 'हे बोल कोणत्या निमित्तानें पाणी सोडणार ?' तेव्हां तो म्हणाला, 'माझी गाढवी तीन चार वर्षांत व्याली नव्हती व मला तर त्याची फार जरूरी होती, म्हणून मीं नवस केला, पण पैसे हातांत येईनात, म्हणून राही. काल व्याली तेव्हां म्हटलें तीन पिढ्या झाल्या, नवस ठेवूं नये, व आज त्या हेडमास्तरच्या येथले पैसे आले त्याचा शिधा घेऊन येथें आलों.' असें सांगून तो गेला व आम्ही गुपचुप बसलों.'

हें ऐकून आम्हाला फार कंटाळा आला. कारण गरिबाचें आठ दिवसांचें खाद्य हे आळशी शास्त्रीबोवा फुकटफाकट एका दिवसांत पार करितात, ही काय चाल ? असें माझ्या मनांत येतांच ते म्हणाले, "हा आम्ही अशा क्षुल्लक गोष्टींतसुद्धां कोण मोठे म्हणून भांडतों; आणि तुम्ही सुधारक–म्हणजे आमच्या दृष्टीनें बाटगेच–पण ते अंतरात्म्यांतून इतके शुद्ध असाल असें नव्हतें वाटत मला. तुम्ही बायकांचे

भाट आहां असें वाटत असे, तें ह्या रत्नाबाईच्या गोष्टी ऐकून आतां असें वाटतें कीं, तुमची स्तुति कांहीं अगदींच खोटी नाहीं."

महाराज म्हणाले, "तुमच्या मनावर इतका परिणाम झाला तरी पुष्कळच. कारण तेंही नाकबूल केल्यास आम्हीं तुमचें काय करणार ? कांहींच नाहीं. म्हणून एवढ्याकरितांसुद्धां तुमचे उपकार मानले पाहिजेत." महाराजांचें म्हणणें पुरें होतांच प्रोफेसरसाहेब म्हणाले, "आणि तुम्ही आमच्या शेजाराला नाहीं म्हणूनही आभार मानले पाहिजेत."

त्यानंतर आम्ही दुसरे दिवशीं येण्याचें कबूल करून घरीं गेलों, व दुसरे दिवशीं पांच वाजतां तेथें पुनः गेलों, तेव्हां दुसऱ्या एका बाईनें मिताहारासंबंधानें मिळविलेली माहिती व त्यामुळें आपल्या भगिनींना कसा फायदा होईल तें सांगितलें. तेव्हां महाराज म्हणाले, "बाई, तुमच्यासारखीं खऱ्या अंतःकरणानें काम करणारीं माणसें मिळत नाहींत; तेव्हां आम्हांला तुमचे उपकार अवश्य मानले पाहिजेत." यावर त्या बाया म्हणाल्या, "महाराज, आपण आमचे उपकार कसे मानतां ? आम्ही आपलीं मुलें. आपण साधुपुरुष, पूजण्यास व वंदण्यास योग्य" तेव्हां महाराज म्हणाले, "मी संन्याशी आहें खरा. पण माझी पूजा करून घेण्याकरितां नाहीं, आपल्या देशाची सेवा करणाऱ्यांची सेवा करण्याकरितां मी संन्याशी झालों आहें. मी विद्वत्ता दाखविण्याकरितां शिकलों नाहीं, तर जगांत सत्य काय आहे तें शोधून काढण्याकरितां मी शिकलों आहें. म्हणून तुम्हांला मदत करणें, हें माझें कर्तव्य आहे. तुमची स्तुति करणें हें मनांतील भाव व्यक्त करणें व तुमच्यासारख्यांच्या मदतीला तुम्ही बोलवाल तेव्हां जाणें, हेंच माझ्या आयुष्याचें सार्थक आहे. म्हणून तुम्हांला जरी तुम्हीं यःकश्चित् वाटत असलां तरी आम्हाला देवी आहां असें वाटतें, व त्याकरितां तुमच्यासंबंधीं आम्ही जो मोठेपणा देऊं तो थोडाच आहे" असें म्हणून महाराजांनीं वकील साहेबांकडे पाहिलें.

वकीलसाहेब म्हणाले, " भगिनींनो, महाराजांचें म्हणणें बरोबर आहे. पैसा, सत्ता, कुळ व धर्म ह्यांच्या नांवावर बाहेरील माणसांना वर- करणीं मिळणारा मान मिळण्याचे दिवस आतां गेले आहेत आणि त्याच्या बदली भ्रातृभाव, स्वदेशप्रेम, निस्पृहपणा, सत्य, ज्ञान, नवे नवे शोध ह्यांपासूनच जनाकडून मान मिळतो व अशा प्रकारचा स्वाभा- विक मान तुम्हांला मिळतो आहे, तो तुम्ही कसा बंद करूं शकाल ! "

मीं म्हटलें, " सुंदराबाई, महात्म्यांच्या तोंडून आपली स्तुति ऐकणें हें भाग्य स्तुति करण्यायोग्य आहे; कारण तो मान व ती स्तुति कांहीं फुकट मिळत नाहीं. पण जेव्हां आपल्यांत कांहीं अर्थ असतो तेव्हांच ती मिळते व त्यानें आपल्याला काम करण्याला दुप्पट बळ येतें. मला वाटतें, महात्म्यांकडून होणारी स्तुति म्हणजे एक प्रकारचा आशीर्वादच आहे. कसें शास्त्रीबोवा ! "

---

## आपल्या देखत एका स्त्रीला एवढा मान

मिळतो, हें पाहून काय जबाब द्यावा यासंबंधानें शास्त्रीबोवा विचा- रांत पडले. कारण त्या सर्व गोष्टी जरी त्यांना खऱ्या वाटत होत्या, तरी त्या त्यांना आवडत नव्हत्या. त्यांना असें वाटूं लागलें कीं, सगळी कडे जर अशी सुधारणा होईल तर मग आमच्यासारख्यांचें कसें होईल ! शिवाय माझ्यासारखा शास्त्री बसला असून त्याला कोणी कांहींच विचारीत नाहीं व एका बाईला इतका मान मिळतो हें पाहून त्यांना आधींच राग आला होता. पण त्यांना ठाऊक होतें. कीं, ह्या कंपूंत आपलें कांहीं सर्व चालणार नाहीं; म्हणून ते इतका वेळ गप्प होते. पण जेव्हां बोलण्याची वेळ आली तेव्हां ते म्हणाले, ' आतां खरें खरें

कलियुग आलें आहे. संन्याशी असून सुद्धां बायकांची इतकी स्तुति करतां, तेव्हां आतां काय म्हणावें ? पहिल्यांदां ब्राह्मण का बायको ? जास्त पुरुष कीं बायको ? हें तुमचें सर्व पाहून मला अशी काळजी पडली आहे कीं, तुम्ही सर्व शिकून शिकून बायकांचे भाट होणार कीं काय ? व असें होईल तर मग पुढें जग चालेल कसें ? राम ! राम ! शास्त्राचें ज्यांना थोडेंसुद्धां ज्ञान नाहीं अशा बायका उपदेश करतात व हे वकील, बॅरिस्टर, संन्याशी असे मोठमोठे लोक बसल्या बसल्या तो ऐकतात आणि तिची स्तुति करतात. बरें त्या गोष्टी तरी कथापुराणांच्या असावयाच्या होत्या. तसेंही नाहीं. त्या तर सर्वांना उपाशीं ठेवण्याच्या आहेत. ह्याचें नांव कलियुग.' असें म्हणून खालीं पाहत धोतर सांवरून ते उठण्याची तयारी करूं लागले तेव्हां प्रोफेसर-साहेब म्हणाले, " जर तुम्हाला

## मोठेपणा हवा असेल तर स्वर्गींच्या स्त्रियांचे शिष्य व्हा.

शास्त्रीबोवा, बायकांची स्तुति ऐकून घाबरूं नका. जर तुम्हांला ती पाहिजे असेल तर ह्या भगिनीमंडळांतील स्वर्गीय स्त्रियांचे चेले व्हा; आणि त्यांना गुरु करा. सीता सती असून व तिनें अग्निप्रवेश केला असून परटाच्या सांगण्यानें रामानें तिला टाकलें. वृंदेच्या शापानें देव दगड झाले, सोळा हजार गोपींबरोबर कृष्णानें विलासक्रीडा केली, अशीं पुराणें तसल्याच शब्दांत सांगण्यापेक्षां ह्या बायका जें सांगतात त्याचा तुम्ही प्रसार करा. कारण आतां लोकांना कांहीं तरी नवें पाहिजे आहे; व भविष्य-काळाच्या प्रजेला तर आपल्या हातून होईल असें कांहीं तरी पाहिजे आहे, व गोड शब्दानें हवें आहे. तर तुम्ही त्यांच्याजवळ तें शिकल्या-शिवाय तुमचें गाडें पुढें जाणार नाहीं."

## स्त्रियांच्या मदतीशिवाय खरा आनंद जगांत मिळणारच नाहीं.

जगताची रचनाच अशी आहे कीं, स्त्रियांच्या मदतीशिवाय आपलें चालूं नये. शास्त्राचा हुकूम असाच आहे. दोन चाकांशिवाय गाडी चालत नाहीं, पंखांशिवाय पक्षी उडत नाहीं, व आपल्या शरीराची रचनाच अशी आहे कीं, त्यांच्याशिवाय आपण अर्धे आहों. म्हणूनच स्त्रियांना शिक्षण व योग्य स्वतंत्रता दिली पाहिजे. जितकी स्वतंत्रता आपण त्यांना देऊं तितकी आपल्याला मिळेल. स्त्रिया सुधारल्यानें भविष्यकाळाची प्रजा सुधारेल. स्त्रियांना आपण जितका परमार्थ शिकवितों तितकें जगांत दुःख कमी होतें. त्या सुखी कीं प्रजा सुखी ! खरेंना ?

---

## स्त्रीशिक्षणासंबंधीं प्राचीन ऋषींचे विचार.

“ एका उपनिषदांच्या मंगलाचरणांत म्हटलें आहे: “ ॐ सह नाववतु सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै । तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै : ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः । ”

अर्थ—ऋषि परमेश्वराची प्रार्थना करतात कीं, हे प्रभो, आम्हा दोघांना एकत्र ठेवून आमचें पालन कर. आमचें दोघांचें एकत्र ठेवून रक्षण कर. आम्हां दोघांना बरोबर सामर्थ्य मिळेल असें कर. आम्हीं दोघांनीं जो एकत्र अभ्यास केला असेल तो फलीभूत होवो आणि आम्हीं दोघे भांडणार नाहीं असें कर आणि हे प्रभो, आम्हांला शान्ति द्या, शान्ति द्या, शान्ति द्य. ’

ह्या मंत्राचा अर्थ पंडित गुरुशिष्यांना लागू आहे, पण मला वाटतें तसाच तो मंत्र नवराबायकोला व जगांतील सर्व स्त्रीपुरुषांनां लागू पडेल. कारण गुरुशिष्यांना तर थोडा वेळ एकत्र रहावयाचें असतें, पण नवराबायकोला नेहमींच रहावयाचें असतें. गुरूनें आधीं अभ्यास केलेला असतो आणि मग तो शिष्यांना शिकवितो. तेव्हां दोघांचा अभ्यास, ज्ञान आणि वय हें कांहीं सारखें नसतें. पण स्त्रीपुरुषांत बहुतकरून तें सारखें असतें. तेव्हां संसारांतील अभ्यास दोघांचा बरोबरच होतो. गुरुशिष्यांत भांडणाचा संभव फार क्वचित् पण नवराबायकोंत मतभेदाचे प्रसंग वरचेवर येतात. तेव्हां हे मंत्र गुरुशिष्यांना लागू आहेत त्यापेक्षां जास्त चांगल्या रीतीनें नवराबायकोला लागू आहेत, आणि वेदमंत्राचा उज्जल व विशाल अर्थ करणारे त्या वेळचे पवित्र ऋषि त्याचा तसाच अर्थ करीत असत आणि त्याप्रमाणेंच वागत असत. म्हणून आपल्या वडिलाप्रमाणें चालून आपल्याबरोबर आपल्या स्त्रियांना विद्या, हुन्नर आणि अभ्यास शिकविला पाहिजे आणि त्यांचें सामर्थ्य वाढविलें पाहिजे."

तेव्हां महाराज म्हणाले, "तुमचें म्हणणें बरोबर आहे. कारण तीव्र व विशाल बुद्धीचे निस्पृह ऋषि अशा मंत्रांचे गुरुशिष्यांपुरताच अर्थ करून बसून राहणार नाहींत हें त्यांच्या बायकांच्या उत्तम रहाणी वगैरेवरून दिसून येतेंच. ते आपल्या बायकांना अर्धांगना समजून काम घेत होते; आणि त्यामुळेंच ते पुढें येत होते, यांत संशय नाहीं. कारण त्या मंत्रांत म्हटलें आहे कीं, हे ईश्वरा, आम्ही दोघे एकदम सामर्थ्य मिळवूं असें कर, पण त्यानंतरच्या काळांत

## रामचंद्राचें मर्यादशील प्रेम

आपल्याला असें शिकवितें कीं, स्त्रीपुरुषांनीं बरोबर सामर्थ्य मिळविणें ह्या आरंभींच्या गोष्टी आहेत, ही प्रेमाची पहिली पायरी होय.

पण जेव्हां प्रेम पुष्ट होतें—वाढतें—तेव्हां पुरुष स्त्रीमिळून सामर्थ्य मिळवितात. उत्तररामचरित्रांत म्हटलें आहे, आपल्या आवडत्या सीतेचे पाय डोळ्यांवर ठेवून रामचंद्र म्हणतात, हे प्राणेश्वरी ! तूं माझें हृदय, डोळ्यांतली बाहुली नेत्रांना आनंद देणारी आहेस. तुझ्यामुळें माझ्या आत्म्यास शांति आहे, तेव्हां तुझ्या जन्मानें मी पवित्र झालों आहें, ह्यांत कांहीं नवल नाहीं कारण तुझ्या जन्मानें सगळें जग पवित्र झालें आहे. अशा रीतीनें श्रीराम सीताबाईमध्यें विशेष पहात होते व त्यापासून बळ मिळवीत होते. पण रामाच्या प्रेमांत मला कांहीं अपूर्णता दिसते. कारण लोकलज्जेस्तव त्यांनीं तिचा त्याग केला. हें खरें आहे कीं, त्यामुळें त्यांना पुष्कळ दुःख झालें, तरी पण कुललज्जा व लोकलज्जा संभाळण्याकरितां त्यांनीं तसें केलें व सीता व आपण दोघेही दुःखांत पडले होते. त्याबद्दल वासंतीनें रामाला म्हटलें कीं, "रामा, तूं असा कठोर कसा झालास?' आणि त्या नाजूक फुलाला अरण्यांत कसें टाकलेंस ? ' पृथ्वी जी इतकी शांत ती देखील रामाच्या ह्या वर्तनानें कांहीं वेळ दुःखानें स्तब्ध बसली. अशा प्रकारचें भयंकर दुःख राम सहन करीत होते. पृथ्वीनें सीतेला म्हटलें, 'अगे, ह्या मुलांकडे बघ.' तेव्हां ती म्हणाली: 'मला अनाथाला मुलें घेऊन काय करावयाचें आहे !' तेव्हां गंगा म्हणाली ' बाईग तुझा आत्मा सगळ्या जगाचें कल्याण करतो, आम्ही देव तुझ्यामुळें पावन होतों. त्या तूं आपल्या आत्म्याला अशा प्रकारचा बोल लावूं नको. ' हीं त्यांचीं भाषणें रामलक्ष्मणांनीं ऐकलीं आणि लक्ष्मण म्हणाला, 'रामा, ऐका, ' तेव्हां राम म्हणाले, 'बाबा, मी ऐकून काय करूं ? जग, ऐकूं दे ' ह्यावरून राम आपल्या प्रजेच्या मताला किती मान देत होते, हें दिसून येतें. हीं वाक्यें मोठीं खुबीदार आहेत. पण प्रेमांतही रामानें असा नेम ठेविला होता. त्यावरून त्याचें प्रेम मला अपूर्ण वाटतें. कारण मला वाटतें, प्रेमांत नेम नाहीं, आणि आपल्यांत अलौकिक प्रेम

असून लोकापवादाकरितां राम मर्यादेंत राहिला म्हणून त्याच्या प्रेमानें माझी तृप्ति होत नाहीं. तरी पण प्राचीन लोकांप्रमाणें राम जें सीतेच्या प्रेमाला महत्व देत तें त्यांचें प्रेम स्तुतिपात्र आहे. त्यानंतरच्या काळांत

## श्रीकृष्णाचें मस्त प्रेम.

जास्त पुढें आलें, तें जास्त पूर्णत्व पावलेलें दिसतें; कारण राधेनें कुलमर्यादा व लोकलज्जा सोडून, प्रेमांत नेम नाहीं ही गोष्ट सिद्ध करून दाखविली; तेव्हां कृष्ण तिला म्हणे, 'तूं सर्व बंधन सोडून माझ्याशीं निर्दोष प्रेमानें बांधली गेली आहेस, याचा मोबदला मला कोणत्याही रूपानें देतां येणें शक्य नाहीं.' तेव्हां तिलाही असें वाटे कीं, जगतांतील सर्व स्त्रियांपेक्षां मी सुखी आहें. रामाच्या मर्यादित प्रेमापेक्षां ह्या निरंकुश प्रेमाची मी स्तुति करतों. ह्यांत अशा प्रकारची तन्मयता असत कीं, कित्येक वेळीं राधेला, मी कृष्ण आहें, असा भास होऊन ती आपल्यालाच 'राधा राधा' अशा हांका मारीत असे व कित्येकदां कृष्णाला आपण राधा आहों असें वाटून तो 'कृष्ण कृष्ण' असें म्हणत असे. अशा प्रकारची तन्मयता कोणत्याही प्रकारची मर्यादा नसते तेव्हांच होते."

## प्रेमाचें श्रेष्ठांत श्रेष्ठ स्वरूप.

"प्रेमाचें जें हें रूप दाखविलें आहे त्याच्या पुढें प्रेमी जनाचें प्रेम कांहींच नाहीं. प्रेमासंबंधीं श्रीकृष्ण गीतेंत म्हणतात: "सर्वभूतहिते रताः" सर्व जगाचें कल्याण करण्यांत प्रेम ठेवणार 'आत्मौपम्येन सर्वत्र'

आपल्या आत्म्याप्रमाणेंच सर्वांचा समजावा. “ यो मां पश्यति सर्वत्र सर्वंच मयि पश्यति” जो सर्वभूतीं मला पहातो, व माझ्यांत सर्वांना पहातो आणि शेवटीं “ वासुदेवः सर्वमिति ” हें सर्व ब्रह्मांड भगवद्रूप आहे, अशी ज्याची खात्री होते आणि अनुभव येतो त्याचें प्रेम किती विशाल, त्याची कल्पना करा. अशा प्रेमाचा परिणाम हाच कीं, ‘ यत्र यत्र मनो याति तत्र तत्र समाधियः’ आत्म्याची ही स्थिति आपल्या हल्लींच्या दर्जापेक्षां किती उत्तम आहे आणि किती स्वाभाविक आहे ! तेव्हां अशा प्रकारचा आनंद भोगतां येणें आणि पतिपत्नींनीं परस्परांमध्यें याचा अनुभव घेणें म्हणजे मोक्ष जवळ करणें आहे. कारण आपल्या अंतरात्म्यांत “ सर्वं खल्विदं ब्रह्म ” सर्व ब्रह्ममय आहे, असें वाटणें हाच मोक्ष होय.

---

## आपल्या वाईट स्थितीचें कारण.

पण अशा रीतीनें सगळीकडे ब्रह्म पहाण्याचें प्रेम राहिलें, पण “ सर्वभूतहिते रताः ” म्हणजे प्राणिमात्राचें चांगलें होण्यांत आनंद मानणें आणि तसें करण्याकरितां आपलें आयुष्य खर्चणें हें दुसऱ्या नंबरचें प्रेम आहे. राधाकृष्णाचें तिसऱ्या नंबरचें प्रेमही आपल्यांत नाहीं, रामाचें चवथ्या नंबरचें प्रेम [illegible] नाहीं, व प्राचीन काळच्या ऋषींचें थंड प्रेमही आपल्यांत [illegible]. त्याच्याही पलीकडची आपली स्थिति आहे व म्हणू[illegible] आपल्या देशाची दुर्दशा आहे व प्रेमाच्या उणिवेमुळेंच आपली ही स्थिति आहे; कारण दरएक चांगलें काम करावयाचें म्हटलें कीं प्रेम लागतें—व ह्या प्रेमाचें मूळ स्त्री—मध्य—बिंदु—लग्नस्नेहांत आहे व म्हणूनच आपल्या स्त्रियांत तें पवित्र प्रेम

वाढावें असें केलें पाहिजे. कारण ज्ञान आणि प्रेम हे स्वाभाविकरीत्याच प्रियकर मित्र आहेत, ते ते निराळे होणें शक्य नाहीं. म्हणून जेथें ज्ञान आहे तेथं प्रेम असणारच व प्रेम आहे तेथें ज्ञानाचा वास सहज होऊं शकेल. तेव्हां प्रेम आलें कीं चांगलीं कामें झालींच व अशा प्रकारचीं पुष्कळशीं चांगलीं कामें झालीं कीं देश सुधारलाच. आपल्या देशाच्या भविष्यकाळच्या प्रजेच्या व आपल्या धर्माच्या—ह्या सर्वांच्या उन्नतीचा आधार प्रेम हाच आहे. व होईल तें करून

## आपल्या स्त्रियांत प्रेम वाढेल असें केलें पाहिजे.

"ज्ञानानें प्रेम वाढतें म्हणून स्त्रियांत शिक्षण वाढविलें पाहिजे; कारण अद्याप आपल्यांतील पुष्कळ वर्ग अज्ञानांत आहे. कांहीं थोड्या लोकांत उगीच शिक्षणाची कल्पना मात्र आहे व फारच थोडीं माणसें चांगलीं आहेत. म्हणून सध्यां आपण "सहनाववतु" ह्या वेदांतील मंत्राप्रमाणें बरोबर अभ्यास केला पाहिजे. म्हणजे योग्यतेप्रमाणें हळू हळू प्रेमाच्या दुसऱ्या पायरीवर चढूं, म्हणून सध्यां लांब लांब कल्पना सोडून स्त्रियांत शिक्षण वाढवा; व तुम्ही तुमच्यांत व तुमच्या बंधुवर्गांत प्रेम वाढेल असें करा. आणि तसें होण्याकारितां आपल्या भगिनीवर्गांवर प्रेमाचे किरण पडूं द्या, म्हणजे ते कोंपऱ्याकोंपऱ्यांतून सुद्धां आपला प्रकाश पाडतील; पण तेही होत नसेल तर ह्या वकीलसाहेबांप्रमाणें आपल्या बायकोबरोबर प्रेम तरी करावयास शिका, म्हणजे पुष्कळ कल्याण होईल." असें म्हणून महाराजांनीं प्रसन्नमुखानें वकीलसाहेबांकडे पाहिलें.

तेव्हां ते म्हणाले, "महाराज, मी कांहीं इतका खोल शिरत नाहीं. इतका विचार केल्याशिवायच मला असें वाटतें कीं,

# सर्व कांहीं माझी रत्नप्रभाच आहे.

———०(:)०———

माझ्या अंतःकरणाची शांति, देवाची कांति, जीवनाची दोरी व अंतःकरणांतील शक्ति सर्व कांहीं ती आहे. तिचें मी काय वर्णन करावें? हा संसारसागर तरण्याचें साधन व त्यांतील अंधकारांत प्रकाश पाडणारा सूर्य तीच आहे. मला मनुष्यपणा देणारा जादुगार आणि संसारांत स्वर्गसुख आणणारी देवी तीच आहे. आपल्या दृष्टीच्या योगानें मला समाधि लावायला शिकविणारीण योगिनी ही अशी माझी ईश्वरी कृपा आहे.

"अहाहा! धन्य! प्रभु धन्य! हिच्याशिवाय मला कोणीं शांति दिली असती? माझ्या जीवनांत अमृत कोणीं घातलें असतें? आणि ह्या श्रेष्ठतेच्या शिडीवर मला कोणीं चढविलें असतें? माझ्या हृदयांतून वाहणाऱ्या ह्या रसज्ञतेच्या व प्रेमाच्या प्रवाहाला मोक्षाच्या मार्गाला कोणीं लाविलें असतें?

" अहाहा! काय तिचा आनंद! समजा कीं, ह्यांत माझ्या आत्म्याची आकर्षणशक्ति आहे, स्वाभाविक खुबी आहे, ज्ञानाचें भांडार आहे व केवळ उदारतेची मूर्ति आहे, आणि मला तारण्याकरितां मनुष्यरूपानें आलेली ही साक्षात् स्वर्गीची देवताच आहे. कारण तसें नसतें तर मी तिच्या आधीन झालों नसतों. तिचें सहज बोलणें ऐकण्यास सुद्धां मी आतुर असतों, तिच्या वाणींतून बाहेर पडणारें अमृत घेण्यास मी तयार असतों व तिच्या साध्या शब्दानें सुद्धां माझ्यांत नवें जीवन येतें. तिच्या दरएक हावभावांत व वागणुकींत मला काय वाटतें तें मला सांगतां येत नाहीं, " असें म्हणतांना त्यांच्या व त्यांच्या पत्नीच्या चेहेऱ्यावर जो आनंद दिसूं लागला त्याचें वर्णन करतां येणें शक्य नाहीं.

ह्यानंतर थोड्या वेळानें मीं म्हटलें, "रत्नप्रभाबाई, तुह्मी मोठ्या नशीबवान् आहां. कारण ज्या स्त्रीबद्दल तिचा नवरा इतक्या उच्च कल्पना बाळगतो तिचा संसार कसा सुखी असेल व ती किती नशीबवान् आहे. ह्याचा विचार करतांच मला आनंद होतो."

हे एकून रत्नप्रभाबाई म्हणाल्या, "होय, मी खरीच नशीबवान् आहें कारण दरएक स्त्रीची मोठ्यांत मोठी व खोल इच्छा अशी असते कीं, मला चांगल्यांत चांगला नवरा मिळावा. तेव्हां स्वाभाविक रीत्याच माझीही तशी इच्छा होती कीं, मला चांगला नवरा मिळावा. पण तो कसा असावा हें मला सांगतां येत नसे. पण एका बंगाली मासिकांत मला कसा 'नवरा पाहिजे ?' ह्या विषयावर बक्षीस लावून लेख मागितले होते, त्यांतला पसंत पडलेला लेख मीं वाचून जवळून समजून घेतला आहे व त्यांतील विचार माझेच असें मला वाटतें. पुढल्या आठवड्यांत माझ्या मैत्रिणीचें " बायकोस वश करण्याकरितां पुरुषांनीं काय करावें ? " या विषयावर व्याख्यान आहे तेव्हां तो तिला उपयोगी पडेल म्हणून दाखविण्याकरितां नेत होतें, तो माझ्याजवळ आहे. तो वाचून दाखवितें; म्हणजे माझें म्हणणें समजेल.

---

## मला कसा नवरा हवा ?

ज्याला पाहून माझे डोळे निवतील, माझ्या अंतःकरणाला शांतता मिळेल, माझ्या आत्म्याला संतोष होईल, माझें म्हणणें ऐकेल, माझे लाड करील, माझ्या सुखाकरितां संकटें सोशील, माझ्या सुखाकरितां आपल्या स्वार्थावर लाथ मारील, असा नवरा मला पाहिजे. मला हौशी, रसिक सुरेख, सशक्त, श्रीमंत, नीतिमान्, मानमरातब असणारा व शूर असा नवरा पाहिजे. ज्याच्यामध्यें गंभीरता, ज्याला अब्रूची चाड व स्वाभिमान यांची

गोडी असून नजरेंत प्रेम, आपला शब्द खरा करण्याची सचोटी, अंतःकरणांत उदारता, शांतपणा, स्वाभाविक श्रेष्ठता, इतरांचें मन आकर्षण करण्याची शक्ति, गोड वाणी, उत्तम विचार, निर्दोष वार्ताविनोद, वगैरे गुण आहेत असा नवरा मला पाहिजे. ज्याला सर्व लोक मान देतात, जो सर्व जनांचें प्रियपात्र, ज्याच्या सत्यासंबंधीं लोकांस अभिमान, ज्याच्या तोंडावर त्याच्या गुणाचें चीज दिसतें आहे असा नवरा मला पाहिजे.

ज्याच्याकडून आपल्याला मोठेपणा मिळावा अशी सर्वांची इच्छा असते, ज्याच्याजवळ क्षमा व शिक्षा हे दोन्ही गुण आहेत, जो माझ्या रूपगुणांवर संतुष्ट होईल व ज्याला पाहून बाकीच्या स्त्रिया माझ्या सुखाचा हेवा करतील, असा नवरा मला पाहिजे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ज्याला पहाण्यानें माझें समाधान होईल, ज्याच्या वाणीनें माझे कान तृप्त होतील, ज्याच्या दरएक गोष्टींत मला कांहींतरी विशेषता वाटेल, इतकेंच नव्हे तर ज्याच्या वाणीबरोबर माझें शरीर वळेल आणि ज्याची सेवा करण्यांत मला आनंद वाटेल, तसेंच ज्याला दुःखी पाहून स्वाभाविकरीत्याच माझ्या हातून अशी प्रार्थना होईल कीं, ' हे प्रभो ! ह्यांचें दुःख मला दे ' अशी भावना व असें प्रेम अंतकाळच्या शेवटल्या श्वासापर्यंत टिकूं शकेल व जो स्वर्गांतही माझी इच्छा करील व मी ज्याची चाकरी करूं शकेन असा नवरा मला पाहिजे.

---

## आपल्या नवऱ्यासंबंधीं रत्नप्रभाबाईंचे विचार.

आणि ताई, ईश्वरकृपेनें मला हे माझे पतिराज तसेच मिळाले आहेत आणि त्यामुळें मी फार सुखी आहें, आतां त्यांनीं माझ्यासंबंधीं जें सांगितलें तें सर्व कांहीं मी खरें मानीत नाहीं, पण सर्व दुनियेंत दासपणांत जे श्रेष्ठांत

श्रेष्ठ असे मारुति ते श्रीरामाबद्दल जसें समजत होते तसें मी माझ्या प्राणनाथांसंबंधीं समजतें. मारुति म्हणतात :—

देहभावेन दासोऽस्मि जीवभावे त्वदंशकः
आत्मभावे त्वनेवाहम् अद्वैतभावयोस्तथा ।

अर्थः—देहभावानें पाहतां मी तुमचा दास आहें, जीवभावानें पाहतां मी तुमचा अंश आहें, आणि आत्मभावानें पाहतां तुह्मी आणि मी एकच आहोंत, अशा तऱ्हेचा अभेदभाव मी ठेवितों. ”

हें ऐकून प्रोफेसरसाहेब म्हणाले, “ देहभावानें मी तुमची दासी आहें आत्मभावानें तुह्मी आणि मी दोघें एकच आहों, हें तर समजलें. पण जीवभावानें पाहतां मी तुमचा अंश आहें ह्याचा अर्थ काय ? ” तेव्हां रत्नप्रभाबाई ह्मणाल्या, “ देहाचा नाश झाल्यावरही मन, बुद्धि, चित्त, अहंकार, प्राण आणि इंद्रियें वगैरे तत्त्वें कायम राहतात, त्याला लिंगदेह अगर सूक्ष्म शरीर म्हणतात. त्याचा जीवाशीं संबंध आहे. ह्या सर्व उत्तम आणि बलवान् तत्त्वांत मी माझ्या प्रियकरांची अंशरूप आहें, म्हणजे हीं सर्व तत्त्वें माझ्या प्रियकरात जास्त आहेत आणि माझ्यांत थोडीं आहेत असें मला वाटतें, म्हणून त्यांची इच्छा तीच माझी इच्छा, त्याचा हुकूम तेंच माझें कर्तव्य, त्यांचें सुख तेंच माझें सुख, त्यांना जें आवडतें तेंच मला आवडतें, त्यांना संतोषित ठेवणें हाच माझा धर्म. कारणें इंद्रियनिग्रह, मनाची दृढता, बुद्धीची विशालता, प्राणाची प्रबलता वगैरे उत्तम आणि बलवान् तत्वें जशीं माझ्या प्रियकरांत आहेत तशीं माझ्यांत नाहींत. पण अंश मात्र माझ्यांत आहे. म्हणून जशी देहाबरोबर देहाची छाया राहते तशी मी त्यांच्याबरोबर असतें; म्हणजे मला असेंच वाटतें कीं त्यांच्या जीवनांतूनच मला जीवन मिळत आहे. म्हणून मारुतीप्रमाणें मी त्यांना ह्मणतें कीं, जीवरूपानें मी तुमचा अंश आहें. कारण जर मी अंशरूपानें त्यांच्याबरोबर राहिलें, तरच अभेदभाव अनुभवूं शकेन. पण जर मी अंश नसेन, म्हणजे माझ्यांत त्यांच्याहून विरुद्ध प्रकारचीं तत्त्वें असतील, तर मी त्यांच्या बरोबर

एकरूपतेचें सुख अनुभवूं शकणार नाहीं; आणि जरी कदाचित् तीं सर्वच तत्त्वें त्यांच्याइतकींच माझ्यांत असतील तरी माझें पूर्ण प्रेम त्यांच्यावर बसणार नाहीं; कारण प्रेमाचा एक असा नियम आहे कीं, सबळाचें सबळावर व निर्बळाचें निर्बळावर प्रेम असूं शकत नाहीं; म्हणून सबळाचें निर्बळावर व निर्बळाचें सबळावर प्रेम असतें. म्हणूनच पुरुष, स्त्रीत्वानें युक्त अशी म्हणजे दीनता, आधीनता, नाजूकपणा आणि प्रेम ह्यांनीं युक्त अशीच पत्नी पसंत करितात. कारण खरोखर स्त्रीत्वानें युक्त अशा स्त्रिया आपल्या पतीला आपल्याहून नेहमीं श्रेष्ठच पहाण्यास इच्छितात; आणि जर पतीची श्रेष्ठता कमी झाली तर स्त्रीचें प्रेमही कमी होतें. कारण प्रेमाचा संबंध कांहीं देहाशीं नाहीं, अंतःकरणाशीं आहे व अंतःकरणाचा संबंध जीव आणि ईश्वर ह्यांच्याशीं आहे म्हणून माझ्या प्रियकराशीं तन्मय होऊन जाण्याकरितां एकरूपतेचा अनुभव घेण्यासाठीं, प्रेमसमुद्रांत बुडण्यासाठीं, संसारांत स्वार्गाचा अनुभव घेण्यासाठीं, आयुष्याचें सार्थक करण्यासाठीं, आत्म्याला परमात्म्यापाशीं नेण्यासाठीं, देहरूपानें मी माझ्या प्रियकराची दासी आहें, जीवरूपानें मी त्यांचा अंश आहें, व आत्मरूपानें आह्मी दोघें एकच आहोंत. हे प्रभो, मला तारण्याकरितां माझ्या ह्या भावना आयुष्याच्या शेवटल्या श्वासापर्यंत कायम ठेव." असें म्हणत म्हणत रत्नप्रभाबाईनीं आपले हात जोडून मस्तक खालीं केलें. त्या वेळेस त्यांच्या नेत्रांतून प्रेमाचे अश्रू येऊं लागले आणि त्यांच्या चेहेऱ्यावर एक प्रकारचें अलौकिक तेज चमकूं लागलें. तें पाहून तो अपूर्व आनंद घेत घेत द्रवलेल्या अंतःकारणानें वकीलसाहेबानीं आपला रुमाल त्यांच्याकडे फेंकला.

---

## स्त्रियांच्या हंसतमुखाचा प्रताप.

त्यानंतर ती प्रेमाची समाधि पहात महाराज प्रोफेसरसाहेबांना म्हणाले, "आपल्या नवऱ्याच्या गोष्टी सांगण्यानें इतका आनंद होणें, इतकें अंतः-

करण द्रवणें आणि अशी समाधि लागणें, हें काय स्त्रियांचें महाभाग्य नाहीं ! आणि हें सर्व कशामुळें ? फक्त थोडी आधीनता, थोडी सेवा, साधारण उच्च भावना, ह्यांपासून इतकें होतें. म्हणून मी म्हणतों कीं, स्त्रिया जर आपल्या स्त्रीत्वाला समजल्या तर त्या आपल्या हंसतमुखानें आनंद वाढवून ह्या संसारांत स्वर्ग आणूं शकतील. ”

हें ऐकून प्रोफेसरसाहेब म्हणाले, “ अहाहा ! काय हें अलौकिक तेज ! काय हृदयांतही न राहणारा आनंद ! काय ती आधीनता ! किती उच्च भावना ! किती एकाग्रता ! मला तर असें वाटतें कीं, आतां ह्यांतूनच ईश्वर उत्पन्न होतो कीं काय ! महाराज, असा देखावा मीं कधीं पाहिला नव्हता. इतका परिणाम मजवर कधीं झाला नव्हता, आणि असा अंतःकरणापर्यंत पोहोंचलेला आनंद मीं कधीं बघितला नव्हता. हें सर्व मीं आजच रत्नप्रभाईपासून मिळविलें. अहाहा ! स्त्रियांपुळें आपल्या सगळ्यां-वर इतका परिणाम होत असेल व जगाचें इतकें कल्याण होत असेल असे मला माहीत नव्हतें. महाराज, असा अनुभव आला असूनही अजून मला असें आश्चर्य वाटतें कीं, नुसत्या हंसतमुखानें इतका परिणाम कसा होतो ? ” तेव्हां महाराज म्हणाले, “ बाबा ! देवांचे प्रतिनिधी व दयेच्या देवी म्हणून स्त्रियांचे अवतार आहेत, म्हणून माझे स्नेही एक महात्मे म्हणतात कीं,

---

## स्वर्गाचा निरोप.

“ हे ईश्वराच्या लाडक्यांनो ! जगताच्या स्तंभांनो ! संसारांतील अमूल्य रत्नांनो, तुमच्या बहिणींना हा स्वर्गीचा निरोप कळवा कीं, हे प्रभूच्या लाडक्या कन्यकांनो, तुमचा दर्जा फार मोठा आहे, तुमच्या हास्यानें देवता प्रसन्न होऊन जगताला आशीर्वाद देतात; कारण जेव्हां सुख असतें तेव्हांच हंसूं येतें व त्या तऱ्हा हंसण्यानें अंतःकरणांत प्रेम

येतें; व जगांत आनंद व प्रेम ह्यांचे झरे वाहूं लागतात. म्हणून देवीची दुसरी प्रतिमा अशा स्त्रिया हंसल्या म्हणजे देवता प्रसन्न होतात. जेव्हां निर्दोष कुमारिका हंसतात तेव्हां लक्ष्मी प्रसन्न होते. नाजूक स्त्रियांच्या मधुर हास्यानें पुरुषांत नवें जीवन येतें, रसिक मुग्धांच्या हास्यानें आनंद वाढतो, आणि सुनीतिमान् स्त्रियांच्या हास्यानें जगांत ईश्वरी स्नेहाचा फैलाव होतो. म्हणून हे बंधूंनों, स्वर्गीचा असा निरोप आहे कीं, स्त्रियांना सदा सुखी ठेवा. कारण हास्य हे सुखाचे फवारे आहेत व तें सुख मिळविण्याची किल्ली हास्य आहे. म्हणून त्यांना आनंदांत ठेवा."

हें ऐकून व रत्नप्रभाबाईची प्रेमसमाधि पाहून यागिनी माता म्हणाल्या "पूर्वीचे महान् पवित्र ऋषि अशी प्रार्थना करीत कीं,

**ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः ।**

**भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ॥**

**स्थिरैरङ्गैस्तुष्टुवांꣳ सस्तनूभिः ।**

**व्यशेम देवहितं यदायुः ॥**

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

**अर्थः**—हे पूजण्यायोग्य परमेश्वरा, आमच्या कानांनीं आम्हीं कल्याणकारक गोष्टी ऐकाव्या, डोळ्यांनीं कल्याणकारक कामें पहावीं, आमचीं इंद्रियें व शरीर मजबूत होईल आणि तुझें भजन करीत करीत त्वां दिलेलें संपूर्ण आयुष्य आम्हीं भोगावें आणि तिन्ही प्रकारच्या दुःखांतून शांति मिळावी असें कर.

"बंधू आणि भगिनींनो, प्राचीन ऋषी अशी प्रार्थना करीत. पण आपल्या देशांत अशीं प्रेमळ दंपत्यें झालीं तर आपल्यालाही अशा प्रार्थना करायची वेळ लवकरच येईल. हे प्रभो ! आमच्या देशाला व आमच्या लोकांना अशी वेळ लवकरच येवो—येवो !" हें ऐकून सर्व 'तथास्तु,' म्हणाले.

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

IRBK-0100102

IRBK-0100102